# पंचतंत्र

PDF



**Five Techniques Of Management...**

a

# पंचतंत्र

संपादक- सुनीळ सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान

a


पुस्तकाचे नांव : पंचतंत्र

प्रकार : गोष्टीरूप ज्ञान

प्रथमावृत्ती : २६ नोव्हेंबर २०१३

द्वितियावृत्ती: Kindle- 1 Jan 2021

तृतियावृत्ती: Mobile- 16 Dec 2021

चतुर्थावृत्ती- १६ मार्च २०२४

मुखपृष्ठ : लास्ट बेंच डुडल

# ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

पत्ता : जी ११०२, इटर्निटी

तीन हात नाका , ठाणे, ४००६०४

www.esahity.com

फ़ोन : 9987737237


ई साहित्य प्रतिष्ठान ही नोंदणीकृत संस्था असून अनेक लेखक वाचकांनी एकत्र येऊन सुरू केली. संस्थेतर्फ़े दर आठवड्याला एक मराठी ई पुस्तक चाळीस देशांतील सुमारे 6 लाख वाचकांना विनामूल्य वितरित केले जाते. त्याशिवाय ई साहित्यच्या विविध वेबसाईट्सना लाखो लोक व्हिजिट करतात.


- हे पुस्तक विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध आहे
- आपले वाचून झाल्यावर आपण हे पुस्तक फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2024

हे पुस्तक ताम्रमुख गुरुजींना अर्पण

हे ताम्रमुख गुरुजी कोण ?

ते हे पुस्तक वाचता वाचता कळेल.

त्यांना हे पुस्तक का अर्पण केले?

हे जर पुस्तक पूर्ण वाचून कळले नाही

तर पुन्हा पुन्हा पुस्तक वाचत रहा.

----- सुनीळ सामंत

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान

# अदृश्य खजिन्याची गोष्ट

फ़ार फ़ार जुनी गोष्ट आहे. एक घनदाट जंगल होते.त्या जंगलात एक सिंह राज्य करत होता. त्याला सर्वजण घाबरत आणि त्याचेच सर्वजण ऐकत. एके दिवशी एक कोल्हा त्याच्याकडे आला आणि म्हणाला...

लहानपणी आपण सर्वांनीच अशा गोष्टी ऐकल्या असतील. वाचल्याही असतील. या गोष्टींतले प्राणी बोलत. गुंतागुंतीचा विचार करत. एकमेकांना उपदेश करत. एकमेकांवर कुरघोडी करत. यातला कोल्हा लबाड असे. गाढव बिनडोक असे. ससा चतुर असे. हत्ती शांत डोक्याने विचार करी. ईसापनिती, जंगल जंगल बात चली है पता चला है म्हणत गोष्टी सांगणारं जंगलबुक, हितोपदेश, पंचतंत्र अशा पुस्तकांतून अशा खूप गोष्टी वाचल्याही असतील. गंमत जंमत करत शिकवण देणाऱ्या आणि संस्कार करणाऱ्या या गोष्टी तुम्हाला आठवत असतील वा नसतील कदाचित. पण त्या गोष्टींनी तुमच्या मनावर केलेले खोलवरचे संस्कार मात्र तुमच्या मनातून आजही पुसले गेले नसणार. आणि हीच तर या गोष्टींची खासियत. पुर्वीच्या काळी या आणि अशाच गोष्टींतून मुलं शहाणपण आणि मूल्यं शिकत. त्याचा वापर आयुष्यभर करत. वेगवेगळ्या क्षेत्रांत उच्च शिक्षण घेतलं तरी मूल्यशिक्षण आणि शहाणपणाची शिदोरी मात्र बालपणी याचगोष्टींतून मिळालेली असे.

हल्ली जो तो उठतो तो एम बी ए करतो. तीसेक वर्षांपुर्वी MBA हा शब्दही फ़ारसा कुणाला माहित नव्हता. मॅनेजर बनण्यासाठी काही विशेष वेगळं

a

शिकावं लागतं हेही माहित नव्हतं लोकांना. मुळातली बुद्धीमत्ता आणि अनुभव यांच्या जोरावर लोक मॅनेजर बनत. पण ते काम करत कसं? की जुने सगळे लोक मठ्ठ होते? त्यांना ते शहाणपण कुठून मिळे?

या MBA मध्ये सगळी जी तंत्रं शिकवतात ती Maslow, Peter Drucker, Koontz, Douglus Mcgregor, Philip Kotlerवगैरे पश्चिमी महान लोकांनी शोधली असं सांगितलं जातं. “म्हणजे मग त्यांच्या आधीच्या लोकांचं काय? भारतीय वगैरे लोकांना काही अक्कलच नव्हती का?” असं मला नेहमी वाटायचं. पण चाणक्य, दासबोध वगैरेंमध्ये जे शहाणपण शिकवलं जातं त्याचं काय?

अचानक पंचतंत्र हाती आलं. म्हणजे लहानपणी गोष्टी वाचल्या होत्या. मस्त होत्या. गंमतीदार होत्या. पण त्यातलं शहाणपण हे म्हणजे आताचं मॅनेजमेंटचं शास्त्र, आणि तेही व्यवस्थित मुद्देसूद स्वरूपात मांडलेलं हे आत्ता लक्षात आलं. Five Techniques of Management. पंच तंत्र. कुठेही राज्य करण्यासाठी पाच तंत्रं यायला हवीत.

खूप बारकाईने आणि गंभीरपणे विचार केला की हे लक्षात येतं की हा एक फ़ार मोठा खजिना आहे. अगदी सहज हाताशी असलेला. पण झालंय काय की घरकी मुर्गी दाल बराबर. आपल्याच देशातलं हे पंच तंत्र आपण ना बारकाईने अभ्यासत. ना गंभीर घेत. टाईमपास म्हणून वरवर वाचतो फ़ारतर. तेही लहानपणी.

म्हणूनच आता आम्ही हे पंच तंत्र मोठ्यांसाठी त्याच्या मूळ रुपात आणलं आहे. याचा तुम्ही अभ्यास करावा. नीट पहावं. अगदी जसा MBA चा करतो

तसा अभ्यास करावा. जमल्यास हे पुस्तक वाचल्यानंतर एक प्रश्नपत्रिका तयार करावी. आणि त्यात पास होणाऱ्यांना पंचतंत्र विशारद ही पदवी द्यावी.

पंचतंत्र वारंवार आणि सूक्ष्मपणे वाचताना या २३०० वर्षांपूर्वीच्या त्या विष्णुगुप्तांना मनातून शंभरदा साष्टांग दंडवत घालून झाला माझा. कारण हा अभ्यासक्रम तयार करतांना त्यांनी जी गुंतागुंतीची पद्धत, पण वरवर सहज साधी सोपी गोष्टीरूप करून वापरली आहे त्याला जगात तोडच नाही. पाचही तंत्रांचा सखोल अभ्यास, तोही त्याच्या सर्व अंगांचा, त्यातही संयमित उपयोग कसा करावा, अतिरेक होऊ नये, बॅलन्स कसा करावा हे सर्व त्यात आलंय. Is Management an art or science? “मॅनेजमेंट हे शास्त्र की कला” हा प्रश्नच श्रीमान विष्णूगुप्तांनी निकालात काढला. इतक्या कलात्मक रितीने सौंदर्यपूर्ण काव्यरूपात, छंदबद्ध, गण मात्रांचा बॅलन्स संभाळून इतकं गहन शास्त्र इतक्या काटेकोर पद्धतीने, इतकं अचूकपणे, परिणामकारक पद्धतीने विद्यार्थ्यांच्या डोक्यात ठोकून पक्कं करणारं एक, एक तरी उदाहरण कोणी पश्चीमी मॅनेजमेंटशास्त्रात दाखवावं.

याचा अर्थ नवीन मॅनेजमेंट शास्त्र निरुपयोगी आहे असं अजिबात नाही. आताच्या समाजात आणि आर्थिक परिस्थितीत खेळाचे नियम बदललेले आहेतच. त्याच बरोबर या पुस्तकातली जाती पाती आणि स्त्रीविषयक मतं ही जुनाट आणि न पटणारी आहेत. त्यामुळे या पुस्तकाचा आधार घेऊन वागायला जाणं हे अनेकदा चुकीचं ठरेल. हे पुस्तक वाचताना त्याचा काळ आणि त्या काळची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती यांचं भान ठेवूनच वाचायला हवं. या पुस्तकातील अनेक मतांशी आम्ही सहमत नाही.

पण २३०० वर्षांपूर्वी लिहीलेलं पंच तंत्र आताच्या मॅनेजमेंट विद्यार्थ्यांनी एकदातरी तंत्र म्हणून नीट अभ्यासलंच पाहिजे हा मात्र आग्रह आम्ही धरतो. त्यातला प्रत्येक प्राणी हा विशिष्ट मानवी प्रवृत्तीचा प्रतिनिधी आहे. आणि असे दोन किंवा अनेक प्रवृत्तींचे लोक एकत्र येतात तेव्हा त्यांच्यात काय घडतं, त्यांच्याशी आपण कसं वागावं, आपलं नुकसान होऊ न देता त्यांच्याशी मैत्री कशी करावी, आपल्याविरुद्ध कोणी जात असेल तर त्याच्या त्याच्या प्रवृत्तीनुसार त्याच्यापासून कसं निपटावं... एक ना अनेक असंख्य धडे या गोष्टींतून घेता येतील.  या गोष्टी कालातीत आहेत. आणि म्हणूनच हे ज्ञानही २३०० वर्षांनतर जिवंत आहे. उपयोगी आहे.

आणि त्याच्याबरोबर मनोरंजन... फ्री फ्री फ्री... आहेच.

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

# पंचतंत्राच्या गोष्टींची गोष्ट

सुमारे २३०० वर्षांपुर्वीची गोष्ट आहे. दक्षिण भारतातील महिलारोप्य नावाच्या नगरात अमरशक्ती नांवाचा राजा राज्य करीत असे. त्याला बहुशक्ती, ऊग्रशक्ती आणि अनंतशक्ती नांवाचे तीन मुलगे होते. राजा अमरशक्ती अतिशय पराक्रमी, उदार आणि हुषार होता. तर त्याचे हे तीन मुलगे मात्र गर्वीष्ठ आणि मूर्ख होते. राजाच्या काळजीला सुमार नव्हता. आपले जर हे तीन पुत्र असेच राहिले तर आपल्या या उत्तम महिलारोप्य नगराचे आपल्यानंतर काय होणार या चिंतेने त्याला ग्रासले होते. अनेक उपाय झाले. अनेक गुरू झाले. साधू, महात्मे झाले. उपदेश झाले. पण पुत्र काही सुधारत नव्हते. तेव्हा राजा अमरशक्तीने दरबारात आपली चिंता मांडली. राजाचा एक मंत्री सुमती याने राजाला पंडित विष्णूशर्माचे नांव सुचवले. पंडित विष्णूशर्मा सर्व शास्त्रांत पारंगत असून विद्यार्थ्यांना शिकवण्यात वाकबगार आहे असे मंत्र्यांचे म्हणणे पडले. तेव्हा पंडित विष्णूशर्मांशी राजाने संपर्क साधण्याचे ठरवले.

राजा अमरशक्तीने विष्णूशर्मांना दरबारात पाचारण केले व आपल्या मुलांना शिकवण्याची विनंती केली. जर विष्णूशर्मा या अशक्य कार्यात यशस्वी झाले तर त्या बदल्यात त्यांना शंभर गांवे ईनाम देण्याची राजाने घोषणा केली. परंतू विष्णूशर्माने ईनामाला नकार दिला. याउलट

त्याने प्रस्ताव ठेवला की राजाने तीनही पुत्रांना सहा महिन्यांसाठी विष्णूशर्माच्या हवाली करावे. विष्णूशर्मा या सहा महिन्यांत त्यांना शिक्षित करून पाठवील. जर यात तो असमर्थ ठरला तर त्याला मृत्यूदंडाची शिक्षा देण्यात यावी.

हे ऐकून राजा आश्वस्त झाला. त्याने अत्यानंदाने आपल्या मुलांना राजाच्या आश्रमात पाठवले. विष्णूशर्माची शिकवण्याची एक वेगळीच रीत होती. तो व्यावहारीक नीती प्राण्यांच्या कथांद्वारे समजावून सांगत असे. त्याने व्यवहारशास्त्राची पाच सूत्रे सांगितली. त्यातूनच जन्माला आले पंचतंत्र.

त्याचे एकूण पाच भाग असून प्रत्येक भागास ‘तंत्र’ अशी संज्ञा आहे. प्रत्येक भागाचा विस्तार एका मुख्य कथेच्या आधारे दुसऱ्या कथा रचून केला गेला असल्यामुळे त्याल ‘तंत्र’ (तनु विस्तारे) ही संज्ञा दिली गेली असणे शक्य आहे. म्हणून त्याला म्हणतात पंचतंत्र.

पंचतंत्रातील पाच तंत्रांना (१) मित्रभेद, (२) मित्रसंप्राप्ती, (३) काकोलूकीय किंवा संधि-विग्रह, (४) लब्धप्रणाश (मिळालेले घालविणे) आणि (५) अपरिक्षितकारित्व (घाईने केलेली कृती) अशी नावे आहेत. प्रत्येक तंत्राचे नाव त्याच्या आरंभीच सांगितले आहे आणि मुख्य कथेचे सूचन करणारा एक ‘आद्य श्लोक’ ही दिलेला आहे. उदा., ‘मित्रभेद’ ह्या पहिल्या तंत्राच्या आरंभी -

वर्धमानो महान्स्नेहः सिंहगोवृषयोर्वने।

पिशुनेनातिलुब्धेन जंबुकेन विनाशितः।।

प्रस्तुत ई पुस्तकात संस्कृत श्लोकांची काही उदाहरणे दिलेली आहेत. परंतू शक्यतो कथेचा ओघ त्यामुळे थांबणार नाही याची काळजी घेतली आहे. हे सर्व श्लोक संस्कृत काव्याची उत्तम उदाहरणे आहेत. कमीत कमी शब्दांतून जास्तीत जास्त बोध देण्याची क्षमता त्यांतून दिसते.

(वनामध्ये सिंह अणि बैल ह्यांची वाढती मैत्री एका दुष्ट आणि अतिलोभी कोल्ह्याने नाहीशी केली) असा आद्य श्लोक आहे.

उपर्युक्त श्लोक गुरू विष्णुशर्मा ह्याने उच्चारल्याचे पंचतंत्रात स्पष्ट म्हटलेले नसले, तरी तसे गृहित धरता येईल. ह्या श्लोकावर राजपुत्र ‘असे कसे झाले?’ असा प्रश्न विचारतात आणि मग पिंगलक नावाचा सिंह आणि संजीवक नावाचा बैल ह्यांच्या मैत्रीत एका कोल्ह्याने फूट पाडल्यामुळे अखेर पिंगलकाने संजीवकास मारले, ही ह्या तंत्रातील मुख्य कथा विष्णुशर्मा सांगतो. कथेत येणाऱ्या उपकथांचा आरंभ असाच एखाद्या श्लोकाने होतो; परंतु ह्या उपकथा कथेतली पात्रे सांगतात, अशी योजना आहे.

a

हीच कथा आताच्या जीवनात कशी लागू होते ते पाहू. सिंह म्हणजे अधिकारी व्यक्ती. बैल म्हणजे त्याचा मित्र. कोल्हा म्हणजे अधिकारी व्यक्तीपासून लांब झालेला जुना सहकारी. आपण यातल्या कोणत्या परिस्थितीत आहात यावर या कथेतून काय धडा घ्यावा ते ठरते. जर आपण अधिकारी असाल तर आपल्या भोवतालचे लोक आणि आपण यांत फ़ूट पाडण्यासाठी कोण काय करत असतं त्यावर आपली नजर पाहिजे हा एक धडा. आपण जर अधिकारी व्यक्तीचे मित्र असू तर आपल्यात आणि अधिकाऱ्यात फ़ूट पाडण्यासाठी कोण कोण काय करतं आहे याची दखल घेणं आवश्यक आहे हा दुसरा धडा. जर आपण अधिकाऱ्याचे जुने सहकारी असू आणि अधिकारी नवीन मित्रांच्या आहारी गेला असेल तर त्यांना दूर कसे करावे हा तिसरा धडा. एकाच कथेतून आपल्या परिस्थितीनुसार वेगवेगळे धडे मिळतात. अशा प्रकारे सर्व सत्तर कथा वेगवेगळ्या कोनांतून वाचल्या पाहिजेत.

मित्रभेद कसा केला जातो, हे पहिल्या तंत्रात सांगून झाल्यानंतर ‘मित्रसंप्राप्ती’ ह्या दुसऱ्या तंत्रात कपोतराज चित्रग्रीव, त्याचा मित्र मूषक हिरण्यक, हिरण्यकाची मैत्री संपादन करणारा कावळा लघुपतनक, त्याचा मित्र कासव मंथरक आणि शेवटी ह्यांना येऊन मिळणारा मृग चित्रांगद ह्यांच्या मैत्रीची कथा आहे. ‘संधि-विग्रह’ किंवा ‘काकोलूकीय’ ह्या तिसऱ्या तंत्रात कावळे आणि घुबडे (काक व

a

उलूक) ह्यांच्या वैराची मुख्य कथा असून कावळयांचा राजा मेघवर्ण हा आपल्या सचिवाच्या-स्थिरजीवीच्या-कपटनीतीचे अवलंबन करून उल्लूकराज अरिमर्दनाची गुहा जाळून टाकतो, असे दाखविले आहे. ‘लब्धप्रणाश’ म्हणजे हाती आलेले घालविणे. ह्या चौथ्या तंत्रात हाती आलेले वानर सुसराने कसे घालविले, ती कथा आहे आणी पाचव्या तंत्रात परिस्थिती नीट समजून घेण्यापूर्वीच जो घाईने कृत्य करतो, त्याच्यावर पश्चात्तापाची वेळ कशी येते, हे एक ब्राह्मण आणि मुंगूस ह्यांच्या कथेतून दाखविले आहे.

पंचतंत्रातील पात्रे मुख्यतः पशुपक्षी असली, तरी काही कथांत मनुष्यपात्रेही आहेत. शिवाय पंचतंत्रातील पशुपक्षी हे विविध वृत्तिप्रवृत्तीच्या माणसांची प्रतीके म्हणूनच येतात. साहजिकच त्यांचा वर्तनक्रम माणसांसारखाच दाखविलेला आहे. उदा., एका कथेत गाढवाचे हृदय आणि कान औषध म्हणून खण्याच्या आधी सिंह स्नानादी नित्यकर्मे करून येतो, असे वर्णन आहे (तंत्र चौथे, लब्धप्रणाश).

मूळ पंचतंत्र आज उपलब्ध नाही. लहानमोठे फरक असलेले त्याचे दोनशेहून अधिक पाठ मिळतात. ह्या पाठांच्या सामान्यतः ज्या परंपरा मानता येतात, त्या अशा :

a

(१) पेहलवी : इसवी सनाच्या सहाव्या शतकात पंचतंत्राचे पेहलवी भाषांतर झाले. ह्या भाषांतर झाले. ह्या भाषांतराचे नाव ‘करटक आणि दमनक’ (मराठी शीर्षकार्थ) असे होते. पंचतंत्राच्या पहिल्या तंत्रात येणाऱ्या दोन कोल्ह्यांच्या नावांवरून ते दिल्याचे दिसते. मूळ पेहलवी भाषांतर आज उपलब्ध नाही. तथापि ह्या भाषांतरावरून तयार केलेली सिरीॲक आणि अरबी भाषांतर मिळतात. अरबी भाषांतराच्या आधारे ग्रीक, लॅटिन, स्पॅनिश, इटालियन, चेक आदी यूरोपीय भाषांत पंचतंत्राचे अनुवाद झाले.

(२) बृहत्कथेतील पंचतंत्र : गुणाढ्याच्या बृहत्कथेत त्याने पंचतंत्र अंतर्भूत केले होते, असे दिसते. तसे असल्यास त्या कथा पैशाची प्राकृतात लिहिल्या गेल्या असल्या पाहिजेत; तथापि गुणाढ्यकृत बृहत्कथा आज उपलब्ध नाही. क्षेमेंद्राच्या बृहत्कथामंजरीत आणि सोमदेवाच्या कथासरित्सागरात (अकरावे शतक) पंचतंत्रातील कथा आहेत आणि त्या पद्यमय आहेत. क्षेमेंद्र आणि सोमदेव ह्यांचे हे कथाग्रंथ बृहत्कथेच्या आधारे लिहिले गेले, असे म्हटले जाते.

(३) तंत्राख्याथिक : हे नाव असलेली काही हस्तलिखिते काश्मीरात सापडली आहेत. हा पंचतंत्राचा सर्वात जुना पाठ असावा. मूळ पंचतंत्राच्या तो बराच जवळचा असण्याचीही शक्यता दिसते; मात्र

a

तो अगदी मुळावरहुकूम असल्याचा काही विद्वानांचा दावा सर्वमान्य झालेला नाही.

(४) दक्षिण भारतीय पंचतंत्र : ह्याची हस्तलिखिते दक्षिण भारतात मिळालेली आहेत. पंचतंत्राचे बरेच संक्षित असे रूप त्यांत दिसते. हे पंचतंत्र तंत्राख्यायिकाला अतिशय जवळचे आहे, ह्या दक्षिण भारतीय पाठावरून तयार करण्यात आलेले अनेक पाठ लोकांत प्रसृत झाले.

(५) नेपाळी पंचतंत्र : हे पद्यमय असून दक्षिण भारतीय पंचतंत्राला बरेच जवळचे आहे. ह्याचे फक्त एक हस्तालिखित मिळते.

(६) जैन पंचतंत्र : ‘टेक्स्टस सिंप्लिसिअर’ ह्या नावाने हे ओळखले जाते. पंचतंत्राच्या ह्या पाठाचा कर्ता अज्ञात असला, तरी एका जैन व्यक्तीने तो तयार केला असावा अणि इ. स. चे नववे ते अकरावे शतक ह्यांच्या दरम्यान कधी तरी तो झालेला असावा, असा तर्क पंचतंत्राचे एक विख्यात संशोधक डॉ. योहानेस हेर्टेल ह्यांचा आहे. तथापि ह्या पाठात जैन प्रवृत्ती दिसून येत नाहीत. ह्या टेक्स्टस सिंप्लिसअरवरून पूर्णभद्र नावाच्या एक जैन यतीने एक नवा पाठ तयार केला (११९९). हा पाठ तयार करण्यासाठी तंत्राख्यायिकेच्या एका उत्तरकालीन पाठाचाही पूर्णभद्राने उपयोग केलेला दिसतो. पूर्णभद्राच्या ह्या पाठास ‘टेक्स्टस ऑर्नाटिअर’ आणि ‘पंचाख्यान’ अशी नावे आहेत. त्यात काही नव्या कथा आणि सुभाषिते आलेली आहेत. पंचतंत्राच्या

a

उत्तरकालीन पाठांत हा पाठ सर्वोत्तम समजला जातो. टेक्स्टस सिंप्लिसिअर आणि टेक्स्टस ऑर्नाटिअर हे दोन पाठ भारतात फार मोठ्या प्रमाणावर प्रसुत झाले. ह्या दोहोंच्या आधारे काही नवे पाठही तयार करण्यात आले. जैन मुनी मेघविजय ह्याच्या पंचाख्यानोद्धाराचा (१६५९-६०) अंतर्भाव अशा पाठांत होतो.

पंचतंत्रात आढळून येणारी गद्यशैली साधी पण वेधक आहे. शिवाय विविध कथांचे सार कलापूर्ण, सुभाषितात्मक श्लोकांत देण्याची पद्धती पंचतंत्राने अवलंबिलेली आहे. उपदेश करणे हा प्रधान हेतू असूनही त्यातील कथांची मनोरंजकता कमी झालेली नाही. अनेक शतके आणि अनेक ठिकाणी ज्यांतील कथा पिढ्यान् पिढ्या मोठ्या आवडीने वाचल्या गेल्या, सांगितल्या गेल्या अशा काही थोड्या ग्रंथांमध्ये पंचतंत्राचा समावेश होतो. पन्नासांवर भाषांत ते अनुवादिले गेले आहे, ह्यावरून त्याची लोकप्रियता लक्षात येऊ शकेल.

मनोरंजक स्वरूप व्यवहारज्ञान प्राप्त करणे, व्यवहारात चतुर बनवणे, धुर्तांच्या धूर्ततेचा परिचय करून देणे हा पंचतंत्राचा हेतू आहे.

# तंत्र पहिले

## मित्रभेद

(दोन मित्रांत भांडण कसे लावून द्यावे.)

यातली उपतंत्रं सुद्धा फार महवाची आहेत.



a

# गोष्ट पहिली

## धन आहे तर सर्व आहे, धनाविना जीवन व्यर्थ आहे

विष्णुशर्मा त्या तीन राजकुमारांना म्हणाला, 'तुम्ही राहात असलेल्या या महिलारोप्य नगरात फार वर्षापूर्वी 'वर्धमानक' नावाचा एक वैश्यपुत्र राहात होता. एके रात्री तो अंथरुणात पडला असता त्याच्या मनात विचार येऊ लागले, आपल्याला जरी पैशांची कमतरता नसली तरी, आहे या संपत्तीत समाधान मानण्यात काय अर्थ आहे? म्हटलंच आहे ना?

*न हि तद्विद्यते किंचिद्यदर्थेन न सिद्ध्यति ।*

*यत्नेन मतिमांस्तस्मादर्थमेकं प्रसाधयेत् ॥*

(**जे पैशानेही साध्य होत नाही, असे या जगात काहीही नाही. म्हणून बुद्धिवंताने प्रयत्न करून फक्त पैसाच मिळवावा.**)

या पैशात केवढं प्रचंड सामर्थ्य आहे?

यस्यार्थास्तस्य मित्राणि यश्यार्थास्तस्य बान्धवाः ।

यस्यार्थाः स पुमांल्लोके यस्यार्थाः स च पण्डितः ॥

**(ज्याच्याकडे पैसा असतो त्याला मित्र असतात, ज्याच्यापाशी पैसा असतो त्याला नातेवाईक मिळतात, ज्याच्याजवळ पैसा असतो तोच या जगात श्रेष्ठ पुरुष मानला जातो आणि ज्याच्याकडे पैसा असतो तोच विद्वान म्हणून समजला जातो.)**

त्याचप्रमाणे -

*इह लोके हि धनिनां परोऽपि स्वजनायते ।*

*स्वजनोऽपि दरिद्राणां सर्वदा दुर्जनायते ॥*

**(या जगात श्रीमंत लोक जरी परके असले, जरी त्यांना आपले मानले जाते आणि दरिद्री जरी आपले नातेवाईक असले, तरी त्यांना वाईट समजून दूर लोटले जाते.)**

तसेच-

*पूज्यते यदपूज्योऽपि यदगम्योऽपि गम्यते ।*

*वन्द्यते यदवन्द्योऽपि स प्रभावो धनस्य च ॥*

(एखादा श्रीमंत माणूस अपूजनीय असला तरी त्याची पूजा केली जाते. ज्याच्याकडे चुकूनही जाऊ नये, असा जरी तो असला तरी त्याच्याकडे जाणे योग्य ठरते, आणि तो वंदन करण्याच्या दृष्टीने कितीही अपात्र असला तरी त्याला वंदन केले जाते.)

शिवाय -

*गतवयसामपि पुंसां येषामर्थां भवन्ति ते तरुणाः ।*

*अर्थेन तु ये हीना वृद्धास्ते यौवनेऽपि स्युः ॥*

(ज्यांच्यापाशी धन आहे अशी माणसे तरुंणासारखी वागतात, तर धनहीन तरुण असले तरीही ते वृद्धांसारखे वागतात. )

पण ती संपत्ती कोणत्या तऱ्हेने मिळवायची? कारण, **संपत्ती मिळवायचे एकूण सहा मार्ग** आहेत.

१) भिक्षा मागणे

२) राजाची सेवा (सरकारी किंवा अन्य नोकरी)

३) शेती,

४) विद्यादान (लेखन, कन्सल्टन्सी, ट्यूशन)

५) सावकारी, (बॅंकेत पैसे ठेवून व्याज)

६) व्यापार. बिझनेस इ.

त्यापैकी भीक मागून धन मिळविणे हे लाजिरवाणे असते. राजाची सेवा तशी वाईट नसते, पण त्याची मर्जी केव्हा फिरेल याची शाश्वती नसते.(आताच्या काळात नोकरी जाणे) शेती पिकणं न पिकणं, हे सर्वस्वी पावसाच्या लहरीवर अवलंबून असतं. विद्यादान करणे चांगले, पण विद्यार्थी जे काही त्यांच्या इच्छेला येईल तो गुरूला देत असल्याने, त्या अल्पस्वल्प उत्पन्नावर गुरूला आपले आयुष्य बहुधा दारिद्र्यातच घालवावे लागते.

a

सावकारीत शरीराला कष्ट कमी, पण सावकाराचा पैसा कर्ज म्हणून दुसऱ्याच्या हाती जातो आणि त्या ऋणकोने हात वर केले की, धनको पार बुडून जातो.(आताच्या काळात बॅंक बुडणे, शेअर मार्केट कोसळणे) त्या दृष्टीने व्यापार हाच सर्वात उत्तम. त्यातून इथल्या वस्तू बाहेरगावी व बाहेरगावच्या वस्तू इथे आणून विकण्याचा व्यापार तर फारच फायदेशीर.

मनात हा विचार येताच, त्या वर्धमानाने आपल्या गावात निर्माण होणाऱ्या वस्तु मथुरेस, व मथुरेस तयार होणाऱ्या वस्तू आपल्या गावी आणून विकण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आपल्या गाडीला संजीवक व नंदक नावाचे दोन बैल जुंपून, विकावयाचा माल गाडीत भरपूर भरून, व बरोबर दोन-तीन सेवक घेऊन तो नजिकच्या शुभ मुहूर्तावर मथुरेच्या मार्गाला लागला.

वाटेत लागलेल्या घनदाट वनातून वाहणाऱ्या यमुना नदीच्या काठाकाठाने बैलगाडी चालली असता, तिला जुंपलेल्या संजीवक बैलाचा पाय मुरगळला. त्याला पुढे चालणे अशक्य झाले. मग वर्धमानाने आपल्या दोन सेवकांना त्या बैलाच्या सेवेसाठी मागे ठेवले आणि जवळच्याच एका गावातून एका नवा बैल विकत घेऊन त्याला गाडीला जुंपले, व उरलेल्या सेवकासह त्याने मथुरेस प्रयाण केले.

त्याने मागे ठेवलेले दोन सेवक जेमतेम दोन दिवस त्या संजीवक बैलाची सेवा करीत राहिले, पण 'वाघ-सिंहानी भरलेल्या या अरण्यात राहणे धोक्याचे आहे,' असा विचार करून, ते सेवक, त्या बैलाला तसाच सोडून

a

धन्याला गाठण्याकरिता मथुरेस गेले व त्याला खोटेच म्हणाले, 'धनी, आपला संजीवक बैल कैलासवासी झाला. तो आपला अतिशय लाडका असल्याने, आम्ही त्याला विधियुक्त अग्नी दिला.'

परंतु इकडे शुद्ध हवा, पाणी आणि पाचूसारखे हिरवेगार कोवळे गवत मिळाल्यामुळे, संजीवक थोड्याच दिवसात पूर्ण बरा झाला व इकडे तिकडे फिरू लागला. त्याची प्रकृतीही चांगली धष्टपुष्ट झाली. म्हटलंच आहे ना?

***अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितं सुरक्षितं दैवहतं विनश्यति।***
***जीवत्यनाथोऽपि वने विसर्जितः कृतप्रयत्नोऽपि गृहे विनश्यति ॥***

(दैवानेच ज्याचे रक्षण केले आहे, असा एखादा जरी रक्षणरहित असला, तरी तो सुरक्षित राहतो आणि ज्याच्यावर दैवच उलटले आहे, असा एखादा कितीही जरी रक्षणात असला तरी तो नाश पावतो. तसेच वनात सोडून दिलेला एखादा अनाथ प्राणी जिवंत राहतो आणि जो जगावा म्हणून प्रयत्नांची शर्थ चालू असते, असा घरात असलेला माणूस मरून जातो!)

अशा तऱ्हेने काही दिवस निघून गेल्यानंतर एके दिवशी त्या वनाचा राजा पिंगलक सिंह हा पाणी पिण्यासाठी यमुनातीरी चालला असता, त्याच्या कानी संजीवक बैलाची डुरकाळी पडली. पिंगलकाने आयुष्यात कधी बैल पाहिलेला नसल्याने, किंवा त्याची डरकाळीही ऐकलेली नसल्याने, तो आवाज कानी पडताच तो घाबरला व पाणी न पिताच दूरच्या


a

एका वडाच्या बुंध्यापाशी आपल्याभोवती मंत्र्यांचे व अनुयायांचे संरक्षक कोंडाळे करून घेऊन बसला.

पिंगलक सिंहाच्या एकेकाळच्या मंत्री असलेल्या एका कोल्ह्याला करटक व दमनक नावाचे दोन मुलगे होते. ते दोघेही पित्याच्या पश्चात पिंगलकाचे मंत्री बनले होते, पण पिंगलकाने त्यांना - काही कारणास्तव - मंत्रीपदावरून दूर केले होते. यमुनेवर गेलेला आपला राजा, हा पाणी न पिताच भयभीत मनःस्थितीत वटवृक्षाकडे परत गेल्याचे पाहून दमनक करटकाला म्हणाला, 'दादा, पिंगलकमहाराज पाणी न पिताच भयग्रस्त मनःस्थितीत का बरं परतले? आपण त्यांच्याकडे चौकशी करून येता का?'

करटक म्हणाला, 'बाबा रे, आपल्याला या नसत्या उठाठेवी हव्यात कशाला? करवतीने अर्धवट कापलेल्या लाकडात सुतारांनी ठोकलेली पाचर कारण नसता काढायला गेलेल्या त्या वानराची गत काय झाली, ते तुला ठाऊक आहे ना?'

'ती गोष्ट काय आहे?' असे दमनकाने विचारताच करटक सांगू लागला-



(या गोष्टीतून काय शिकावे?)

१- धनाचे महत्व

२- अर्थप्राप्तीचे मार्ग आणि त्यांचे फायदे व तोटे

३- कर्मचाऱ्यांवर विश्वास किती ठेवावा

४- अनोळखी गोष्टींची भिती मोठलोठ्यांना असते.

५- बरंच काही. तुम्हीच सांगा...

या पुस्तकातील प्रत्येक कथेतून अनेक व्यावहारिक धडे मिळतील. प्रत्येक गोष्ट वाचून झाल्यावर त्यातून आपल्याला काय काय बोध घेता येईल याचा शांतपने वा सामूहिक रित्या विचार करावा.

# गोष्ट दुसरी


## 'नसती उठाठेव जो करी, तो संकटाला आपणहून पाचारी'

'एका नगरात सीमेवरील उपवनात एक धनिक मंदिर बांधून घेत होता. त्या कामावर असलेले सुतार, गवंडी आदि कामगार, सूर्य डोक्यावर येताच काम थांबवून आपापल्या घरी जेवायला जात.

एकदा त्या मंदिराच्या तुळया तयार करण्याकरिता सुतार अर्जुनवृक्षाचे एक जाड व लांब लाकूड करवतीने चिरत होते. ते लाकूड अर्धवट चिरून होते न होते, तोच उन्हे उभावल्यामुळे सुतार त्या अर्धवट चिरलेल्या लाकडात खाच पुन्हा जोडले जाऊ नये म्हणून खैराची पाचर ठोकून, इतर कामगारांसंगे जेवायला घरी गेले. ते घरी गेले आणि लगेच पाच-पंचवीस वानरांचे एक टोळके त्या ठिकाणी येऊन नाना तऱ्हेच्या चेष्टा, चाळे करू लागले.

कुणी दगडांच्या राशीतले दगड फेकतोय, तर कुणी हातोड्याने ठाकठोक करतोय, असे त्यांचे चाळे सुरू झाले असता, नसते उपद्व्याप करण्याची खोड असलेला एक जाडगेला वानर त्या अर्धवट चिरलेल्या लाकडावर जाऊन बसला, व त्या चिरलेल्या भागात सुताराने ठोकलेली पाचर ओढून काढू लागला. असे करीत असता, त्याची शेपटी, वृषण आदि

अवयव अजाणता त्या दुभंगलेल्या लाकडाच्या फटीत गेले आणि ती पाचर काढली जाताच ते लाकडाचे दोन भाग एकदम एकत्र आल्याने त्यांत ते अवयव चिरडले गेले व त्याला यातना सोशीत प्राणांना मुकावे लागले. म्हणून मी म्हणतो, 'हे दमनका, तू नसत्या उठाठेवीत पडू नकोस.'



यावर दमनक नाक मुरडून म्हणाला, 'दादा, मग काय आपण आपलं पुढलं आयुष्य केवळ स्वतःचं पोट भरण्यातच घालवायचं? छे छे! आज जरी आपल्याला राजाश्रय नसला, तरी मित्रांना वर आणण्याकरिता व शत्रूंना खाली दडपण्याकरिता आपण पुन्हा राजाश्रय मिळवलाच पाहिजे. सध्याच्या आपल्या चैतन्यहीन आयुष्याला काहीतरी अर्थ आहे का? म्हटलंच आहे ना?

*यस्मिन जीवति जीवन्ति*

*बहवः सोऽत्र जीवति ।*

*वायाम्सि किं न किर्वन्ति*

*चंच्वा स्वोदरपूरणम् ॥*

(ज्याच्या जगण्यामुळे या जगात अनेकजण जगतात, तोच खऱ्या अर्थी जगतो. नाहीतर कावळेसुद्धा आपल्या चोचीने स्वतःचे पोट भरतातच ना?)

'तेव्हा दादा, मी पिंगलकमहाराजांकडे जाणार आणि त्यांना त्यांच्या भीतीचे कारण विचारून व शक्य झाल्यास ते कारण दूर करून, त्यांचे व आपले दुरावलेले संबंध पुन्हा जोडणार.'

करटकाने विचारले, 'पण दमनका, **बोलावले नसतानाही जो राजाकडे जातो, तो बऱ्याच वेळा इतरांच्या कुचेष्टेचा विषय होतो**, हे तुला ठाऊक आहे ना?'

दमनक म्हणाला, 'दादा, **नसत्या अभिमानाला बळी पडून जे लोक राजापासून दूर राहतात ते आयुष्यभर अर्धपोटी राहतात**. ज्याप्रमाणे चंदनवृक्ष हा मलय पर्वताखेरीज इतरत्र कुठे वाढत नाही, त्याचप्रमाणे विद्वान, गुणवान्, कलावंत व शूर यांच्या गुणांचे चीज राजाच्या आश्रयाखेरीज होत नाही. आता तू विचारशील की, आपण कुठे तसे मोठे आहोत? पण आपण जरी सामान्य असलो, तरीही राजाच्या आश्रयाला जावे. कारण म्हटलेच आहे ना?

a

*आसन्नमेव नृपतिर्भजते मनुष्यं ।*
*विद्याविहीनमकुलीनमसंस्कृतं वा ।*
*प्रायेण भूमिपतयः प्रमदा लताश्च ।*
*यत्पार्श्वतो भवति तत्परिवेष्टयन्ति ॥*

(जो मनुष्य जवळपास असतो, तो जरी विद्याहीन, अकुलीन किंवा असंस्कृत असला, तरी राजा त्याच्यावर कृपा करतो. राजे, स्त्रिया व वेली या बहुधा जो जवळ असतो त्याचाच आधार घेतात.)

याप्रमाणे बोलून दमनक हा जेव्हा पिंगलकाकडे गेला व त्याला वंदन करून त्याच्यापुढे नम्रपणे उभा राहिला, तेव्हा पिंगलकाने त्याला विचारले, 'काय रे दमनका, तू बऱ्याच दिवसांत माझ्याकडे फिरकला कसा काय नाहीस?'

दमनक म्हणाला, 'महाराज, आपल्याला जर आमच्या-सारख्या सामान्यांची गरज उरली नाही, तर उगाच यायचे कशाला? पण एक गोष्ट मात्र निश्चित - आपण आम्हाला विचारा वा न विचारा, आमचे आपल्यावरचे प्रेम कधी कमी व्हायचे नाही, आणि आम्हाला जे योग्य वाटेल ते आपल्यासमोर बोलायला आम्ही कचरणारही नाही.'

'त्यातून महाराज, राजा जर सेवकावर प्रसन्न झाला, तर तो फार तर त्याला कमीअधिक धन देतो, पण निष्ठावंत सेवक जर राजावर प्रसन्न झाला, तर तो त्याच्यासाठी आपला प्राणही द्यायला तयार होतो. आता इतर

a

मंत्र्यांच्या तुलनेत मी व माझा भाऊ करटक आपल्याला यःकश्चित् वाटत असलो, तरीही आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे.'

'महाराज, **यःकश्चित् गोष्टींकडेसुद्धा दुर्लक्ष करू नये**. त्यासुद्धा वाटतात तशा निरुपयोगी नसतात. साध्या काडीचासुद्धा दात व कान कोरण्यासाठी उपयोग होतोच ना? मौल्यवान रेशीम यःकश्चित् किड्यांपासूनच मिळते ना? प्रत्यक्ष देवसुद्धा ज्यांना मस्तकी धारण करतात, ती कमळे चिखलापासूनच मिळतात ना? सोनेसुद्धा दगड मातीतूनच प्राप्त होते ना? तेव्हा भोवतालच्या **लोकांचे नुसते कूळ वा बुद्धी विचारात न घेता, त्यांची निष्ठाच अधिक विचारात घ्यावी**. तेव्हा, आम्हा दोघां भावांसारखे मर्यादित बुद्धीचे पण अमर्याद निष्ठेचे सेवकच आपल्याला अधिक उपयोगी पडतील, ही गोष्ट महाराजांनी लक्षात असू द्यावी, एवढीच माझी आपल्याला विनंती आहे.'

पिंगलक हसून म्हणाला, 'दमनका, तुझे आताचे बोलणेच मुळी तू सामान्य बुद्धीचा नाहीस हे सिद्ध करते. त्यातून तू व तुझा भाऊ करटक हे माझ्या एकेकाळच्या मंत्र्याचे मुलगे, तेव्हा मी तुम्हा दोघांना तसे परके कसे मानीन? पण या घडीला त्या इतर गोष्टी बाजूला ठेवून, तू माझ्याकडे कशासाठी आला आहेस, तेवढेच मला सांग.'

दमनक म्हणाला, 'काही गोष्टी सर्वांसमक्ष बोलायच्या नसतात.' त्याचे हे बोलणे ऐकून राजा पिंगलकाभोवती असलेले सर्व प्राणी दूर जाताच दमनकाने विचारले, 'महाराज, आपण पाणी पिण्याच्या उद्देशाने यमुनाकाठी

a

गेला असता, पाणी न पिताच काहीशा भयभीत मनःस्थितीत इकडे का परतलात?'

सुरुवातीला थोडेसे आढेवेढे घेऊन राजा पिंगलक म्हणाला, 'दमनका, मी सांगतो आहे त्याची कुठे वाच्यता करू नकोस. अरे, मी यमुनेवर पाणी प्यायला गेलो असता, काळजाचा थरकाप उडवणारी एक डरकाळी माझ्या कानी पडली. ती ऐकून, ती एखाद्या, महाभयंकर प्राण्याची असावी, असे वाटून मी पाणी न पिताच इकडे परतलो व हे रान सोडून दुसऱ्या एखाद्या दूरच्या रानात जाण्यचा विचार मी करू लागलो.'

यावर दमनक म्हणाला, 'महाराज, **नुसत्या मोठ्या आवाजामुळे धास्तावून जाणे योग्य नाही**. तसा मोठा आवाज नगारा, नौबत किंवा शंख यांचाही होतो. अशाच एका नगाऱ्याच्या आवाजाला भ्यायलेल्या आमच्या एका जातभाईचे, नंतर कसे डोळे उघडले, ती गोष्ट आपल्याला ठाऊक आहे का?' पिंगलकाने नाही असे उत्तर देताच दमनक म्हणाला, 'तर मग ऐका महाराज-

# गोष्ट तिसरी

## 'नको तिथे भितो,
## तो हसे करून घेतो.'

गोमायु नावाचा एक कोल्हा भक्ष्याच्या शोधार्थ वनात भटकत असता, त्याच्या कानी अधुनमधून एक भयंकर आवाज पडू लागला. प्रत्यक्ष परिस्थिती अशी होती की, एके ठिकाणी कुणाच्यातरी राहून गेलेल्या नगाऱ्यावर वाऱ्याच्या झुळकेसरशी एका झुडपाच्या फांदीचा अधुनमधून आघात होत होता व त्यामुळे त्या नगाऱ्यातून 'धाडधूम्' असा ध्वनी बाहेर पडत होता.

पण तो आवाज ऐकून तो कोल्हा अतिशय घाबरला व ते वन सोडून जाण्याचा विचार करू लागला. परंतु लगेच त्याच्या मनात विचार आला, हा भयंकर आवाज काढणारा प्राणी आहे तरी कोण, ते अगोदर सुरक्षित अंतरावरून पाहावे, आणि मगच हे वन सोडून जायचे की नाही ते ठरवावे.

मनात असा विचार करून तो त्या आवाजाच्या रोखाने जरा पुढे जातो न जातो, तोच त्याला फांदीच्या आघातांमुळे आवाज करणारा तो नगारा दिसला. ती एक निर्जीव वस्तू असल्याचे लक्षात येताच, तो त्या नगाऱ्याजवळ गेला व स्वतःशीच म्हणाला, 'मी उगाच या आवाजाला

भ्यायलो. हे एक पोकळ लाकडी भांडे असून, हे बहुधा चमचमीत खाद्यपदार्थांनी भरलेले असावे, म्हणूनच याचे वरचे तोंड चामड्याने पक्के बंद करून टाकले असावे.

या विचारामुळे त्याला आनंद झाला आणि त्या भांड्यातील ते रुचकर पदार्थ खाण्याच्या हेतूने, त्याने त्या नगाऱ्याचे कातडे दाताने कुरतडले व तो त्याच्या आत काय काय आहे ते पाहू लागला. पण आत पाहतो तर केवळ पोकळी! त्यामुळे निराश झालेला तो स्वतःशी म्हणाला -



*भये वा यदि वा हर्षे*
*संप्राप्ते यो विमर्शयेत् ।*
*कृत्यं न कुरुते वेगान्न*
*स सन्तापमाप्नुयात् ॥*

**(भयाचा प्रसंग असो वा आनंदाचा प्रसंग असो, जो विचाराने वागतो, व कुठलीही गोष्ट उतावीळेपणाने करीत नाही, त्याच्यावर पश्चात्ताप करण्याची वेळ येत नाही**.)

दमनकाने ही गोष्ट सांगताच राजा पिंगलक त्याला म्हणाला, 'तुझ्या गोष्टीचा मतितार्थ मला कळला. पण समजा, ती भयंकर डुरकाळी एखाद्या

a

महाभयंकर प्राण्याची असली तर? मी वनराज सिंह असलो तरी आता वृद्ध झालो असल्याने, माझ्यात आता पूर्वीचे बळ राहिले नाही. तेव्हा मी त्याच्याकडे कसा जाऊ?'

दमनक म्हणाला, 'महाराज, माझ्यासारखा निष्ठावंत सेवक आपल्या सेवेला हजर असताना, आपण त्या प्राण्याकडे जाण्याचं काय कारण? आपली आज्ञा झाल्यास, मी त्या प्राण्याकडे जातो आणि त्याची माहिती काढून येतो. त्याच्याकडे जाऊन आल्यावर पुढं काय करायचं ते मी सांगेन.'

'तू खरोखरच त्याच्याकडे जाशील का?' अशा प्रश्न पिंगलकाने केला असता दमनक म्हणाला, 'महाराज, हा काय प्रश्न झाला? माझ्यासारखा निष्ठावंत सेवक स्वामींसाठी वाटेल ते करायला तयार होईल. चांगल्या सेवकाचं लक्षणच मुळी असं आहे की-

*स्वाम्यादेशात् सुभृत्यस्य*

*न भीः संजायते क्वचित् ।*

*प्रविशेत् मुखमाहेयं*

*दुस्तरं वा महार्णवम् ॥*

**(स्वामीने आज्ञा केली तर चांगला सेवक हा कधीही भीत नाही**. तो सर्पाच्या जबड्यातसुद्धा शिरेल, किंवा प्रसंग पडल्यास महासागरातही उडी घेईल. )

दमनकाच्या या बोलण्याने संतुष्ट झालेल्या राजा पिंगलकाने, 'तू आपल्या कामात यशस्वी हो,' अशी त्याला शुभेच्छा व्यक्त करताच दमनक त्या 'भयंकर' प्राण्याच्या शोधार्थ निघाला व थोड्याच वेळात तो संजीवक बैल त्याच्या दृष्टीस पडला. त्याबरोबर तो स्वतःशीच हसून म्हणाला, हात्तिच्या! हा तर एक साधा बैल आहे! पण पिंगलक महाराजांनी आयुष्यात कधीही बैल पाहिलेला किंवा त्याचा आवाज ऐकलेला नसल्याने, याचीच डुरकाळी ऐकून स्वारीची तारांबळ उडाली असली पाहिजे. आता तोच त्यांचा समज कायम ठेवून, आपण आपल्या फायद्यासाठी या बैलात व त्यांच्यात आपल्या गरजेनुसार मैत्री किंवा तंटा निर्माण केला पाहिजे, तरच हे दोघे आपल्या शब्दांत राहतील. नाहीतरी **राजेलोक हे काही एखाद्याचे सद्गुण वा त्याचे कुळ पाहून त्याला मान देत नाहीत**. त्यांना ज्याची गरज असते, त्याचीच ते दखल घेतात. बाकी तेही साहजिकच आहे. **ज्याचं आरोग्य उत्तम आहे, तो वैद्याची विचारपूस कशाला करील?**' मनाशी असे ठरवून, दमनक पिंगलकाकडे गेला.

त्याला पाहून पिंगलकाने विचारले, 'दमनका, खरं सांग, तुझ्या कामात तू यश मिळवलंस का?'

दमनक म्हणाला, 'महाराज, आपल्याशी मी खोटं कसं बोलेन? अहो, **देवापाशी खोटं बोललं तर त्याबद्दलची शिक्षा पुढल्या जन्मी मिळते, पण राजाजवळ खोटं बोललं तर त्याची शिक्षा याच जन्मी वाट्याला येते**. तेव्हा खरं सांगायचं तर तुम्ही सांगितलेल्या मोठ्या कामगिरीचा पहिला

टप्पा मी पूर्ण केला. या वेळेला मी फक्त त्या प्राण्याला दुरून पाहिले. तो खरोखरच भयंकर दिसतोय. तरीही आपली आज्ञा झाली, तर मी त्याला आपला सेवक बनवू शकेन.'

'पण तो प्राणी माझा सेवक बनायला तयार होईल?' असा प्रश्न पिंगलकाने केला असता, दमनक म्हणाला, 'महाराज, जी बुद्धीलाही करता येणे अशक्य आहे, अशी एखादी तरी गोष्ट या जगात आहे का? म्हटलंच आहे-

*न तच्छस्त्रैर्ननागेन्द्रैर्न हयैर्न पदातिभिः।*

*कार्यं संसिद्धिमभ्येति यथा बुद्ध्या प्रसाधितम् ॥*

**(एखादी गोष्ट बुद्धीच्या सामर्थ्यावर जशी प्राप्त करून घेता येते, तशी ती शस्त्रे, हत्ती, घोडे व सैनिक यांच्या सहाय्यानेही साध्य करून घेता येत नाही.** )

दमनकाच्या या बोलण्याने त्याच्यावर खूष झालेला पिंगलक त्याला म्हणाला, 'दमनका, आतापासून मी तुला पुन्हा माझा मंत्री बनविले आहे. यापुढे कुणाचा गौरव करायचा व कुणाला शिक्षा द्यायची, त्याबद्दलचा निर्णय घेण्याचा अधिकार मी तुला बहाल करीत आहे. तेव्हा आता तू माझा मंत्री म्हणून त्या प्राण्याकडे जा, त्याला मी अभय दिले असल्याचे सांग आणि त्याच्याकडूनही मला अभय असल्याचे वचन मिळवून, मग तू त्याला घेऊन माझ्याकडे.'

मंत्रीपद मिळाल्याने आनंदित झालेला दमनक त्या संजीवक बैलाकडे गेला आणि त्याला दटावणीच्या सुरात म्हणाला, 'कोण रे तू? आणि या वनाचे राजे असलेले महापराक्रमी पिंगलकमहाराज, यांच्या अनुज्ञेशिवाय तू या वनात स्वच्छंदपणे फिरून चारा खातोस? त्यांच्यासारख्या सिंहश्रेष्ठाने मनात आणले, तर ते क्षणात तुझी चटणी करून टाकतील, तेव्हा तू माझ्यासंगे त्यांची क्षमा मागायला चल.'

'वनराज सिंहाकडे जाणे म्हणजे त्याचे भक्ष्य होणे,' हा विचार मनात येताच संजीवक बैल हादरून दमनकाला म्हणाला, 'कोल्होबा, कृपा करा आणि पिंगलकमहाराज या संजीवकाला मारणार नाहीत असे काहीतरी करा.'

दमनक मनात म्हणाला, 'सध्या हा व पिंगलक यांच्यात मैत्री घडवून आणायला हरकत नाहीत. त्यामुळे हे दोघेही परस्परांच्या भीतीपोटी माझ्याशी चांगले वागत राहतील.'

इकडे दमनकाच्या मनात असा विचार चालला असता, तिकडे पिंगलकाच्या मनात संशयाचे वेगळेच भूत थैमान घालू लागले होते. तो स्वतःशीच म्हणाला, 'या दमनकाला आपण मागे मंत्रीपदावरून काढून टाकले होते. त्या अपमानाचा सूड घेण्यासाठी त्या भयंकर प्राण्याकरवी हा आपला काटा तर नाही ना काढणार? वास्तविक त्याच्यावर विश्वास टाकून, आपण आपल्या मनातली भीती त्याच्यापुढे उघड करायला नको होती.

म्हटलंच आहे ना?

a

*न वध्यन्ते ह्यविश्वस्ता*

*बलिभिर्दुबला अपि ।*

*विश्वस्तारस्त्वैव वध्यन्ते*

*बलवन्तोऽपि दुर्बलैः ॥*

(**अवाजवी विश्वास न टाकणाऱ्या दुर्बलांचा बलवानही घात करू शकत नाहीत, पण तसा विश्वास टाकणाऱ्या बलवंतांचा दुर्बलांकडूनसुद्धा घात केला जातो**.)

वनराज पिंगलकाच्या मनात असा संशय उत्पन्न झाल्यामुळे तो त्या वडाच्या झाडाखालून उठून, पलायनाच्या दृष्टीने सोयीच्या अशा दुसऱ्या झाडाखाली जाऊन बसला व संकट ओढवलेच तर काय करायचे, याचा विचार करू लागला.

तिकडे दमनक संजीवकाला म्हणाला, 'हे बघ, वास्तविक आमचे पिंगलकमहाराज हे प्रत्यक्ष चंडिकादेवीचे वाहन असल्यामुळे, त्यांना कुणाचीच गरज नाही. असे असूनही मी तुला त्यांच्याकडून अभय मिळवून देईन व तुझी त्यांची मैत्री जुळवीन. पण माझे जे तुझ्यावर उपकार होतील, त्यांची तू जाणीव मात्र ठेव. यापुढे आपण दोघे जर एकमेकांचा सल्ला घेऊन वागलो, तर दोघांनाही सुखात दिवस काढता येतील.'

संजीवकाने हे मान्य करताच, दमनकाने त्याला तिथेच तात्पुरते थांबायला सांगून, तो पिंगलकाकडे गेला व त्याला भिवविण्यासाठी

म्हणाला, 'महाराज, तो प्राणी असा तसा नाही. प्रत्यक्ष भगवान् महादेवाचे तो वाहन असल्यामुळे त्याला कुणाचीच गरज नाही. त्यामुळे सुरुवातीला तो माझे म्हणणेही ऐकून घ्यायला तयार नव्हता. पण 'पिंगलकमहाराज हे तर प्रत्यक्ष पार्वतीदेवीचे वाहन आहेत, असे मी त्याला खोटेच सांगितले, त्यामुळे तो आपल्याशी मैत्री करायला तयार झाला. मग घेऊन येऊ का इकडे त्याला?'

दमनकाच्या या बोलण्याने मनातला संशय दूर होऊन पिंगलक त्याला म्हणाला, 'शाब्बास तुझी! खरा बुद्धिवान आहेस तू. म्हटलंच आहे ना?



***मन्त्रिणां भिन्नसन्धाने भिषजां सन्निपातिके ।***
***कर्मणि व्यज्यते प्रज्ञा स्वस्थे को वा न पण्डितः ॥***

a

(अनपेक्षित प्रसंग ओढवले असता मंत्र्यांच्या बुद्धीची आणि मोठ्या दुखण्यात वैद्यांच्या बुद्धीची परीक्षा होते. **खरी बुद्धिमत्ता ही बिकट प्रसंगीच प्रकट होते**. सर्व ठीक असताना कोण विद्वान नसतो?)

मग पुन्हा पिंगलकाची परवानगी घेऊन दमनक संजीवकाकडे गेला व त्याला म्हणाला, 'मित्रा, मी माझे कौशल्य पणाला लावले आणि तुझ्यात व महाराजांच्यामधे मैत्रीचे संबध जुळवून आणले. तेव्हा तू निःशंकपणे माझ्यासंगे त्यांच्याकडे चल. पण महाराजांशी मैत्री जुळली, तरी मला मात्र विसरू नकोस. मी कोल्हा म्हणून मला क्षुद्र समजू नकोस. क्षुद्रांमध्येही थोरामोठ्यांना त्रास देण्याचे सामर्थ्य असते. म्हणून तर एका राजाच्या एका क्षुद्र हुजऱ्याने त्या दंतिल सावकाराची हबेलंडी उडवली ना?'

'ती गोष्ट काय आहे?' असे संजीवकाने विचारताच दमनक म्हणाला, 'त्याचं असं झालं -

# गोष्ट चौथी

## क्षुद्र पेटता सूडाला, भारी पडे समर्थाला!

वर्धमान नावाच्या नगरीत दंतिल नावाचा एक श्रीमंत सावकार राहात होता. त्याच्या प्रेमळ व परोपकारी स्वभावामुळे, त्याला प्रजा व राजा या दोघांतही मानाचे स्थान होते. एकदा दंतिलाने त्याच्या घरी असलेल्या लग्नाच्या निमित्ताने, जसे इतर लोकांना भोजनाचे निमंत्रण केले, तसेच त्याने राजालाही त्याच्या परिवारासह जेवायला बोलावले.

ठरलेल्या दिवशी व वेळी राजा, राणी, त्यांचे खास अधिकारी, त्याचप्रमाणे दासदासी अशी सर्व मंडळी, त्या सावकाराकडे आली व त्याचे स्वागत स्वीकारून, त्यांच्यासाठी खास राखून ठेवलेल्या वेगवेगळ्या दालनांतील पानांवर आपापल्या दर्जाप्रमाणे बसू लागली. त्यांच्यात राजाचा गोरंभ नावाचा एक हुजऱ्या होता. तो राजा व राजघराण्यातील माणसे यांच्यासाठी वाढून ठेवलेल्या पानांपैकी, एका पानावर बसू लागला होता, दंतिलाने त्याला तिथून हुसकून लावले. या अपमानाने तो हुजऱ्या रागावून निघून गेला.

गोरंभ राजवाड्यावर निघून गेला खरा, पण त्याला चैन पडेना. तो मनात म्हणाला, 'मी एक यकःश्चित्त नोकर. त्या दंतिलशेटने माझ्या केलेल्या

अपमानाचा सूड मी कसा काय घेऊ शकणार? चूलखंडावरच्या कढईत भाजून निघणाऱ्या हरभऱ्यांनी रागाच्या भरात कितीही जरी फडफडाट केला, तरी त्यामुळे कढई कधी फुटते का? त्याचप्रमाणे **दुर्बलांनी अपमानाचे कडू घोट निमूटपणे गिळायचे असतात**.' पण या विचाराने त्याची समजूत पटेना. अखेर त्याला एक युक्ती सुचली.

दोन-तीन दिवसानंतरच्या एका सकाळी, तो राजाच्या शयनमहालाच्या दरवाजाबाहेर बसला होता. राजा आता अर्धवट जागा झाला असून, तो पलंगावरून उठण्याची हालचाल करीत आहे, अशी त्याला चाहूल लागली. तोच राजाला ऐकू जाईल अशा स्वरात तो मुद्दाम म्हणाला, 'कमाल आहे त्या दंतिलशेठची! आपण महाराजांचे सच्चे मित्र आहोत असे वरपांगी त्यांना भासवतो, पण राजवाड्यात येऊन मात्र संधी सापडताच राणीसाहेबांना आलिंगने देतो. आणि अशा त्या कपटी दंतिलाला महाराजांनी मान द्यावा?'

गोरंभाच्या तोंडची ही वाक्ये ऐकून राजा रागानं लालबुंद होऊन पलंगावरून उठला व गोरंभाला म्हणाला, 'काय रे, तो कपटी दंतिलशेठ राजवाड्यात येऊन राणीसाहेबांना खरोखरच आलिंगने देतो काय? अरे गप्प का राहिलास? तूच तर नुकतंच तसं म्हणालास ना?'

मनात ठरवून ठेवल्याप्रमाणे गोरंभाने उत्तर दिले, 'महाराज, असं कसं होईल? काल रात्री मी बऱ्याच उशिरापर्यंत द्यूत खेळत बसलो होतो. त्यामुळे पहारा करता करता जरासा पेंगलो व त्या झोपेत भलतेच बोलून गेलो.'

पण गोरंभाच्या या खुलाशाने राजाचे समाधान झाले नाही. त्याला सारखे वाटू लागले, गोरंभाने ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिली असावी व जागेपणी जे दिसते ते झोपेत तोंडावाटे बाहेर पडते, या नियमानुसार त्याच्या तोंडातून ती गोष्ट बाहेर पडली असावी. राजाच्या मनाने असे घेतले व म्हणून त्याने दंतिलाला राजवाड्यात प्रवेश न करू देण्याचे द्वारपालांना फर्मान सोडले.

दंतिलाला या गोष्टीची कल्पना नव्हती. तो नेहमीप्रमाणे राजाच्या भेटीसाठी राजवाड्यावर गेला असता, द्वारपालांनी त्याला अडविले. 'महाराजांचा माझ्यावर असा कोप का बरं झाला?' असा प्रश्न दंतिलाने त्या द्वारपालांना विचारला असता, जवळच उभा असलेला गोरंभ म्हणाला, 'दंतिलशेट, करावे तसे भरावे. त्या दिवशी तुम्ही मला तुमच्या घरी जेवायला आलो असता, पानावरून उठवून हुसकून लावले होते ना? आज महाराजांनी तुम्हाला हुसकावून देण्याचा हुकूम आम्हा सेवकांना सोडला आहे.'



a

हे उत्तर ऐकून दंतिलशेट खिन्न मनाने घरी परतला. राजाचे कान त्या गोरंभानेच फुंकले असले पाहिजेत, हे त्याने ओळखले. मग त्याला आपल्या घरी बोलावून व मनाविरुद्ध का होईना, त्याला बऱ्याच सुवर्णमोहरा व उंची वस्त्रे देऊन त्याने त्याची समजूत घातली व विचारले, 'गोरंभा, आता तरी तुझा राग गेला ना?' यावर गोरंभ म्हणाला, 'शेट, माझा राग तर गेलाच, पण चार-दोन दिवसांत राजेसाहेबांचाही तुमच्यावरचा राग दूर होईल असे मी करतो व त्यांचे -तुमचे स्नेहसंबंध पूर्ववत् जोडून देतो.'

त्याप्रमाणे दुसऱ्याच दिवशी सकाळी, राजा अर्धवट जागा झाल्याची चाहूल लागताच, त्याच्या शयनमहलाबाहेर बसलेला गोरंभ त्याला ऐकू जाईल अशा स्वरात मुद्दाम म्हणाला, 'आमचे महाराज एवढ्या मोठ्या राजवाड्यात राहतात, पण काकड्या मात्र शौचकूपात शौचाला बसल्याबसल्या खातात!'

गोरंभाच्या तोंडचे ते शब्द ऐकून राजा पलंगावरून ताडकन् उठला व त्याला विचारू लागला, काय रे मूर्खा! मी शौचकूपात जाऊन काकड्या खात बसतो काय? तू मला तसे खाताना कधी रे पाहिलेस?'

'छे, छे! असं कसं होईल? कोण हरामखोर असं बोलला? गोरंभाने प्रश्न केला. राजा म्हणाला, अरे, तूच तर आत्ता तसं बोललास. तू माझा जुना नोकर आहेस, म्हणून तुला क्षमा केली. तुझ्या जागी जर दुसरा कोणी असता, तर त्याला मी यमलोकीच रवाना केले असते.'

a

मुद्दाम गयावया करीत गोरंभ म्हणाला, 'महाराज, काल रात्री पण मी बराच उशीरापर्यंत द्यूत खेळलो आणि थोडीशी झोप घेऊन, पहाट होताच इकडे आलो. म्हणून मला इथे बसलो असता थोडीशी डुलकी लागली आणि जी गोष्ट कधी घडलीच नाही, ती माझ्या तोंडावाटे बाहेर पडली.' गोरंभाने केलेला हा खुलासा ऐकून राजा मनात म्हणाला, 'आपल्या राणीबद्दल व दंतिलाबद्दलही हा मूर्ख असेच बिनबुडाचे बरळला असावा.' अशी समजूत पटताच राजाने दंतिलाला बोलवायला सेवक पाठविला आणि तो आल्यावर आदल्या दिवशी केलेल्या त्याच्या अपमानाबद्दल खेद व्यक्त केला.

ही गोष्ट सांगून दमनक संजीवकाला म्हणाला, 'मित्रा, तेव्हा पिंगलकमहाराजांशी मैत्री जुळून येताच, गर्वाने फुगून जाऊ नकोस, थोरामोठ्यांशी जसा वागशील, तसाच तू माझ्यापाशीही सौजन्याने वाग, म्हणजे तुझे पुढले आयुष्य सुखात जाईल.' संजीवकाने तसे वचन देताच, दमनक त्याला घेऊन पिंगलकाकडे गेला.

वनराज पिंगलकाशी दृष्टादृष्ट होताच, संजीवकाने त्याला नम्रतापूर्वक वंदन केले, तर पिंगलकाने त्याला अभय देऊन त्याचे क्षेम विचारले. मग त्यांच्या भेटीचे रूपांतर दाट मैत्रीत झाले. संजीवकाचं एकदम सात्त्विक वागणं, त्याचा गवतपाल्यासारखा अहिंसक आहार वगैरेचा पिंगलकावर फार प्रभाव पडला. आपल्या वनराज्याचा सर्व कारभार दमनक व त्याचा

मोठा भाऊ करटक यांच्यावर सोपवून, पिंगलक हा दिवसातला बराचसा वेळ त्या बुद्धिवान व बहुश्रुत अशा संजीवकाशी निरनिराळ्या विषयांवर चर्चा करण्यात घालवू लागला की, त्यामुळे प्रत्यक्ष दमनक व करटक यांनाही पिंगलकाची भेट मिळणे कठीण होऊ लागले.

संजीवकाच्या विचारांच्या प्रभावामुळे पिंगलकाने वन्य पशूंची शिकार करणे व खाणे सोडून दिले. त्यामुळे त्याच्या मांसाहारी मंत्र्यांना आणि सेवकांना उपवास घडू लागले व ते एकामागून एक याप्रमाणे त्याला सोडून जाऊ लागले. म्हटलंच आहे ना?

***फलहीनं नृपं भृत्याः***
***कुलीनमपि चोन्नतम् ।***
***सन्त्यज्यन्यत्र गच्छन्ति***
***शुष्कं वृक्षामिवाण्डजाः ॥***

(वठलेल्या वृक्षाचा त्याग करून, ज्याप्रमाणे पक्षी इतरत्र निघून जातात, त्याचप्रमाणे सेवेचा मोबदला न देणारा राजा कितीही जरी कुलीन व उच्च दर्जाचा असला तरी त्याचे सेवक त्याला सोडून जातात.). याउलट

***कालातिक्रमणं वृत्तेर्यो***
***न कुर्वीत भूपतिः ।***
***कदाचित्तं न मुञ्चन्ति***
***भर्त्सिता अपि सेवकाः ॥***

(जो राजा वेतन देण्यात कधी उशीर करीत नाही, त्याने आपल्या सेवकांचा जरी अपमान केला, तरी ते त्याला कधीही सोडून जात नाहीत.)

हे सगळे जगच मुळी पोटावर चालले आहे. ते पोट भरण्यासाठी बऱ्याप्रमाणे वाईट मार्गांचाही अवलंब केला जातो. समुद्रातले मोठे मासे लहान माशांना खातात, वैद्य रोग्यांना लुबाडतात, व्यापारी गिऱ्हाइकांची लूट करतात, राजे प्रजेची पिळवणूक करतात, चोर निष्काळजी लोकांच्या घरी चोऱ्या करून स्वतःचे पोट भरतात, तर भिक्षुक भोळ्याभाळ्या लोकांना नाना व्रतवैकल्यांत गुंतवून आपली तुंबडी भरतात. अर्थात सर्वत्र केवळ स्वार्थच बोकाळला आहे असे मात्र नाही, आणि स्वार्थी लोकांचे सर्वत्र मनोरथ फलद्रूप होतात असेही नाही. म्हटलंच आहे ना?

*सर्पाणां च खलानां च परद्रव्यापहारिणाम् ।*
*अभिप्राया न सिद्धयन्ति तेनेदं वर्तते जगत् ॥*

(सर्पांचे, दुष्टांचे व दुसऱ्यांचे द्रव्य लुबाडणाऱ्यांचे सर्वच बेत सिद्धीस जात नाहीत, म्हणून तर हे जग बरेचसे सुरळीत चालले आहे.)

एके दिवशी भुकेने व्याकुळ झालेले दमनक करटकाला म्हणाला, 'दादा, पिंगलकमहाराज हे आताशा संजीवकाच्या एवढे भजनी लागले आहेत की, आपल्या मंत्रिपदांना अर्थ उरला नाही. त्यांचे आश्रितही त्यांना एकामागून एक असे सोडून चालले आहेत.'

करटक म्हणाला, 'दमनका, उन्मत्त राजे व मदोन्मत्त हत्ती हे स्वतःहून जरी चुकीच्या मार्गाने जाऊ लागले, तरी त्यांच्या तशा वागण्याच्या दोषाचे

खापर अनुक्रमे मंत्री व माहूत यांच्याच माथी फुटत असते. म्हणून मी तुला अगोदरच परोपरीने सांगितले होते की, तू संजीवक व पिंगलकमहाराज यांची मैत्री घडवून आणू नकोस. पण तू माझे ऐकले नाहीस. तेव्हा आता त्यांच्याविरुद्ध धुसफुसण्यात काय अर्थ?'

दमनक म्हणाला, 'दादा, मी काही नुसता धुसफुसत राहिलो नाही. जशी मी त्यांची मैत्री जुळवून आणली, तशी मी त्यांच्या मैत्रीत फूटही पाडू शकतो.'

करटक म्हणाला, 'दमनका, अरे, असले भलतेच धाडस तू करू नकोस. तू त्यांच्या मैत्रीत फूट पाडू पाहात आहेस, हे नुसते त्या पिंगलकमहाराजांना जरी कळले, तरी आपल्या दोघांची गत काय होईल याची तुला कल्पना आहे ना?'

दमनकाने उत्तर दिले, 'माझे हे कारस्थान मी फुटू कसे देईन? अरे, मी हे धाडस करीत आहे हे मलाही मान्य आहे, पण असे धाडस केले म्हणूनच एका तरुण विणकराला सुस्वरूप राजकन्या मिळवता आली ना?'

'ती कशी काय?' असा प्रश्न करटकाने केला असता दमनक म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट पाचवी

## 'असाध्य ते साध्य होते,

### पण त्यासाठी धाडस करावे लागते.'

एका नगरीत एक विणकर तरुण व सुतार तरुण यांची दाट मैत्री होती. एकदा ते दोघे गावातल्या देवळातील वार्षिक उत्सवाला गेले असता, त्या ठिकाणी आलेल्या कमालीच्या सुंदर राजकन्येला पाहून तो विणकर तिच्यावर एकदम मोहित झाला; पण तिच्याशी आपले लग्न होणे अशक्य असल्याचे लक्षात येऊन, तो अतिशय अस्वस्थही झाला.

त्याची ती काहीशी भ्रमिष्टासारखी मनःस्थिती पाहून त्याच्या सुतार मित्राने त्याला त्याच्या तशा वागण्याचे कारण विचारले. तेव्हा तो विणकर तरुण म्हणाला, 'मित्रा आज देवळात पाहिलेली ती असामान्य सुंदर राजकन्या पाहून, मला तिच्याच संगे लग्न करण्याची इच्छा झाली आहे. पण तिचे माझे लग्न होणे ही अशक्य गोष्ट असल्याने, मी अग्निकुंडात उडी घेऊन माझ्या जीवनाचा अंत करून घेण्याचे ठरविले आहे.'

सुतार म्हणाला, 'अरे मित्रा, **एखादी गोष्ट अशक्य आहे म्हणून ज्याला रडत बसण्याची सवय असते, त्याच्या वाट्याला या जगात केवळ दुःखच येते; याउलट, ज्याच्या अंगी प्रयत्नांची पराकाष्ठा**

a

**करून अशक्य गोष्टही शक्य करून दाखविण्याचे धाडस व जिद्द असते, त्याच्याच गळ्यात 'लक्ष्मी' माळ घालते.** तेव्हा तुझा मित्र म्हणून मी तुला 'कळ' असलेला एक लाकडाचा गरुड बनवून देतो. तू भगवान विष्णूंचे रूप घेऊन त्या गरुडावर बैस व त्याची 'कळ' दाबून, हवेतून त्या राजवाड्याच्या वरच्या मजल्यावरील खास महालात राहणाऱ्या त्या राजकन्येची अपरात्रीच्या वेळी भेट घेत जा. भगवान विष्णू म्हणून ती तुझे स्वागत करील आणि मोठ्या आनंदाने ती तुझ्याशी लग्न करायला तयार होईल. मात्र लग्न झाल्यावर एखाद्या रांगड्या विणकराप्रमाणे तिच्याशी न वागता, तू तिच्याशी एखाद्या खानदानी राजकुमाराप्रमाणे चांगले वागण्याची काळजी घे.'



a

विणकराला ही गोष्ट पटली. मग आठ-दहा दिवसांत त्या सुतार मित्राने लाकडापासून तयार करून व रंगवून दिलेले चक्र, शंख, गदा व मुकुट धारण करून व त्यानेच तयार करून दिलेल्या कळीच्या गरुडावर बसून, तो तरुण विणकर एका रात्री त्या गरुडाची 'कळ दाबून, हवेतून त्या राजकन्येच्या महालात गेला.

प्रत्यक्ष भगवान विष्णू गरुडावर स्वार होऊन प्रेमाची याचना करण्याकरिता आपल्याकडे आले, या विचाराने त्या राजकन्येचे मन आनंदाने मोहरून गेले. तिने त्याच्यापुढे साष्टांग नमस्कार घातला. मग बराच वेळ प्रेमाच्या गोष्टी झाल्यावर 'भगवान्' पुन्हा गरुडावर बसून तिथून निघून गेले. त्यानंतर त्यांची अशी भेट दररोज रात्री होऊ लागली.

एके रात्री कंचुकी - राजवाड्यातील स्त्रियांवर देखरेख करणारा अधिकारी - त्या राजकन्येच्या बंद महालावरून चालला असता, ती राजकन्या व एक पुरुष यांचे बोलणे त्याच्या कानी पडले. त्याने ते वृत्त दुसऱ्या दिवशी सकाळी राजाच्या कानी घातले. ते ऐकून, मनी धास्तावलेला राजा म्हणाला, 'राजवाड्याभोवती एवढा कडक पहारा असताना आपल्या कन्येला भेटायला येण्याचे धाडस कोण करतो? खरोखरच मुलीचा पिता होणं ही एक दुःखाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. म्हटलंच आहे ना?-

*पुत्रीति जाता महतीह चिन्ता ।*
*कस्मै प्रदेयेति महान्वितर्कः ।*
*दत्त्वा सुखं प्राप्स्यति वा न वेति ।*
*कन्यापितृत्वं खलु नाम कष्टम् ।*

**(मुलगी जन्मणे म्हणजे मोठीच चिंतेची गोष्ट आहे. ती कुणाला द्यावी हा जसा मोठा प्रश्न तसाच तिला दिल्यावर तिला सुख मिळेल की नाही, हाही प्रश्नच असतो**. खरोखरीच मुलीचा पिता होणं ही कष्टाची गोष्ट आहे. )

राजाराणीने आपल्या कन्येला फैलावर घ्यायला सुरुवात केली असता, ती त्यांना म्हणाली, 'आई-बाबा! प्रत्यक्ष भगवान् विष्णू गरुडावर बसून माझ्याकडे येतात व त्यांची पत्नी होण्याचा मला आग्रह करतात. मग मी त्यांना नकार कसा देऊ? वाटल्यास आज रात्री तुम्ही लपून त्यांना पहा, 'राजाराणीने त्याप्रमाणे त्या रात्री पाहिले व भगवंताचे दर्शन होताच त्यांना आपले हात आकाशाला लागल्यासारखे वाटले. विष्णू निघून जात असताना, त्यांना चोरून नमस्कार करून, त्या दोघांनी आपल्या मुलीचे अपार कौतुक केले.

प्रत्यक्ष भगवान विष्णू आपले आता जावई होणार म्हणजे या जगात आपले कोण वाईट करू शकणार!' असा समज होऊन, त्या राजाने आपल्या राज्याच्या सीमा ओलांडून, दुसऱ्या राज्यांवर आक्रमण केले. ते पाहून इतर

राजे एकत्र आले व त्यांनी त्या राजाचा दारुण पराभव करून, त्याचे जवळजवळ सर्व राज्य जिंकले.

त्यामुळे तो राजा व त्याची राणी घाबरली आणि मुलीला म्हणाली, 'बेटी, प्रत्यक्ष विष्णू तुझा पती होणार असताना, आपल्याला असा दारुण पराभव का पत्करावा लागला? उद्या हा राजवाडाही जर शत्रूच्या हाती गेला, तर आपण जायचे कुठे? तेव्हा आज रात्री भगवान् तुझ्याकडे आले की, त्यांना आपले राज्य परत मिळवून देण्याची विनंती कर.'

त्या रात्री तो विष्णुवेषधारी विणकर त्या राजकन्येला भेटायला आला असता, तिने विनंती केली, 'भगवान्, आपण सर्वशक्तिमान् आहात. तेव्हा उद्या आपण माझ्या बाबांच्या सर्व शत्रूंचा धुव्वा उडवून, माझ्या बाबांना त्यांचे राज्य परत मिळवून द्या.'

तिची ती प्रार्थना ऐकून विणकर क्षणभर पेचात पडला. पण दुसऱ्याच क्षणी तो मनात म्हणाला, 'मी जरी सामान्य माणूस असलो, तरी मी या राजकन्येच्या पित्याचा एक प्रजाजन आहे आणि तो माझा स्वामी आहे. तेव्हा प्रसंगी स्वतःचे प्राणही पणाला लावून स्वामीचं व त्याच्या राज्याचं रक्षण करणं हे माझं कर्तव्य आहे. म्हणून उद्या सकाळी आपण राजाच्या सैन्याबरोबर - पण गरुडावर बसून - हवेत संचार करू. म्हणजे आपल्याला खरेखुरे भगवान् विष्णू समजून, शत्रू निश्चितच पळून जाईल.' मनात असे ठरवून तो विणकर तरुण राजकन्येला मुद्दामच म्हणाला, 'प्रिये, तुझ्या वडिलांच्या शत्रूंना जर माझ्या हातून मृत्यु आला तर त्यांना मरणोत्तर स्वर्ग

मिळेल. तसे न होता त्यांना नरकाची प्राप्ती व्हावी, म्हणून तू तुझ्या बाबांनाच त्यांच्या सैन्याच्या सहाय्याने शत्रूवर तुटून पडायला सांग. मी त्यांना आशीर्वाद देईन व गरज पडलीच तर सहाय्य करीन.' राजकन्येने ते मान्य केले व त्याप्रमाणे वडिलांना सांगितले.

वैकुंठात राहणाऱ्या खऱ्या भगवान् विष्णूंना हा प्रकार अंतर्ज्ञानाने कळला.

त्यांनी विचार केला, 'माझे रूप धारण केलेला हा विणकर जर उद्या रणभूमीवर पराभूत झाला, 'तर लोकांना तो माझाच पराभव झाल्यासारखा वाटेल व माझ्यावरची त्यांची भक्ती लोप पावेल, तेव्हा याला व याचा सासरा होणार असलेल्या राजाला विजयी करायला हवेच हवे.'

मनात असे ठरवून भगवान विष्णूंनी स्वतः त्या विणकराच्या शरीरात प्रवेश केला, स्वतःच्या खऱ्या गरुडाला त्यांनी त्या विणकराच्या लाकडी गरुडात प्रवेश करण्याची आज्ञा केली, तर त्यांच्या चक्राने व गदेने आपल्या सामर्थ्यासह त्या विणकराच्या अनुक्रमे लाकडी चक्रात व गदेत प्रवेश केला.

आपल्या गरुडावर विष्णूंच्या रूपात बसलेला तो विणकर दुसऱ्या दिवशी सकाळी मोठ्या धैर्याने रणभूमीवर गेला आणि त्याचे असामान्य तेज पाहून राजाच्या शत्रूंनी रणांगणातून पळ काढला. हे कर्तृत्व केवळ आपले व आपल्या सुतारमित्राचे नसून, या कामी आपल्याला प्रत्यक्ष परमेश्वराचे सहाय्य झाले आहे, याची जाणीव त्या विणकराला झाली. त्याने मनोभावे परमेश्वराला नमस्कार केला व तो गरुडासह जमिनीवर उतरला.

गावकऱ्यांनी तो विणकर असल्याचे ओळखले, पण तरीही त्याने दाखविलेल्या धाडसाबद्दल ते त्याचा जयजयकार करू लागले. तेवढ्यात राजा तिथे आला व त्याला खरा प्रकार समजला. पण तो म्हणाला, 'राजघराण्यातील एखाद्या सामान्य तरुणापेक्षाही हा धाडसी विणकर तरुण अधिक श्रेष्ठ असल्याने, माझ्या दृष्टीने तो माझा जावई व्हायला योग्य आहे.' मग राजाने त्या विणकर तरुणाशी आपल्या कन्येचे मोठ्या थाटात लग्न लावून दिले व त्याला एक स्वतंत्र राज्यही दिले.'

ही गोष्ट करटकाला सांगून दमनक म्हणाला, 'दादा, गुप्त योजनेच्या व धाडसाच्या बळावर त्या विणकराने जशी राजकन्या मिळविली तसेच संजीवक व पिंगलकमहाराज यांच्या मैत्रीत फूट पाडण्यात मी यश मिळवीन.'

'पण बुद्धिमान संजीवक व शक्तिमान पिंगलक यांच्यापुढे तुझ्यासारख्या दुर्बळाचे काय चालणार?' असा प्रश्न करटकाने केला असता दमनक म्हणाला, 'दादा, **या जगात जे काम करायला शक्ति असमर्थ ठरते, तेच काम युक्ती सहज करू शकते**. म्हणून तर एक कावळा एका काळ्या व विषारी महासर्पाचा वध करू शकला ना?'

'तो कसा काय?' अशी पृच्छा करटकाने केली असता दमनक म्हणाला, 'त्याचं असं झालं-

# गोष्ट सहावी

## शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ

एका वनातील वटवृक्षावर कावळ्याचे एक जोडपे घरटे बांधून राहात होते. त्याच वृक्षाच्या ढोलीत राहणारा एक भलामोठा व काळाकुट्ट सर्प त्या जोडप्यातील मादीने घरट्यात घातलेली अंडी - ते जोडपे भक्ष्याच्या शोधार्थ बाहेर गेले असता - खाऊन फस्त करी. एकदा त्या महासर्पाने त्यांच्या घरट्यात शिरून, अशीच त्यांची अंडी स्वाहा केली असता, दुःखी झालेले ते जोडपे आपला हितचिंतक असलेल्या एका चतुर कोल्ह्याकडे गेले व घडलेला प्रकार त्याला सांगून म्हणाले, 'कोल्हेदादा, त्या वडाच्या झाडावर आम्ही घरटे बांधण्यात चूक केली हे सुरुवातीलाच कबूल करतो-'

'तुम्ही कसली चूक केली?' असे त्या कोल्ह्याने मोठ्या उत्कंठेने विचारले असता कावळा म्हणाला, 'म्हटलंच आहे ना? -

*यस्य क्षेत्रं नदीतीरे भार्या च परसङ्गता ।*
*ससर्पे च गृहे वासः कथं स्यात् तस्य निर्वृतिः ।*

**(ज्याचे शेत नदीतीरी असते, ज्याची बायको दुसऱ्याच्या नादी लागलेली असते व ज्याचे वास्तव्य सर्प राहात असलेल्या घरात असते, त्याला निश्चिंतपणा कसा लाभावा?)**

'तेव्हा कोल्हेदादा, ज्याच्या ढोलीत सर्पाचे वास्तव्य आहे अशा त्या वडावर घरटे बांधण्यात आमची चूक झाली खरी, पण आता दुसऱ्या दूरच्या

झाडावर नव्याने घरटं बांधायचं आणि तिथेही दुसरा एखादा साप आला की, पुन्हा तिसरीकडे बिऱ्हाड हलवायचं, ही काय साधी गोष्ट आहे? तेव्हा एकतर या कायमच्या बोकांडी बसलेल्या संकटातून सुटण्याचा आम्हाला उपाय सांग, किंवा आमच्यासारख्या दुर्बळांचा जन्म असली संकटे निमूटपणे भोगण्यासाठीच असतो, असे तरी स्पष्टपणे सांग.'

कोल्हा म्हणाला, 'कावळेमामा व कावळूमामी, तुम्ही बिलकूल निराश होऊ नका. या जगात जो युक्ती योजतो, तो शरीराने जरी दुर्बळ असला तरी प्रबळ ठरतो, तर युक्ती योजू न शकणारा जरी शारीरिक सामर्थ्याच्या दृष्टीने कितीही प्रबळ असला, तरीही तो दुर्बळ ठरतो. म्हटलंच आहे ना?

*उपायेन जयो यादृग् रिपोतादृग न हेतिभिः ।*
*उपायज्ञोऽल्पकायोऽपि न शूरैः परिभूयते ॥*

**(युक्तीने जसा शत्रूवर विजय मिळविता येतो, तसा तो शस्त्रांनीही मिळवता येत नाही. युक्तिबाज हा सामर्थ्याच्या दृष्टीने जरी किरकोळ असला, तरी तो पराक्रमी लोकांकडूनही पराभूत होत नाही.)**

'कावळेमामा व कावळूमामी, लहानसानच नव्हे, तर मध्यम व मोठ्या आकाराच्या माशांनाही कपटाने खाणाऱ्या एका बगळ्याचा, एका किरकोळ खेकड्याने कसा जीव घेतला ते तुम्हाला ठाऊक आहे ना?'

'ती गोष्ट मला ठाऊक नाही,' असे कावळा म्हणताच कोल्हा म्हणाला, 'कावळूमामी, तुम्ही पण ऐका-

# गोष्ट सातवी

## 'पापे पचली,' असे दिसते,
## पण त्यांचे फळ भोगावेच लागते.

एका वनातील सरोवराकाठच्या वृक्षावर एक बगळा राहात असे. तो त्या सरोवरातले मासे, बेडूक आदि पकडून, त्यावर आपली उपजीविका करी. पुढे वाढत्या वयाबरोबर, मासे पकडण्याकरिता आवश्यक अशी चपळता अंगी न उरल्याने, त्याची उपासमार होऊ लागली. त्यामुळे एके दिवशी तो मुद्दाम त्या सरोवराकाठी अश्रू ढाळीत बसला.

त्याला रडताना पाहून एका खेकड्याने पुरेशा अंतरावरून त्याच्या दुःखाचे कारण विचारले असता, तो कपटी बगळा खोटेच म्हणाला, 'काय सांगू खेकडोजी, एक तर आजवर या सरोवरातल्या निरपराध माशांना मारून खाल्ल्याबद्दल मला दुःख झालं आहे आणि दुसरं म्हणजे लवकरच बारा वर्षे टिकणाऱ्या एका भयंकर दुष्काळाला सुरुवात होणार असून, त्यात या सरोवरातले सर्व प्राणी आटून जाऊन, तुम्हा सर्वांवर तडफडून मरण्याचा प्रसंग येणार आहे, असे भविष्य काल एका ज्योतिषाने मला सांगितल्या-पासून तर, माझ्या मूळच्या दुःखात भर पडली आहे. त्यामुळे मला एकूण

a

जीवनाचा वीट आला असून, मी आमरण उपोषण करून याच ठिकाणी माझा देहांत करून घ्यायचा ठरविले आहे.'

त्या बगळ्याच्या तोंडून ही भविष्यवाणी ऐकताच त्या खेकड्याने ती गोष्ट त्या सरोवरातल्या जलचरांच्या कानी घातली. त्याबरोबर ते सर्व काठावर आले व त्या बगळ्याला विनवू लागले, 'बगळूमामा, असा स्वतःचा घात करून कशाला घेता? त्यापेक्षा तुम्ही आम्हाला वाचविण्याचा एखादा उपाय शोधून काढा आणि आम्हाला वाचवून तुम्हीही जिवंत रहा.'

बगळा म्हणाला, 'एक उपाय आहे, पण त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मला फार त्रास घ्यावा लागणार आहे. इथून काही अंतरावर जे एक अत्यंत खोल व विस्तीर्ण असे सरोवर आहे, त्यातले पाणी कुठल्याही दुष्काळात पूर्णपणे आटून जाणे शक्य नसल्याने, त्या सरोवरात तुमच्यापैकी एकेकाला नेऊन सोडायचे. त्यामुळे मला जरी त्रास घ्यावा लागणार असला, तरी तुमचे प्राण वाचतील आणि त्यायोगे माझी सर्व पापे धुवून जातील.'

'मग बगळूमामा, आतापासूनच या कामाला सुरुवात करा. देव तुमचं भलं करील.' असं त्या सरोवरातले मासे वगैरे म्हणताच, त्या कपटी बगळ्याने एकेका माशाला चोचीने उचलून दूर न्यावे व तिथे असलेल्या एका खडकावर त्याला आपटून मारून खावे, असे संहारसत्र सुरू केले. त्या सरोवरातल्या माशांना 'दूरच्या सरोवरात नेऊन सोडलेले तुमचे भाईबंद मोठ्या मजेत आहेत.' असे तो बगळा अधुनमधून सांगू लागल्याने, त्याचे हे कपटनाट्य सुरळीतपणे चालू राहिले.

a

पण एके दिवशी त्या खेकड्याला त्या बगळ्याबद्दल संशय आला. तो मनात म्हणाला, 'चोचीत मासे नेऊन नेऊन हा बगळा थकून जाण्याऐवजी, याची प्रक्रुती सुधारत आहे, हे कसे काय?' तो त्या बगळ्याला म्हणाला, 'बगळूमामा, वास्तविक त्या दिवशी मीच प्रथम तुमची प्रेमाने चौकशी केली. असे असता तुम्ही मला मात्र अजूनही त्या सुरक्षित सरोवरात का नेत नाही?'

बगळ्याला खेकड्याचे मांस खाण्याचा मोह अनावर झाला व तो त्याला पाठीवर घेऊन जाऊ लागला. पण तो खडक जवळ येताच जेव्हा त्या खेकड्याला माशांच्या काट्यांची व हाडांची मोठी रास दिसली, तेव्हा मनीचा संशय बळावून त्याने चौकशी केली, 'बगळेदादा, त्या खडकापाशी माशांच्या काट्यांची व हाडांची रास कशी काय हो जमा झाली?'

'पाण्यातला हा प्राणी आपल्याला हवेत काय इजा करणार?' अशा घमेंडीत तो बगळा त्या खेकड्याला म्हणाला, 'अरे मूर्खा! कुठला आलाय दुष्काळ आणि कुठले आलेय ते न आटणारे सरोवर? तुम्हा मूर्ख जलचरांना मी केवळ त्या थापा मारल्या. तुमच्या त्या तळ्यातून आजवर ज्या ज्या माशाला मी इकडे आणले, त्याला त्याला मी त्या खडकावर आपटून खाऊन टाकले. त्यांच्याच हाडाकाट्यांची ही रास आहे. तुझीही अखेरची घटका जवळ आली आहे. वाटल्यास मरणापूर्वी तू आपल्या कुलदेवतेचं स्मरण कर.'

बगळ्याचे कपट असे उघड होताच, त्या खेकड्याने आपल्या नांग्यांच्या कैचीने पटकन् त्याची मान मुरगळून त्याचे मस्तक धडावेगळे केले

a

व केवळ आपल्यावरचेच नव्हे, तर त्या सरोवरात उरलेल्या सर्व जलचर प्राण्यांच्या प्राणांवरचेही संकट दूर केले.'

ही गोष्ट त्या कावळा-कावळीला सांगून तो कोल्हा त्यांना म्हणाला, 'हे पहा, इथून पूर्व दिशेला सरोवर आहे ना... त्यात जलक्रीडा करण्याकरिता राजा, प्रधान किंवा त्यांच्या घरच्या स्त्रिया दररोज येतात व जलविहार करण्यासाठी सरोवरात शिरण्यापूर्वी आपापल्या गळ्यांतले रत्नामोत्यांचे कंठे वा सुवर्णमाला काठावर ठेवून देतात. तुम्ही उद्या त्या सरोवराकाठी जा आणि काठावर ठेवून दिलेल्या अशा माळांपैकी एखादी माळ चोचीने उचलून व हळूहळू उडून, ती माळ तुम्ही त्या दुष्ट सर्पाच्या ढोलीत टाका म्हणजे तुम्हाला हवी असलेली गोष्ट होऊन जाईल.'

दुसऱ्या दिवशी सकाळी तो कावळा व कावळी त्या सरोवराकडे गेली असता, त्यांना प्रत्यक्ष राणी व राजघराण्यातल्या इतर काही स्त्रिया गळ्यांतले रत्नहार व सोनसाखळ्या काठावर ठेवून सरोवरात जलविहार करीत असलेल्या दिसल्या. कावळीने झडप घालून त्यातली एक सोनसाखळी चोचीने उचलली व ती त्या कावळ्यासह त्या वडाच्या दिशेने मुद्दाम हळूहळू उडू लागली. त्याबरोबर त्या स्त्रियांसंगे आलेली सेवकमंडळी त्या दोघांच्या पाठोपाठ धावू लागली. शेवटी त्या कावळीने ती सोनसाखळी त्या वटवृक्षाच्या ढोलीत टाकली व पतीसह एका जवळच्या झाडावर जाऊन बसली. तेवढ्यात राणीच्या सेवकांनी त्या ढोलीत डोकावून पाहिले

असता, त्यांच्या दृष्टीने तो काळा सर्प पडला. त्यांनी त्याला काठ्या व दगड यांचा वापर करून ठार केला. तो मारला गेल्यामुळे ते कावळ्याचे जोडपे सुखी झाले.'

ही गोष्ट सांगून दमनक करटकाला म्हणाला, 'दादा-

*बुद्धिर्यस्य बलं तस्य*

*निर्बुद्धेस्तु कुतो बलम् ।*

(ज्याला बुद्धी असते त्याचाच प्रभाव पडतो, ज्याला बुद्धी नाही त्याच्यात कुठून 'दम असणार?)

'असं जे म्हटलं जातं ते खरं आहे.'

'अरे दमनका, समजा, तुला पुरेपूर बुद्धी असली तरी तिच्या जोरावर तू पिंगलक महाराज व संजीवक या जीवश्चकंठश्च मित्रांमध्ये फूट कशी काय पाडू शकणार?'

करटकाने हा प्रश्न केला असता दमनक आत्मविश्वासाने म्हणाला, 'दादा, अरे एक दुर्बळ ससा जर बुद्धीच्या सामर्थ्यावर एका सिंहाचा जीव घेऊ शकतो, तर तशाच बुद्धीच्या सामर्थ्यावर पिंगलकमहाराज व संजीवक यांच्यात मला फूट पाडता का येऊ नये?'

'ती गोष्ट काय आहे?' असे करटकाने विचारताच दमनक म्हणाला, 'ती गोष्ट अशी आहे-

# गोष्ट आठवी

## 'बुद्धिवंताची शक्ती खरी,
## तो जाई तिथे विजयाची गुढी उभारी'

एका वनात भासुरक नावाचा सिंह राहात असे. तो कारण नसता दररोज त्या वनातल्या अनेक पशूंची शिकार करी व त्यांतल्या एखाद्यालाच खाऊन, बाकीचे तसेच टाकून देई. त्यामुळे त्या वनातल्या पशूंची संख्या रोडावू लागली. अखेर एके दिवशी त्या वनातले हत्ती, रानरेडे, डुक्कर, ससे वगैरे प्राण्यांचे एक शिष्टमंडळ त्या सिंहाकडे गेले व त्याला वंदन करून म्हणाला, 'महाराज, आपली दररोजची भूक भागविण्यासाठी आपल्याला एखादा पशू पुरा पडत असताना, आपण पशूंची अमर्याद हत्या करता. हे असेच चालू राहिले, तर लवकरच हे वन पशूरहित होईल व आपल्यावरही उपासमारीचा प्रसंग येईल. तेव्हा यापुढे आम्हीच आपापसांत ठरवून दररोज आपल्याकडे ठरलेल्या वेळी एक वा दोन पशू पाठवीत जाऊ. त्यामुळे श्रम न पडता आपली भूक भागेल आणि आम्हा पशूंची विनाकारण होणारी हत्याही थांबेल.'

तो सिंह या गोष्टीचा विचार करू लागल्याचे पाहून हत्ती म्हणाला, 'महाराज, राजनीती या ग्रंथात असं सांगितलं आहे -

*गोपालेन प्रजाधेनोर्वित्तदुग्धं शनैः शनैः ।*
*पालनात्पोषणाद् ग्राह्यं न्याय्यां वृत्तिं समाचरेत् ॥*

**(प्रजा ही गाईसारखी आहे, तर राजा हा गवळ्यासारखा आहे. तेव्हा या गवळ्याने प्रजारूपी गाईचे पालनपोषण करून, तिला त्रास न होईल अशा तऱ्हेने, तिच्यापासून धीरे धीरे धनरूपी दूध मिळवावे, व न्याय्य वृत्तीने आपले जीवन जगावे**.)

मग रानरेडा पुढे होऊन म्हणाला, 'महाराज, राजनीतीत तर असंही सांगितलंय-

*अजामिव प्रजां मोहाद्यो*
*हन्यात् पृथिवीपतिः ।*
*तस्यैका जायते तृप्तिर्न द्वि*
*तीया कथचंन ।*

**(बोकडाला कापणाऱ्या एखाद्या कसायाप्रमाणे जो राजा धनलोभापायी आपल्या प्रजेला पुरेपूर मारतो - म्हणजे लुटतो - त्याचे फारतर एकदा समाधान होऊन शकते पण दुसऱ्या वेळेला ती समाधानाची संधी त्याला कधीही लाभत नाही**.)

रानरेड्याचे बोलणे पूर्ण होते न होते, तोच एक चतुर ससा पुढे सरसावून म्हणाला, 'महाराज, आपल्याला माझ्यासारख्यानं काय सांगावं? तरीही

a

'राजनीती' या ग्रंथातल्या एका मौल्यवान वचनाची मी आपल्याला आठवण करून देतो-

*यथा बीजांकुरः सूक्ष्मः*
*प्रयत्नेनाभिरक्षितः ।*
*फलप्रदो भवेत् काले*
*तद्वल्लोकः सुरक्षितः ।*

**(जसे सूक्ष्म अशा बीजांकुराचे प्रयत्नपूर्वक रक्षण केले असता कालांतराने ते वृक्षरूप होऊन फळे देऊ लागते. तसेच प्रजेला सुरक्षित ठेवले असता (राजाला) तिच्यापासून वैभव प्राप्त होते.)**

शिष्टमंडळाचे हे म्हणणे पटल्यामुळे भासुरकाने ते मान्य केले व ठरल्याप्रमाणे ते पशू दर दिवशी त्यांच्यापैकी एकेकाला त्या वनराजाकडे अगदी ठरविल्यावेळी पाठवू लागले. असे होता होता एके दिवशी. त्या शिष्टमंडळाबरोबर गेलेल्या बुद्धिमान् सशाचीच त्या भासुरकाकडे भक्ष्य म्हणून जाण्याची पाळी आली.

अश्रुभरल्या डोळ्यांनी आपल्या बायकापोरांचा निरोप घेऊन त्या सशाने सिंहाच्या गुहेचा रस्ता धरला. पण चालता चालता त्याच्या मनात विचार आला, 'या वनराज भासुरकाचा या वनातल्या पशूंना काहीतरी उपयोग आहे का? मुळीच नाही. उलट याने बेछूटपणे प्रजाजनांना मारू नये म्हणून त्याच्याच गुहेत दररोज एका प्राण्याने आपणहून जायचे, व त्याच्या

a

भक्ष्यस्थानी पडायचे, हा काय न्याय झाला? त्यापेक्षा यालाच कायमचे नाहीसे केले तर?' तो मनात असे म्हणतो न म्हणतो तोच, त्याला सभोवती दगडी बेंड बांधलेली एक विहीर दिसली. त्या विहिरीकडे जाऊन त्याने आत डोकावून पाहिले असता, त्याला आतल्या पाण्यात स्वतःचे स्पष्ट प्रतिबिंब दिसले आणि त्याचक्षणी त्याच्या तरल बुद्धीने त्या बेफाम सिंहाला कसे मारायचे याबाबत त्याला मार्गदर्शन केले.

मग उगाच इकडे तिकडे भटकण्यात वेळ घालवून तो ससा बऱ्याच उशिरा त्या सिंहाकडे गेला व संतप्त स्थितीत गुहेबाहेर येरझारा घालणाऱ्या सिंहाला नमस्कार करून म्हणाला, 'महाराज, आपण माझ्यावर रागावलात ते योग्य असले, तरी मला यायला उशीर झाला, यात माझा अपराध नाही. आपली भूक पुरेपूर भागावी, म्हणून मी माझ्या आणखी चार नातेवाईकांसह आपल्याकडे येण्यासाठी घरून वेळीच निघालो होतो, पण वाटेत दुसऱ्याच एका सिंहाने आम्हाला आडवून विचारले, 'काय हो, एवढ्या घाईने तुम्ही कुठे निघालात?'

'महाराज, आम्ही त्याला खरे ते सांगताच तो सिंह मला म्हणाला, 'या वनाचा राजा मी असताना, तुम्ही त्या उपटसुंभ भासुरक्याला का म्हणून वनाचा राजा मानता?' तू एकटाच त्याच्याकडे जाऊन सांग की, तुझ्यात ताकद असली, तर तू माझ्याशी लढायला ये.' याप्रमाणे बोलून, त्या सिंहाने माझ्या चार नातेवाईकांना त्याच्याकडे ओलीस म्हणून ठेवून घेतले व

a

स्वतःचा निरोप तुम्हाला सांगण्याकरिता फक्त मलाच तेवढे इकडे पाठवून दिले.'

त्या सशाने सांगितलेली ही हकीकत त्या भासुरकाला खरी वाटली व त्याच्या अंगाची लाहीलाही झाली. रागाने लटलट कापू लागलेला तो त्या सशाला म्हणाला, 'काय, तो महामूर्ख मला असं म्हणाला? तर मग तू मला आत्ताच त्याच्याकडे घेऊन चल. मी त्याला नाही ठार केले तर 'भासुरक' हे नाव लावणार नाही.'

यावर त्याला अधिक डिवचण्यासाठी तो ससा मुद्दामच म्हणाला, 'पण महाराज, त्या सिंहाची गुहा, सभोवताली दगडी तटबंदी असलेल्या एका छोट्याशा वर्तुळाकार किल्ल्यात आहे. तो केव्हाही त्या किल्ल्यातील गुहेचा आश्रय घेऊ शकतो. आणि किल्ल्याचं सामर्थ्य किती असतं, ते काय आपल्याला मी सांगायला हवं? युद्धशास्त्रावरील एका ग्रंथा म्हटलं अहे -

*न गजानां सहस्त्रेण*
*न च लक्षेण वाजिनाम् ।*
*यत्कृत्यं साध्यते राज्ञां*
*दुर्गेणैकेन सिद्ध्यति ॥*

**(राजाचे जे काम हजार हत्तींच्या किंवा लाख घोड्यांच्या सहाय्याने होऊ शकत नाही, ते काम एका किल्ल्यामुळे होते**.)

a

भडकलेला भासुरक म्हणाला, 'अरे, तो किल्ल्यातच काय, पण सप्तपाताळात जरी दडून राहिला, तरी मी त्याला शोधून ठार करीन. या बाबतीत शास्त्र असं सांगतं -

*जातमात्रं न यः शत्रुं*
*रोगं च प्रशमं नयेत् ।*
*महाबलोऽप तेनैव*
*वृद्धिंप्राप्य स हन्यते ॥*

**(शत्रू काय किंवा अग्नी काय, निर्माण होतो न होतो, तोच त्याचा नायनाट करावा. एकदा का तो वाढला, की मोठ्या बलवंताचाही तो प्राण घेतो**.)

परंतु तरीही ससा मुद्दाम म्हणाला, 'महाराज, आपलं म्हणणं योग्य असलं तरी मला 'राजनीतिशास्त्र' या ग्रंथातलं एक वचन आपल्या निदर्शनास आणावंस वाटतं. ते वचन असं आहे-

*अविदित्वत्मनः शक्तिं*
*परस्य च समुत्सुकः ।*
*गच्छन्नभिमुखो नाशं*
*याति वह्नौ पतङ्गवत् ॥*

**(शत्रूच्या व आपल्या सामर्थ्याचा अंदाज न घेता, जो त्याच्यावर घाईने चालून जातो, त्याचा अग्नीवर झेप घेणाऱ्या पतंगाप्रमाणे नाश होतो**.)

a

पण लगेच स्वतःला सावरल्यासारखे दाखवून तो ससा भासुरकाला म्हणाला, 'अर्थात् हे वचन आपल्यासारख्याला लागू होत नाही. कारण देवांनाही भारी होण्याएवढं सामर्थ्य आपल्या अंगी असताना, त्या शेळपटाची आपल्यापुढे डाळ कशी काय शिजणार?' सशाने केलेल्या स्तुतीमुळे हवेत तरंगू लागलेला तो भासुरक मोठ्या ऐटीत त्याच्या पाठोपाठ चालू लागला.

बऱ्याच वेळाने ती विहीर दृष्टीच्या टप्प्यात येताच ससा त्याला म्हणाला, 'महाराज, तोच आपल्या कट्टर शत्रूचा किल्ला. आपले नुसते दुरून दर्शन होताच, बेट्याने त्या किल्ल्यातील गुहेत दडी मारलेली दिसते.'

भासुरकाने त्या विहिरीजवळ जाऊन आत डोकावून पाहिले असता, आतल्या पाण्यात पडलेले आपलेच प्रतिबिंब दिसले. आपल्याला आव्हान देणारा हाच तो आपला शत्रू अशा समजुतीने त्याने गर्जना केली. तिचा प्रतिध्वनी निघताच 'आपला शत्रूही आपल्याकडे पाहून गरजतोय, 'असा समज होऊन, त्याने त्या प्रतिबिंबावर झेप घेतली आणि त्या पाण्यात थोडा वेळ गटांगळ्या खाऊन, भासुरकाला अखेर जलसमाधी मिळाली. अशा रीतीने एका सामान्य शक्तीच्या सशाने आपल्या असामान्य बुद्धीच्या जोरावर भासुरकाला मारले आणि स्वतःचेच नव्हे तर भविष्यकाळात बळी जाणार असलेल्या असंख्य वन्य पशूंचे प्राण वाचविले.

a

ही गोष्ट करटकाला सांगून दमनक कोल्हा त्याला म्हणाला, 'दादा, मीसुद्धा माझ्या बुद्धीच्या सामर्थ्यावर पिंगलक व संजीवक यांच्या मैत्रीत फूट पाडतो. फक्त तू मला आशीर्वाद दे.' करटकाने 'तू तुझ्या कामात यशस्वी हो,' असे म्हणताच दमनक पिंगलकाकडे गेला व नमस्कार करून चूपचाप उभा राहिला. त्याला तसे उभे राहिलेले पाहून पिंगलकाने विचारले, 'दमनका, आताशा तू माझ्याकडे चुकूनही येत नाहीस, हे कसे?'

दमनक बोलू लागला, 'महाराज, त्या संजीवकाशी मैत्री जुळवल्यापासून आम्ही इतर सर्व मंत्री जर आपल्या दृष्टीने कुचकामी ठरलो आहोत, तर उगाच आपल्याकडे यायचे तरी कशाला? मात्र आता आपल्यावर व आपल्या राज्यावर संकट येऊ पाहात असल्याने, मंत्री असलेल्या मला चूप बसून राहता येत नाही, म्हणून मी आपल्याकडे आलो आहे. म्हटलेच आहे ना?'

*प्रियं वा यदि वा द्वेष्यं*
*शुभं वा यदि वाऽशुभम् ।*
*अपृष्टोऽपि हितं ब्रूयात*
*यस्य नेच्छेत्पराभवम् ॥*

**(ज्याचा पराभव होऊ नये असे आपणास वाटते, त्याला बरे वाटो वा तिरस्करणीय वाटो, शुभ वाटो वा अशुभ वाटो, त्याने न विचारताच आपणत्याच्या हिताचे जे असेल ते सांगून टाकावे.)**

a

दमनक पुढे म्हणाला, 'महाराज, आता मी जे आपल्याला सांगणार आहे ते संजीवकाला मात्र सांगू नका. महाराज, तो आताशा मनातून आपला अतिशय तिरस्कार करतो. तो कालच मला म्हणाला, 'पिंगलकमहाराजांना काडीचीही अक्क्ल नाही. तेव्हा लवकरच मी त्यांना ठार करीन आणि मी स्वतःच या वनाचा राजा होईन.'

पिंगलक म्हणाला, 'दमनका, एकतर माझा संजीवक असं बोलणं शक्य नाही आणि समजा दुसरं म्हणजे, तो चुकून असे बोलला असला, तरी ज्याला अभय देऊन मी आपला मानला, त्याला मी कधीही अंतर देणार नाही. म्हटलंच आहे ना? -

*अनेकदोषदुष्टोऽपि*
*कायः कस्य न वल्लभः ।*
*कुर्वन्नपि व्यलीकानि*
*यः प्रियः प्रिय एव सः ॥*

(**अनेक दोष किंवा व्याधी यांमुळे त्रासदायक झाले, तरी आपले शरीर कुणाला प्रिय असत नाही? त्याचप्रमाणे जो प्रिय असतो, त्याने जरी नको त्या गोष्टी केल्या, तरी तो प्रियच राहतो**.)

'पण महाराज, जो आपल्या वाईटावर आहे. त्यालाही आपण आपला मानता?' असा प्रश्न दमनकाने केला असता पिंगलक म्हणाला, 'बाबा रे -

*उपकारिषु यः साधूः*
*साधुत्वे तस्य को गुणः ।*

*अपकारिषु यः साधुः*
*स साधुः सद्भिरुच्यते ॥*

(**जो उपकारकर्त्याशी चांगला वागतो, त्याच्या चांगलेपणाला काय अर्थ आहे? आपल्यावर अपकार करणाऱ्याशीही जो चांगला वागतो, तोच खरा साधुपुरुष, असे सज्जन म्हणतात**.)

दमनक म्हणाला, 'महाराज, आपले हे तत्त्वज्ञान एखाद्या साधूच्या तोंडी शोभून दिसणारे असले, तरी राजाच्या तोंडी शोभून दिसणारे नाही. राज्य चालविण्याच्या दृष्टीने पार निकामी असलेल्या त्या गवतखाऊ संजीवकाच्या नादी लागून, आपल्यातलं क्षात्रतेज लोप पावू लागलं आहे, राज्याकडे व सेवकांकडे आपलं दुर्लक्ष होऊ लागलं आहे आणि त्यामुळे सेवक आपल्याला सोडून इतरत निघून जाऊ लागले आहेत. हीच स्थिती जर पुढेही चालू राहिली, तर मला आपले व आपल्या राज्याचे भवितव्य आशादायक दिसत नाही. तेव्हा आपण त्या संजीवकाची संगत सोडा. एका ढेकणाच्या संगतीमुळे मंदविसर्पिणी नावाची ऊ प्राणास मुकली ती गोष्ट आपल्याला ठाऊक आहे ना?

'नाही, ती गोष्ट मला सांग,' असा आग्रह पिंगलकाने धरताच दमनक म्हणाला, 'ऐका-



a

# गोष्ट नववी

## 'संगत धरता दुष्टाची, शाश्वती नुरे जीविताची.'

एका राजाच्या शयनमहालातील पलंगावरच्या गाद्या-गिरद्यात 'मंदविसर्पिणी' नावाची एक पांढरी ऊ राहात होती. रात्री राजाला गाढ झोप लागली की, ती हळूहळू त्याचे रक्त पिई व सुखात राही.

एकदा तिच्याकडे 'अग्निमुख' नावाचा टपोरा ढेकूण आला. ती त्याला निघून जायला सांगू लागताच, तो म्हणाला, 'बाईसाहेब, घरी आलेल्या अतिथीला मानाने वागवावे, असे आपले धर्मशास्त्र सांगते. मी आजवर नेभळट माणसांचे बेचव रक्त प्यायलो, दुष्टांच्या कडू रक्ताची चव घेतली, भडक लोकांच्या तिखट रक्ताचा आस्वाद घेतला आणि आंबटशौकीन लोकांच्या आंबट रक्ताचीही रुची घेतली. पण गोड गोड पक्वान्नांवर ज्याचं शरीर पोसलं गेलं आहे, अशा एखाद्या राजाच्या गोड रक्ताचा मनसोक्त आस्वाद घेण्याची माझी इच्छा अजून अपुरी राहिली आहे. ती पूर्ण व्हावी, म्हणून मी आपल्याकडे आलो आहे. तेव्हा आजची रात्र मला इथे आसरा द्या. बाईसाहेब, राव असो, रंक असो, प्रत्येकाला एकदा तरी चांगलं -चुंगल खावं -प्यावंस वाटतंच. म्हटलंच आहे ना?' -

a

*रंकस्य नृपतेर्वापि जिव्हासौख्यं समं स्मृतम्*
*तन्मात्रं च स्मृतं सारं यदर्थं यतते जनः ॥*

**(रंक असो वा राजा असो, सर्वांमधे जिभेचे चोचले पुरविण्याची जागरूकता सारखीच असते. या जगात तीच तर महत्त्वाची गोष्ट मानली जाते व तिच्यासाठी लोकांची धडपड चाललेली असते.)**

अग्निमुख पुढं म्हणाला, 'बाईसाहेब, मला बिलकूल उताविळी नाही. वाटल्यास तुम्ही प्रथम राजाचे रक्त पोटी-पोटभर पिऊन घ्या आणि मग त्याला माझ्या हवाली करा. मग तर झालं?' अग्निमुखाच्या या बोलण्यावर त्या मंदविसर्पिणीचा विश्वास बसला व तिने त्याला लपून राहण्यासाठी त्या पलंगाचा एक कोपरा दाखविला.

तेवढ्यात राजा आला व पलंगावर पहुडला. त्याला पाहताच, त्याचे गोड रक्त पिण्याच्या हव्यासामुळे त्या अग्निमुखातला उतावळेपणा जागृत झाला आणि मंदविसर्पिणीला आपण काय आश्वासन दिले आहे ते विसरून, त्याने राजाजवळ जाऊन त्याच्या मांडीचा कडकडून चावा घेतला. स्वभाव कुठे बदलतो? म्हटलंच आहे ना?-

*स्वभावो नोपदेशेन*
*शक्यते कर्तुमन्यथा ।*
*सुतप्तमपि पानीयं*
*पुनर्गच्छति शीतताम् ॥*

**(पाणी जरी कितीही तापविले तरी ज्याप्रमाणे ते पुन्हा थंड होते, त्याचप्रमाणे कितीही जरी उपदेश केला, तरी स्वभाव बदलणे अशक्य असते. )**

त्या अग्निमुखाने घेतलेल्या चाव्यामुळे एखादी सुई टोचल्यासारखी वेदना होऊन, राजा अंथरुणातून उठला व त्याने महालाच्या दरवाजावर पहारा देणाऱ्या सेवकाला तो ढेकूण शोधून मारण्याचा हुकूम दिला.

त्या 'राजद्रोही' ढेकणाला शोधून मारण्यासाठी त्या सेवकाने पलंगावरची अंथरुणे-पांघरुणे उलटीपालटी करायला सुरुवात करताच, त्या चपळ ढेकणाने पलंगाच्या चौकटीतील फटीत दडी मारली आणि त्या सेवकाला एका कोपऱ्यात चूपचाप बसलेली मंदविसर्पिणी दिसली. त्याबरोबर 'हीच ऊ महाराजांच्या मांडीला चावली असावी,' असा समज होऊन, त्या सेवकाने तिला चिरडून टाकले.



a

ही गोष्ट सांगून दमनक पिंगलकाला म्हणाला, 'महाराज, पाणी जर तापलेल्या लोखंडावर पडले, तर ते वाफारून नाहीसे होते आणि तेच पाणी जर स्वाती नक्षत्रात, समुद्रातील एखाद्या शिंपल्यात पडले तर ते मोती बनते. वाईट व चांगल्या संगतीचा परिणाम असा भिन्नभिन्न होतो. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्या व राज्याच्या दृष्टीने पूर्ण कुचकामी असलेल्या त्या कपटी व गवतखाऊ संजीवकाच्या संगतीत आपण निदान यापुढे तरी राहू नका. आपल्या माहितीतल्या लोकांना दूर सारून, जो परक्यांना जवळ करतो त्याच्यावर - जसा त्या ककुद्रमावर ओढवला तसा - मरण्याचा प्रसंग ओढवतो.'

'तो कसा काय?' असा प्रश्न पिंगलकाने केला असता दमनक सांगू लागला-

# गोष्ट दहावी

# स्वजनांना त्यागून जो परक्याकडे जाई, तो दोन्हीकडून मार खाई

एका वनात राहणारा 'चंडरव' नावाचा कोल्हा भक्ष्याच्या शोधार्थ भटकता भटकता भर रात्री एका नजिकच्या गावात शिरला आणि एका रंगाऱ्याच्या घराच्या परसदारी गेला व निळ्या रंगाने भरलेल्या एका मोठ्या भांड्यात पडला. बरीच धडपड केल्यावर निळ्या रंगाने चिंब झालेला तो कोल्हा त्या भांड्यातून बाहेर पडला व कुत्र्यांची नजर चुकवीत पुन्हा रानात गेला.

दुसऱ्या दिवशी उजाडताच जेव्हा तो निळा कोल्हा त्या वनातील वाघ, सिंह, लांडगे आदि प्राण्यांच्या दृष्टीस पडला, तेव्हा भीतीने पळून जाता जाता ते आपापसांत म्हणू लागले, 'कोण बरं असावा हा प्राणी? आपल्याशी तुलना करता हा जरी आकाराने लहान असला तरी याचं सामर्थ्य जर मोठं असलं, तर हा आपल्याला मारल्याशिवाय कसा राहील? तेव्हा याच्यापासून दूर गेललंच बरं. म्हटलंच आहे ना?-

*न यस्य चेष्टितं विद्यात्*
*न कुलं न पराक्रमम् ।*
*न तस्य विश्वसेत् प्राज्ञो*
*यदीच्छेत् श्रियमात्मनः ॥*

a

**(आपण सुरक्षित राहावे असे ज्या सूज्ञाला वाटत असेल, त्याने ज्याची वागण्याची रीत, कूळ किंवा पराक्रम माहीत नाहीत, अशावर कधीही विश्वास ठेवू नये.)**



याप्रमाणे बोलून ते वन्य प्राणी पळून जाऊ लागल्याचे पाहून, त्या निळया कोल्ह्याने त्यांच्या या गैरसमजुतीचा फायदा उठविण्याचे ठरविले. तो त्यांना हाका मारून म्हणाला, 'बाबांनो, असे पळून न जाता मी काय सांगतो ते ऐका. या वनातील प्राण्यांना योग्य असा राजा नसल्याने, ब्रह्मदेवाने कालच मला निर्माण केले. 'ककुद्रम' असे माझे नाव ठेवले आणि स्वर्गलोकीच मला राज्याभिषेक करून, आज पहाटे मला पृथ्वीवरील या

वनाचा राजा म्हणून पाठवून दिले.' त्याच्या या सांगण्यावर सिंहादि मोठमोठ्या बलवान पशूंचाही विश्वास बसला व जो तो त्याच्या सेवेला लागला.

प्रधान या नात्याने सिंहाने दररोज शिकार करून ककुद्रमाला दोन वेळा चांगले मांस खायला आणून द्यावे, शरीररक्षक म्हणून वाघाने त्याचे रक्षण करून भोजनोत्तर त्याला विडे आणून द्यावे, द्वाररक्षक म्हणून लांडग्याने राजाला भेटायला येणाऱ्या-जाणाऱ्यांवर नियंत्रण ठेवावे, असा दिनक्रम सुरू झाला.

पण वाघ, सिंह, लांडगे अशांसारखे शक्तिशाली प्राणी सेवेला लागताच ककुद्रम शेफारून गेला व आपल्या जातभाईंना तुच्छ मानू लागला. वास्तविक त्यांनी त्याला ओळखले होते. पण 'आपलाच एक जातभाई वनाचा राजा म्हणून मिरवतो आहे ना?' अशा विचाराने ते गप्प बसले होते. परंतु जेव्हा तो स्वकीयांना तुच्छ मानून परक्यांना जवळ करू लागला तेव्हा त्यांनी त्याचे बिंग फोडण्याचा बेत केला. त्यानुसार ते कोल्हे एके दिवशी त्या ककुद्रमापासून काही अंतरावर एकत्र जमले व 'कुई कुई' ओरडू लागले. त्याबरोबर वाघ, सिंह आदि बड्या पण परक्या प्राण्यांत राजा म्हणून रुबाबात बसलेल्या ककुद्रमाच्या कानी ती कोल्हेकुई गेली आणि स्वभावधर्मानुसार उभे राहून व तोंड वर करून 'कुईकुई' असे ओरडायला सुरुवात केली.

a

त्याच्या त्या कोल्हेकुईमुळे त्याचे खरे स्वरूप उघडे होताच, ते त्याची सेवा करणारे बडे पशू एकमेकांना म्हणाले, 'अरे, हा तर एक फालतू कोल्हा आहे! याने मारलेल्या थापा खऱ्या मानून आपण फसलो व याच्या सेवेत गुंतून गेलो.' याप्रमाणे बोलून क्षणार्धात त्या पशूंनी त्या ककुद्रमालाच ठार केले.

ही गोष्ट पिंगलकाला सांगून दमनक त्याला म्हणाला, 'महाराज, म्हणून तुम्ही त्या ढोंगी व परक्या संजीवकाला जवळ करू नका. मी तर म्हणतो, तुम्ही त्या कपटी गवतखाऊला लवकरात लवकर यमलोकी रवाना करा व निश्चिंत व्हा.'

'पण दमनका, संजीवक हा खरोखरच माझ्या वाईटावर आहे याला पुरावा काय?'

असा प्रश्न पिंगलकाने केला असता दमनक म्हणाला, 'तो माझ्याशी जे बोलतो ते तर मी आपल्याला सांगितलेच. शिवाय त्याचा आपल्याला आजच मारण्याचा विचार दिसतोय. तो चरून जेव्हा आपल्याकडे येईल, तेव्हा आपण त्याच्याकडे बारकाईने पाहा. त्याची चर्या उग्र दिसेल, त्याच्या डोळ्यात लाली व क्रूरता आढळेल आणि त्याच्या नाकपुड्या क्रोधाने थरथरत असल्याचे दिसून येईल. आता एवढे पुरावे मिळाल्यावरही जर आपण त्याला ठार मारले नाही, तर आपण व आपले दैव. मी तरी आपल्याला आणखी किती सावध करणार?'

अशा तऱ्हेने पिंगलकाचे मन संजीवकाविरुद्ध पार कलुषित करून दमनक निघाला. तो बऱ्याच अंतरावर चरत असलेल्या संजीवकाकडे चिंताग्रस्त चेहेऱ्याने गेला. त्याला पाहताच त्याचे सुहास्य मुद्रेने स्वागत करून संजीवक म्हणाला, 'वा! दमनका, आज माझ्याकडे येऊन तू मला धन्य केलेस. म्हटलंच आहे ना?-

*ते धन्यास्ते विवेकज्ञास्ते*
*सभ्या इह भूतले ।*
*आगच्छन्ति गृहे येषां*
*कार्यार्थं सुहृदो जनाः ॥*

**(आपले हेतु सफल करून घेण्याच्या उद्देशाने ज्यांच्या घरी मित्रमंडळी येत राहतात, तेच लोक या जगात धन्य, विवेकी व सभ्य होत.)**

याप्रमाणे स्वागत करून संजीवकाने दमनकाला त्याचे क्षेम विचारले असता, दमनक मुद्दाम खिन्नपणे म्हणाला, 'अरे मित्रा, ज्याचे भविष्य सर्वस्वी धन्याच्या मर्जीवर अवलंबून असते, असा सेवक कधी सुखी असतो का? वास्तविक सेवक हा जरी जिवंत असला तरी तो मेल्यातच जमा असतो. म्हटलंच आहे ना?-

*जीवन्तोऽपि मृताः पञ्च*
*श्रूयन्ते किल भारते ।*
*दरिद्रो व्याधितो मूर्खः*
*प्रवासी नित्यसेवकः ॥*

a

(दरिद्री, रोगजर्जर, मूर्ख, प्रवासी व नेहमी सेवेत गुंतलेला, हे पाचजण जिवंत असूनही मेल्यात जमा असल्याचे जे महाभारतात म्हटले गेले आहे ते खरे आहे.)

'शिवाय-

*सेवा श्ववृत्तिराख्याता*
*यैस्तैर्मिथ्या प्रजल्पितम् ।*
*स्वच्छन्दं चरति श्वात्र*
*सेवकः परशासनात् ॥*

**(सेवावृत्तीला म्हणजे दुसऱ्याच्या नोकरीला जे 'श्वानवृत्ती असं म्हटलं जातं, ते चुकीन म्हटलं जातं. कारण कुत्रा हा निदान स्वतःच्या इच्छेनुसार इकडे तिकडे संचार तरी करू शकतो. पण सेवकाला मात्र दुसरा सांगेल त्याप्रमाणे वागावे लागेल.)**

संजीवकाने प्रश्न केला, 'अरे, पण तू काय साधासुधा सेवक आहेस? तू राजसेवक व त्यातून मंत्री आहेस. तेव्हा तुला दुःखी असण्याचं काय कारण?'

खिन्न स्वरात दमनक म्हणाला, 'बाबा रे, राजसेवक आहे म्हणूनच अधिक दुःखी आहे. राजसेवकाचं दैव राजाच्या लहरीबरोबर उलटंसुलटं होत असतं. तुझीच गोष्ट घे ना! कालपर्यंत तुझ्यावर प्रेमाचा वर्षाव करणारे महाराज, तुझा काही एक अपराध नसता, आज तुला जिवे मारायला तयार व्हावे, हा काय न्याय झाला?'

a

दमनकाच्या या विधानामुळे पार हादरून जाऊन संजीवकाने विचारले, 'काय म्हणतोस काय दमनका? महाराज मला जिवे मारणार आहेत? आणि ते का?'

दमनक म्हणाला, 'अरे, राजाने व पावसाने झोडपले तर कारण विचारायचे असते का? त्यांची लहर हेच त्याचे कारण. 'आपण संजीवकाला मारून, आपल्या सर्व परिवाराला मेजवानी देणार आहोत, 'असं ते नुकतेच मला म्हणाले, म्हणून तुला सांगावयास आलो. वास्तविक राजाने विश्वासात घेऊन सांगितलेली गोष्ट मंत्र्याने बाहेर फोडणे हे पाप आहे. धर्मशास्त्रच मुळी असं सांगत की-

*यो मन्त्रं स्वामिनो भिन्द्या-*
*त्साचिव्ये सन्नियोजितः ।*
*स हत्वा नृपकार्यं तत्*
*स्वयं च नरकं व्रजेत् ॥*

**(जो मंत्री धन्याचे म्हणजे राजाचे रहस्य बाहेर फोडतो, तो त्या राजाच्या कार्याची तर हानी करतोच, पण त्यायोगे स्वतःही नरकात जातो.)**

'तेव्हा मित्रा संजीवका, वास्तविक हे गुपित मी तुला सांगायलाच नको होतं पण केवळ माझ्यावर विश्वास ठेवून तू पिंगलकमहाराजांकडे गेलास व त्यांचा मित्र बनलास म्हणून तुझ्यावर आलेल्या प्राणसंकटा-ची तुला कल्पना देणे हे मी माझे अधिक श्रेष्ठ कर्तव्य मानले व ते गुपित तुझ्यापाशी उघड केले.'

'पण पिंगलकमहाराजांच्या डोक्यात आलेला हा घातक विचार त्यांनी काढून टाकावा यासाठी तू त्यांना काही सांगून पाहिले नाहीस का?' असा प्रश्न संजीवकाने केला असता कपटी दमनक त्याला साळसूदपणे म्हणाला, 'मी सर्व तऱ्हेने प्रयत्न केले, पण ते मला म्हणू लागले, 'अरे दमनका, तो संजीवक हा काही झाले तरी गवतखाऊ आणि आपण मांसाहारी. तेव्हा त्याच्याशी मैत्री ठेवण्याऐवजी त्याला शत्रु मानणे, हेच शहाणपणाचे नाही का? आणि शत्रु म्हटला म्हणजे, त्याला जरी स्वतःची मुलगी दिलेली असली तरी त्याचा निःपात करणे हे माझ्यासारख्या क्षत्रियाचे कर्तव्य आहे.' पिंगलकमहाराज असे बोलल्यावर माझे काय चालणार?'

संजीवक म्हणाला, 'एका अर्थी पिंगलकाचं म्हणण खरं आहे. त्याच्याशी मी मैत्री केली ही माझीच चूक झाली. म्हटलेच आहे ना?

***ययोरेव समं वित्तं ययोरेव समं कुलम् ।***

***तयोर्मैत्री विवाहश्च न तु पुष्टविपुष्ट्योः ॥***

(ज्यांची आर्थिक परिस्थिती सारखी असते व ज्यांचे कुल तोलामोलाचे असते त्यांच्यातच मैत्री व विवाह जुळून येतात, विषमांत जुळून येत नाहीत.)

यावर संभावितपणाचा आव आणून दमनकाने विचारले, 'संजीवका, तूच एकदा तुझ्या प्रभावी वाणीने महाराजांचा तुझ्याबद्दलचा राग घालवून टाकण्याचा प्रयत्न का करीत नाहीस?'

a

हताशपणे संजीवक म्हणाला 'दमनका, त्याचा काही उपयोग होणार नाही. कारण-

*निमित्तमुद्दिश्य हि यः प्रकुप्यति ।*
*ध्रुवं स तस्यापगमे प्रशाम्यति ।*
*अकारणद्वेषपरो हि यो भवेत् ।*
*कथं नरस्तं परितोषयिष्यति ॥*

**(जो काही कारणास्तव रागावतो, तो ते कारण दूर केले की लगेच शांत होतो. पण जो काहीएक कारण नसताना द्वेष करतो वा रागावतो-अशा पुरुषाचे समाधान कसे करायचे?)**

'तेव्हा दमनका, एकतर मी त्या पिंगलकाचे मन वळविण्याचा कितीही प्रयत्न केला तरी ते वळणार नाही आणि दुसरे म्हणजे समजा, त्याचे मन यदाकदाचित वळले, तरी ज्याप्रमाणे त्या क्रथनक नावाच्या सज्जन उंटाचा त्या कपटी कावळा, कोल्हा आदि त्याच्याच सहकाऱ्यांनी बळी घेतला, त्याचप्रमाणे पिंगलकाचे कान फुंकणारे 'पापग्रह' आज ना उद्या माझाही बळी घेतल्याशिवाय राहणार नाहीत.'

'बळी घेतल्या गेलेल्या त्या क्रथनक उंटाची गोष्ट काय आहे?' अशी पृच्छा दमनकाने केली असता संजीवक म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट अकरावी

## 'दुष्टांचे बोलणे असे गोडे,

### पण त्यावर भाळणारा फशी पडे.'

एका वनात 'मदोत्कट' नावाचा एक सिंह राहात होता. त्याच्या अनुयायांमध्ये चित्ता, कोल्हा व एक कावळा हे तिघे प्रमुख होते.

एकदा आपल्या अनुयायांसह तो मदोत्कट सिंह वनात फिरत असता, त्याला एक उंट दिसला. तो उंट मूळ तांड्यापासून अलग पडून, भटकत भटकत, चुकून त्या वनात आला होता. मदोत्कटाने त्यापूर्वी कधीही उंट पाहिलेला नसल्याने त्याने विचारले, 'हा प्राणी कोण आहे आणि हा वनातच राहातो, की लोकांच्या आधाराने गावात राहतो?'

कावळा म्हणाला, 'महाराज, याला उंट असे म्हणतात. हा माणसांत राहातो व त्यांची ओझी वाहण्याची कामे करतो. याचे मांस फार रुचकर असते. आपण याला मारलेत, तर तीन-चार दिवस आपली सर्वांचीच चंगळ उडेल.'

मदोत्कट म्हणाला, 'कावळोबा, तुम्हाला खाण्याशिवाय दुसरे काहीच सुचत नाही का? वास्तविक, तो त्याचे भाईबंद सोडून आपल्याकडे आलेला

आहे, तेव्हा त्याला अभय देणे, हे आपले पवित्र कर्तव्य आहे. म्हटलंच आहे ना?-

*न गोप्रदानं न महीप्रदानं न चान्नदानं हि तथा प्रधानम् ।*
*यथा वदन्तीह बुधाः प्रधानं सर्वप्रदानेष्वभयप्रदानम् ॥*

**(गाईचे दान नव्हे, भूमीचे दान नव्हे, किंवा अन्नदानही तेवढे महत्त्वाचे नव्हे, एवढे अभयदान हे सर्व दानांमध्ये श्रेष्ठ आहे, असे सूज्ञ म्हणतात.)**

खुद्द मदोत्कटच असे म्हणाल्यामुळे कावळा, कोल्हा व चित्ता हे तिघेही गप्प बसले आणि मदोत्कटाच्या आज्ञेवरून ते त्या उंटाला घेऊन त्याच्याकडे आहे. मदोत्कटाने त्या उंटाची आस्थेने चौकशी करून त्याला अभय दिले व आपल्या परिवारात सामील करून घेतले. मग तो क्रथनक नावाचा उंट त्या रानात उगवलेल्या पाचूसारख्या गवतावर आपला उदरनिर्वाह मोठ्या सुखात करू लागला. पण, या उंटाला मारून त्याच्या रुचकर मांसाचा आस्वाद घेण्याऐवजी, आपल्या वनराजाने त्याला अभय दिले, ही गोष्ट कावळा, कोल्हा व चित्ता यांच्या मनात सलत राहिली.

एके दिवशी त्या मदोत्कट सिंहाची, त्याच वनातील एका उन्मत्त हत्तीशी झुंज झाली, आणि तीत त्या हत्तीचा सुळा लागून, मदोत्कटाला जबर जखम झाली. त्यामुळे आजारी पडून, त्याच्यावर गुहेत पडून राहाण्याची पाळी आली.

a

मदोत्कटाचे शिकारीसाठी बाहेर जाणे बंद झाल्यामुळे, त्याच्याबरोबरच त्याच्या परिवारातील चित्ता, कोल्हा व कावळा आदि पशुपक्ष्यांची उपासमार होऊ लागली. अशा स्थितीत एकदा मदोत्कट त्यांना म्हणाला, 'बाबांनो, सध्या मला काही शिकारीसाठी बाहेर पडता येत नाही. तेव्हा तुम्ही जर एखाद्या प्राण्याला फसवून माझ्या गुहेत आणलेत, तर इथल्या इथे मी त्याची शिकार करीन आणि माझ्या भुकेबरोबरच तुमचीही भूक भागवीन.'

मदोत्कटाने याप्रमाणे सांगताच, चित्ता, कोल्हा व कावळा हे तिघेही तिथून निघून वनात गेले व श्वापदाचा शोध घेऊ लागले. बराच प्रयत्न करूनदेखील 'शिकार' दृष्टिपथात न आल्याने कोल्हा आपल्या दोघा साथीदारांना म्हणाला, 'उंटासारखा चवदार प्राणी हाताशी असताना, महाराज त्यालाच का मारीत नाहीत? त्याला मारले असते, तर चार-दोन दिवस त्याचे मांस आपल्याला पोटीपोटभर झाले असते.'

कावळा म्हणाला, 'मलाही तसेच वाटते. पण महाराज पडले धार्मिक. तेव्हा अभय दिलेल्या त्याला ते कसे मारतील?'

कोल्हा बोलू लागला, 'हे पहा, जे स्वतःला 'धार्मिक' म्हणवून घेतात ना, ते स्वतःच्या सोयीचे असे धर्मग्रंथातले आधार घेऊन, तुमच्या आमच्या सर्वसामान्यांप्रमाणेच मनःपूत वागत असतात. तेव्हा मी एकटाच महाराजांकडे जातो आणि धर्मातले आधार देऊनच त्या उंटाला मारण्याबाबत त्यांची संमती मिळवतो.'

a

चित्ता व कावळा यांना असे आश्वासन देऊन व त्यांना ते होते त्याच ठिकाणी थांबायला सांगून, तो कपटी कोल्हा मदोत्कटाकडे मंदगतीने गेला व त्याला म्हणाला, 'महाराज, आम्ही तिघांनी शोध घेऊनही आम्हाला शिकार मिळाली नाही आणि भुकेने शक्तिहीन झाल्यामुळे शिकारीच्या शोधार्थ आणखी भटकण्याएवढे आता आमच्या अंगात त्राणही राहिले नाही. अशा स्थितीत आपण त्या निरुपयोगी क्रथनक उंटालाच मारून खाल्ले तर?'

मदोत्कट म्हणाला, 'अरे नीचा, काय बोलतोस तू हे? ज्याला मी अभय दिले आहे, त्यालाच मी मारून खाऊ? धर्माच्या विरुद्ध अशी ही गोष्ट मी कदापीही करणार नाही.'

कोल्हा बोलू लागला, 'महाराज, आपल्यासारख्या धर्मवीराला मी अधार्मिक कृत्य करायला कसा सांगेन? पण समजा, महाराजांचे भुकेमुळे जाऊ पाहणारे प्राण वाचविण्यासाठी जर त्या स्वामीभक्त क्रथनकानेच प्राणार्पण करण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्याची इच्छा जर चित्त्याने व मी पूर्ण करण्यात मदत केली, तर आपण त्या क्रथनकाचे मांस खाल ना? कारण त्यामुळे क्रथनकासारख्या निष्ठावंत सेवकाची पवित्र इच्छा पूर्ण केल्याचे धर्मकृत्य आपल्या हातून घडेल आणि धन्याचे प्राण वाचविण्यासाठी प्राणार्पण करण्याचे धर्मकृत्य त्या क्रथनकाकडून घडल्यामुळे, त्यालाही मरणोत्तर स्वर्ग मिळेल.'

भुकेल्या मदोत्कटाने उत्तर दिले, 'हा तुमचा मार्ग धर्माला धरून असल्याने, मी त्याचे मांस आनंदाने खाईन. कुणीकडून तरी क्रथनकाला मरणोत्तर स्वर्ग मिळावा अशीच माझी इच्छा आहे.'

मदोत्कटाने तशी तयारी दाखविताच, त्या पाताळयंत्री कोल्ह्याच्या पायात जोर आला. तो वेगाने आपले सहकारी कावळा व चित्ता यांच्याकडे गेला व त्यांच्या कानात काहीतरी कुजबुजला. मग ते तिघेही दूरवरच्या एका कुरणात चरत असलेल्या क्रथनकाकडे गेले.

तिथे जाताच कोल्हा त्या उंटाला म्हणाला, 'मित्रा, भुकेने व्याकुळ झालेले मदोत्कटमहाराज अखेरच्या घटका मोजत आहेत. अशा वेळी आपण त्यांच्याकडे जाऊन त्यांना, 'तुम्ही आम्हाला मारून खा, पण तुमचे प्राण वाचवा,' असे सांगितले पाहिजे. मदोत्कटमहाराज आपल्याला मारून खाणे शक्य नाही. तेव्हा त्यांना नुसते तसे सांगायला काय हरकत आहे? म्हणून आपण चौघेही त्यांच्याकडे आताच जाऊ या.' तो कोल्हा याप्रमाणे बोलल्यावर तो स्वतः, कावळा व उंट असे चौघेही मदोत्कटाकडे गेले व त्याला नमस्कार करून उभे राहिले.

मग तो कावळा मदोत्कटाला म्हणाला, 'महाराज, गेल्या तीन-चार दिवसांत पोटात मांसाचा कणही न गेल्याने, आपले प्राण जाण्याची पाळी आली आहे. अशा स्थितीत आपण मागेपुढे न पाहता निःशंकपणे मला मारून खावे व स्वतःचे प्राण वाचवावे. त्यात माझेही हित आहे. कारण-

*स्वाम्यर्थे यस्त्यजेत् प्राणान्*
*भृत्यो भक्तिसमन्वितः ।*
*परं स पदमाप्नोति*
*जरामरणवर्जितम् ॥*

**(भक्तियुक्त मनाने जो सेवक स्वामीसाठी आपले प्राण देतो, त्याला वृद्धत्व व मृत्यु यांच्यापासून मुक्त अशा अढळपदाचा लाभ होतो.)**

त्या कावळ्याचे हे बोलणे पूर्ण होते न होते, तोच त्याला बाजूला सारून कोल्हा त्या सिंहाला म्हणाला, 'महाराज, या कावळ्याला खाऊन आपले पोट कसे काय भरणार? तेव्हा आपण मलाच मारून खावे व माझे जीवन धन्य करावे.'

मग त्या कोल्ह्याशी मागे ढकलून चित्ता पुढे व मदोत्कटाला म्हणाला, 'महाराज, या कावळ्याला खाऊन आपल्या पोटात कोकलत असलेले भुकेचे कावळे काही तृप्त होणार नाहीत आणि आपल्याप्रमाणेच नख्यांनी शिकार करणारा हा कोल्हा आपल्याच संस्कृतीचा असल्याने, याला आपण मारून खाणेही योग्य नाही. तेव्हा आपण मलाच मारून खावे आणि योग्यांनाही मरणोत्तर जी गती मिळत नाही, ती गती मिळण्याची संधी देऊन मला धन्य करावे.'

कावळा, कोल्हा व चित्ता यांनी प्राणार्पण करण्याची तयारी दर्शविली असतानाही मदोत्कटाने त्यांना मारून खाल्ले नाही; मग मला तर अभय

दिले असल्याने, तो मारणे शक्य नाही, अशी समजूत होऊन क्रथनक उंटही पुढे सरसावला व मदोत्कटाला म्हणाला, 'महाराज, चित्ता हासुद्धा आपल्याप्रमाणेच नख्यांनी शिकार करणारा असल्याने, तो आपल्याच संस्कृतीतला आहे. तेव्हा त्याला न मारता, आपण मलाच मारून खावे व मला मरणोत्तर उत्तम गतीचा धनी करावे.' क्रथनक याप्रमाणे बोलताच, कोल्हा व चित्ता यांनी त्याच्यावर झडप घेऊन त्याला ठार मारले आणि मग मदोत्कटासह त्या सर्वांनी त्याचे मांस अगदी चवीने खाल्ले..."

ही गोष्ट सांगून संजीवक दमनकाला म्हणाले, 'तेव्हा मित्रा, तुझ्या म्हणण्याप्रमाणे जरी मी त्या पिंगलकाची समजूत घालून, त्याच्या मनात माझ्याविषयी निर्माण झालेला गैरसमज दूर केला, तरी त्याच्याभोवती वावरणारे दुष्ट सल्लागार त्याचे मन पुन्हा कोणत्याही रीतीने कलुषित करतील व माझा घात करतील. त्यामुळे पिंगलकाशी पुन्हा स्नेहसंबंधी जोडण्यात अर्थ नाही. कारण म्हटलंच आहे. -

*गृध्राकारोऽपि सेव्यः स्यात*
*हंसाकारैः सभासदैः*
*हंसाकारोपि सन्त्याज्यो*
*गृध्राकारैः स तैर्नृपः ॥*

**(भोवतालच्या परिवारातील लोक हे जर हंसांप्रमाणे असतील, तर गिधाडाप्रमाणे असलेल्या राजाच्या सेवेत रहावे, पण**

a

**भोवतालच्या परिवारातील लोक हे जर गिधाडांप्रमाणे असतील, तर हंसाप्रमाणे असलेल्या राजाच्याही सेवेत राहू नये.)**

'शिवाय हे दमनका, दुष्टाबद्दल बोलायचं झालं तर तो एक महाभयंकर सर्पच आहे. म्हटलंच आहे ना?-

*अहो खलभुजङ्गस्य*
*विपरीतो वधक्रमः ।*
*कर्णे लगति चैकस्य*
*प्राणैरन्यो वियुज्यते ॥*

**(अहो, खलरूपी सर्पाची दुसऱ्यांना मारण्याची रीत मोठी अजब असते. तो एकाच्या कानाला दंश करतो. तर दुसऱ्याचा प्राण घेतो.)**

ह्या संजीवकाची व पिंगलकाची झुंज सुरू झाली आणि त्यात एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत असता, त्यांच्यापैकी एखाद्याने, मी त्याला दुसऱ्याविरुद्ध उठवल्याची गोष्ट उघड केली, तर पिंगलक आपल्याला ठार मारल्याशिवाय राहणार नाही, त्यापेक्षा या संजीवकाला दूरच्या रानात जायला सांगणे अधिक बरे! असा विचार करून दमनक त्याला म्हणाला, 'संजीवका, मला वाटते तू पिंगलकमहाराजांपासून तुझे रक्षण करण्यासाठी दुसऱ्या एखाद्या वनात निघून जावेस.'

संजीवक म्हणाला, 'नाही दमनका, मी या वनातून दुसऱ्या वनात गेलो, तरी परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही. कारण -

*महतां योऽपराध्येत*

*दूरस्थोंऽस्मीति नाश्वसेत् ।*

*दीर्घो बुद्धिमतो बाहू*

*ताभ्यां हिंसति हिंसकम् ॥*

**(थोरामोठ्यांचा ज्याने अपराध केला, त्याने 'आपण दूर आहोत म्हणजे सुरक्षित आहोत, अशा विश्वासावर राहू नये, कारण बुद्धिवंताचे बाहू फार दूरवरपर्यंत पोहोचतात आणि त्यांच्या सहाय्याने तो अपराध्याला मारू शकतो.)**

'तेव्हा दमनका, समजा पिंगलकाशी लढता लढता मला मरण आले, तरी मी ते पत्करीन, पण पळून दुसऱ्या रानात जाणार नाही.'

संजीवकाने पिंगलकाशी लढण्याचा केलेला निर्धार त्याने बदलावा म्हणून दमनक त्याला म्हणाला, 'मित्रा, निर्णय घेण्यात तू अशी उताविळी करू नकोस. **ज्याच्याशी आपल्याला लढायचे आहे, त्या शत्रूशी अगोदर ताकद ओळखून, मगच त्याच्याशी लढायचे की नाही, याबद्दलचा निर्णय घ्यावा**. नाहीतर त्या टिटव्याकडून पराभूत होण्याचा प्रसंग जसा समुद्रावर आला, तसा प्रसंग तुझ्यावर यायचा.'

'तो कसा काय?' असा प्रश्न संजीवकाने विचारला असता, दमनक सांगू लागला-

a

# गोष्ट बारावी

## 'जो न ऐके हिताचे बोलणे, त्याच्या नशिबी ठोकरा खाणे!

सागरतीरी टिटवा - टिटवीचे एक जोडपे राहात होते. एकदा टिटवी लाजत मुरकत टिटव्याला म्हणाली, 'ऐकल का? मला दिवस गेलेत. तेव्हा मला अंडी घालण्याच्या दृष्टीने एखादे सुरक्षित ठिकाण तुम्ही शोधून काढा.'

टिटवा म्हणाला, 'कांते, अगं समुद्रकिनाऱ्यासारखं हवेशीर ठिकाण सोडून, अंडी घालण्यासाठी दूरच्या ठिकाणी जाण्याचं काय कारणं? तू या किनाऱ्यालगतच्या पुळणीतच अंडी घाल.'

टिटवी म्हणाली, 'पण पुनवेला या समुद्राला नेहमीपेक्षा अधिक भरती आली आणि याच्या लाटांबरोबर याने माझी अंडी वाहून नेली, तर काय करू?'

टिटवा हसून म्हणाला, 'प्रिये, तुम्हा बायकांची जात अती भित्री. अगं आपल्या अंड्यांना हात लावण्याची त्या समुद्राची काय बिशाद लागते?'

त्या टिटव्याचे हे बोलणे ऐकून, त्या समुद्राने मुद्दामच टिटवीने अंडी घातल्यावर ती लांबविण्याचे ठरविले. तो मनात म्हणाला, 'ज्या पुरुषांचे तेज घराबाहेरच्या जगात कुठेच पडत नसते, त्यांणा घरात बायकापोरांसमोर पावलोपावली आपल्या मोठेपणाचे प्रदर्शन करण्याची वाईट खोड असते.

a

तेव्हा निदान या टिटव्याची मिजास उतरविण्यासाठी तरी, या टिटवीची अंडी लांबवायलाच हवीत.'

मग पतीच्या सांगण्यानुसार टिटवीने सागरकिनारीच्या वाळवंटात अंडी घातली, आणि एके दिवशी ती दोघे भक्ष्याच्या शोधार्थ दूरवर गेली असता, समुद्राने पुनवेच्या महाभरतीची संधी साधून, आपल्या लाटांच्या हातांनी ती अंडी लांबविली.



परत आल्यावर जेव्हा आपली अंडी समुद्राने पळवून नेली असल्याचे त्या टिटवीला आढळून आले, तेव्हा आकांत करीत ती टिटव्याला म्हणाली, 'तुम्हाला परोपरीने सांगूनही तुम्ही माझे ऐकले नाही, म्हणून आपल्यावर हा प्रसंग ओढवला. दुसरे लोक हिताचे सांगत असतानाही, जे आपल्याच हेक्यानुसार वागतात, ते काठी सोडल्यामुळे आकाशातून खाली पडून मेलेल्या कासवाप्रमाणे नाश पावतात?'

ती कासवाची गोष्ट काय आहे, 'अशी पृच्छा टिटव्याने केली असता, आपले रडणे तात्पुरते थांबवून टिटवी म्हणाली, 'ऐका-

# गोष्ट तेरावी

## 'प्रसंगाचे ठेवावे भान अन्यथा करून घ्यावे नुकसान.'

एका सरोवरात कंबुग्रीव नावाचे एक कासव राहात होते. त्याच सरोवरात जलविहार करण्यासाठी संकट व विकट या नावचे दोन हंसे येत व अधुनमधून त्या कासवाला देवादिकांच्या बोधप्रद गोष्टी सांगत. संध्याकाळ व्हायला आली; की ते हंस दूरच्या झाडांवर असलेल्या आपल्या घरट्यांकडे निघून जात.

एका वर्षी पाऊस न पडल्याने ते सरोवर आटले. तेव्हा ते हंस त्या कासवाला म्हणाले, 'कंबुग्रीवा, या तळ्यात आता बव्हंशी चिखलच उरला आहे. उद्या हे तळे कोरडे ठणठणीत झाले की, तुझे काय होणार, याची आम्हाला चिंता लागली आहे. आम्ही दोघे पाण्याने तुडुंब भरलेल्या दुसऱ्या एका दूरच्या सरोवराकडे जलविहारासाठी जाऊ शकतो. पण तू कुठे जाणार?'

ते कासव म्हणाले, 'मी कधीही उद्याची चिंता करीत नाही. पण तुम्हीच विषय काढलात म्हणून सांगतो- तुम्ही बेतशीर लांबीची एक काठी घेऊन या. मी त्या काठीचा मध्यभाग माझ्या तोंडात घट्ट पकडतो. मग तुम्ही दोघे

त्या काठीचे एकेक टोक तुमच्या चोचीत घट्ट धरा व उडत उडत मला त्या भरपूर पाणी असलेल्या सरोवरात नेऊन सोडा.'

ते हंस म्हणाले, 'कंबुग्रीवा, तू युक्ती तर नामी शोधून काढलीस. पण आम्ही दोघे हवेतून उडत असताना, तू कुठल्याही परिस्थितीत तोंड मात्र उघडू नकोस. नाहीतर उंचावरून जमिनीवर जोरात आदळशील व फुकट मरून जाशील.' यावर ते कासव म्हणाले, 'मित्रांनो, माझी चिंता वहायला मी समर्थ आहे.' मग त्या हंसांनी एक काठी आणली. त्या कासवाने तिला मध्यभागी तोंडात घट्ट पकडली, आणि त्या हंसांपैकी प्रत्येकाने तिचे एकेक टोक चोचीत दाबून धरून आकाशात भरारी घेतली.



अशा तऱ्हेने ते हंस त्या कासवासह हवेतून उडत उडत एका गावावरून चालले असता, त्यांना त्या गावातल्या गावकऱ्यांनी पाहिले व ते गावकरी एकमेकांना विचारू लागले, 'काय हो, ते दोन हंस वाटोळे वाटोळे असे जे काहीतरी घेऊन चालले आहेत, ते काय असेल?'

ते त्यांचे शब्द कानी पडताच त्या कासवाने, त्या हंसांना, 'मित्रांनो, त्या मूर्ख गावकऱ्यांना, मी कासव आहे ही साधी गोष्टसुद्धा कळू नये?' असे विचारण्याकरिता तोंड उघडले, त्याबरोबर - काठीचा आधार सुटल्यामुळे - ते कासव आकाशातून जमिनीवर कोसळून छिन्नविच्छिन्न झाले.' ही गोष्ट सांगून टिटवी टिटव्याला म्हणाली, 'त्या हंसांनी सांगितलेली हिताची गोष्ट सांगून दुर्लक्षिल्यामुळे त्या कासवाचा असा दारूण शेवट झाला.'

ती टिटवी पुढं म्हणाली, 'उद्याची चिंता आज कशाला करायची? किंवा 'माझी चिंता वाहायला मी समर्थ आहे,' असे म्हणून बेसावध कधीही राहू नये. तसे बेसावध राहिल्यामुळे व आपले भविष्य नशिबावर सोपविल्यामुळेच त्या 'यद्भविष्य' नावाच्या माशावरती प्राण गमावण्याचा प्रसंग आला.'

'ती गोष्ट काय आहे?' असे त्या टिटव्याने मोठ्या उत्कंठेने विचारले असता, टिटवी म्हणाली, 'नीट ऐका-

a

# गोष्ट चौदावी

## नशिबाचे तट्टू पावलास अडे,
## तर प्रयत्नाचा घोडा चौखूर दौडे.

एका सरोवरात अनागतविधाता, प्रत्युत्पन्नमती, व यद्भविष्य या नावाचे तीन मासे आपापल्या बंधुबांधवांसह राहात होते. त्यांच्यापैकी 'अनागतविधाता' हा मासा भविष्यकाळात संकट येण्याची शक्यता दिसताच, त्या संकटातून सहीसलामत सुटण्याची अगोदरच उपाययोजना करी. 'प्रत्युत्पन्नमती' हा - आयत्या वेळी का होईना - युक्ती लढवून, आलेल्या संकटातून सुखरूपपणे बाहेर पडण्यात यश मिळवी; तर तिसरा 'यद्भविष्य' हा मासा 'नशिबात असेल ते होईल' असे म्हणून स्वस्थ बसून राही.

एके दिवशी संध्याकाळी, काही कोळी, दुसऱ्या एका सरोवरातले मासे पकडून, ते तीन मासे रहात असलेल्या सरोवराच्या काठाने चालले असता, त्यांना ते मासे दिसले. ते पाहून ते कोळी आपापसांत म्हणाले, 'वाः! केवढे मोठमोठे मासे आहेत या तळ्यात! सध्या आपल्यापाशी भरपूर मासे असल्याने, व आता अंधारूनही लागले असल्याने, आपण उद्या सकाळी या तळ्याकडे येऊ व इथल्या माशांना पागवून नेऊ.'


a

कोळयांचे ते बोलणे एखाद्या वज्राघातासारखे कानी पडताच, अनागतविधाता मासा त्या सरोवरातल्या माशांना जवळ बोलावून घेऊन म्हणाला, 'ते कोळी जे बोलले ते ऐकलेत ना? तेव्हा आपण सर्वांनी आत्ताच्या आत्ता दुसऱ्या जवळच्या तळयाच्या आश्रयाला गेले पाहिजे. नाहीतर ते कोळी उद्या सकाळी येतील आणि पाण्यात जाळी टाकून, खाण्यासाठी वा विकण्यासाठी आपणा सर्वांना पकडून नेतील. तेव्हा या संकटातून आपला बचाव करण्यासाठी अगोदरच उपाय योजलेला बरा. म्हटलंच आहे -

*अशक्तैर्बलिनः शत्रोः*
*कर्तव्य प्रपलायनम् ।*
*संश्रितव्योऽथवा दुर्गो*
*नान्या तेषां गतिर्भवेत् ॥*

**(आपला शत्रु जर प्रबळ असेल, तर अशक्तांनी एक तर पळ काढावा किंवा एखाद्या किल्ल्ल्याचा आश्रय तरी घ्यावा. जीव वाचविण्याचा याशिवाय त्याला अन्य मार्ग नसतो.)**

अनागतविधात्याचं हे बोलणं ऐकून प्रत्युत्पन्नमती म्हणाला, 'तुझं म्हणणं अगदी बरोबर आहे. आपण आजच्या आज इथून त्या दुसऱ्या सरोवरात गेले पाहिजे. आता 'वाडवडील राहात आलेले हे ठिकाण सोडून दुसरीकडे कसे जायचे?' असा विचार आपल्यापैकी एखाद्याच्या मनात येईल, पण त्यात अर्थ नाही. कारण -



*यस्यास्ति सर्वत्र गतिः स कस्मात*
*स्वदेशरागेण हि याति नाशम् ।*
*तातस्य कूपोऽयमिति ब्रुवाणाः*
*क्षारं जलं कापुरुषाः पिबन्ति ।*

**(जो सर्व ठिकाणी - म्हणजे कुठेही - जाउ शकतो, त्याने मायेपोटी स्वदेशात राहून, स्वतःला का म्हणून बरबाद करून घ्यायचे?' कशीही असली तरी ही वडिलांची विहिर आहे.' असे म्हणणाऱ्या क्षुद्र लोकांवर त्या विहिरीचे खारे पाणी पीत राहण्याचा प्रसंग येतो.)**

प्रत्युत्पन्नमतीने याप्रमाणे अनागतविधात्याच्या म्हणण्या ला दुजोरा देताच यद्भविष्य नावाचा मासा खदखदून हसला व त्यांना म्हणाला, 'हे पहा,

a

ते कोळी' उद्या येऊ' असे जरी म्हणाले असले, तरी नक्की येतीलच असे थोडेच आहे? त्यातून समजा जरी ते आले तरी ज्या माशांचे आयुष्य संपत आलेले असेल, तेच त्यांच्या जाळ्यांत सापडणार व मरणार. अशा परिस्थितीत, वाडवडील रहात आलेले हे सरोवर सोडून मी तरी दुसरीकडे जाणार नाही.'

यद्भविष्य माशाचा ते सरोवर सोडून न जाण्याचा निर्धार पाहून अनागतविधाता व प्रत्युत्पन्नमती हे दोन मासे आपापल्या परिवारांसह लगेच दुसऱ्या सरोवराकडे गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या पहिल्या सरोवराकडे आले आणि जाळी पाण्यात टाकून, त्यांनी यद्भविष्य व त्याच्याबरोबर राहिलेले मासे पकडून त्यांना घरी नेले आणि मारून खाल्ले. नशिबावर अवलंबून रहाणाऱ्यांवर असे दुर्धर प्रसंग ओढवतात.'

टिटवीने ही गोष्ट सांगताच टिटवा म्हणाला, 'प्रिये, तू सांगितलेली ही गोष्ट मला लागू नाही. मी काही नशिबावर विसंबून रहाणारा नाही. मी त्या खोडसाळ समुद्राला कोरडा, शुष्क करण्याचा निर्धार केला आहे.'

टिटवी म्हणाली, 'नाथ, रागाच्या भरात असे तोंडाला येईल ते बरळू नका. कुठे तो समुद्र आणि कुठे आपण यःकश्चित् पक्षी!'

टिटवा म्हणाला, 'लाडके, त्या समुद्राच्या तुलनेत जरी मी लहान असलो, तरी दुर्दम्य उत्साह व उत्कट इच्छाशक्ती यांच्या बळावर ही असाध्य

गोष्टही मी करून दाखवीन. आणि चोचीने थेंब थेंब पाणी पिता पिता त्या समुद्राला कोरडा ठणठणीत करून दाखवीन. म्हटलंच आहे ना?-

*हस्ती स्थूलतरः स चाड्कुशवशः किं हस्तिमात्रोऽङ्कुशः*
*दीपे प्रज्वलिते प्रणश्यति तमः किं दीपमात्रं तमः ।*
*वज्रेणापि हताः पतन्ति गिरयः किं वज्रमात्रो गिरिः*
*तेजो यस्य विराजते स बलवान् स्थूलेषु कः प्रत्ययः ॥*

**(हत्ती हा आकाराने बराच मोठा असून अंकुशाला वश होतो; वास्तविक हत्ती केवढा मोठा व अंकुश किती लहान? दीप प्रज्वलित केला असता, अंधाराचा नाश होतो; तसं पाहिलं तर अंधारापुढे दिवा किती लहान? व्रजाच्या आघाताने पर्वत कोसळतात; तसं पहाता पर्वताच्या आकारापुढे वज्र किती लहान? तात्पर्य हेच की, ज्याच्या ठिकाणी तेज असते, तोच खरा बलवान. आकारमान हे काही सामर्थ्याचे प्रमाण नव्हे.)**

यावर टिटवी म्हणाली, 'ते जरी खरं असलं, तरी ज्या सागरात गंगा, सिंधू यांच्यासारख्या शेकडो नद्या प्रतिक्षणी अमर्याद पाणी टाकत असतात, तो समुद्र पिऊन टाकण्याची प्रतिज्ञा करण्यात काही अर्थ आहे का? त्यापेक्षा तुम्ही तुमच्या लहानसान का असेनात - बऱ्याच मित्रांना आपल्या सहाय्यार्थ बोलवा आणि त्या समुद्राला धडा शिकवा. कारण बारीकसारीक गोष्टी एकेकट्या जरी कुचकामी ठरत असल्या, तरी जर का त्या एकत्र आल्या, तर

त्यांचे संघटित सामर्थ्य, असाध्य वाटणारी गोष्टही साध्य करू शकते. म्हटलंच आहे ना?-

*बहूनामप्यसाराणां*
*समवायो हि दुर्जयः ।*
*तृणैरावेष्ट्यते रज्जु*
*-र्यया नागोऽपि बद्ध्यते ॥*

**(कमकुवत का असेनात, त्या गोष्टींचा मोठा समूह झाला की, त्यांना जिंकणे कठीण जाते. म्हणून तर गवताच्या काड्यांपासून बनविलेल्या दोरीने हत्तीलासुद्धा बांधून ठेवता येते.)**

टिटवी पुढं म्हणाली, 'नाथ, म्हणूनच एक चिमणी, सुतारपक्षी, बेडूक व माशी यांच्यासारखे यःकश्चित् प्राणी संघटितपणे एका उन्मत्त हत्तीच्या विरुद्ध गेल्यामुळे त्यांना त्या हत्तीचा नाश करता आला ना?'

'तो कसा काय?' असा प्रश्न टिटव्याने विचारला असता टिटवी सांगू लागली-

# गोष्ट पंधरावी

## ऐक्य जिथे असे,
## यश तिथे वसे.



एका वनातील तमाल-वृक्षाच्या फांदीवर चिमणा-चिमणीचे एक जोडपे घरटे बांधून राहात होते. त्या घरट्यात चिमणीने अंडी घातली होती. एकदा दुपारच्या वेळी एक मदोन्मत्त हत्ती सावलीसाठी त्या वृक्षाखाली येऊन उभा राहिला. विसावा घेता घेता त्याने काही एक कारण नसता त्या चिमणाचिमणीचे घरटे असलेली फांदी मोडून टाकली. त्यामुळे त्या

घरट्यात असलेली त्या चिमणीची सर्व अंडी खाली जमिनीवर पडून फुटून गेली. ती चिमणाचिमणी मात्र कशीबशी वाचली.

आपली सर्व अंडी फुटल्याचे पाहून ती चिमणी मोठमोठ्याने रडत असता, आणि स्वतःही दुःखी झालेला चिमणा तिची समजूत घालत असता, 'काष्ठकूट' नावाचा एक सुतारपक्षी तिथे आला व चिमणीला म्हणाला, 'चिमूताई, अशा रडू नका. तुम्ही आता कितीही जरी रडलात, तरी फुटून नाश पावलेली अंडी काही तुम्हाला परत मिळणार नाहीत. म्हटलंच आहे -

*नष्टं मृतमतिक्रान्तं नानुशोचन्ति पण्डिताः ।*
*पण्डितानां च मूर्खाणां विशेषोयं यतः स्मृतः ॥*

**(नष्ट, मृत किंवा नाहीशा झालेल्यांसाठी सूज्ञ लोक शोक करीत नाहीत. सूज्ञ व मूर्ख यांच्यात हाच तर विशेष फरक मानला जातो.)**

चिमणी म्हणाली, 'हे काष्ठकूटा! आमचा मित्र व हितचिंतक म्हणून तू नुसता शुष्क उपदेश करण्याऐवजी, त्या दुष्ट हत्तीचा वध होऊ शकेल, असा काहीतरी उपाय आम्हाला सांग. कारण आपले वाईट करणाऱ्याला योग्य ते शासन मिळाले की, कुणालाही बरे वाटते.'

a

काष्ठकूट म्हणाला, 'चिमूताई, तुमचं म्हणणं खरं आहे. नुसता उपदेश कुणीही करू शकतो. संकटात खरेखुरे सहाय्य करतो, तोच मित्र. म्हटलंच आहे-

*स सुहृद् व्यसने यः स्यात्*
*स पुत्रो यस्तु भक्तिमान् ।*
*स भृत्यो यो विधेयज्ञः*
*सा भार्या यत्र निर्वृतिः ॥*

(संकटाचे वेळी जो धावून येतो तो मित्र, ज्याची मायपित्यांवर भक्ती असते तो पुत्र, जो जाणून कामे करतो तो सेवक आणि जिच्यापासून मनाला दिलासा मिळतो, तीच खरी पत्नी.)

काष्ठकूट पुढे म्हणाला, 'चिमूताई, तुमची इच्छा पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपल्याला जिचा मोठा उपयोग होईल, अशी एक बुद्धिवान् माशी माझ्या ओळखीची आहे. तिचा आपण सल्ला घेऊ.'

यानंतर तो सुतार पक्षी चिमणा-चिमणीसह एका माशीकडे गेला व घडलेला प्रकार तिच्या कानी घालून तिला म्हणाला, 'माशीमावशी, अशा त्या उन्मत्त हत्तीचा जर वेळीच वध केला नाही, तर तो 'आपल्याला हटकणारे कुणी नाही,' अशा समजुतीने आपल्यासारख्या दुर्बळांना असाच छळीत राहील. तेव्हा त्याच्या नाशाचा एखादा नामी उपाय तू सांग.'

a

माशी म्हणाली, 'निरपराध जीवांना त्रास देणाऱ्या त्या हत्तीला मारले हे पाहिजेच. पण या बाबतीत आपण माझा मित्र असलेल्या 'मेघनाद' नावाच्या विद्वान् बेडकाचा सल्ला प्रथम घेऊ. कारण म्हटलंच आहे-

*हितैः साधुसमाचारैः*

*शास्त्रज्ञैर्मतिशालिभिः ।*

*कथंचिन्न विकल्पन्ते*

*विद्वद्भिश्चिन्तिता नयाः ॥*

(हितचिंतक, सज्जन, शास्त्र जाणणारे व बुद्धिवंत यांना विचारून जे बेत केले जातात, ते कधीही असफल होत नाहीत.)

मग चिमणा-चिमणी व तो काष्ठकुट पक्षी यांच्यासह ती माशी त्या विद्वान् बेडकाकडे गेली आणि चिमणाचिमणीवर गुदरलेल्या संकटाची तिने कल्पना दिली. त्यानंतर तिने त्या बेडकाला त्याला प्रश्न केला, 'बेडूकराव, त्या माथेफिरू हत्तीला मारण्याचा तुम्हाला एखादा उपाय सुचतो का?' यावर तो बेडूक म्हणाला, 'हात्तिच्या! ऐक्य व युक्ती यांच्या बळावर आपण त्या हत्तीला सहज मारू शकू. दुपारच्या वेळी तो एखाद्या झाडाच्या सावलीत आराम करीत बसला असता, माशीमावशीने त्याच्या कानात गोड आवाजात गुणगुणावे. त्या गोड आवाजाने धुंद होऊन त्या हत्तीने, त्याचे डोळे अर्धवट मिटले असता, काष्ठकूटाने स्वतःच्या अणकुचीदार चोचीने त्याचे दोन्ही डोळे झटपट फोडून त्याला आंधळे करावे, आणि तो आंधळा

हत्ती तहान लागल्यावर पाणी पिण्याकरिता नेहमीच्या सरोवराकडे चाचपडत चालला असता, मी माझ्या परिवारासह वाटेतील एका खोल खड्ड्यापाशी डरॉंव डरॉंव ओरडत बसावे. आमचा आवाज कानी पडला की, इथेच सरोवर असावे, असा समज होऊन तो आंधळा हत्ती त्या खड्ड्याकडे जाईल, व त्यात कोसळून तहानभुकेने चार-दोन दिवसांत त्याला मृत्यु येईल.' मेघनाद बेडकाने सुचविलेल्या युक्तीनुसार त्या सर्वांनी केले व त्या उन्मत्त हत्तीला जिवे मारले.'

ही गोष्ट सांगून टिटवी त्या टिटव्याला म्हणाली, 'तेव्हा नाथ, तुम्हीसुद्धा अशीच युक्तिवंतांची व बुद्धिवंताची मदत घ्या, म्हणजे त्या समुद्राला जिरविण्याची तुमची इच्छा तडीस जाईल.'

पत्नीचे म्हणणे पटल्यामुळे त्या टिटव्याने बगळा, सारस, मोर इत्यादी पक्ष्यांना एकत्र जमवून त्यांच्यापुढे आपले दुःख उघड केले व समुद्राला कोरडा करण्याच्या कार्यात आपल्याला मार्गदर्शन करण्यास त्यांना सांगितले.

टिटव्याचे म्हणणे ऐकून घेऊन ते पक्षी म्हणाले, 'टिटवोजी, तुम्हा जोडप्यावर ओढवलेल्या संकटाबद्दल आम्हालाही दुःख होते. पण आपले दुःख अशांपाशी उघड करावे की, जे ते दुःख दूर करू शकतील. या बाबतीत पक्ष्यांचा बलशाली राजा गरुड याचा आपल्याला निश्चितच उपयोग होईल. तेव्हा आपण त्याच्याकडे जाऊ या. म्हटलेच आहे ना?-

*सुहृदि निरन्तरचित्ते गुणवति भृत्येऽनुवर्तिनी कलत्रे ।*

a

*स्वामिनि शक्तिसमेते निवेद्य दुःखं सुखी भवति ॥*

(ज्याचे मनाला नित्य स्मरण होते असा मित्र, गुणवान सेवक, मनाप्रमाणे वागणारी पत्नी आणि सामर्थ्यसंपन्न स्वामी यांनाच दुःख सांगितले असता सांगणारा सुखी होतो. )

याप्रमाणे बोलणे झाल्यावर ते सर्व पक्षी त्या टिटवा -टिटवीसह गरुडाकडे गेले. आणि आपल्या येण्यामागचा हेतु त्याच्यापुढे उघड करून त्याला म्हणाले, 'महाराज, आज त्या समुद्राने या टिटवा-टिटवीची अंडी पळवून एक प्रकारे आपल्या अखिल पक्षीजातीचीच खोडी काढली आहे. ती जर आपण पचू दिली, तर उद्या दुसरा कुणीतरी आपली अशीच खोडी काढील. लोकांना काय? एक करतो तसे इतर करू लागतात. म्हटलंच आहे ना? -

*एकस्य कर्म संविख्ष्य*

*करोत्यन्योऽपि गर्हितम् ।*

*गतानुगतिको लोको*

*न लोकः पारमार्थिकः ॥*

**(एखाद्याला एखादी गोष्ट करताना पाहून - ती जरी वाईट असली तरी - दुसराही तशीच गोष्ट करू लागतो. लोक गतानुगतिक - म्हणजे रुळलेल्या मार्गाने जाणारे - असतात. लोक सत्याच्या मुळाशी जात नाहीत.)**

a

ते पक्षी पुढे म्हणाले, 'महाराज, आपण आमचे राजे. राजा म्हणजे आम्हा प्रजेचं सर्वस्व. म्हटलंच आहे ना? -

*राजा बन्धुरबन्धूनां*

*राजा चक्षुरचक्षुषाम् ।*

*राजा पिता च माता च*

*सर्वेषां न्यायवर्तिनाम् ॥*

**(ज्यांना भाऊ नसतो, त्यांचा राजा भाऊ होतो, ज्यांना डोळे नसतात, त्यांचे राजा डोळे होतो. राजा हा न्यायाने गावकऱ्यांच्या जणू माता-पित्यांच्या ठिकाणी असतो.)**

त्या पक्ष्यांचे एकूण म्हणणे पटल्यामुळे, 'समुद्राकडून टिटवा-टिटवीवर झालेला अन्याय कसा दूर करायचा, 'याबद्दल तो गरुड विचार करू लागला. तेवढ्यात भगवान् विष्णूंचा दूत त्याच्याकडे आला व म्हणाला, 'हे पक्षीराज, भगवंतांना काही तातडीच्या कामासाठी तुझ्यावर बसून अमरावतीस जायचं आहे, म्हणून त्यांनी तुला आत्ताच बोलावलंय.'

आलेल्या संधीचा उपयोग करून घेण्याचा विचार मनात येऊन, गरुड त्याला म्हणाला, 'दूता, भगवंतांना सांग की, आजवर मी कधीही आपल्या आज्ञेचे उल्लंघन केले नाही. पण त्यांच्या आश्रयाने राहणारा समुद्र हा जोवर माझ्या प्रजाजनांतील टिटवा-टिटवीची अंडी परत करीत नाही, तोवर मला

a

भगवंतांच्या सेवेत राहायची इच्छा नाही. त्यांनी वाटल्यास माझ्या जागी दुसऱ्या एखाद्या पक्ष्याची नेमणूक करावी.'

कधीही अशी उद्धटपणाची भाषा न बोलणारा गरुड, आजच असे का बोलत आहे, याबद्दल त्या दूताने त्याच्याकडून सर्व माहिती मिळविली व भगवंतांकडे जाऊन त्यांच्या कानी घातली. ती ऐकून भगवान् म्हणाले, 'यात माझ्या गरुडाची चूक नाही. त्याच्या प्रजाजनांतील कुणाचाही अपमान जसा त्याचा आहे, तसाच तो माझाही आहे आणि गरुडासारख्या माझ्या निष्ठावंत सेवकाचे गाऱ्हाणे दूर करणे, हे माझे कर्तव्यच आहे. म्हटलेच आहे ना? -

*भक्तं शक्तं कुलीनं च*

*न भृत्यमपमानयेत् ।*

*पुत्रवत् लालयेत् नित्य*

*य इच्छेत् श्रियमात्मनः ॥*

**(ज्याला आपले हित साधण्याची इच्छा असेल, त्याने आपल्यावर भक्ती करणाऱ्या शक्तिमान् व कुलीन सेवकाचा कधीही अपमान करू वा होऊ देऊ नये. त्याचे पोटच्या पोराप्रमाणे लालनपालन करावे.)**

याप्रमाणे बोलून भगवान् विष्णु स्वतः गरुडाकडे गेले. मग त्यांनी त्याची समजूत घालून व त्याच्यावर आरूढ होऊन ते समुद्राकडे गेले आणि त्याने टिटवीची अंडी होती त्या स्थितीत परत न केल्यास, त्याच्यावर

अग्न्यस्त्र सोडण्याचे त्याला भय दाखविले. त्याबरोबर हातून घडलेल्या अपराधाबद्दल समुद्राने भगवंतांची क्षमा मागितली व टिटवीची अंडी त्याने निमूटपणे परत केली.'

या गोष्टी सांगून दमनक कोल्हा त्या संजीवक नावाच्या बैलाला म्हणाला, 'मित्रा, मला सांगायचं आहे ते हेच की, दुर्बळाला जरी थोरामोठ्याचा आधार मिळाला, तरी तो दुर्बळ प्रबळ होतो, मग पिंगलकमहाराज हे स्वतः तर प्रबळ आहेतच, आणी त्यातून पार्वतीदेवीचे ते वाहक असल्यामुळे तिचेही त्यांना पाठबळ आहे. तेव्हा तू त्यांच्या वाटेस न जाता, इथून पळ काढावास हेच बरे.'

संजीवक म्हणाला, 'दमनका, त्या गोष्टीचा निर्णय मी नंतर घेईन. तू मला अगोदर हे सांग की, समजा, मी त्या पिंगलकाची भेट घेतलीच, तर तो माझ्यावर रागावला आहे, हे मी कसे काय ओळखू?'

दमनक म्हणाला, 'ते ओळखणे सोपे आहे. तुला त्यांचे डोळे लाल झालेले दिसतील, अंगावरचे केस उभे राहिलेले दिसतील आणि शिवाय तुला पाहून ते जिभल्या चाटू लागतील. मग तर तुझी खात्री होईल ना? एक गोष्ट मात्र लक्षात ठेव. ही गोष्ट मी तुला सांगितल्याचे तू कुणापाशी चुकूनही बोलू नकोस. पण हा सर्व पाल्हाळ हवाच कशाला?

स्वतःचा जीव वाचविण्याच्या दृष्टीने तूच हे रान सोडून जा ना! म्हटलंच आहे -

*त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।*

*ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ॥*

**(कुळासाठी एका व्यक्तीचा त्याग करावा, गावासाठी कुळाचा त्याग करावा, राज्यासाठी गावाचा त्याग करावा आणि स्वतःसाठी तर पृथ्वीचाही त्याग करावा म्हणजे तिलाही कःपदार्थ मानावे. )**

दमनक असे म्हणाला, आणि 'मी जरा जाऊन येतो, तू जपून राहा, ' असे मायावी प्रेमळपणाने संजीवकाला सांगून, आपला भाऊ करटक याच्याकडे तो निघून गेला.

करटकाकडे जाताच त्याने विचारले, 'दमनका, तू कोणता उपद्व्याप करून आलास?' त्याच्या या प्रश्नाला दमनकाने उत्तर दिले, 'दादा, जो उपद्व्याप करायला हवा होता, तोच केला. अरे, उपद्व्याप किंवा उद्योग न करता, केवळ दैवावर विसंबून राहून का कुठे भाग्य फळफळते? म्हटलेच आहे अन?-

*उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी-*

*दैंवं हि देवमिति कापुरुषा वदन्ति ।*

*दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या*

*यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोषः ॥*

**(उद्योगी पुरुषश्रेष्ठावरच लक्ष्मी प्रसन्न होते.' 'दैव हाच देव असे केवळ क्षुद्र पुरुषच बोलतात. दैवाला बाजूला सारून आपल्या**

**शक्तीनुसार प्रयत्न करूनही जर यश मिळाले नाही, तर त्यात कुणाचा दोष?)**

दमनक पुढे करटकाला म्हणाला, 'दादा, मी पिंगलकमहाराज व संजीवक या दोघांची वेगवेगळी भेट घेऊन, त्यांची मने एकमेकांविरुद्ध कलुषित केली. आता एकतर संजीवक हा पिंगलकमहाराजांकडून ठार मारला जाऊन, त्याच्या मांसाची आपल्याला मेजवानी मिळेल, किंवा तो पळून गेल्यास; महाराजांच्या दरबारी आपल्या शब्दाची किंमत वाढेल.'

करटकाला दमनकाने केलेले हे कारस्थान न आवडल्याने त्याने त्याची निर्भत्सना केली असता दमनक चिडून म्हणाला, 'दादा, माझ्या स्पष्ट बोलण्याचा राग मानू नकोस. ज्याच्यामुळे राजदरबारात आपल्याला काडीचीही किंमत उरली नव्हती, त्या संजीवकाचा परस्पर काटा काढण्यात किंवा त्याला पळवून लावण्यात काहीही गैर नाही. चतुरक नावाच्या एका कोल्ह्याचे असेच एक कारस्थान केल्यामुळे त्याला अख्ख्या उंटाचे मांस खायला मिळाले ना?'

'ते कसे काय?' असे करटकाने मोठ्या उत्कंठेने विचारले असता दमनक त्याला ती गोष्ट सांगू लागला-

# गोष्ट सोळावी

## लुच्चे मारती मजा,
## पण त्यांच्याकडून फसलेले भोगती सजा!

एका वनात वज्रदंष्ट्र नावाचा एक सिंह राहात असे. चतुरक नावाचा कोल्हा व क्रव्यमुख नावाचा लांडगा, हे दोघे त्याचे खासगी कारभारी होते. एके दिवशी एका झाडाखाली विश्रांती घेत बसलेल्या उंटिणीवर झडप घालून व तिचे पोट फोडून, वज्रदंष्ट्राने त्याला ठार केले. ती उंटीण गर्भवती असून तिची प्रसूतीची वेळ जवळ आली असल्याने, तिचे पोट फोडले जाताच, त्यातून एक जिवंत पिलू बाहेर पडले.' आपण एका गर्भवती उंटिणीला ठार मारले,' म्हणून वज्रदंष्ट्राला नंतर फार वाईट वाटले आणि त्याने तिच्या पिलाला अभय देऊन त्याचे नाव शंकुकर्ण असे ठेवले व त्याला आपल्या वनराज्यात निर्भयपणे रहायला सांगितले.

शंकुकर्ण हळूहळू मोठा होता होता ऐन तारुण्यत आला व वज्रदंष्ट्र सिंह एकदा बराच आजारी पडला. गुहेबाहेर पडून वनातील श्वापदांची शिकार करण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी न उरल्याने त्याची आणि त्याच्याबरोबरच चतुरक व क्रव्यमुख यांची उपासमार होऊ लागली. तेव्हा 'स्वामीला जगविण्यासाठी मरणारास मरणोत्तर स्वर्ग मिळतो,' अशी लालूच चतुरक कोल्ह्याने शंकुकर्णाला दाखवून त्याला आपणहून मरायला तयार

केले आणि त्याने तसे वज्रदंष्ट्रापुढे बोलून दाखवताच, चतुरक व क्रव्यमुख यांनी त्या भाबड्या उंटाला ठार केले. मग भुकेल्या वज्रदंष्ट्रानेही त्या उंटाचे मांस खाण्याचे कबूल केले.

शंकुकर्ण मरून पडताच चतुरक व क्रव्यमुख यांना वज्रदंष्ट्र म्हणाला, 'मी हळूहळू नदीवर जाऊन स्नानसंध्या उरकून येतो. तोवर या शंकुकर्णाच्या मांसाला तुम्ही तोंड लावू नका, किंवा इतर कुणालाही तसे करू देऊ नका.'

याप्रमाणे बोलून तो वज्रदंष्ट्र सिंह तेथून नदीकडे निघून जाताच चतुरकाच्या मनात विचार आला, 'या उंटाचे सर्व मांस आपल्या एकट्यालाच खायला मिळाले तर किती मजा येईल? मनात असा विचार येताच त्याला एक युक्ती सुचली. तो क्रव्यमुख लांडग्याला म्हणाला, 'वास्तविक या भोळया शंकुकर्ण उंटाला आपण दोघांनीच ठार मारले असल्याने, याचे मांस प्रथम खाण्याचा मान आपला आहे. तेव्हा वज्रदंष्ट्रमहाराज आता इथे नसल्याचे संधी साधून, तू याचे थोडेसे मांस खाऊन घे. समज, याचे मांस खाल्ल्याचे त्यांच्या लक्षात आलेच, तर त्यांची समजूत मी कशीही घालीन.' चतुरकाने असे आश्वासन दिल्यामुळे क्रव्यमुखाने त्या उंटाचे काळीज खायला सुरुवात केली.

तेवढ्यात अंघोळ करून, तोंडाने स्तोत्र पुटपुटत वज्रदंष्ट्र परतला. क्रव्यमुख उंटाचे काळीज खात असल्याचे त्याने पाहिले व त्याला दटावले, 'काय रे खादाडा, मी ताकीद देऊन गेलो असतानाही, तू या उंटाचे काळीज खायला कशी काय सुरुवात केलीस?'

a

सिंहाच्या या दटावणीने घाबरलेला क्रव्यमुख- चतुरकाने आपली बाजू घेऊन बोलावे या अपेक्षेने त्याच्याकडे - बघू लागला असता चतुरक एकदम त्याच्यावर उलटून त्याला म्हणाला, 'अरे मूर्खा, 'शंकुकर्णाचे मांस तू खाऊ नकोस,' असे मी तुला परोपरीने सांगूनही तू माझे ऐकले नाहीस ना? मग भोग आपल्या अधाशीपणाचे फळ.' चतुरक असा उलटताच, 'हा वज्रदंष्ट्र आता आपल्याला ठार मारल्याशिवाय रहाणार नाही!' असे भय वाटून क्रव्यमुख तिथून विद्युतगतीने पळून गेला.

उंटाच्या मांसाच्या तीन वाटेकऱ्यांपैकी क्रव्यमुख हा एक वाटेकरी तर पळून गेला; आता या वज्रदंष्ट्राला कसे नाहीसे करायचे व उंटाचे मांस आपल्या एकट्याच्या पदरात कसे पाडून घ्यायचे, याबद्दलचा विचार चतुरक करू लागला असता, एका दिशेने घंटा घणघणल्याचा आवाज त्याच्या व वज्रदंष्ट्राच्या कानी आला. वज्रदंष्ट्राने आजवरच्या आयुष्यात कधी घंटानाद ऐकला नसल्याने, त्याने भयभीत होऊन विचारले, 'चतुरका, हा ध्वनी कसला आहे रे?'

हा घंटेचा नाद आहे, हे चतुरकाला कळत असूनही तो मुद्दामच म्हणाला, ',महाराज, मी बघून येतो. तोवर तुम्ही इथेच उभे रहा.' याप्रमाणे बोलून तो त्या घंटानादाच्या दिशेने गेला. काहीसे अंतर चालून जातो, तो पाठींवर ओझी लादलेला उंटांचा तांडा एका रानवाटेने चालला असल्याचे व त्या तांड्यातील आघाडीच्या उंटाच्या गळयातील घंटेचा आवाज होत

a

असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याने त्या गोष्टीचा उपयोग वज्रदंष्ट्राला पळवून लावण्याच्या कामी करायचे ठरविले.

त्याप्रमाणे लगबगीने वज्रदंष्ट्राकडे परतून तो त्याला म्हणाला, 'महाराज, तुम्ही ज्याला अभय दिलेत, त्या शंकुकर्ण उंटाला ठार मारलेत ना? म्हणून रेड्यावर बसलेला यम तुम्हाला मारायला येत असून, त्या रेड्याच्या गळ्यातला 'घंटा' नावाच्या वाद्यचा हा 'घणघण' असा आवाज येत आहे. तुम्हाला जर स्वतःचा जीव वाचवायचा असेल, तर याच क्षणी त्या आवाजाच्या उलट दिशेने तुम्ही कुठेतरी दूर पळून जा.'

'पण त्या उंटाला तर तू व क्रव्यमुख अशा दोघांनीच मारलेत! मी काही त्याला मारले नाही. मग यम मला मारायला का येतोय?' असा प्रश्न वज्रदंष्ट्राने केला असता चतुरक त्याला म्हणाला, 'महाराज, **सेवकांनी जर एखादे पापकृत्य आपल्या धन्याच्या समक्ष केले, तर ते पापकृत्य त्यांनी धन्याच्या आज्ञेनेच व संमतीनेच केले, असे यम समजतो व त्याबद्दलची शिक्षा तो त्या धन्यालाच देतो.**' चतुरकाने केलेले हे स्पष्टीकरण ऐकून वज्रदंष्ट्र घाबरला आणि ताबडतोब तिथून पळून दुसऱ्या वनात निघून गेला. अशा तऱ्हेने क्रव्यमुख व वज्रदंष्ट्र या दोघांनाही पळवून लावल्यावर चतुरक कोल्ह्याने त्या उंटाचे सर्वच्या सर्व मांस मोठ्या चवीने व आपल्या सवडीने खाऊन खलास केले.'

a

ही गोष्ट सांगून दमनक करटकाला म्हणाला, 'दादा, अशा तऱ्हेने **जे बुद्धिमान् असतात, ते आपली उद्दिष्टं अशा युक्तीप्रयुक्तीने साध्य करून घेतात.**'

इकडे दमनक आपल्या मोठ्या भावाला - करटकाला - ही गोष्ट सांगत असता, तिकडे संजीवक विचार करीत होता, 'दमनक म्हणतो त्याप्रमाणे इथून दूर कुठेतरी पळून जाण्यात अर्थ नाही. समजा, दूर पळून गेलो तरी तिथेही तो पिंगलक मला मारण्यासाठी येणार नाही याची खात्री कुणी द्यावी? त्यापेक्षा पिंगलकाच्या भेटीस जाऊन, त्याचा जर काही गैरसमज झाला असला, तर तो दूर करण्याचा प्रयत्न करावा. समजा, त्याचा माझ्याविषयीचा गैरसमज दूर न होता तो मला मारायला आला, तर आपणही आपल्यापरीने त्याला पुरे पडण्याचा प्रयत्नकरावा. मग भले त्यात मला मरण का येईना? भेकडाप्रमाणे अपमानकारक जिणे जगण्यापेक्षा मर्दाचे मरण केव्हाही भूषणास्पद ठरते. म्हटलेच आहे -

***महद्भिः स्पर्धमानस्य***

***विपदेव गरीयसी ।***

***दन्तभङ्गोऽपि नागानां***

***श्लाघ्यो गिरिविदारणे ॥***

**(थोरामोठ्यांशी स्पर्धा करताना संकटे आली तरी ते गौरवास्पद ठरते. पर्वताला धडक मारणाऱ्या हत्तींचे सुळे मोडले तरी ते त्यांना भूषणावहच ठरते. )**

मनाशी असे ठरवून संजीवक पिंगलकाकडे जाऊ लागला. पण त्याला दुरून पाहताच पिंगलक लालबुंद डोळयांनी त्याच्याकडे पाहू लागला. ती त्याची भयकारी नजर पाहून, संजीवक घाबरला व पिंगलकाला नेहमीप्रमाणे नमस्कार करायचेही विसरून गेला. पण 'याने मुद्दामच आपल्याला नमस्कार केला नाही.' असा गैरसमज होऊन पिंगलकाने झटकन् संजीवकाला मारण्यासाठी त्याच्यावर झेप घेतली. परंतु संजीवकानेही जिवाच्या कराराने क्षणार्धात आपली शिंगे उगारून ती पिंगलकाच्या पोटात खुपसण्यासाठी धडपड सुरू केली.

त्या दोघांमध्ये सुरू झालेली ती अटीतटीची झुंज दुरूनच दृष्टीस पडताच करटक दमनकाला म्हणाला, 'अरेरे! दमनका, ज्या अर्थी मघाशी तू सांगितलेल्या गोष्टीतील त्या कपटी चतुरक कोल्ह्याचं कौतुक करायला तुला लाज वाटली नाही, त्या अर्थी तुझ्या नीचपणाला आता सीमा उरली नाही. तू केवळ स्वार्थासाठी पिंगलकमहाराज व संजीवक यांच्यात वैर निर्माण केलेस व ते वैर या थराला आणलेस. तू राजाचा मंत्री व्हायला पूर्णपणे अपात्र आहेस. अजूनही तुझ्यात जर थोडाफार चांगलेपणाचा अंश असेल, तर पिंगलकमहाराजांकडे जाऊन त्यांच्यापासून त्या निरपराध संजीवकाला वाचविण्याचा प्रयत्न कर. पण छे! असली चांगली गोष्ट तू करणार नाहीस.

अरे, तुझ्यासारख्या पाताळयंत्री व स्वार्थांध व्यक्तीला जर का महाराजांनी प्रधानपदी ठेवले, तर त्यांचे व त्यांच्याबरोबरच त्यांच्या राज्याचे वाटोळे व्हायला वेळ लागणार नाही. म्हटलंच आहे ना? -

*नराधिपां नीचजनानुवर्तिनो*

*बुधोपदिष्टेन पथा न यान्ति ये ।*

*विशन्त्यतो दुर्गमार्गनिर्गमम् ।*

*समस्तसम्बाधमनर्थपंजरम् ॥*

**(नीचांच्या कलाने वागणारे जे राजे सूज्ञांनी दाखविलेल्या मार्गाने जात नाहीत, ते कुठल्याच बाजूने बाहेर पडण्याचा मार्ग नसलेल्या संकटरूपी पिंजऱ्यात अडकून पडतात.)**

करटक पुढे म्हणाला, 'बाकी तुला कितीही जरी उपदेश केला, तरी त्याचा थोडाच उपयोग होणार आहे? सुकलेले लाकूड जसे काही केल्या वाकत नाही, किंवा वस्तरा कितीही जरी परजलेला असला तरी दगडावर चालत नाही, त्याचप्रमाणे तुला केलेल्या उपदेशाचा तुझ्यावर काहीही परिणाम होणार नाही. उलट, नको त्याला उपदेश करायला गेलेल्या त्या सूचिमुख पक्ष्याने जसे स्वतःवर संकट ओढवून घेतले, तसा तुला उपदेश केल्याने माझ्यावरच एखादे संकट ओढवण्याची शक्यता आहे.'

'त्या सूचिमुख पक्ष्यावर संकट कसे काय ओढवले?' असे दमनकाने विचारता, करटक म्हणाला, 'त्याचं असं झालं-

a

# गोष्ट सतरावी

## उपदेश करू जाता मूर्खाला, संकटात पडावे लागे शहाण्याला.

एका पर्वतावर वानरांचा एक कळप रहात होता. पावसाळ्यातील एके दिवशी धुवांधार जलवर्षावाने ती वानरे पार भिजलेल्या व गारठलेल्या स्थितीत एका झाडाखाली येऊन कुडकुडत बसली.' थंडी कशी घालवावी?' या गोष्टीचा विचार ती वानरे करू लागली असता, त्यांचे लक्ष नजिकच्या गुंजवेलीखाली पडलेल्या लाल गुंजाकडे गेले. ते बारीक बारीक निखारे असावेत, त्यांना एकत्र करुन व फुंकरा मारून अधिक प्रज्वलित केले, तर शेकोटी धगधगेल व आपल्याला ऊब मिळेल, असे वाटून त्यांनी त्या गुंजा छोट्या छोट्या फांद्यांनी झाडून, एकत्र करून, त्यांची रास केली व तिच्यावर फुंकर मारण्यास सुरुवात केली. त्यांची ती वायफळ धडपड पाहून त्या झाडावर बसलेला सूचिमुख पक्षी त्यांना म्हणाला, 'बाबांनो, त्या गुंजांना निखारे समजून तुम्ही त्यांच्यावर कितीही जरी फुंकरा मारल्यात, तरी त्या पेट घेऊन तुमची थंडी थोडीच घालवू शकणार आहेत?'

त्या सूचिमुखाचे हे बोलणे ऐकून, त्याच झाडावर बसलेले एक सूज्ञ वानर त्याला म्हणाले, 'हे सूचिमुखा, **व्यसनी, जुगारी व मूर्ख यांना उपदेश करण्यात मुळीच अर्थ नसतो. तू त्यांना कितीही जरी सांगून पाहिलेस तरी ते वागायचे तसेच वागणार**. तेव्हा तू गप्प बैस ना!'

त्या सूज्ञ वानराने असे सांगूनही न राहवल्यामुळे सूचिमुख त्या झाडाखालच्या वानरांना म्हणाला, 'अरे मूर्खांनो! मी तुम्हाला घसा फोडून सांगत असतानाही तुम्ही त्या गुंजांना निखारे समजता?'

त्या सूचिमुखाचे बोलणे न रुचल्यामुळे, चिडलेल्या एका वानराने, रागाच्या भरात त्याच्याजवळ उडी घेऊन त्याला हातात पकडले आणि दगडावर आपटून ठार केले.'

ही गोष्ट सांगून करटक म्हणाला, 'दमनका, मूर्खाला उपदेश करून, त्यातून काही चांगले निष्पन्न व्हायचे तर बाजूलाच राहते, उलट त्याचे वागणे अधिकच त्रासदायक होते. म्हटलेच आहे ना? -

*उपदेशो हि मूर्खाणां प्रकोपाय न शान्तये ।*
*पयःपानं भुजङ्गानां केवलं विषवर्धनम् ॥*

**(ज्याप्रमाणे सर्पांना दूध पाजले असता, त्यांच्यातील केवळ विषाची वाढ होते, त्याचप्रमाणे मूर्खांना केलेला उपदेश त्यांना शांत करण्याऐवजी, त्यांना राग आणण्यास कारणीभूत होतो. )**

'दमनका, अरे तू माझा भाऊ म्हणूनच मी तुला आतापर्यंत उपदेश केला. वास्तविक उपदेश हा, तो ग्रहण करायला जो पात्र असतो, त्यालाच करायचा असतो. नको त्याला उपदेश करू गेल्यास, त्या चिमणीवर जसा घरादाराला मुकण्याचा प्रसंग आला. तसा प्रसंग उपदेश करणाऱ्यावर येतो.'

'तो कसा काय? ' अशी पृच्छा दमनकाने केली असता करटक म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट अठरावी

## मूर्खाला उपदेश करणे, म्हणजे स्वत:चे वाटोळे करून घेणे

एका वनात एक शमीचे झाड होते. त्या झाडावर चिमणा-चिमणीचे एक जोडपे घरटे बांधून सुखासमाधानात राहात होते.

एकदा पावसामुळे ओलेचिंब झालेले एक वानर थंडीने थरथरत त्या झाडाच्या आश्रयाला आले असता त्याच्या पात्रतेचा विचार न करता ती चिमणी त्याला म्हणाली, 'हे वानरा, तुला देवाने माणसांसारखे हात, पाय व आकार दिलेला असताना, एखादे चांगलेसे घर बांधून त्यात सुखाने राहण्याऐवजी तू असा विनाकारण थंडीपावसाचा त्रास का भोगतोस?'

त्या चिमणीच्या या बोलण्यामागचा चांगला हेतु लक्षात न घेता ते वानर तिच्यावर भडकून म्हणाले, 'अगं सटवे, मी घरात राहावे, की थंडीपावसात भिजून आयुष्य काढावे, याबद्दल तुला काही विचारले होते का? नाही ना? मग हा उपदेश तू मला का करतेस? तुला हे वचन ठाऊक नाही का?

*वाच्यं श्रद्धासमेतस्य*
*पृच्छतश्च विशेषतः ।*
*प्रोक्तं श्रद्धाविहीनस्य*
*अरण्यरुदितोपमम् ॥*

a

**(ज्याची आपल्यावर श्रद्धा असेल किंवा विशेषेकरून ज्याने विचारले असेल, त्यालाच सांगायला जावे. ज्याची आपल्यावर श्रद्धा नाही, त्याला उपदेश करू पाहणे हे अरण्यरुदनाप्रमाणे - म्हणजे अरण्यात रडण्याप्रमाणे निष्फळ असते.)**



याप्रमाणे बोलून त्या वानराने रागाच्या भरात त्या चिमणीचे सुबक घरटे उद्ध्वस्त करून टाकले.

ही गोष्ट सांगून करटक पुढे म्हणाला, 'दमनका, तुला उपदेश करून मी एखादे दिवशी स्वतःवर तर संकट ओढवून घेणार नाही ना, असे भय आता मला वाटू लागले आहे. कारण तुझी वृत्तीच मूळची वाईट व स्वार्थी

a

असल्यामुळे तुझ्या बुद्धीचा व विद्वत्तेचा उपयोग तू केवळ वाईट गोष्टीच करीत राहाण्यासाठी करणार. म्हटलेच आहे ना?

*किं करोत्येव पाण्डित्य*

*मस्थाने विनियोजितम् ।*

*अन्धकारप्रतिच्छन्ने*

*घटे दीप इवाहितः ॥*

**(पांडित्याचा नको तिथे उपयोग केल्याने पदरात काय पडणार? ही गोष्ट अंधाराने वेढलेल्या - म्हणजे अपारदर्शक अशा - भांड्यात ठेवलेल्या दिव्यासारखीच निरर्थक ठरते.)**

तेव्हा हे दमनका, तू असले नसते उपद्व्याप करू नकोस, असे मी तुला आजवर अनेक वेळा सांगितले असतानाही तू माझे ऐकले नाहीस. स्वतःला इतरांपेक्षा विशेष शहाणे समजण्याची ही तुझी वृत्ती पाहिली की एका दिवट्या मुलाने शहाणपणाच्या धुंदीत स्वतःच्याच पित्यावर धुरात कोंडून, करपून जाण्याचा जो भयंकर प्रसंग आणला, त्याची आठवण होते.'

'ती गोष्ट काय आहे,' असे दमनकाने विचारताच करटक म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट एकोणिसावी

## पाप करताना येई हसू,
### पण परिणाम भोगताना येती आसू.

एका गावात 'धर्मबुद्धी' व 'पापबुद्धी' या नावाचे दोन तरुण मित्र होते. एकदा पापबुद्धीच्या मनात विचार आला, 'आपल्या मानाने धर्मबुद्धी हा अतिशय बुद्धिमान व विद्वान असल्यामुळे तो परदेशी गेल्यास पैसाच पैसा कमवू शकेल, व आपणही जर का त्याच्यासंगे गेलो, तर त्याच्या मार्गदर्शनाने आपल्यालाही थोडाफार पैसा मिळू शकेल.'

मनात असा विचार येताच तो धर्मबुद्धीकडे गेला व त्याला म्हणाला, 'मित्रा, अरे, ज्याने आयुष्यात परदेश पाहिले नाहीत, निरनिराळे लोक, त्यांच्या चालीरीती, भाषा, वेष, कला वगैरेंचा प्रत्यक्ष अनुभव घेतला नाही, अशा माणसाच्या जीवनाला काहीतरी अर्थ असतो का? म्हटलेच आहे ना?

*देशान्तरेषु बहुविधभाषा*

*वेशादि येन न ज्ञातम् ।*

*भ्रमता धरणीपीठे तस्य*

*फलं जन्मनो व्यर्थम् ॥*

**(पृथ्वीच्या पाठीवर भ्रमंती करून, निरनिराळ्या देशांतील भाषा, वेष इत्यादी ज्याने पाहिले नाहीत, त्याचा जन्म व्यर्थ होय.)**

a

पापबुद्धी पुढे म्हणाला, 'हे धर्मबुद्धी, अरे आपल्या म्हातारपणी मुलांनी किंवा नातवंडांनी 'तुम्ही आयुष्यात काय केले?' असा जर प्रश्न विचारला, तर 'आम्ही आमचं आयुष्य केवळ खाण्यापिण्यात घालवलं,' असंच आपण त्यांना उत्तर द्यायचं का? वास्तविक तुझ्यासारख्या बुद्धिवंताने तर परदेशात जाऊन इतर गोष्टींचा अनुभव घेण्याबरोबरच धनही कमावले पाहिजे. तुझी तयारी असली, तर तुझ्यासोबत परदेशात येण्याची माझी तयारी आहे.' पापबुद्धीचे हे म्हणणे धर्मबुद्धीला पटले व एके दिवशी ते दोघे वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद घेऊन परदेशाच्या प्रवासाच्या निघाले.

परदेशी गेल्यावर धर्मबुद्धीने आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर भरपूर धन मिळविले तर त्याच्या मार्गदर्शनामुळे थोडाफार पैसा मिळविण्यात पापबुद्धीलाही यश आले. काही वर्षे तिकडे घालविल्यावर दोघे आपापल्या संपत्तीसह स्वतःच्या गावी जायला निघाले.

आपल्या गावाबाहेरील वनापर्यंतची मजल गाठताच कपटी पापबुद्धी मुद्दाम म्हणाला, 'धर्मबुद्धी, मी आता जे म्हणतो आहे ते नीट ऐक -

***न वित्तं दर्शयेत् प्राज्ञः***
***कस्यचित् स्वल्पमप्यहो ।***
***मुनेरपि यतस्तस्य***
***दर्शनाच्चलते मनः ॥***

**(सूज्ञाने आपले थोडेसेही धन कुणाला दाखवू नये. कारण धनाचे दर्शन घडले असता, वैराग्याचेही मन विचलित होते.)**

त्याचप्रमाणे - *यथाऽमिषं जले मत्स्यै*

*र्भक्ष्यते श्वापदैर्भुवि ।*

*आकाशे पक्षिभिश्चैव*

*तथा सर्वत्र वित्तवान् ॥*

**(पाण्यातील आमिष मासे खातात, भूमीवरील पशू खातात, तर आकाशातील आमीष पक्षी खातात. पण धनवंत माणूस मात्र कुठेही जरी असला, तरी लोक त्याला खाऊन टाकतात. [म्हणजे लुबाडतात.]** )

'तेव्हा हे धर्मबुद्धी, आपल्याला सध्या लागेल तेवढेच धन आपण आता बरोबर घेऊन घरी जावे व बाकीचे धन या वनात पुरून ठेवावे असे मला वाटते. मग पुढे जेव्हा जशी गरज लागेल, तसे इथे पुरलेले धन आपल्याला घेऊन जाता येईल.' पापबुद्धीने केलेली ही सूचना पटल्यामुळे - कुणी पाहात नाही याची खात्री करून घेऊन - त्या दोघांनी एक खोल खड्डा खणला आणि आपापल्या धनाच्या थैल्या एका मोठ्या डब्यात घालून, तो डबा खड्ड्यात पुरला व घराचा रस्ता धरला.

घरी गेल्यावर त्यांचा काळ अतिशय सुबत्तेत चालला होता. असे काही दिवस निघून गेले आणि एके दिवशी पापबुद्धीने एकट्याने वनात जाऊन व तो खड्डा उकरून, त्यातले दोघांचेही सर्वच्या सर्व धन पळवून आपल्या घरी नेऊन ठेवले.

a

मग दुसऱ्याच दिवशी तो धर्मबुद्धीकडे गेला व त्याला म्हणाला, 'मित्रा, माझे कुटुंब मोठे असल्याने, माझ्याजवळचे सर्व धन संपून गेले. तेव्हा निदान माझ्या गरजेपुरते थोडेसे धन आणण्यासाठी तरी आपण दोघे वनात जाऊ या.' धर्मबुद्धीने त्याचे म्हणणे मान्य केले व ते दोघे वनातील ठरल्या जागी गेले.

पण माती खणून काढतात, तर त्या खड्ड्यातला डबा नाहीसा झालेला! ते पाहून पापबुद्धी धर्मबुद्धीवर उलटून त्याला म्हणाला, 'अरे दगलबाजा, इथे पुरलेले धन तुझ्या-माझ्याशिवाय इतर कुणालाच ठाऊक नसल्याने, ही चोरी तूच केली आहेस. बऱ्या बोलाने माझे धन मला परत कर, नाहीतर मी तुझ्याविरुद्ध सरकारात दावा दाखल करीन.'

धर्मबुद्धी म्हणाला, 'हे पापबुद्धी, मला तर हे काम तुझेच असून, चोरी पचविण्यासाठी तू माझ्यावर बालंट घेत आहेस असे वाटते. माझ्याविषयी म्हणशील तर मी माझ्या नावाप्रमाणेच धर्मशील आहे आणि माझ्या हातून असे पापकर्म घडणे अशक्य आहे. म्हटलेच आहे ना?

***मातृवत् परदाराणि***
***परद्रव्याणि लोष्ठवत् ।***
***आत्मवत् सर्वभूतानि***
***वीक्ष्यन्ते धर्मबुद्धयः ॥***

a

**(जे धार्मिक वृत्तीचे असतात, त्यांना इतरांच्या स्त्रिया मातेप्रमाणे, दुसऱ्यांचे धन मातीच्या ढेकळाप्रमाणे आणि सर्व प्राणिमात्र स्वतःप्रमाणे वाटत असतात.)**

अखेर ते दोघे न्यायालयात गेले व त्यांनी आपापले गाऱ्हाणे न्यायमूर्तींच्या कानी घातले. ते ऐकून न्यायमूर्ती म्हणाले, 'तुम्हा दोघांपैकी कुणी हा अपराध केला, हे कळायला साधन नसल्यामुळे, तुम्ही दोघांनीही एखादे 'दिव्य' करून दाखवा.'

यावर पापबुद्धी म्हणाला, 'न्यायमूर्ती, तुमचे हे सांगणे वावगे आहे. एखादे प्रकरण संशयास्पद असले, तर न्यायमूर्तींनी लेखी पुराव्याची मागणी करावी; ती पूर्ण करता येत नसेल, तर ती घटना प्रत्यक्ष पाहिलेल्या व्यक्तीची साक्ष काढावी आणि तसा साक्षीदार मिळत नसेल, तरच 'दिव्य' करून दाखविण्याची जबाबदारी संबंधितांवर टाकावी या बाबतीत म्हणाल तर ते धन या धर्मबुद्धीने चोरले. ही गोष्ट त्या वनाच्या वनदेवाने नक्कीच पाहिली असणार. तेव्हा आपण वनात यावे व त्या वनदेवालाच विचारावे. वनदेव हा जरी मानवांच्या दृष्टीस पडत नसला, तरी माझ्यासारख्या सज्जन व पुण्यवान् माणसाला वाचविण्यासाठी तो आपण विचारलेल्या एखाद् दुसऱ्या प्रश्नाला तरी स्वतः गुप्त राहून नक्कीच उत्तर देईल.' काहीशा आश्चर्याने का होईना, पण न्यायमूर्तींनी पापबुद्धीचे हे म्हणणे मान्य केले आणि दुसऱ्या दिवशी वनात येण्याचे त्याला आश्वासन दिले.

घरी जाताच पापबुद्धीने न्यायालयात घडलेला सर्व प्रकार आपल्या पित्याच्या कानी घातला व तो त्याला म्हणाला, 'बाबा, उद्या पहाटे तुम्ही त्या वनातील शमीच्या झाडाच्या ढोलीत दडून रहा, आणि 'हे धन कुणी चोरले?' असा प्रश्न आमच्यापैकी कुणी विचारला की, 'धर्मबुद्धीने' असे सरळ उत्तर द्या.' पित्याने धनाच्या लोभाने पापबुद्धीचे म्हणणे मान्य केले.

दुसऱ्या दिवशी पहाटेच पापबुद्धीचा पिता वनात जाऊन शर्मीच्या झाडातील कोटरीत लपून बसला आणि चांगले उजाडल्यावर पापबुद्धी व धर्मबुद्धी यांच्यासह न्यायाधीशही तिकडे गेले.

दुसऱ्या दिवशी पहाटेच पापबुद्धीचा पिता वनात जाऊन शमीच्या झाडातील कोटरीत लपून बसला आणि चांगले उजाडल्यावर पापबुद्धी व धर्मबुद्धी यांच्यासह न्यायाधीशही तिकडे गेले.

तिकडे गेल्यावर न्यायाधीशाच्या सांगण्यावरून स्वतः पापबुद्धीनेच मोठ्या आवाजात विचारले, 'हे वनदेवा, या इथे पुरलेले धन कुणी चोरले?'

तो प्रश्न कानी पडताच त्या शमीवृक्षाच्या ढोलीतून उत्तर बाहेर पडले, 'पुण्यवान् पापबुद्धीचे त्या ठिकाणी पुरलेले धन, अधर्मी अशा धर्मबुद्धीने पळवून नेताना स्वतः मी वनदेवाने पाहिले.' हे उत्तर ऐकून पापबुद्धीने न्यायाधीशाला विचारले, 'महाराज, हा धर्मबुद्धीच चोर असल्याचे आता तरी सिद्ध झाले ना?'

परंतु त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता धर्मबुद्धीने घाईघाईने त्या वृक्षाच्या बुंध्याभोवती पालापाचोळ्याचा ढीग रचला व तो पेटवून दिला.

त्याबरोबर त्याच्या ज्वाला व धूर त्या ढोलीत शिरून पापबुद्धीच्या बापाच्या कपड्यांनी पेट घेतला व त्याचे डोळे भाजले जाऊन तो आंधळा बनला. पण अशाही स्थितीत त्याने ओरडत, किंचाळत ढोलीबाहेर उडी घेतली आणि न्यायाधीशाने विचारल्यावरून त्याला खरी हकीगत सांगितली. मग न्यायाधीशाने पापबुद्धीला त्याच झाडाखाली फाशी दिले. अशा तऱ्हेने, केलेली चोरी पचविण्यासाठी पापबुद्धीने जो उपाय योजला भयंकर अपाय ठरला.

त्यानंतर धर्मबुद्धीच्या प्रामाणिकपणाची व चातुर्याची स्तुती करून न्यायाधीश त्याला म्हणाला, **'कुठलाही उपाय योजताना, त्याच्यापासून आपल्याला एखादा अपाय तर होणार नाही ना? या गोष्टीचा विचार करावा लागतो.** नाहीतर, त्या अविचारी बगळ्याने योजलेल्या उपायमुळे, जसा त्याच्यावर व त्याच्या आप्तमित्रांवर आत्मनाशाचा प्रसंग ओढवला, तसा प्रसंग ओढवतो.'

'तो कसा काय?' अशी पृच्छा धर्मबुद्धीने केली असता, न्यायाधीश म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट वीसावी

## अविचाराने करता उपाय, कालांतराने ठरे अपाय

एका वनातील वडाच्या झाडावर बरेच बगळे घरटी करून राहात होते. त्याच झाडाच्या ढोलीत एक भलामोठा काळाकुट्ट सर्प राहात असे व ते बगळे भक्ष्याच्या शोधार्थ दूरवर गेले की, त्यांच्या घरट्यातील पिले खाऊन टाकत असे.

एकदा अशीच त्या सर्पाने एका बगळाबगळीची पिले खाऊन टाकल्यामुळे तो बगळा जवळच्याच एका सरोवराकाठी जाऊन रडत बसला. एका खेकड्याने त्याला रडण्याचे कारण विचारता, त्याने ते त्याला सांगितले व 'त्या दुष्ट सर्पाला मारण्याचा एखादा उपाय सांगतोस का?' असे त्याला विचारले.

त्याचे ते म्हणणे ऐकून खेकडा मनात म्हणाला, 'जसा तो साप या बगळयांच्या पिल्लांचा शत्रू, तसेच झाडून सारे बगळेही आम्हा खेकड्यांचे व माशांचे शत्रूच आहेत. मग आलेली संधी साधून, आपण जर गोड बोलून

या बगळ्यांचा परस्पर कुणाकडून तरी नाश करविला, तर त्यात वावगे ते काय? म्हटलेच आहे ना?

***नवनीतसमां वाणीं***
***कृत्वा चित्तं तु निर्दयम् ।***
***तथा प्रबोध्यते शत्रुः***
***सान्वयो म्रियते यथा ॥***

(वाचा लोण्याप्रमाणे मृदु, पण हृदय मात्र कठोर ठेवून शत्रूला असा सल्ला द्यावा, की ज्यायोगे त्याचा गणगोतासह नाश होईल.)

मनात आलेला हा विचार पक्का करून तो खेकडा म्हणाला, 'बगळेमामा, यावर एक नामी उपाय तुम्हाला म्हणून मी सांगतो. त्या समोरच्या झाडाखाली असलेल्या बिळात मुंगूस राहतो ना? त्याच्या बिळापासून ते थेट तुमच्या वटवृक्षातील ढोलीपर्यंत थोडथोड्या अंतरावर मांसखंड टाका; म्हणजे तो मुंगूस त्याच्या बिळापासून एकेक मांसखंड खात खात अखेर त्या ढोलीपर्यंत जाईल व त्या सर्पाला मारून खाईल.'

खेकड्याने सुचविलेला हा उपाय एकदम पटल्यामुळे त्या बगळ्याने त्याप्रमाणे केले. पण हा उपाय जरी परिणामकारक ठरला, तरी त्या मुंगुसाने ते मांसखंड खात खात जाऊन जसा त्या सर्पाचा फडशा उडविला, तसाच

त्यानंतर त्याची दृष्टी त्या वृक्षावर गेल्यामुळे, त्याने त्या वृक्षावरील सर्व बगळ्यांचाही क्रमाक्रमाने फडशा उडविला.'

ही गोष्ट सांगून तो न्यायाधीश म्हणाला, 'हे धर्मबुद्धी! म्हणून मी म्हणतो की, ज्याप्रमाणे पूर्ण विचार न केल्यामुळे त्या बगळ्याने योजलेला उपाय हा अपाय ठरला, त्याचप्रमाणे पापबुद्धीनेही तुझे धन गडप करण्यासाठी उपाय योजताना, त्यापासून होणाऱ्या अपायाचा विचार न केल्यामुळे, तो स्वतः तर प्राणास मुकलाच, पण त्याचा पिताही आंधळा झाला.'

या गोष्टी सांगून करटक दमनकाला म्हणाला, 'बाबा रे, स्वार्थापुढे तुला न्यायनीतीची चाड उरली नसल्याने, तू पिंगलकमहाराजांचे प्राण व राज्य धोक्यात आणले आहेस. आज त्यांना दगा देऊ पहाणारा तू, उद्या मलाही दगा द्यायला कमी करणार नाहीस. अशा स्थितीत तुझी संगत सोडून देणेच योग्य होईल. ज्याने न्याय व नीती गुंडाळून ठेवली आहे, अशा तुला आज जरी यश मिळत असल्यासारखे वाटत असले, तरी ते यापुढेही असेच मिळत राहील, या भ्रमात तू राहू नकोस. ज्या गावात शेकडो शेर वजनाचा लोखंडी तराजू खाणारा उंदीर असतो, त्या गावात - त्या उंदरास तोडीस तोड असा - चोचीने मुलगा उचलून उडून जाऊ शकणारा बहिरीससाणाही असतो, ही गोष्ट तुला ठाऊक आहे ना?'

'ती गोष्ट मला ठाऊक नाही, 'असे दमनक म्हणताच करटकाने त्याला ती गोष्ट सांगायला सुरुवात केली -

a

# गोष्ट एकवीसावी

## ही देवाची योजना आहे, 'शेर आहे तिथे सव्वाशेर' ही आहे.

एका गावात 'जीर्णधन' नावाचा एक वैश्यपुत्र होता. व्यापारात जबरदस्त खोट खाल्ल्यामुळे त्याला अतिशय वाईट दिवस आले, म्हणून तशा स्थितीत त्याला त्या गावात राहणे लाजिरवाणे वाटु लागले व त्याने काही काळाकरिता बाहेरगावी जायचे ठरविले.

*यत्र देशेऽथवा स्थाने भोगान् भुक्त्वा स्ववीर्यतः ।*

*तस्मिन् विभवहीनो यो वसेत् स पुरुषाधमः ॥*

**(ज्या देशात वा ठिकाणी ज्याने स्वतःच्या हिंमतीवर वैभव भोगले, तिथे जो वैभवहीन झाल्यावरही राहातो, तो पुरुष सर्वात अधम असतो.)**

त्याचप्रमाणे -

*येनाहङ्कारयुक्तेन चिरं विलसितं पुरा ।*

*दिनं वदति तत्रैव यः परेषां स निन्दितः ॥*

**(ज्याने एखाद्या ठिकाणी पूर्वी अभिमानाने विलास व चैन आस्वादण्यात बराच काळ घालविला, तो जर नंतर त्याच ठिकाणी लाचारीने बोलू लागला, तर दुसऱ्यांच्या निंदेचा विषय बनतो.)**

म्हणून त्या वैश्यपुत्राने घरात असलेला वडिलोपार्जित असा एक मोठा वजनदार लोखंडी तराजू, एका व्यापाऱ्याकडे सुरक्षित ठेवण्यासाठी दिला आणि मग तो दूरच्या प्रदेशात निघून गेला.

चार-सहा वर्षांनंतर, थोडीफार कमाई केल्यावर, जेव्हा तो आपल्या गावी परतला व त्या व्यापाऱ्याकडे जाऊन आपला तराजू मागू लागला, तेव्हा तो व्यापारी त्याला म्हणाला, 'तू माझ्याकडे ठेवायला दिलेला लोखंडी तराजू उंदराने कुरतडून कुरतडून खाल्ला व पार संपवून टाकला. मग आता तो तराजू मी तुला कसा काय परत करणार?' शेटजीचे हे उत्तर ऐकून तो वैश्यपुत्र समजूत झाल्याप्रमाणे गप्प बसला. त्यामुळे तो लबाड व्यापारी स्वतःच्या चातुर्यावर खूष झाला. त्या वैश्यपुत्राने - म्हणजे जीर्णधनाने त्या शेटजींशी पूर्वीपेक्षाही अधिक स्नेहाचे संबंध ठेवले, त्यांच्याकडे जाणे येणे चालू ठेवले, पण मनात मात्र त्याला धडा शिकविण्याचे ठरविले.

जीर्णधनाचे ते वाजवीपेक्षाही अधिक प्रेमाचे वागणे पाहून त्या शेटजीच्या मनात मधूनच विचार येई, 'हा आपल्याशी इतका प्रेमाने का बरं वागतो? याच्या मनात तराजूच्या बदल्यात आपल्याकडून काही उकळावयाचे तर नसेल ना? कारण कुणीही कुणाशी विनाकारण चांगला वागत नसतो. म्हटलंच आहे ना?

***न भक्त्या कस्यचित् कोऽपि प्रियं प्रकुरुते नरः ।***

***मुक्त्वा भयं प्रलोभं वा कार्यकारणमेव वा ॥***

a

(केवळ प्रेमापोटी कुणी कुणाचे हित करायला जात नाही. त्यामागे भीती, लोभ किंवा असेही काही खास कारण असते.)

त्याचप्रमाणे -

*अत्यादरो भवेत् यत्र कार्यकारणवर्जितः ।*

*तत्र शङ्का प्रकर्तव्या परिणामेऽसुखावहा ॥*

**(जिथे कारण नसतानाही अतिशय आदर दाखविला जातो, तिथे शंका घ्यावी; नाहीतर परिणाम दुःखद होतो.)**

एके दिवशी तो जीर्णधन, त्या लबाड शेटजीच्या घरावरून आंघोळीसाठी नदीवर जात असता, त्या शेटजीचा लहान मुलगा त्याच्या पाठीशी लागला व शेटजीने संमती दिल्यामुळे जीर्णधन त्या मुलाला घेऊन गेला. मात्र दोघांच्या आंघोळी झाल्यावर जीर्णधनाने त्या मुलाला त्याच्या घरी पोहोचते करण्याऐवजी त्याला एका अज्ञात स्थळी लपवून ठेवले. बराच वेळ झाला तरी आपला मुलगा घरी परत न आल्याचे पाहून, तो शेटजी जीर्णधनाकडे गेला व 'माझा मुलगा कुठे आहे?' असे त्याला विचारू लागला. 'तुझ्या मुलाला मी नदीवर आंघोळ घालत असता तिथे एक बहिरीससाणा आला व तुझ्या मुलाची मान चोचीत पकडून दूर उडून गेला,' असे उत्तर जीर्णधनाने मुद्दाम दिले तेव्हा त्या शेटजीने त्याच्याविरुद्ध न्यायालयात दावा केला.

a

न्यायाधीशाने विचारले, 'जीर्णधना, ससाण्यासारखा छोटासा पक्षी, शेटजींच्या पाच-सहा वर्षांच्या मुलाची मान चोचीत पकडून दूर उडून जाणे शक्य आहे का?'

जीर्णधनाने उत्तर दिले, 'का शक्य नाही? चार-सहा वर्षांपूर्वी मी बाहेरगावी जाताना, याच शेटजींकडे ठेवायला दिलेला बऱ्याच शेर वजनाचा लोखंडी तराजू जर याच्याकडला एक यःकश्चित् उंदीर कुरतडून खलास करू शकला, तर नदीवर आलेला तो बलदंड ससाणा याच्या मुलाची मानगूट चोचीत पकडून उडून जाण्यात यशस्वी झाला, यात अशक्य ते काय?' त्याच्या या बोलण्याने तो न्यायाधीश त्याच्याकडे अचंबित नजरेने पाहू लागताच जीर्णधनाने पूर्वीच्या तराजू-प्रकरणाचा सविस्तर वृत्तांत त्याला सांगितला. त्याबरोबर न्यायाधीश खदखदून हसला. मग त्याने त्या लबाड व्यापाऱ्याला फैलावर घेतले आणि तो मुलगा व तो तराजू ज्याचा त्याला परत करण्याचे त्या दोघांना हुकूम फर्मावले.'

ही गोष्ट सांगून करटक दमनकाला म्हणाला, 'तुला स्वतःच्या बुद्धीचा जसा वाजवीपेक्षा अधिक अभिमान वाटू लागला आहे, तसाच त्या संजीवकाचा उत्कर्षही सहन होईनासा झाला आहे. म्हटलंच आहे ना?

a

*मूर्खाणां पण्डिता द्वेष्या निर्धनानां महाधनाः ।*

*व्रतिनः पापशीलनामसतीनां कुलस्त्रियः ॥*

**(पंडितांचा द्वेष किंवा हेवा मूर्ख लोक करतात, धनहीन धनवंताचा, पापी व्रतस्थांचा तर दुराचारी स्त्रिया कुलवान स्त्रियांचा करतात. )**

'हे दमनका, स्वतःला शहाणा समजणाऱ्याएवढा मूर्ख या जगात दुसरा कुणी नसतो. तू तसाच असल्यामुळे, तुझ्याशी प्रेमाचे संबंध ठेवल्याने, मूर्ख वानराशी मैत्री जोडल्यामुळे एका राजावर जसा मरणाचा प्रसंग ओढवला, तसा प्रसंग माझ्यावर ओढवेल.'

'राजाची व वानराची ती गोष्ट काय आहे?' असे दमनकाने विचारले असता करटक म्हणाला, 'काही वर्षांपूर्वीची गोष्ट -



# गोष्ट बावीसावी

## मूर्खाला काम सांगावे व स्वतःवर संकट ओढवून घ्यावे.

'एका राजापाशी एक भलेमोठे वानर होते. त्याच्यावर त्याचा अतिशय जीव असल्यामुळे तो जिथे जाई, तिथे त्याला आपल्यासंगे नेई. एकदा दुपारच्या जेवणानंतर राजा झोपला असता, ते वानर त्याला पंख्याने वारा घालू लागले. तेवढ्यात एक माशी आली व राजाच्या छातीवर बसली.

'त्या वानराने तिला हाकलून द्यावे व तिने पुन्हा लगेच त्याच्या छातीवर येऊन बसावे, असे अनेक वेळा झाल्यावर, ते वानर तिच्यावर भलतेच चिडले. त्याने त्या माशीला ठार मारण्यासाठी जवळच असलेली नंगी तलवार हाती घेऊन, तिच्यावर एवढ्या जोराने प्रहार केला की, त्या एका घावासरशी त्या राजाचे दोन तुकडे झाले! म्हणून **ज्याला बरेच दिवस जगायचे असेल, त्याने मूर्खांच्या सहवासात कधीही राहू नये**.

'दमनका, माझे तर ठाम मत आहे की, **एक वेळ सुज्ञ शत्रू परवडला, पण मूर्ख अशा मित्राच्याच नव्हे, तर भावाच्याही वाऱ्याला उभे राहू नये.** ज्याने परक्या व्यापाऱ्यांचे प्राण वाचविण्यासाठी आत्मबलिदान केले, त्या चोरट्या पण सूज्ञ ब्राह्मणाची गोष्ट माझ्या विधानाला पुष्टी देणारी आहे.'

'ती गोष्ट काय आहे बुवा?' असा प्रश्न दमनकाने मोठ्या उत्कंठाने विचारला असता करटक म्हणाला, 'त्याचं असं झालं-

# गोष्ट तेवीसावी

## सूज्ञ शत्रू परवडे, पण मूर्ख मित्र महाग पडे.

एका गावात एक ब्राह्मण राहात होता. तसा तो चांगला विद्वान होता. पण कुठल्या पूर्वजाचा अवगुण त्याच्या स्वभावात उतरला न कळे - त्याला मधूनच केव्हातरी चोरी करण्याची हुक्की येई.

एकदा त्या गावात चार ब्राह्मण व्यापारी आले. त्यांनी आपल्याबरोबर आणलेला सर्वच्या सर्व माल भराभर विकला गेल्यामुळे, त्यांच्यापाशी बराच पैसा जमा झाला. ते गावात आल्यापासून त्या विद्वान पण चोरट्या ब्राह्मणाची त्यांच्यावर बारीक नजर होती. त्यांच्याजवळच्या पैशांची चोरी करण्यासाठी त्याने त्यांची ओळख करून घेतली व त्यांना सुंदर सुंदर संस्कृत सुभाषिते सुनावून, त्यांच्यावर आपली छाप पाडली. पण ते व्यापारी धूर्त व सावध असल्यामूळे त्यांच्याजवळच्या पैशांची चोरी करणे त्या ब्राह्मणाला अशक्य झाले.

त्यातून त्या व्यापाऱ्यांच्या मनात विचार आला, 'आपल्याजवळचा पैसा जर आपण आहे तसाच घेऊन गावी जाऊ लागलो, तर वाटेत चोरदरवडेखोर आपल्याला लुटतील.' मनात असा विचार आल्याने त्या चौघांनीही आपापल्या पैशांची मौल्यवान् रत्ने खरेदी केली आणि आपल्या मांड्या चिरून ती त्यांत दडवून ठेवली. मग कापलेल्या मांड्या शिवून होताच, त्यांनी आपल्या गावी परतण्याच्या दृष्टीने सावरासावर सुरू केली.

हा सर्व प्रकार त्या चोरट्या ब्राह्मणाने पाहिला आणि तो स्वतःशी म्हणाला, 'या व्यापाऱ्यांना जर असेच जाऊ दिले, तर आयती आलेली सुवर्णसंधी आपण कायमची गमावून बसू. त्यापेक्षा यांच्याशी असेच गोडगोड बोलून यांनी आपल्यालाही त्यांच्याबरोबर न्यावे, यासाठी त्यांना विनंती करावी आणि त्याप्रमाणे त्यांच्यासंगे जात असता, वाटेत या चौघांनाही विष घालून यांच्या मांड्यात दडवलेली रत्ने आपण काढून घ्यावीत.'

मनात असे ठरवून तो चोरटा ब्राह्मण त्यांना म्हणाला, 'शेटजी, तुमच्या थोड्याशा सहवासानेदेखील तुमच्यावर माझा एवढा जीव जडला आहे की, यापुढे तुमच्याशिवाय राहाणे मला शक्य होणार नाही. तेव्हा तुम्ही मलाही तुमच्यासंगे तुमच्या गावाला न्या.'

त्या व्यापाऱ्यांनी त्याचे म्हणणे मान्य केले आणि ते त्याला घेऊन आपल्या गावाचा रस्ता चालू लागले.

पण वाटेत एक आक्रित घडले. 'पल्लीपूर' या भिल्लांच्या गावामधून ते जात असता, झाडांवर बसलेले कावळे विशिष्ट पद्धतीने 'कावकाव' करू लागले, 'लाख सव्वालाखाचे धनी चालले आहेत. त्यांना लुटायचे असेल तर लवकर तुटा,' अशा अर्थाची ती सूचक भाषा कानी पडताच, त्या भिल्लांनी त्या पाचहीजणांना एकदम गराडले, व त्यांचे कपडे काढून त्यांना कसोशीने तपासले, पण त्यांना त्यांच्यापाशी काहीच मोलाचे असे मिळाले नाही. ते पाहून म्होरक्या भिल्ल बाकीच्यांना म्हणाला, 'आपल्या

a

कावळ्यांचे सांगणे आजवर कधी खोटे ठरले नाही. मग आजच ते खोटे कसे ठरले? तेव्हा या पाचहीजणांना ठार मारून यांची कातडी सोलून काढा, म्हणजे यांनी जर शरीरात सोन्याच्या चिपा किंवा रत्ने दडवून ठेवली असली तर ती आपल्याला मिळतील.'

भिल्लांच्या म्होरक्याचे हे शब्द ऐकून तो चोरटा ब्राह्मण मनात म्हणाला, 'अरेरे! मी या व्यापाऱ्यांना मारून यांच्याजवळची रत्ने मिळवायला म्हणून आलो आणि आता ती रत्ने मिळवण्याऐवजी या चौघांबरोबर माझ्यावरही प्राण गमावण्याचा प्रसंग आला! आता एवीतेवी मरण जर चुकत नाही, तर आपण या भिल्लांना केवळ 'नमुना' म्हणून आपल्याला मारायला सांगावे आणि आपल्या शरीरात दडवलेले सोने वा रत्ने न सापडल्यास या चार व्यापाऱ्यांना सोडण्याबद्दल विनवावे. आपल्यामुळे जर हे व्यापारी सुटले तर निदान मरता मरता हातून एक महान् पुण्यकृत्य घडेल व आजवरचे आपले पाप धुवून निघेल.'

मनात असा विचार करून त्या चोरट्या पण सूज्ञ ब्राह्मणाने त्या भिल्लप्रमुखाला त्याप्रमाणे विनविले आणि त्याने ते मान्य केले. मग त्या भिल्लांनी त्या ब्राह्मणाला ठार मारून, त्याच्या अंगावरचे कातडे सोलून काढले, पण त्याच्या शरीरात सोने वा रत्न न मिळाल्याने बाकीचे चौघेही असेच असतील, असे म्हणून त्यांनी त्या चारहीजणांना सोडून दिले.' ही गोष्ट सांगून करटक दमनकाला म्हणाला, 'म्हणून मी म्हणतो की, मूर्ख मित्रापेक्षा सूज्ञ फार बरा.'

a

दमनक म्हणाला, 'दादा, तुझं तत्त्वज्ञान तू तुझ्यापाशी सांभाळून ठेव. सध्याचे जग हे असे सरळ वागणाऱ्यांसाठी नाही.' असे बोलता बोलताच, तिकडे पिंगलकाकडून ठार झालेल्या संजीवकाकडे लक्ष वेधवून दमनक करटकाला पुढं म्हणाला, 'ते बघ, माझे कारस्थान फळाला आले. पिंगलकमहाराजांनी संजीवकाला ठार मारले. माझ्याशी कधीही शत्रुत्व न करणाऱ्या, पण माझे महत्त्व कमी व्हायला कारणीभूत होणाऱ्या त्या संजीवकाचा अंत झाला असल्याने, आता मी महाराजांचा प्रधान होणार आणि अमर्याद वैभव व सत्ता उपभोगणार.'

तिकडे संजीवकाच्या प्रेताकडे पाहात पिंगलक अश्रु ढाळीत म्हणत होता, 'अरेरे! झाले हे फार वाईट झाले. देशाचा एखादा भाग दुसऱ्या राजाने घेतला तर तो परत जिंकून घेता येतो, पण निष्ठावंत व बुधिमान् सेवक मेल्याने, राजा त्याला कायमचा मुकतो. बाकी संजीवकाची आता आपल्या ठिकाणी निष्ठा कुठे राहिली होती? पण याला पुरावा काय? आपण तर त्याचे म्हणणे ऐकून न घेताच त्याचा प्राण घेतला. म्हणजे आपण मित्राचा विश्वासघातच केला म्हणायचा! आणि मित्राचा विश्वासघात करणारा तर महापापी मानला जातो. म्हटलंच आहे ना?-

*मित्रद्रोही कृतघ्नश्च यश्च विश्वासघातकः ।*

*ते नरा नरकं यान्ति यावच्चन्द्रदिवाकरौ ॥*

**(मित्रद्रोही, कृतघ्न आणि विश्वासघातकी जे असतात, ते चंद्रसूर्य असेपर्यंत नरकाचे धनी होतात.)**

a

पिंगलक याप्रमाणे दुःख करीत असता त्याच्यापाशी जाऊन दमनक म्हणाला, 'महाराज, केलेल्या कृतीबद्दल असा पश्चात्ताप वा दुःख करीत बसणे राजाला शोभून दिसत नाही. त्यातून संजीवक हा तर आपल्या जिवावर उठला होता, हे मी त्याच्यासमक्ष आपल्याला सांगितले आहे. मग त्याला मारण्यात आपली चूक ती काय? कारण शास्त्रच मुळी सांगतं-

*पिता वा यदि वा भ्राता पुत्रो भार्याऽथवा सुहृद् ।*

*प्राणद्रोहं यदा गच्छेत् हन्तव्यो नास्ति पातकम् ॥*

**(बाप असो वा भाऊ, मुलगा, पत्नी किंवा मित्र असो, जो आपल्या जिवावर उठतो, त्याला दुसरा पर्याय नसल्यास ठार मारण्यात पाप नाही.)**

दमनक पुढे म्हणाला, 'महाराज, ज्याला राज्य चालवायचं आहे, त्याला एवढे हळवे व सोवळे राहून चालत नाही. ही राजनीती काही एखाद्या कुलवती स्त्रीप्रमाणे चारित्र्याला जपणारी नाही. ती कशी आहे ते ऐकायचं आहे? ऐका -

*सत्यानृता च परुषा प्रियवादिनी च*

*हिंस्त्रा दयालुरपि चार्थपरा वदान्या ।*

*भूरिव्यया प्रचुरवित्तसमागम च*

*वेश्याङ्गनेव नृपनीतिरनेकरूपा ॥*

**(कधी खरे बोलणारी, तर कधी खोटे बोलणारी, कधी कठोरभाषा तर कधी मधुभाषी, कधी घातक तर कधी दयाळू, कधी अप्पलपोटी तर कधी दानशूर, कधी जास्तीतजास्त पैशांचा सांभाळ करणारी तर कधी जास्त खर्च करणारी, अशी ही राजनीती एखाद्या वेश्येप्रमाणे नाना रूपे घेणारी आहे.)**

दमनकाचा हा प्रभावी उपदेश ऐकून पिंगलकाने आपले दुःख आवरले आणि प्रधान व्हायला तूच योग्य आहेस,' असे म्हणून त्याला आपला प्रधान नेमले.



a

# तंत्र दुसरे

# मित्रलाभ



# गोष्ट चोवीसावी

# विनाशकाले विपरीत बुद्धी

या 'महिलारोप्य' नगराच्या सीमेवरील एका वटवृक्षावर जे नानातऱ्हेचे पक्षी राहात होते, त्यामध्ये 'लघुपतनक' नावाचा एक कावळाही राहात होता.

एके दिवशी तो कावळा अन्नाच्या शोधार्थ त्या झाडावरून उडून कुठेतरी चालला असता, त्याला एक काळाकभिन्न फासेपारधी वटवृक्षावरील पक्ष्यांना पकडण्यासाठीच चालला असावा, हे हेरून, लघुपतनक परत त्या वृक्षाकडे गेला व त्या ठिकाणी असलेल्या सर्व पक्ष्यांना उद्देशून म्हणाला, 'पक्षीबांधवहो, एक फासेपारधी इकडे येत आहे. तो जवळपासच्या मोकळ्या जमिनीवर जाळे पसरील व त्यावर तांदूळ फेकील. ते तांदूळ खायला आपण गेलो की जाळ्यात अडकू व प्राणांस मुकू. तेव्हा ते तांदूळ खाण्यासाठी त्या जाळ्याकडे जाऊ नका.' लघुपतनकाचे हे बोलणे पुरे होते न होते, तोच तो पारधी तिथे आला आणि जमिनीवर जाळे पसरून व त्यावर तांदूळ फेकून तो दूरच्या झुडपाआड लपून बसला. लघुपतनकाने सर्वांना अगोदरच सावध केले असल्याने, त्या वटवृक्षावरील एकही पक्षी त्या तांदूळाच्या वाटेस गेला नाही.

परंतु थोड्याच वेळात चित्रग्रीव नावाचा एक कबुतरांचा राजा आपल्या अनुयायांसह त्या बाजूने उडत चालला असता, त्याची व त्याच्या

अनुयायांची नजर त्या तांदळांच्या दाण्यांकडे गेली. वास्तविक चित्रग्रीव हा बुद्धिमान होता. 'या वनात तांदळाचे दाणे सहजासहजी दृष्टीस पडणार नाहीत,' हे त्याला कळत होते. शिवाय लघुपतनकानेही त्यालाव त्याच्या अनुयायांना सावध केले होते. तरीही राजा चित्रग्रीव व त्याचे अनुयायी ते दाणे खायला गेले आणि त्या जाळ्यात अडकले! म्हटलेच आहे ना?-

***पौलस्त्य कथमन्यदाहरणे दोषं न विज्ञातवान्***
***रामेणापि कथं न हेमहरिणस्यासंभवो लक्षितः ।***
***अक्षैश्चापि युधिष्ठिरेण सहसा प्राप्तो ह्यनर्थः कथं***
***प्रत्यासन्नविपत्तिमूढमनसां प्रायो मतिः क्षीयते ॥***

**(दुसऱ्याची बायको पळविणे ही वाईट गोष्ट असल्याचे रावणाला कळत नव्हते का? सोन्याचे हरीण असू शकत नाही हे श्रीरामाच्या लक्षात कसे काय आले नाही? त्याचप्रमाणे जुगार खेळून युधिष्ठिरासारख्याने एकाएकी अनर्थ कसा काय ओढवून घेतला? वस्तुस्थिती अशी आहे की, आपत्ती जवळ आल्यामुळे संभ्रमित झालेल्यांची बुद्धी बहुधा काम देईनाशी होते.)**

जाळ्यात अडकताच ती कबुतरे जेव्हा भयाने आरडाओरडा करू लागली, तेव्हा त्यांचा राजा चित्रग्रीव त्यांना म्हणाला, 'बाबांनो, असे घाबरून जाऊ नका. प्रसंग आनंदाचा असो वा दुःखाचा असो, सूज्ञांनी आपले मन स्थिर ठेवले पाहिजे. म्हटलेच आहे ना? -

*उदये सविता रक्तः रक्तश्चास्तमने तथा ।*

*सम्पतौ च विपत्तौ च महतामेकरूपता ॥*

**(सूर्य उगवताना जसा लाल असतो, तसाच तो मावळतानाही लालच असतो. जे थोर असतात ते काळ वैभवाचा असो व विपत्तीचा असो - मनाची वृत्ती सारखीच ठेवतात.)**

राजा चित्रग्रीव पुढे म्हणाला, 'बाबांनो, आता सर्वांचे बळ एकवटून आपण एकाच वेळी उडू या, म्हणजे या जाळ्यासकट आपल्याला एखाद्या सुरक्षित ठिकाणी जाता येईल.'

चित्रग्रीवाच्या सूचनेप्रमाणे त्याच्या सर्व अनुयायांनी जोर करून त्या जाळ्यासह एकदम उड्डाण केले व ते सर्व हवेतून दूर दूर जाऊ लागले.'ही कबुतरे आता लवकरच एकमेकांना दोष देऊन आपपासांत भांडू लागतील व खाली येऊन आपल्या हाती सापडतील,' अशा अपेक्षेने तो पारधीही त्यांच्या पाठोपाठ धावू लागला. पण घडले उलटेच. ती कबुतरे दूरवर जात अखेर दिसेनाशी झाली. मग तो पारधी निराश झाला व परतीची वाट चालता चालता स्वतःशी म्हणाला-

*न हि भवति यन्न भाव्यं भवति च भाव्यं विनाऽपि यत्नेन ।*

*करतलगतमपि नश्यति यस्य हि भवितव्यता नास्ति ॥*

**(जे घडायचे नसेल, ते कधीच घड्त नाही, आणि जे घडायचे असेल ते प्रयत्न न करताही घडून येते. ज्याचे दैव अनुकूल नसते, अशाच्या हाती जरी एखादी वस्तू आली, तरी ती नाश पावते. )**

a

पारधी दिसेनासा झाल्यावर त्या पक्ष्यांनी चित्रग्रीवाला, 'महाराज, आता आपल्याला या जाळ्यातून कोण मुक्त करील?' असा प्रश्न केला असता तो म्हणाला -

*सर्वेषामेव मर्त्यानां व्यसने समुपस्थिते ।*

*वाङ्मात्रेणापि साहाय्यं मित्रादन्यो न सन्दधे ॥*

**(संकटे ओढवली असता, सर्वच मर्त्य जीवांना त्यांच्या मित्राशिवाय अन्य कोणी साध्या शब्दानेही मदत करीत नाही.)**

चित्रग्रीव पुढे म्हणाला, 'इथून थोड्याच अंतरावर राहणारा हिरण्यक नावाचा माझा एक उंदीर मित्र 'उंदराचा राजा' आहे. तो एका किल्लेवजा टेकाडातील बिळात राहतो. तो आपल्याला निश्चित सहाय्य करील.'

'पण किल्ल्यात राहण्यामागचा त्याचा हेतु काय?' असा प्रश्न एका अनुयायाने केला असता, चित्रग्रीव म्हणाला, राजाला स्वतःच्या व आपल्या राज्याच्या रक्षणाच्या दृष्टीने किल्ल्यांचे महत्त्व फार आहे. म्हटलेच आहे -

*शतमेकोऽपि सन्धत्ते प्राकारस्थो धनुर्धरः ।*

*तस्मात् दुर्गं प्रशंसन्ति नीतिशास्त्रविदो जनाः ॥*

**(किल्ल्याचा आश्रय ज्याला आहे, असा एक धनुर्धारीसुद्धा शंभरांना पुरा पडतो. म्हणून राजनीतीत पारंगत असलेले लोक किल्ल्याची प्रशंसा करतात.)**

a

याप्रमाणे माहिती सांगून राजा चित्रग्रीव आपल्या अनुयायांसह हिरण्यक नावाच्या उंदराकडे गेला व त्याला हाका मारू लागला.

चित्रग्रीवाचा आवाज ऐकताच हिरण्यक आपल्या बिळातून मोठ्या आनंदाने बाहेर आला, पण ते दृश्य पाहून म्हणाला, मित्रा चित्रग्रीवा, वास्तविक मित्राचे आपल्या घरी आगमन ही आनंदाची जणू पर्वणी! पण तुला व तुझ्या अनुयायांना अशा स्थितीत पाहून मला त्या आनंदाचा आस्वादही घेता येत नाही! मित्रा, हे असे कसे घडून आले?'

घडलेली हकीकत त्याला सांगून चित्रग्रीवाने त्याला जाळे कुरतडून आपल्याला व आपल्या अनुयायांना मुक्त करण्याची विनंती केली.

हिरण्यक प्रथम चित्रग्रीवाला मुक्त करायला गेला असता, चित्रग्रीव म्हणाला, 'हिरण्यका, तू अगोदर माझ्या सर्व अनुयायांना मुक्त कर आणि सर्वांच्या शेवटी मला सोडव. तू जाळे कुरतडून मला मुक्त केलेस आणि नेमक्या वेळी तुझे दात पडले, किंवा त्या दुष्ट पारध्याने इकडे येऊन आम्हाला गाठले, तर मी सुटेन, परंतु या माझ्या अनुयायांची गत काय होईल? तेव्हा राजा या नात्याने, स्वतःपेक्षा स्वतःच्या अनुयायांची व सेवकांची काळजी घेणे हे मी माझे कर्तव्य समजतो.' त्याच्या या थोर मनोवृत्तीचे कौतुक करून, हिरण्यकाने आपल्या धारदार दातांनी ते जाळे कुरतडले आणि त्या सर्व कबुतरांना व शेवटी राजा चित्रग्रीवालाही बंधमुक्त केले. मग चित्रग्रीवाने हिरण्यकाचा निरोप घेतला आणि तो आपल्या अनुयायांसह घराकडे निघून

गेला. तर हिरण्यक स्वतःच्या किल्ल्यातील बिळात घुसला. या जगात मित्राचं महत्त्व किती आहे, हे स्पष्ट सांगणारं एक सुभाषित असं आहे -

*मित्रवान् साधयत्यर्थान् दुःसाध्यानापि वै यतः ।*

*तस्मान्मित्राणि कुर्वीत समानान्येव चात्मनः ॥*

**(ज्याला मित्र आहेत, तो असाध्य अशा गोष्टीही साध्य करून घेऊ शकतो. म्हणून प्रत्येकाने आपल्या तोलाचे मित्र जोडावे. )**

हा सर्व प्रकार, त्या कबुतरांमागोमाग उडत आलेला व जवळच्याच एका वृक्षाच्या फांदीवर बसून राहिलेला लघुपतनक कावळा पाहात होता. तो मनात म्हणाला, 'हिरण्यकासारखा मित्र लाभणे ही खरोखरच भाग्याची गोष्ट आहे. समजा, चित्रग्रीवावर आला, तसाच प्रसंग भविष्यकाळात आपल्यावर आला, तर याचा उपयोग होईल. कुणी कितीही समर्थ असला, तरी वेळी अवेळी दुसऱ्याची मदत घेण्याचा प्रसंग येतोच. सागरालासुद्धा भरतीसाठी चंद्राचे सहाय्य घ्यावे लागतेच ना? मनात असा विचार करून लघुपतनक हिरण्यक राहात होता त्या बिळाच्या तोंडाशी गेला व आपण कोण आहोत ते सांगून त्याला हाका मारू लागला.

पण बिळात बसल्या बसल्याच हिरण्यक त्याला म्हणाला, 'तू माझा जन्मजात वैरी असताना मी बाहेर कसा येऊ?'

लघुपतनकाने विचारले, 'अरे हिरण्यका, तुझी व माझी आजवर एकदाही भेट झालेली नसताना, मी तुझा वैरी कसा काय झालो?'

a

बिळातूनच हिरण्यकाने उत्तर दिले, 'लघुपतनका, वैर हे दोन प्रकारचे असते. पहिले स्वाभाविक वैर व दुसरे प्रासंगिक वैर. प्रासंगिक वैर मात्र तात्पुरत्या उत्पन्न झालेल्या वैराचे कारण दूर होताच नाहीसे होते. पण स्वाभाविक वैर मात्र जन्मापासून जीवनाचा अंत होईपर्यंत टिकून राहाते. साप व मुंगूस, पाणी व अग्नी, देव व दानव, कुत्रा व मांजर, सिंह व हत्ती, त्याचप्रमाणे सज्जन व दुर्जन यांच्यातील वैर स्वाभाविक असते. या जोड्यांमध्ये कुणीही कुणाचा अपराध केलेला नसला, तरी त्यांच्यात वैराचे अग्निकुंड अखंड धगधगत असते. कावळे व उंदीर यांच्यातले वैरसुद्धा असे स्वाभाविक असल्यामुळे, मी तुझ्याकडे कसा येऊ?'

'तुझ्यासारख्या बुद्धिमान् व बहुश्रुत सज्जनाला मारण्याचा, माझ्या मनात चुकूनही विचार येणार नाही.' अशी शपथपूर्वक ग्वाही लघुपतनकाने दिली असता हिरण्यक त्याला म्हणाला, 'बाबा रे, एकतर शत्रूंनी घेतलेल्या शपथांवर विश्वास ठेवण्याइतका मी मूर्ख नाही आणि दुसरे म्हणजे ज्याच्या मनावर अज्ञानाचे आवरण असते, तो प्राणी विद्वान् व बहुश्रुत अशा सज्जनालाही मारायला मागेपुढे पाहात नाही. आद्य व्याकरणकार पाणिनी यांचे प्राण एका सिंहाने घेतले, मीमांसाकार जैमिनींना एका हत्तीने ठार केले, तर छंदशास्त्राचा आद्यप्रणेता असलेल्या पिंगलमुनींना एका मगरीने गिळंकृत केले. या थोर पुरुषांनी त्या प्राण्यांचे असे कोणते अपराध केले होते, म्हणुन त्यांना अशी देहांताची सजा मिळावी?'

हिरण्यकाचा हा बिनतोड सवाल ऐकून थक्क झालेला लघुपतनक त्याला म्हणाला, 'मित्रा, तुझे म्हणणे खरे आहे. पण तू माझ्यावर एवढी तरी कृपा करशील का? मी अधुनमधून तुझ्याकडे येऊन, तुझ्या बिळाबाहेर बसत जाईन आणि तू मात्र बिळातच बसून माझ्याशी बोलत जा. थोरांचा प्रत्यक्ष सहवास न लाभता, त्यांच्या केवळ विचारांचा जरी लाभ झाला, तरी जीवन उजळून जाते. हेही तुला मान्य नसेल, तर मात्र मी आत्ताच इथे आमरण उपोषणाला बसून माझा देहान्त करून घेईन.' लघुपतनक याप्रमाणे बोलल्यावर मात्र हिरण्यकाच्या मनात त्याच्याविषयी विश्वास उत्पन्न झाला आणि तो बिळाबाहेर आला व त्याच्याशी मनमोकळेपणाने गप्पागोष्टी करू लागला. हळूहळू त्या दोघांच्या परिचयाचे रूपांतर दाट मैत्रीत झाले. म्हटलेच आहे ना?

*आरम्भगुर्वी क्षयिणी क्रमेण लघ्वी पुरा वृद्धिमती च पश्चात् ।*
*दिनस्य पूर्वार्धपरार्धभिन्ना छायेव मैत्री खलसज्जनानाम् ॥*

**(दुर्जनांची मैत्री दिवसाच्या पूर्वाधातील सावलीप्रमाणे सुरुवातीस मोठी पण हळूहळू लहान होत जाते, तर सज्जनांची मैत्री ही दिवसाच्या उत्तरार्धातील सावलीप्रमाणे प्रारंभी लहान, पण क्रमाक्रमाने मोठी होत जाणारी म्हणजे पहिलीपेक्षा भिन्न असते.)**

अशा तऱ्हेने त्यांच्या गाठीभेटी रंगू लागल्या असता, एके दिवशी लघुपतनक हिरण्यकाकडे आला व डोळयांत पाणी आणून म्हणाला, 'मित्रा,

आता सुरू झालेल्या दुष्काळामुळे आजुबाजूच्या गावांतले लोक जेवणापूर्वीचे 'काकबळी' देईनासे झाले आहेत. त्यामुळे माझी उपासमार होऊ लागली आहे. त्यातून लोकांना धान्य मिळेनासे झाल्यामुळे कुठलाही पक्षी दिसताच, त्याला मारून ते खाऊ लागले आहेत. स्वतः मी केवळ सुदैवाने अशाच एका प्रसंगातून वाचलो. तेव्हा इथून बऱ्याच दूर असलेल्या वनात एक मोठे सरोवर असून, तिकडे दुष्काळ नसल्याने - ते पाण्याने तुडुंब भरलेले असल्याचे माझ्या कानी आले आहे. त्या सरोवरात राहात असलेल्या 'मंथरक' नावाच्या कासवाची व माझी दाट मैत्री असल्याने व तिकडे गेल्यास अन्नपाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने, मी त्याच्याकडे जायचे ठरविले अहे.'

एक दीर्घ उसासा सोडून हिरण्यक म्हणाला, 'मित्रा, सध्या तू मला कारण विचारू नकोस, पण मलाही या जागेचा उबग आला आहे. तुझ्यासंगे त्या परदेशी आल्यावर मला जर तिथे मानाने जगता येण्याची शक्यता असली तर मीही तुझ्याबरोबर तिकडे आलो असतो.'

लघुपतनक म्हणाला, 'मित्रा, अरे तूही मजसंगे तिकडे यावेस, या उद्देशाने तर मी तुला ही गोष्ट सांगायला आलो. त्यातून तुझ्यासारख्या विद्वावानाला व गुणवंताला तिकडे मानाने जगण्यात अडचण ती काय? म्हटलेच आहे ना -

*विद्वत्त्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन ।*
*स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥*

**(विद्वत्ता व राजेपण यांची बरोबरी कधीच करता येत नाही. राजाला केवळ त्याच्याच देशात मान मान मिळतो, पण विद्वान् हा सर्वत्र सन्मानिला जातो.)**

याप्रमाणे बोलणे झाल्यावर हिरण्यक उंदराला पाठीवर घेऊन, तो लघुपतनक कावळा दूरच्या सरोवरात राहणाऱ्या आपल्या मित्राकडे - मंथरक कासवाकडे -उडत गेला.

ते दोघे तिथे जाताच, मंथरकाने त्यांचे मोठ्या प्रेमादराने स्वागत केले व हे पाहुणे कोण व यांना तू पाठीवरून का आणलेस, असे लघुपतनकाला विचारले.

लघुपतनक म्हणाला, 'मित्रा मंथरका, या माझ्या मित्राचं नाव आहे हिरण्यक. मी या माझ्या मित्राला पाठीवरून नव्हे, तर डोक्यावरून घेऊन यायला हवे होते? इतका हा गुणी व ज्ञानी आहे. अरे, याच्या गुणांबद्दल मी काय व किती म्हणून सांगू? एक वेळ पर्जन्यधारा किंवा आकाशातल्या ताऱ्यांची गणती करता येईल, पण या माझ्या मित्राच्या ठिकाणी असलेल्या गुणांची मोजदाद करता येणार नाही. स्वदेशात राहायचा उबग आला, म्हणूनच केवळ हा माझ्यासंगे इकडे आला.'

'या माझ्या नव्या थोर मित्राला स्वदेशात राहण्याचा उबग का बरे आला?' असा प्रश्न मंथरकाने केला व लघुपतनकानेही आग्रह केला म्हणून हिरण्यक त्यांना ती गोष्ट सांगू लागला-

# गोष्ट पंचवीसावी

## धनाच्या उबेचा प्रभाव मोठा, प्राण्याला चढे भलताच ताठा.

'दक्षिणेकडील' महिलारोप्य नावाच्या नगराबाहेर असलेल्या श्रीमहादेवाच्या मंदिरात 'ताम्रचूड' नावाचा एक जोगी राहात असे. दिवसा गावात भिक्षा मागून जमविलेले धान्य रात्री शिजवून, त्यातले आपल्याला आवश्यक तेवढे तो खाई आणि उरलेले अन्न तो भिक्षापात्रात झाकून ठेवी. मग दुसऱ्या दिवशी सकाळी, ते अन्न, तो एकदोघा गरिबांना देई आणि त्या अन्नाच्या बदल्यात तो त्यांच्याकडून त्या देवळाची झाडलोट व सडासारवण करून घेई.'

आपण सांगत असलेली हकीकत लघुपतनक व मंथरक हे लक्ष देऊन ऐकत असल्याचे पाहून हिरण्यक पुढे म्हणाला, 'एके दिवशी माझे चार-पाच अनुयायी व सेवक माझ्याकडे आले व मला म्हणाले, 'महाराज, देवळातला बैरागी रात्री जे अन्न शिजवतो, त्यातले स्वतःला आवश्यक तेवढे खाऊन, बाकीचे अन्न तो एका भांड्यात घालून ते भांडे आम्हा उंदरांच्या भयाने भिंतीतील एका उंच खुंटीवर टांगून ठेवतो. आम्हाला तेवढी उंच उडी मारून त्या भांड्यातले अन्न खाता येणे शक्य नाही. पण आपल्याला तशी उडी मारता येणे सहज शक्य आहे. तसे झाले, तर आपणा सगळ्यांनाच अन्नासाठी इकडे तिकडे फिरावे न लागता, एकाच जागी पोटीपोटभर व ताजे अन्न मिळेल.'

त्यांची ही विनंती ऐकून मी रात्री त्या देवळात गेलो व एका उडीसरशी त्या खुंटीवर टांगलेल्या भांड्यावर जाऊन बसलो. मग मी अगोदर त्या भांड्यातले अन्न माझ्या सेवकसहाय्यकांसाठी खाली टाकले आणि त्यांचे पोटीपोटभर खाऊन झाल्यावर भांड्यात उरलेले मी खाल्ले. त्यानंतर हा आमचा रोजचा रात्रक्रम सुरू झाला. थोड्याच दिवसांनी तो जोगी रात्री अंथरूणात पडल्यावर, हाती एक बांबूची पिचलेली काठी घेऊन, अधुनमधून ती त्या खुंटीखालच्या जमिनीवर आपटू लागला. पण मी असल्या धाकाला भीक घालणारा नव्हतो. मधूनच जेव्हा डुलकी लागून तो जोगी घोरू लागे, तेव्हा मी तेवढ्या अवधीत त्या खुंटीवर टांगलेल्या भांड्यातले अन्न लुटू लागे.

असे होता होता एके दिवशी संध्याकाळी बृहत्स्फिक नावाचा दुसरा एक जोगी त्या मंदिरात आला. तो ताम्रचूडाचा परममित्र होता. रात्री जेवण झाल्यावर तो पाहुणा गप्पा मारू लागला असता, ताम्रचूड - एकीकडे त्याचे बोलणे ऐकता ऐकता दुसरीकडे - आपल्या हातातील काठी अधुनमधून त्या खुंटीखालच्या जमिनीवर आपटू लागला.

त्याच्या अशा वागण्याचा अतिशय राग येऊन तो पाहुणा त्याला म्हणाला, 'ताम्रचूडा, मी तुझ्याशी बोलत असताना तू अशी काठी का आपटत राहिला आहेस? तुला माझे बोलणे ऐकण्यात गोडी वाटत नाही का? मी तुझ्याकडे आलो, हाच मोठा मूर्खपणा केला! कारण म्हटलेच आहे -***गृही यत्रागतं दृष्ट्वा दिशो वीक्षेत वाप्यथः ।***

a

*तत्र ये सदने यान्ति ते श्रृङ्गरहिता वृषाः ॥*

**(ज्या घरी पाहुणे आले असता त्या घरची माणसे इतरत्र किंवा खाली बघत राहतात, अशा घरी जाणारे हे जणू शिंगे नसलेले बैलच असतात. )** त्याचप्रमाणे

*नाभ्युत्थानक्रिया यत्र नालापा मधुराक्षराः ।*

*गुणदोषकथा नैव तत्र हर्म्ये न गम्यते ॥*

**(जिथे पाहुणे आले असता उठून स्वागत होत नाही, गोड शब्द ऐकू येत नाहीत किंवा बऱ्यावाईट गोष्टी मोकळेपणाने बोलल्या जात नाहीत, अशा घरी जाऊ नये.)**

रागावलेला पाहुणा पुढे म्हणाला, 'ताम्रचूडा! राहण्यासाठी एक मठवजा देऊळ मिळाले म्हणून या तुझ्या मित्राला तुच्छतेनं वागवण्याइतका तू शेफारून गेलास का? पण मठात राहिल्याने स्वर्गाचा नव्हे, तर नरकाचा मार्ग सुलभ होत असतो, हे तू लक्षात ठेव. एका गुरूनेच आपल्या शिष्याला सांगितलं, 'वत्सा-

*नरकाय मतिस्ते चेत् पौरोहित्यं समाचर ।*

*वर्षं यावत् किमन्येन मठचिन्तां दिनत्रयम् ॥*

**(आपण नरकाला जावं, असं जर तुला वाटत असेल, तर तू एक वर्षभर पुरोहिताचं काम कर, किंवा केवळ तीन दिवस एखाद्या मठाची उठाठेव कर. )**

आपल्या पाहुण्या मित्राला क्षणभर थांबवून ताम्रचूडाने आपण काठी का आपटत होतो याबद्दल खुलासा केला. तेव्हा पाहुण्याने विचारले, 'काय रे, मांजरापेक्षा किंवा माकडापेक्षाही उंच उडी मारणाऱ्या त्या उंदराचे बीळ एखाद्या पुरलेल्या धनाच्या साठ्यालगत आहे का? कारण धनाची ऊब असल्याशिवाय त्या उंदराला एवढी मस्ती चढणार नाही.

म्हटलंच आहे -

*ऊष्मापि वित्तजो वृद्धिं तेजो नयति देहिनाम् ।*

*किं पुनस्तस्य सम्भोगस्त्यागकर्मसमन्वितः ।*

**(संपत्तीच्या उबेमुळेच प्राण्याच्या अंगी मस्ती चढते. त्यातून तिचा उपभोग घेतला किंवा तिचे दान केले की, मग तर विचारण्याची सोयच उरत नाही.)**

पाहुणा जोगी पुढं म्हणाला, 'शिवाय ज्या अर्थी तो उंदरडा केवळ अन्नासाठी एवढं धाडस करतोय, त्या अर्थी त्यामागे त्याचा काहीतरी खास हेतु असण्याचीही शक्यता आहे. अरे ताम्रचूडा, ती शांडिलीबाई दुसऱ्याकडल्या साध्या तिळांच्या बदल्यात, त्याला जे स्वतःकडले सोललेले तीळ द्यायला तयार झाली, तो त्यामागे तिचा काही उद्देश होता म्हणूनच ना?'

'त्या शांडिलीबाईची गोष्ट काय आहे?' असा प्रश्न ताम्रचूडाने केला असता पाहुणा जोगी बृहत्स्फिक म्हणाला, 'शांतपणे ऐक-

a

# गोष्ट सव्विसावी

## जो मनुष्य दुसऱ्यासाठी त्याग करतो, त्याच्याच जगण्याला अर्थ असतो.

एकदा मी एका व्रताच्या पालनासाठी एका गावातील गरीब ब्राह्मणाच्या घरी राहात असता, एके दिवशी पहाटे तो ब्राह्मण व त्याची बायको यांच्यात चाललेला संवाद माझ्या कानी पडू लागला -

ब्राह्मण म्हणाला, 'आज संक्रांतीनिमित्त मी दान घेण्यासाठी बाहेरगावी जात आहे. तूही आज एखाद्या गरीब ब्राह्मणाला घरी जेवायला बोलावून त्याला काहीतरी दान दे.'

ब्राह्मणी भडकून म्हणाली, लग्न झाल्यापासून मला चांगले दागदागिने व उंची वस्त्रे तर सोडाच, पण सुग्रास अन्नही कधी खायला मिळालं नाही आणि त्या ब्राह्मणाला काय खायला घालू, तुमचं कपाळ?'

ब्राह्मण शांतपणे म्हणाला, 'कांते, अगं धन हे इच्छेनुसार का प्राप्त होत असतं? नाही ना! तेव्हा आपल्याला जे मिळेल, त्यात समाधान मानावे आणि कुवतीप्रमाणे दान करावे. एखाद्या धनिकाने भरपूर धनाचे दान केले आणि एखाद्या गरीबाने जरी एका कवडीचे दान केले, तरी दोघांच्या पदरात पुण्य सारखेच पडते. शास्त्र तर असं सांगतं -

*दाता लघुरपि सेव्यो भवति न कृपणो महानपि समृद्ध्या ।*
*कूपोऽन्तः स्वादुजलः प्रीत्यै लोकस्य न समुद्रः ॥*

a

**( दाता हा जरी क्षुल्लक असला तरी तो सेवेला पात्र होतो आणि कृपण हा जरी कितीही श्रीमंत असला, तरी तो सेवेला पात्र होत नाही. [अथांग जलसंपत्ती असलेला] सागर नव्हे, तर गोड्या पाण्याची छोटी विहीरच लोकांच्या प्रेमाला पात्र होते.)**

'कांते, संपत्ती ही सावलीसारखी बेभरंवशाची असते. ती कधी असते, तर कधी नाहीशी होते. पण दानापासून मिळणारे पुण्य चिरकाल साथ देते. मात्र ते दान सारासार विचाराने करायला हवे. म्हटलेच आहे -

*सत्पात्रं महती श्रद्धा देशे काले यथोचिते ।*

*यद्दीयते विवेकज्ञैस्तदनन्ताय कल्पते ।*

**(योग्य स्थळ व काळ विचारात घेऊन, सत्पात्र व्यक्तीला विवेकी माणसे जे दान मोठ्या श्रद्धेने करतात, त्याचे फळ - म्हणजे पुण्य - अनंत काळपर्यंत टिकते.)**

तो ब्राह्मण पुढं म्हणाला, 'कांते, केवळ धनाचीच नव्हे, तर कुठल्याही गोष्टीची हाव, जीवन जगता येण्यापुरत्या मर्यादेत हवी. तिचा अतिरेक झाला, की त्या कोल्ह्याच्या मस्तकातून जसे धनुष्याचे टोक शेंडीसारखे बाहेर आले, तशी प्राण्याची गत होते.'

'ती गोष्ट काय आहे?' अशी विचारणा त्या ब्राह्मणीने केली असता ब्राह्मण म्हणाला, 'त्याचं असं झालं-

a

# गोष्ट सत्ताविसावी

## हावेला तृप्ती ठाऊक नाही, शमवू पाहता ती वाढतच जाई.

एका गावात एक भिल्ल राहात होता. वन्य प्राण्यांच्या शिकारीवर तो आपले पोट भरी. एकदा त्याने नेम धरून सोडलेला बाण एका रानडुकराच्या जिव्हारी लागला. पण तशाही परिस्थितीत सूडाच्या भावनेने ते डुक्कर त्याच्या अंगावर धावून गेले व त्याने आपल्या सुळ्याने त्या भिल्लाचे पोट फाडले. त्यामुळे त्या भिल्लाला तर प्राणांना मुकावे लागले, परंतु लगेच त्याच्याजवळ ते डुक्करही थोडावेळ तडफडून मृत्यू पावले.

काही वेळाने तिथून एक कोल्हा चालला असता त्याला ते दोन मृत देह दिसले. ते पाहून तो स्वतःशीच म्हणाला, 'वा! दैव ही किती अजब चीज आहे. कधी प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही पदरात माती पडते. तर कधी जराही प्रयत्न केले नसताना हाती घबाड येते! आता हे दोन मृत देह मी एकटा बरेच दिवस अगदी पुरवून पुरवून खाईन. त्या दृष्टीने आज फक्त या भिल्लाच्या बाणाच्या टोकाला अडकून राहिलेल्या डुकराच्या मांसखंडावर मी माझी भूक भागवीन.' असे म्हणून त्या लोभी कोल्ह्याने पटकन त्या बाणाचे अणकुचीदार टोक आपल्या तोंडात घातले. त्याबरोबर ते त्याच्या एकदम तोंडात घुसून डोक्यातून शेंडीसारखे बाहेर आले. अति हावेपायी तो कोल्हाही तिथे मरून पडला. म्हणून कुठल्याही गोष्टीची अति हाव धरू नये.'

ब्राह्मणाने ही गोष्ट सांगताच त्याची बायको शांडिली त्याला म्हणाली, 'नाथ, तुमचे म्हणणे मला पटले. घरात तीळ आहेत ते मी अगोदर गरम पाण्यात धुवून स्वच्छ करते व वाळवते आणि मग एखाद्या ब्राह्मणाला जेवायला बोलावून त्याला ते दान म्हणून देते. तुम्ही निश्चिंतपणे बाहेरगावी जा.'

मग तो ब्राह्मण घरातून निघून जाताच, शांडिलीने घरातले तीळ धुवून स्वच्छ केले व पुढल्या अंगणात वाळत घातले. पण ते तीळ वाळत असता, जवळून जाणारे एक खट्याळ कुत्रे नेमके त्या तिळांवर मुतले व निघून गेले! ते पाहून शांडिली चरफडत स्वतःशी म्हणाली, 'या मेल्या खोडसाळ कुतरड्याला मुतायला भूलोकावर दुसरी जागाच सापडली नाही का? आता काही या तिळांचे दान करता येणार नाही. तेव्हा हे पुन्हा धुवून व वाळवून गावातल्या एखाद्या भोळसर बाईला साध्या तिळांच्या बदली द्यावेत.' मनाशी असे ठरवून ती ते तीळ धुवून व वाळवून झाल्यानंतर एका घरी गेली व त्या घरातल्या बाईला भेटली.'

'साध्या तिळांच्या बदल्यात शांडिली चांगले धुवून स्वच्छ केलेले तीळ देते, 'या विचाराने त्या घरातली बाई घरचे साधे तीळ घेऊन बाहेर आली. पण तेवढ्यात तिचा मुलगा तिला म्हणाला, 'आई ज्या अर्थी शांडिलीकाकू तिच्याकडले धुवून साल काढून स्वच्छ केलेले तीळ आपल्याकडल्या साध्या तिळांच्या बदल्यात द्यायला तयार झाली आहे, त्या अर्थी तिच्या तिळांत नक्की काहीतरी दोष आहे.' मुलाचे हे म्हणणे

पटल्यामुळे ती बाई - आणलेल्या साध्या तिळांसह - तशीच घरात परत गेली.

महादेवाच्या मंदिरातील ताम्रचूडाच्या मित्राने त्याला ही गोष्ट सांगून विचारले, 'काय रे, तो शक्तिशाली उंदीर कुठल्या वाटेने त्याच्या बिळाकडे जातो हे तुला ठाऊक आहे का?' ताम्रचूडाने होकारार्थी मान हलवताच त्याचा मित्र म्हणाला, 'तर मग तू कुदळ तयार ठेव. उद्या उजाडताच आपण त्याच्या बिळाचा शोध घेऊ आणि ते खणून नाहीसे करू.'



आपल्या जीवनातील दुःखद घटना इथवर सांगितल्यावर हिरण्यकाने मध्येच एक दीर्घ उसासा सोडला व मग तो आपले मित्र लघुपतनक व मंथरक यांना म्हणाला, 'मित्रांनो, त्या पाहुण्या जोग्याच्या तोंडचे हे शब्द ऐकून माझे अवसान पार गळून गेले. हा पाहुणा आता आपला 'किल्ला'

a

खणून काढणार, आपला धनधान्याचा साठा उद्‍ध्वस्त करणार आणि आपल्यालाही ठार करणार या विचाराने मी माझ्या अनुयायांसह एखाद्या सुरक्षित स्थळी जाता यावे या हेतूने वेगळया वाटेने जाऊ लागलो. तेवढ्यात एका गलेलठ्ठ बोक्याने आम्हाला वाटेत गाठले व आमच्यापैकी दोघातिघांना ठार केले, तर काहींना जखमी केले.

'जखमी झालेले उंदीर, मी त्यांना नको त्या वाटेने नेऊन संकटात लोटल्याबद्दल मला शिव्या देत देत, आपापल्या बिळांकडे निघून गेले पण त्यांच्या जखमांतून वाटेत पडलेल्या रक्ताच्या थेंबांवरून मागोवा घेत घेत, दुसऱ्या दिवशी सकाळी ताम्रचूड व त्याचा पाहुणा माझ्या किल्ल्यापर्यंत गेले आणि त्यांनी माझे घर व त्यातील धनधान्याचे साठे कुदळीने खणून पार उद्‍ध्वस्त केले. ते दृश्य जेव्हा मी दुरून लपून पाहिले, तेव्हा माझ्यावर जणु दुःखाचे आकाशच कोसळले.

'ताम्रचूड व त्याचा मित्र हे जेव्हा माझ्या वैभवशाली किल्ल्याची स्थिती एखाद्या उजाड स्मशानाप्रमाणे करुन निघून गेले, तेव्हा मीही कुठेतरी दूर पळून गेलो असणार, अशा समजुतीने माझे बहुतांश अनुयायी, आता या कफल्लक हिरण्यकाजवळ राहण्यात काय अर्थ आहे - असे एकमेकांपाशी म्हणत व माझी निंदानालस्ती करीत, माझ्या एका शत्रूला जाऊन मिळाले.

'मित्रांनो, तरीही मी धीर सोडला नाही. मी पुन्हा पूर्वीप्रमाणे त्या देवळात जाऊन खुंटीवरचे धान्य फस्त करण्याचे ठरविले व त्या गोसाव्यांची चीजवस्तू नासाडून त्यांना धडा शिकविण्याचे ठरविले. पण देवळात जाऊन

त्या अन्नाची हंडी टांगलेल्या खुंटीवर उडी घेण्याचा प्रयत्न केला असता, माझी उडी तिथवर पोहोचेना. 'आता काय करायचं?' याचा मी विचार करू लागलो. ताम्रचूडाशी बोलत असलेल्या त्या पाहुण्या गोसाव्याचे शब्द माझ्या कानी पडले. तो ताम्रचूडाला म्हणत होता, 'मित्रा, संपत्तीची ऊब नाहीशी होताच, त्या शक्तिशाली उंदराची मस्ती मी म्हटल्याप्रमाणे जिरली ना? आता तो त्या खुंटीवरचं अन्न खायला यायचा बंद झाला. ज्याच्यावर लक्ष्मीचा कोप होतो, तो पुरुष या व्यवहारी जगात कवडीमोलाचा ठरतो, म्हटलंच आहे ना?-

*दंष्ट्राविरहितः सर्पो मदहीनो यथा गजः ।*
*तथार्थेन विहीनोऽत्र पुरुषो नामधारकः ॥*

**(जसा दात काढलेला सर्प किंवा मदहीन हत्ती असतो, तसाच जवळ पैसा नसलेला पुरुष हा केवळ या जगात नावाला पुरुष असतो.)**

याप्रमाणे तो पाहूणा बैरागी ताम्रचूडाशी बोलत असतानाच त्याचे लक्ष माझ्याकडे गेले. लगेच हाती काठी घेऊन त्याने माझा पाठलाग सुरू केला व त्याने हातातल्या काठीचा एक फटकाराही मला मारला. पण केवळ माझ्या आयुष्याची दोरी बळकट, म्हणून मी त्यातून कसाबसा वाचलो व त्यानंतर दुसरा किल्ला उभारून त्यात राहू लागलो. अश दुःखमय स्थितीत दिवस कंठीत असता, माझी व लघुपतनका, तुझी मैत्री जुळून आली. मला

तो नवा आधार वाटू लागला. तरीही जिथे मी वैभवात दिवस काढले, तिथे दीनवाण्या स्थितीत राहणे अयोग्य वाटल्याने, लघुपतनका, तू इकडे येण्याचे ठरविताच, मीही तुझ्यासंगे या परक्या देशात आलो.'

हिरण्यकाची ती करुण कहाणी ऐकून झाल्यावर मंथरक त्याला म्हणाला, 'मित्रा, बुद्धिवंतांना व गुणवंतांना कुठलाच देश परका नसतो. ते जिथे जातात, तो देश त्यांना आपले मानतो. तेव्हा तू इतःपर दुःख न मानता, इथे सुखात राहा.'

हिरण्यक म्हणाला, 'नाही मित्रांनो, मी भूतकाळातल्या दुःखांचे कोळसे उगाळत बसणारा नाही. माझे आता असे मत झाले आहे की, जे माझे आहे, ते कुणी हिरावून नेऊ शकत नाही. आणि जे माझे नाही ते - समजा योगायोगाने काही काळापुरते मजपाशी आले, तरी ते - फार काळ माझ्याजवळ राहू शकत नाही. त्या सागरदत्ताच्या मुलाची गोष्ट माझ्या या विधानाला पुष्टीच देणारी आहे.'

'ती गोष्ट काय आहे?' अशी पृच्छा मंथरक व लघुपतनक या दोघांनीही मोठ्या उत्कंठेने केली असता हिरण्यक सांगू लागला -

# गोष्ट अठ्ठावीसावी

## ज्याचे जे असे, त्याच्यापाशीच ते वसे.

एका गावी सागरदत्त नावाचा एक कंजूष वाणी राहात होता. त्याच्या बुद्धिवान् व वाचनाची आवड असलेल्या मुलाने एक मौल्यवान ग्रंथ बरीच किंमत मोजून विकत घेतला. त्या वाण्याला ही गोष्ट कळताच तो त्याच्यावर भडकून म्हणाला, 'घरबुडव्या! ग्रंथासाठी एवढा पैसा खर्च करायचा? चालता हो घरातून. घरातून बाहेर हाकलून दिल्यावर तुझ्यावर रस्तोरस्ती फिरून भीक मागण्याची पाळी येणार आहे, हे लक्षात ठेव.'

मुलगा म्हणाला, 'बाबा, तुमची आज्ञाच आहे, तर मी घरातून जातो. पण तुम्ही म्हणता तशी, मला भीकच मागावी लागेल असे मात्र नाही. कुणी सांगावं? एखाद् वेळी रस्त्याच्या बाजूला बसून लोकांकडून भिक्षेचा स्वीकार करण्याऐवजी मी सिंहासनावर बसून लोकांकडून येणारे नजराणेसुद्धा स्वीकारीन. कारण ज्याला जे मिळायचे असते ते त्याला मिळतेच मिळते.' असे म्हणून तो मुलगा घराबाहेर पडला.

मग भटकत भटकत तो एका नगरात गेला. कुणी त्याला 'तू कुठून आलास?' असे विचारले की तो 'प्राक्तनपुराहून' असे उत्तर देई. कुणी त्याला 'तुझं नाव काय?' असा सवाल केला की, तो 'भाग्यदत्त' असा जबाब देई.

a

एके दिवशी त्या नगरातील एका महोत्सवाला देशोदेशीचे राजे व राजकुमार आले होते. त्या नगरात राहणारी चंद्रावती नावाची तरुण व सुस्वरूप राजकन्या हीसुद्धा आपल्या एका दासीसह तो उत्सव पाहायला गेली होती. मध्येच तिचे लक्ष एका अत्यंत देखण्या व रुबाबदार राजकुमाराकडे गेले आणि 'हाच आपला पती व्हावा, ' असे तिच्या मनात आले.

तिने लगेच आपल्या दासीसंगे त्याला आपले मनोगत कळविले व भेटीसाठी गुपचूप रात्री राजवाड्यातील आपल्या महालात येण्याबद्दल विनविले. राजवाड्याच्या दर्शनी बाजूला शिपायाचा खडा पहारा असल्याने, वाड्याच्या उजव्या कुशीकडील पहिल्या मजल्यावरच्या महालाच्या खिडकीतून खाली एक जाड दोरखंड सोडले जाईल व त्याच्या आधारानेच चंद्रावतीदेवींच्या महालात जाता येईल, असेही त्या दासीने त्या राजकुमाराला सांगितले. ही राजकन्या आपल्याला अगदी हवी तशीच आहे, असा विचार करून, त्या राजकुमारानेही तिच्याकडे येण्याचे मान्य केले. परंतु रात्री प्रत्यक्ष त्या राजकन्येकडे जाण्याची वेळ झाली असता, तो स्वतःशी म्हणाला, 'चंद्रावतीचा पिता हा सम्राट असून, आपला पिता हा त्याचा मांडलिक आहे. मग एका अर्थी तिचा पिता आपला स्वामी असताना आणि गुरू, मित्र, स्वामी किंवा सेवक यांच्या घरातील स्त्रियांकडे पापदृष्टीने पाहाणे हे धर्माविरुद्ध असताना, चंद्रावतीकडे जाणे अयोग्य आहे का?'

मनात असा विचार येताच, त्या राजकुमाराने तिच्याकडे जाण्याचा बेत रद्द केला.

योगायोगाने त्याच रात्री भाग्यदत्त हा वाड्यावरून चालला होता. त्याने त्या वाड्याच्या पहिल्या मजल्यावरच्या खिडकीतून खाली लोंबत असलेला दोरखंड पाहिला. तो मनात म्हणाला, 'ज्या अर्थी हा दोरखंड मुद्दाम खाली सोडला आहे, त्या अर्थी तो तसा मुद्दाम लोंबत ठेवण्याचा राजाचा काहीतरी हेतु असावा, हे स्पष्ट आहे. आपण चढून वर जायला काय हरकत आहे?' असे म्हणून तो राजाचा हेतु जाणून घेण्यासाठी त्या दोराच्या आधारे वर चढला आणि राजकन्येच्या महालात शिरला.

'आपला प्रियकरच आला आहे,' अशा समजुतीने चंद्रावतीने त्याचे अत्यानंदाने स्वागत केले. पण नंतर 'हा तो नव्हे' हे तिला उमजून आले. परंतु त्याच्या वागण्याने व बोलण्याने ती प्रभावित झाली. तिने त्याची माहिती काढली. 'आपल्याला हा तरुण, पती म्हणून आवडत असला, तरी हा एका साध्या वाण्याचा मुलगा असल्याने आपले वडील व विवाहाला मान्यता देणार नाहीत,' असे तिला वाटले. म्हणून तिने त्याला त्याच दोरीच्या आधारे निघून जाण्याची विनंती केली.

त्या महालातून खाली उतरल्यावर भाग्यदत्ताने ती उरलेली सर्व रात्र एका धर्मशाळेत घालविली आणि सकाळ होताच, भराभर प्रातर्विधी उरकून पुन्हा त्या नगरीतून फिरायला सुरुवात केली.

फिरता फिरता भाग्यदत्ताला, शृंगारलेल्या हत्तीवर बसलेला 'वरकीर्ती' नावाचा एक नवरदेव वऱ्हाडी मंडळींसह वधूपक्षाच्या वाड्याकडे चाललेला दिसला. तेवढ्यात एकाएकी काय झाले न कळे - तो हत्ती पिसाळला व चीत्कारत धावू लागला. त्याच्यावर बसलेल्या नवरदेवाने कशीबशी उडी मारून दूर पळ काढला. वऱ्हाडीमंडळींचीही पळापळ झाली. माहूत तर कुठल्याकुठे फेकला गेला! भाग्यदत्त मात्र त्या हत्तीला आवरण्यासाठी त्याच्यापाठोपाठ धावू लागला.

योगायोगाने तो हत्ती रस्त्यालगत असलेल्या वधूपक्षाकडील मंडपाच्या प्रवेशद्वारापाशी गेला. तिथे नवरीमुलगी हाती पुष्पमाला घेऊन वराची वाट पाहात उभी होती. आता हा हत्ती तिला तुडवून मंडपात घुसणार, असे पाहून भाग्यदत्त एकदम त्या हत्तीच्या समोर उभा राहिला व ओरडून त्याला म्हणाला, 'हे गजश्रेष्ठा! अरे सर्व पशूंमध्ये तू बुद्धिमान् ना? मग तुला या नवऱ्यामुलीला तुडवून, या मंडपात चालू असलेल्या मंगलाचे अमंगल करणे पसंत पडेल का? नाही ना? मग शांत हो.' आणि काय चमत्कार! भाग्यदत्ताचे हे शब्द ऐकून हत्ती एकदम स्तब्ध उभा राहिला! आणि दुसऱ्याच क्षणी त्या नवरीने आपला प्राणरक्षक म्हणून भाग्यदत्ताच्या गळयात तो पुष्पहार घातला.

तिच्या पित्याला तिची ही कृती योग्यच वाटली व त्याने मंडपातल्या भटजींना वराच्या आसनावर भाग्यदत्ताला बसवून विवाहविधी सुरू करण्याची सूचना केली. पण तेवढ्यात सैरावैरा पळून गेलेला नवरदेव व

a

त्याची वऱ्हाडी मंडळी मंडपात आली व नवऱ्यामुलीचे लग्न दुसऱ्याच कुठल्या तरुणाशी होत असल्याचे पाहून वधूपित्याशी कडाडून भांडू लागली.

त्याच वेळी त्या रस्त्याने राजकन्या चंद्रावतीसह राजा व राणी रथातून देवदर्शनाला चालली होती. मांडवात चाललेला गदारोळ ऐकून राजाने सारथ्याला रथ थांबवायला सांगून, घडलेला प्रकार समजून घेतला, व तो संबंधितांना म्हणाला, 'या मुलीचे लग्न जरी वरकीर्तीशी ठरले असले, तरी हिला भाग्यदत्ताने वाचविले आहे व शिवाय हिच्याही मनात त्याच्याशीच लग्न करायचे आहे, तेव्हा हिच्या इच्छेला मान द्यायलाच हवा.'

पित्याने याप्रमाणे निर्णय देताच, त्याच वेळी मागे येऊन उभी राहिलेली चंद्रावती पुढे झाली आणि आदल्या रात्री घडलेली हकीगत पित्याच्या कानात सांगून नंतर उघड म्हणाली, 'पिताश्री, लग्नाच्या बाबतीत मुलीच्या इच्छेला मान द्यायलाच हवा, असं तुम्हीच नुकतेच म्हणालात ना? मग या नवऱ्यामुलीच्या अगोदर मी या भाग्यवंतांना मनाने वरले असल्याने, खरे तर तिच्याऐवजी माझेच लग्न त्यांच्याशी झाले पाहिजे.'

राजा म्हणाला, 'ठीक आहे. भाग्यदत्ताचं लग्न दोघींशीही होईल. मला मुलगा नसल्याने, माझ्या पश्चात् तोच या राज्याचा राजा होईल आणि तुम्ही दोघीही त्याच्या राण्या व्हाल व सुखाने नांदाल.' आणि खरोखरच तसे झाले. मग राजा झाल्यावर भाग्यदत्ताने आपल्या आईवडिलांनाही आपल्याजवळ रहायला आणले व त्यांचे पुढले जीवन अतिशय सुखाचे झाले.'

ही गोष्ट मंथरक व लघुपतनक यांना सांगून हिरण्यक म्हणाला, 'मित्रांनो, एकतर 'माझ्या नशिबात जे असेल ते मला मिळेलच मिळेल' यावर माझा विश्वास आहे आणि दुसरे म्हणजे तुमच्यासारख्या मित्रांचे सहाय्य मला लाभले आहे, मग मला निराश होण्याचे काय कारण?

मंथरक म्हणाला, 'हिरण्यका, अरे आम्ही तुला काय सहाय्य करणार? खरं तर तुझ्यासारखा विचार व ज्ञानी मित्र आम्हाला मिळाला म्हणून आम्हालाच मोठा आधार वाटू लागला आहे. कारण खऱ्या मित्राविषयी असं म्हटलं जातं ना?-

*आपत्काले तु सम्प्राप्ते यन्मित्रं मित्रमेव तत् ।*

*वृद्धिकाले तु सम्प्राप्ते दुर्जनोऽपि सुहृद् भवेत् ॥*

**(संकटाच्या वेळी जो मित्र म्हणून टिकून राहतो, तोच खरा मित्र. भरभराटीच्या काळात काय, एखादा दुष्टसुद्धा मित्र होऊ शकतो.)**

मंथरक पुढे बोलू लागला, 'हिरण्यका, तुझ्यासारख्याला मी काय शिकवावे? तरीही एक गोष्ट तुला सांगतो की, संपत्ती किंवा वैभव यांना लोक देतात तेवढे महत्त्व जीवनात नक्कीच नाही. म्हटलंच आहे ना?-

*अभ्रच्छाया खलप्रीतिः सिद्धमन्नं च योषितः ।*

*किंचित् कालोपभोग्यानि यौवनानि धनानि च ॥*

a

**(ढगाची सावली, दुर्जनाचे प्रेम, शिजवलेले अन्न, तरुण स्त्रिया, त्याचप्रमाणे तारुण्य व संपत्ती यांच्यापासून फार थोडा वेळ आनंद घेता येतो.)**

मंथरक पुढे म्हणाला, 'त्यातून संपत्ती ही तर तशी फारच त्रासदायक आहे. ती मिळवताना, खर्च करताना, तिचे रक्षण करताना, अशा प्रत्येक वेळी वाट्याला यातनाच येतात. इतकेही करून समजा ती वाट्याला आली, तरी तिचा उपभोग घेण्याची व तिचे दान करण्याची अक्कल हवी ना? नाहीतर नुसता धनाचा साठा करून पदरात काय पडणार आहे? म्हणून तर त्या सोमिलिक कोष्ट्याने देवापाशी 'तू मला संपत्तीचा उपभोग घेणारा स्वामी कर' असा वर मागितला ना?'

'ती गोष्ट काय आहे?' असे लघुपतनक व हिरण्यक या दोघांनाही विचारले असता मंथरक म्हणाला, 'ऐका-



# गोष्ट एकोणतीसावी

## धनिक कंजूष का असेना, लोक तुकविती त्याच्यापुढे माना.

एका गावात सोमिलक नावाचा एक कोष्टी राहात होता. वस्त्रे विणण्यात तो अत्यंत कुशल असूनही, गावात त्याचे व त्याच्या कुटुंबाचे पोट भरेना. म्हणून त्याने नशीब काढण्यासाठी एखाद्या मोठ्या शहरात जाण्याचे ठरविले. त्याचा तो बेत कळताच त्याची बायको त्याला म्हणाली, 'धनी, आपल्या दैवातच जर धन नसेल, तर दुसऱ्या गावी जाऊन तरी ते कसे मिळणार? म्हटलेच आहे ना -

*यथा धेनुसहस्त्रेषु वत्सो विन्दति मातरम् ।*

*तथा पुराकृतं कर्म कर्तारमनुगच्छति ॥*

**(ज्याप्रमाणे हजारो गाई एकत्र असल्या, तरी वासरू हे नेमके त्यांतील आपल्या आईला ओळखते, त्याचप्रमाणे पूर्वजन्मीचे बरेवाईट कर्म हे त्याच्या कर्त्याच्या पाठोपाठ त्याला 'फळ द्यायला जाते.')**

यावर तो कोष्ठी म्हणाला, 'कांते, तू चुकतेस. अगं -

*यथैकेन न हस्तेन तालिका सम्प्रपद्यते ।*

*तथोद्यमपरित्यक्तं न फलं कर्मणः स्मृतम् ॥*

a

**(ज्याप्रमाणे एका हाताने टाळी वाजत नाही, त्याचप्रमाणे उद्योग केल्याशिवाय कर्माचे फळ हाती लागत नाही.)**

बायकोला याप्रमाणे उत्तर देऊन सोमिलक कोष्टी वर्धमान नावाच्या नगरीत गेला. तिथे अपार श्रम घेऊन व आपल्या वस्त्रे विणण्याच्या व्यवसायात अवघ्या दोन वर्षात तीनशे सुवर्णमोहरांची माया जमवून, तो त्या मोहरांसह आपल्या गावी जायला निघाला.

अर्धी वाट चालून होताच संध्याकाळ झाल्यामुळे, तो त्या मोहोरांच्या गाठोड्यासह एका वडाच्या झाडावर चढला व त्याच्या एका रुंदसर फांदीच्या बेचक्यावर झोपला. रात्री झोपेत असताना, त्याच्या स्वप्नात प्रयत्नराव व नशीबराव या दोन पुरुषांचा संवाद त्याला ऐकू येऊ लागला. नशीबराव प्रयत्नरावाला विचारू लागला, 'काय रे, या कोष्ट्याच्या नशिबात जेमतेम स्वतःचे कुटुंब पोसण्यापुरतेच द्रव्य असताना, तू याच्याजवळ तीनशे सुवर्णमोहरा कशा काय साठू दिल्यास?'

प्रयत्नराव म्हणाला, 'जे नशिबावर हवाला न ठेवता प्रयत्न करतात, त्यांच्या प्रयत्नाचे फळ मी त्यांच्या पदरात टाकतो. तुला वाटल्यास तू याच्या मोहरा घेऊन जा.' हे स्वप्न पडताच सोमिलक खडबडून जागा झाला. बघतो, तर जवळच्या सर्व मोहोरा नाहीशा झालेल्या. तरीही खचून न जाता, तो पुन्हा वर्धमान शहरी गेला व अथक परिश्रम घेऊन, त्याने अवघ्या एका वर्षात पाचशे सुर्वणमोहरा साठविल्या आणि पुन्हा तो त्या मोहोरांच्या

गाठोड्यासह गावी जाऊ लागला. पण काय आश्चर्य! पुन्हा तसेच स्वप्न व पुन्हा त्या मोहोरांचे गाठोडे नाहीसे झालेले.

त्या प्रकाराने अतिशय निराश झालेला तो, गळ्याला फास लावून स्वतःचा देहान्त करायला सज्ज झाला असता एक अदृश्य पुरुष त्याला म्हणाला, 'हे सोमिलका, तू कष्ट करून जगणारा आहेस! त्यामुळे तुझ्याबद्दल मला आपुलकी वाटते. तेव्हा तू अशी आत्महत्या करू नकोस. एक संपत्ती सोडून तू मजकडे दुसरा, कुठलाही शक्यतेतला वर माग. तो मी तुला देईन. तुझ्या नशिबात जर मुबलक संपत्तीचा भोग घेणे नाही, तर ती तुला कशाला हवी?'

सोमिलक म्हणाला, 'प्रभू, तरीही तू मला भरपूर धनच दे. अरे, स्वतः उपभोग न घेता, किंवा दान न करता नुसताच धनाचा साठा करून ठेवणाऱ्यालासुद्धा हे मूर्ख जग मान देते. तेव्हा तू मला भरपूर धन दिल्यावर, जरी मला याचा उपभोग घेता आला नाही, तरी लोकांकडून मान तर मिळेल ना? कुणीकडून तरी काही पदरात पडल्याशी कारण. आयुष्यभर अथक परिश्रम घ्यायचे आणि पदरात मात्र काहीच नाही पडायचे, म्हणजे सतत पंधरा वर्षे फुकट भ्रमंती करीत राहणाऱ्या त्या मूर्ख कोल्हाकोल्हीसारखी गत झाली की!'

'ती गोष्ट काय आहे?' असा प्रश्न त्या अदृश्य पुरुषाने केला असता सोमिलक म्हणाला - 'ऐक-

# गोष्ट तीसावी

## हातचे सोडून पळत्यामागे जाई,
## त्याच्यावर हातचेही गमावण्याची पाळी येई.

एका गावात 'तीक्ष्णविषाण' नावाचा एक धष्टपुष्ट बैल राहात होता. एकदा तो नदीकाठी पाणी प्यायला गेला असता, तिथे राहात असलेल्या प्रलोभक नावाच्या कोल्ह्याच्या बायकोचे लक्ष त्या बैलाच्या खाली लोंबत असलेल्या वृषणाकडे गेले. ते पाहून ती पतीला म्हणाली, 'अहो, त्या बैलाचे मांसपिंड बघा किती खालीपर्यंत लोंबताहेत! लवकरच ते तुटून जमिनीवर पडतील व आपल्याला खायला मिळतील. तेव्हा तो जिथे जाईल, तिथे आपणही जात राहू या.'

प्रलोभक कोल्हा म्हणाला, 'कांते, ते मांसपिंड त्या बैलाच्या शरीराला एकसंध असे चिकटले असताना, ते खाली कसे पडतील? तेव्हा रात्रीच्या वेळी या नदीकाठी पाणी प्यायला येणाऱ्या उंदरांना पकडून आपण आजवर जसा चरितार्थ चालविला, तसाच पुढे चालवावा हे बरे. म्हटलंच आहे ना?-

*यो ध्रुवाणि परित्यज्य अध्रुवाणि निषेवते ।*
*ध्रुवाणि तस्य नश्यन्ति अध्रुवं नष्टमेव च ॥*

a

**(जो भरंवशाच्या गोष्टी सोडून बिनभरवंशाच्या गोष्टींमागे लागतो, त्याच्या हातून जे भरवंशाचे असते ते जाते आणि बेभरंवशाची गोष्ट तर गेल्यातच जमा असते.)**

नवऱ्याचे हे बोलणे न पटून कोल्ही त्याला म्हणाली, 'तुम्ही अगदीच अल्पसंतुष्ट आहात; त्यामुळे आहे ती परिस्थितीही तुम्हाला चांगली वाटते. म्हटलंच आहे ना?-

*सुपूरा स्यात् कुनदिका सुपूरो मूषकाञ्जलिः ।*

*सुसन्तुष्टः कापुरुषः स्वल्पकेनापि तुष्यति ॥*

**(ओढ्याला थोड्याशा पावसानेही 'महापूर' येतो आणि त्या पाण्याने उंदराची ओंजळ भरून जाते. क्षुद्र पुरुष हा अशा लहानसान गोष्टींनीही संतुष्ट होऊन जातो. )**

'अहो, पुरुषाचं भाग्य केव्हा फळफळतं, हे तुम्हाला ठाऊक आहे का? नसल्यास ऐका -

*यत्रोत्साहसमारम्भो यत्रालस्यविहीनता ।*

*नयविक्रमसंयोगस्तत्र श्रीरचला ध्रुवम् ॥*

**(जिथे उत्साहाने कामाला प्रारंभ केला जातो व जिथे आळशीपणा नसतो, त्याचप्रमाणे जिथे नीती व साहस यांचा संगम झालेला असतो, तिथेच लक्ष्मीचा निरंतर वास असतो. )**

a

अविचारी बायकोच्या या बोचक बोलण्याने तो प्रलोभक कोल्हा सारासार विचार गमावून, तिच्यासह त्या बैलाच्या मागोमाग जाऊ लागला. अविचारी अशा स्त्रीच्या अधीन झालेला पुरुष, काय करायचे बाकी ठेवतो? म्हटलंच आहे ना? -

*तावत् स्यात् सर्वकृत्येषु पुरुषोऽत्र स्वयं प्रभुः ।*
*स्त्रीवाक्यांकुशविक्षुण्णो यावन्नो ह्रियते बलात् ॥*

**(जोवर स्त्रीच्या वाक्यरूपी अंकुशाने जोराने टोचला जात नाही, तोवरच पुरुष हा या जगात सर्व बाबतीत आपल्या मनाप्रमाणे वागू शकतो.)**

पण एकदा का तो तिच्या आहारी गेला की -

*अकृत्यं मन्यते कृत्यमगम्यं मन्यते सुगम् ।*
*अभक्ष्यं मन्यते भक्ष्यं स्त्रीवाक्यप्रेरितो नरः ॥*

**(अविचारी स्त्रीच्या बोलण्याने प्रेरणा मिळालेला पुरुष करू नये ते करणे योग्य मानू लागतो, जिकडे जाणे कठीण आहे तिकडे जाणे सोपे मानतो, आणि खाऊ नये ते खाण्यास योग्य आहेसे समजू लागतो.)**

अशा रीतीने अविचारी बायकोच्या पूर्णपणे आहारी गेलेला तो कोल्हा सतत पंधरा वर्षे तिच्यासह त्या बैलाच्या पाठीपाठीशी हिंडत राहिला. पण त्या बैलाची वृषणे काही खाली गळून पडली नाहीत, आणि त्यामुळे ती त्या

कोल्हाकोल्हीला खायला मिळाली नाहीत. शेवटी निराश झालेला तो कोल्हा पत्नीसह आपल्या मूळच्या राहण्याच्या ठिकाणी परत गेला.'

ही गोष्ट सांगून सोमिलक त्या अदृश्य पुरुषाला म्हणाला, 'हे पुरुषश्रेष्ठा, तेव्हा इतर कुठल्याही वराचे आमिष न दाखवता, तू मला धनवान् होण्याचाच वर दे.'

यावर तो अदृश्य पुरुष म्हणाला, 'सोमिलका, ठीक आहे. तुझी इच्छाच श्रीमंत होण्याची आहे, तर मी तुला तसा वर देईन. पण तत्पूर्वी तू पुन्हा त्या वर्धमान नगरीत जा. तिथे मृत्यु पावलेल्या एका व्यापाऱ्याचे 'गुप्तधन' व 'उपभुक्तधन' या नावाचे दोन मुलगे आपापल्या स्वतंत्र वाड्यात राहतात. त्यांचा अनुभव घेऊन तू पुन्हा याच ठिकाणी ये व तुला त्या दोन भावांपैकी कुणासारखे व्हावेसे वाटते ते तू मला सांग, म्हणजे मी तुला तसा वर देईन.' त्या अदृश्य पुरुषाच्या सांगण्यानुसार सोमिलक पुन्हा वर्धमान नगरीत गेला. त्याने प्रथम 'गुप्तधना' ची भेट घेतली व त्याच्याकडे रात्रीचे एक जेवण आणि त्याच रात्रीपुरती झोपायला जागा देण्याची विनंती केली.

कंजूष गुप्तधनाने सोमिलकाला प्रथम 'फुकट्या', 'ऐतखाऊ' अशा शिव्या देऊन हाकलून लावण्याचा प्रयत्न केला, पण सोमिलक ठाणच मांडून बसला. अखेर नाईलाज होऊन त्याने सोमिलकाला रात्रीपुरती, वाड्याच्या मागल्या उघड्या पडवीत राहण्यास परवानगी दिली व त्याच्या पुढ्यात अन्नाचे केवळ चार घास असलेली थाळी ठेवली. पण कंजूष गुप्तधन तेवढ्यावर थांबला नाही. पाहुण्याला चार घास अन्न दान करावे

a

लागले, म्हणून त्या नुकसानीची भरपाई करून घेण्यासाठी, त्याने आपल्याला चार घास कमी अन्न वाढण्याचा हुकूम अगदी सोमिलकाला ऐकू जाईल, अशा आवाजात बायकोला फर्मावला. तो प्रकार पाहून सोमिलकाला त्याच्या श्रीमंतीचा उबग आला आणि ती रात्र त्याच्याकडे कशीबशी काढून, दुसऱ्या दिवशी सकाळी तो 'उपभुक्तधना' च्या वाड्यावर गेला.

उपभुक्तधनाने सोमिलक हा एक सामान्य कोष्टी आहे, हे कळूनही त्याची राहण्या-जेवण्याची अतिशय उत्तम व्यवस्था ठेवली. गोरगरिबांना तो करीत असलेला दानधर्म पाहून सोमिलकाने त्याला विचारले, 'शेटजी, तुमचा भाऊ गुप्तधन हा तिकडे अतिशय कंजूषपणाने जगत असता, तुम्हाला हा एवढा खर्च कसा काय परवडतो?'

उपभुक्तधन म्हणाला, 'जो दुसऱ्यांना मदत करीत राहतो, त्याला देवसुद्धा कुठल्या ना कुठल्या तऱ्हेने मदत करतो. या देशाचे राजे परममित्र आहेत. ते मला अधुनमधून भरघोस सहाय्य करतात.' उपभुक्तधन ही गोष्ट सांगत असतानाच राजसेवक रथातून आले, आणि उपभुक्तधनाला राजाकडील भेट म्हणून सुवर्णमोहरांनी भरलेली परात देऊन गेले. ते दृश्य पाहून संतुष्ट झालेल्या सोमिलकाने 'आपणही उपभुक्तधनाप्रमाणेच संपत्तीचा उपभोग घेणारे व दान करणारे व्हावे,' असे मनाशी ठरविले. मग उपभुक्तधनाप्रमाणेच संपत्तीचा उपभोग घेणारे व दान करणारे व्हावे, 'असे मनाशी ठरविले. मग उपभुक्तधनाचा निरोप घेऊन तो आपल्या गावाच्या

रस्त्याला लागला व वाटेत त्या 'अदृश्या पुरुषा' ची भेट झाल्यावर त्याने त्याच्याकडे तसाच वर मागितला.'

या गोष्टी सांगून मंथरक हिरण्यकाला म्हणाला, 'मित्रा, तू धनधान्याचा साठा करण्यामागे लागलास, म्हणून तुझ्यावर हा प्रसंग ओढवला. लक्ष्मी ही चंचल असते. ती तीनपैकी कुठल्यातरी एका मार्गाने जाते.

*दानं भोगो नाशस्तिस्त्रो गतयो भवन्ति वित्तस्य ।*

*यो न ददाति न भुङ्क्ते तस्य तृतीया गतिर्भवति ॥*

**(धन संपण्याचे तीन मार्ग आहेत. पहिला दान, दुसरा उपभोग व तिसरा नाश. जो दान करीत नाही वा उपभोगही घेत नाही, त्याचे धन तिसऱ्या मार्गाने नाहीसे होते. )**

'हिरण्यका, अरे धनधान्याचा बराच साठा जवळ असल्याने किंवा त्याचा येथेच्छ उपभोग घेतल्यानेच जीवन सुखी होते, असे थोडेच आहे?

*सर्पाः पिबन्ति पवनं न च दुर्बलास्ते*

*शुष्कैस्तृणैर्वनगजा बलिनो भवन्ति ।*

*कन्दैः फलैर्मुनिवरा गमयन्ति कालं*

*सन्तोष एव पुरुषस्य परं निधानम् ॥*

**(साप वारा पिऊन राहतात, म्हणून काही ते दुर्बल नसतात. सुके गवत खाऊनसुद्धा हत्ती बलवान होतात. कंदमुळे व फळे यांवर ऋषी**

a

**निर्वाह करतात. तेव्हा संतोष हेच माणसाचे मोठ्यात मोठे सुखाचे निधान आहे.)**

मंथरक पुढे म्हणाला, 'हिरण्यका, अरे धन हे खरे धन नसून, संतोष हेच खरे धन आहे. म्हणून तर म्हटलं आहे -

*दानेन तुल्यो निधिरस्ति नान्यो*
*लोभाच्च नान्योऽस्ति रिपुः पृथिव्याम् ।*
*विभूषणं शीलसमं न चान्यत्*
*सन्तोषतुल्यं धनमस्ति नान्यत् ॥*

**(दानासारखा दुसरा मोलाचा साठा नाही. या जगात लोभासारखा दुसरा शत्रु नाही. शीलासारखा दुसरा अलंकार नाही, आणि संतोषासारखे दुसरे धन नाही.)**

याप्रमाणे उपदेश करून मंथरक शेवटी म्हणाला, 'हिरण्यका, तू काही सामान्य नाहीस. अरे, जे निर्बुद्ध असतात, ते ओल्या मातीचा गोळा जमिनीवर आपटला असता जसा आपटल्या जागी पडून राहतो, तसे संकटात अवसान गाळून बसतात. पण जे बुद्धिमान् असतात, ते मात्र आपटलेल्या चेंडूप्रमाणे संकटामुळे दुप्पट वेगाने उसळी घेऊन वर येतात.'

मंथरकाचे हे बोलणे संपताच लघुपतनक हिरण्यकाला म्हणाला, 'मित्रा, मंथरकाने केलेला उपदेश काहीसा कटु असला, तरी तो तुझ्या हिताचा आहे आणि हेच तर खऱ्या मित्राचं लक्षण आहे. म्हटलंच आहे -

*अप्रियाण्यपि पथ्यानि ये वदन्ति नृणामिह ।*
*त एव सुहृदः प्रोक्ता अन्ये स्युर्नामधारकाः ॥*

**(या जगात लोकांशी जे अप्रिय पण हितकारक बोलतात तेच खरे मित्र. बाकीचे नावाचे मित्र असतात. )**

लघुपतनक याप्रमाणे हिरण्यकाला बोलत असतानाच चित्रांग नावाचे एक हरीण धापा टाकीत तिथे आले व म्हणाले, 'एका पारध्याचा बाण निसटता लागल्यामुळे कसाबसा वाचलेला मी तुमच्या आश्रयाला आलो आहे. तेव्हा मला आधार द्या.'

यावर मंथरक म्हणाला, 'मित्रा, शत्रूपासून स्वतःचा बचाव करण्याचे दोन मार्ग आहेत.

*द्वावुपायाविह प्रोक्तौ विमुक्तौ शत्रुदर्शने ।*
*हस्तयोश्चालनादेको द्वितीयः पादवेगजः ॥*

**(शत्रु दृष्टीस पडला असता त्याच्यापासून सुटका करून घेण्याचे दोन उपाय या जगात आहेत. एक तर त्याच्याशी दोन हात करणे, किंवा दुसरा उपाय म्हणजे पलायन करणे. )**

प्रसंगाचे गांभीर्य लक्षात न घेता मंथरक उपदेश करण्यात वेळ घालवू लागल्याचे पाहून लघुपतनक कावळा पटकन् उडून जवळच्याच एका झाडाच्या शेंड्यावर जाऊन बसला व सभोवार नजर टाकून चित्रांगाला म्हणाला, 'मित्रा, त्या पारध्याने तुझा नाद सोडून दिला आहे आणि

a

मारलेल्या दोन हरिणांसह तो त्याच्या घरी चालला आहे तेव्हा तू निश्चिंतपणे या ठिकाणी वास्तव्य कर.' मग तो चित्रांगही त्या तिघांसमवेत राहू लागला आणि सुभाषिते व दृष्टांतकथा एकमेकांना सुनावण्यात त्यांचा काळ फार मजेत जाऊ लागला.

एके दिवशी नित्याप्रमाणे दूरवर चरायला गेलेला चित्रांग, ठरलेल्या वेळी परत न आल्याने, मंथरकाच्या सांगण्यावरून लघुपतनक कावळा त्या वनावरून घिरट्या घालू लागला. तोच त्याला एका फासेपारध्याच्या जाळ्यात अडकून पडलेला चित्रांग दिसला. तेव्हा दुःखद मनाने त्याच्यापाशी जाऊन लघुपतनकाने त्याला विचारले, 'मित्रा, तू एवढा सावध असताना या जाळ्यात कसा काय अडकलास?' यावर चित्रांगाने उत्तर दिले

*कृतान्तपाशबद्धानां दैवोपहतचेतसाम् ।*
*बुद्धयः कुब्जगामिन्यो भवन्ति महतामपि ॥*

**(यमपाशांनी बद्ध झाले असता, किंवा दैवाने मारायचे ठरविले असता, थोरामोठ्यांची बुद्धीही वाकड्या चालीने चालू लागते. )**

'तेव्हा लघुपतनका, इतर सर्व जाऊ दे. लवकरच पारधी येऊन, मला ठार मारून घेऊन जाणार असल्याने, तुझी व माझी ही शेवटची भेट आहे. म्हणून माझी विनंती हीच की, तुम्हा तिघांना जर मी जाणता अजाणता कधी दुखविले असेल तर मला क्षमा करा.'

लघुपतनक म्हणाला, 'चित्रांगा, तू असा धीर सोडू नकोस. मी हिरण्यकाला घेऊन येतो. तो त्याच्या धारदार दातांनी हे जाळे तोडील आणि

a

तुला मुक्त करील.' बोलल्याप्रमाणे लघुपतनक आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी गेला व तातडीने हिरण्यकाला घेऊन परत आला. हिरण्यकाने ते जाळे भराभर तोडले व चित्रांगाला मुक्त केले.

तेवढ्यात हळूहळू मंथरकही आपल्याकडे येत असल्याचे पाहून, हिरण्यक व चित्रांग यांना लघुपतनक म्हणाला, 'मंथरक इकडे आला, हे काही त्याने चांगले केले नाही. समजा, याच वेळी तो पारधी आला, तर आपण तिघे झटकन् पळू शकतो, पण मंदगतीच्या मंथरकाचे कसे काय होणार?' लघुपतनकाचे बोलणे कानी पडल्यामुळे मंथरक त्याला म्हणाला, 'अरे, ते सर्व मलाही कळते, पण जाळ्यात अडकलेला आपला चित्रांग मोकळा झाला की नाही, हे पाहण्यासाठी प्रत्यक्ष इकडे आल्याशिवाय मला चैनच पडेना.' मंथरकाचे हे बोलणे संपते न संपते तोच, खरोखरच पारधी आला. त्याला पाहून चित्रांग चौखूर धावून एका दूरच्या झुडुपात दडून राहिला. लघुपतनक उडून एका झाडावर जाऊन बसला, तर हिरण्यक हा जवळच्याच एका बिळात घुसला. मंथरक मात्र त्या पारध्याच्या हाती लागला.

जाळ्यातून हरीण निसटल्याचे पाहून पारध्याने मिळालेल्या कासवालाच घरी कालवणासाठी न्यायचे ठरविले. त्याला एका दर्भासनात गुंडाळून ठेवले आणि ते दर्भासन आपल्या जवळच्या बाणात अडकवून, तो घराची वाट चालू लागला.

तो थोडासा दूर जाताच, हिरण्यक, लघुपतनक व चित्रांग हे झटपट एकत्र आले. हिरण्यकाला तर दुःख आवरता आवरेना. अश्रु ढाळीत तो म्हणाला, 'अरेरे! माझा जन्म केवळ दुःखे भोगण्यासाठीच आहे का? माझा वाडा आतील धनधान्याच्या साठ्यासह नष्ट झाला, माझा परिवार मला सोडून गेला, मला परदेशाचा आश्रय घ्यावा लागेल, प्रसंग आला? संकटाबद्दल जे म्हटलं जातं ते काही खोटं नाही-

*क्षते प्रहारा निपतन्त्यभीक्ष्णं धनक्षये वर्धति जाठराग्निः ।*

*आपत्सु वैराणि सुमल्लसन्ति छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति ॥*

**(झालेल्या जखमेवरच पुनःपुन्हा लागत राहते. संपत्ती संपल्यावर भूक अतिशय तीव्र होऊ लागते. संकटकाळी नवी वैरे उत्पन्न होतात. एकदा का एका संकटाला वाट सापडली की अनेक संकटे येऊ लागतात.)**

याप्रमाणे बोलता बोलताच आपले दुःख आवरते घेऊन हिरण्यक म्हणाला, 'बाकी आता दुःख करण्यात वेळ न घालवता, मंथरकाला सोडविण्याचा उपाय शोधून काढला पाहिजे.'

यावर लघुपतनक म्हणाला, 'मला एक युक्ती सुचते. तो पारधी ज्या वाटेने घरी जात आहे, त्या वाटेवर थोड्याच वेळात त्याला एक सरोवर लागेल. चित्रांगाने त्या पारध्याच्या दृष्टीस न पडता, आडवाटेने त्याच्यापुढे पळत जाऊन त्या तळ्याकाठी मृतवत् पडून राहावे, आणि मी त्याच्या मस्तकावर बसून, चोचीने त्याचा डोळा खात असल्याचे सोंग करावे, असे

केले की, 'चित्रांग मरून पडला आहे,' असा त्या पारध्याचा समज होईल व हाती असलेल्या मंथरकाला जमिनीवर ठेवून तो चित्रांगाला उचलण्यासाठी त्याच्याकडे जाईल. तत्पूर्वीच हिरण्यकाला मी पाठीवर घेऊन तिकडे जातो व त्या पारध्याने मंथरकाला जमिनीवर ठेवताच, हिरण्यकाला मंथरकाभोवती गुंडाळलेल्या दर्भासनाचे पाश तोडण्याची सूचना देतो. तो पारधी चित्रांगाकडे जाऊ लागताच चित्रांग पटकन् पळून जाईल, व हिरण्यकाकडून मुक्त झालेला मंथरक, त्या पारध्याची पाठ असताना वेगाने तळ्यात शिरून दिसेनासा होईल.' लघुपतनकाने सांगितल्याप्रमाणे त्यांनी केले, आणि ती युक्ती सफल होऊन मंथरकाचे प्राण वाचले. मग ते चौघेही मित्र आपल्या मूळ ठिकाणी सुखात राहू लागले.'

अशा या गोष्टी सांगून दुसऱ्या तंत्राचा समारोप करताना विष्णुशर्मा त्या तीन राजकुमारांना म्हणाला, 'मित्र हे प्रत्येकाच्या जीवनात आनंद व निर्भयता निर्माण करणारे एक अमोघ साधन आहे. म्हणून तुम्ही चांगले मित्र जोडा व सुखी व्हा. कारण मित्राबद्दल असं म्हटलं आहे -

***यो मित्राणि करोत्यत्र न कौटिल्येन वर्तते ।***
***तैः समं न पराभूतिं संप्राप्नोति कथंचन ॥***

**(जो या जगात मित्र जोडून त्यांच्याशी कपटाने वागत नाही, त्याच्यावर पराभवाचे दु:ख करण्याचा प्रसंग कधीच येत नाही. )**

a

# तंत्र तिसरे

# काकोलुकीय



# काकोलूकीय

वनातल्या त्या आश्रमातील शांतदांत व मंगल वातावरणात एका वटवृक्षाच्या पारावर बसलेल्या त्या तीन राजकुमारांनी गुरू येताच त्यांना वंदन केले व ते म्हणाले, 'गुरुदेव, पंचतंत्राच्या पहिल्या दोन प्रकरणांतील गोष्टी ऐकून जगाच्या बाह्यांगाप्रमाणेच त्याच्या अंतरंगाचेही आम्हांला बरेच ज्ञान झाले. आता आजपासून आपण आम्हाला कोणत्या गोष्टी सांगणार आहात?'

यावर विष्णुशर्मा म्हणाला, 'बाळांनो, आजपासून मी पंचतंत्राच्या तिसऱ्या तंत्राला सुरुवात करणार आहे. काक म्हणजे कावळा आणु उलुक म्हणजे घुबड हे तुम्हाला ठाऊक आहे ना? मग कावळा व घुबड यांच्याबद्दलची मुख्य गोष्ट या तंत्रात म्हणजे प्रकरणात आली असल्याने या तंत्राला काकोलूकीय असे नाव देण्यात आले आहे.' एके काळचा शत्रु जरी नंतर मित्र बनला, तरी त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकू नये,' हे तत्त्व प्रामुख्याने या प्रकरणात सांगितले आहे. नाहीतर त्या कावळयांकडून त्या घुबडांचा जसा नाश झाला तसा प्रसंग ओढवतो.'

'तो कसा काय?' असा प्रश्न त्या राजकुमारांनी केला असता, विष्णुशर्मा म्हणाला, 'ऐका-

a

# गोष्ट एकतिसावी

## शत्रूशी मैत्रीचे नाटक करावे,
## पण संधी मिळताच त्याला मारावे.

महिलारोप्य नगरीच्या सीमेवरील एका विशाल वटवृक्षावर कावळ्यांचा राजा मेघवर्ण, हा आपल्या अनेक अनुयायांसह राहात होता. त्याच वटवृक्षापासून बऱ्याच अंतरावरील एका पर्वताच्या गुहेत 'अरिमर्दन' नावाचा एक घुबडांचा राजा त्याच्या अनेक प्रजाजनांसह वास्तव्य करीत होता. तो अरिमर्दन मधूनच रात्रीच्या वेळी आपल्या लढवय्या अनुयायांसह त्या वटवृक्षावरील कावळ्यांवर हल्ला करी आणि त्या कावळ्यांपैकी काहींचे प्राण घेई व त्यांना खाऊन फस्त करी. 'जशास तसे' या न्यायाने न वागता, आपण जर दुष्ट शत्रूशी चांगलेपणाने वागलो, तर त्याच हृदयपरिवर्तन होऊन तो आपला मित्र होईल, या विचाराने मेघवर्णाने शत्रूकडे काही दिवस दुर्लक्ष केले. पण त्यामुळे शत्रूच्या मनोवृत्तीत बदल न होता तो अधिक उन्मत्त बनला व दिवसेंदिवस त्या कावळ्यांवर अधिकाधिक हल्ले करून त्यांचे प्राण घेऊ लागला. म्हटलंच आहे -

*जातमात्रं न यः शत्रुः व्याधिं च प्रशमं नयेत् ।*
*अतिपुष्टाङ्गयुक्तोऽपि स पश्चात् तेन हन्यते ॥*

**(शत्रु व रोग हे निर्माण होताच जो त्यांचा नाश करीत नाही, तो जरी अतिशय बलवान् असला तरी नंतर त्यांच्याकडून म्हणजे शत्रू वा रोग यांच्याकडून मारला जातो.)**

अखेर एके दिवशी आपल्या मंत्र्यांना बोलावून राजा मेघवर्ण त्यांना म्हणाला, 'शत्रूवर दया दाखविल्याने किंवा त्याच्याशी चांगले वागल्याने त्याचे मतपरिवर्तन होऊन तो आपल्याशी चांगला वागतो, हा माझा विचार आत्मघातकी ठरला. तेव्हा आता आपल्याला शत्रूला तोंड देण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. पण घुबडांना रात्री चांगले दिसत असल्याने त्यांचा राजा अरिमर्दन हा आपल्यावर रात्री हल्ले करतो आणि आपल्याला रात्री दिसत नसल्याने प्रत्येक वेळी आपण त्याच्याकडून मार खातो. अर्थात् दिवसा आपल्याला दिसत असल्याने, पण घुबडांना दिसेनासे होत असल्याने, आपण त्यांच्यावर दिवसा हल्ला केला असता, परंतु त्या अरिमर्दनाचं राहण्याचं ठिकाण कुठे आहे याची आपल्याला माहिती नाही. अशा स्थितीत साम, दंड व भेद यांपैकी कोणत्या मार्गाचा अवलंब करून आपण शत्रूपासून आपले रक्षण करावे, याबद्दल योग्य तो सल्ला तुम्ही मला द्या. वास्तविक विचारलं नसतानाही मंत्र्यांनी त्याला महत्त्वाच्या बाबतीत त्याच्या व राज्याच्या हिताचा सल्ला द्यावा. मग प्रत्यक्षात राजानं विचारलं असता त्याला निर्भयपणे सल्ला न देऊन कसे चालेल? म्हटलंच आहे -

***यः पृष्टो न ऋतं ब्रूते परिणामे सुखावहम् ।***
***सुमंत्री च प्रियवक्ता च केवलं स रिपुः स्मृतः ॥***

**(जो [ राजाने ] विचारले असताही, परिणामी सुखावह ठरणारे सत्य बोलत नाही, तो मंत्री म्हणून इतर दृष्टींनी जरी लायक असला व जरी गोड बोलणारा असला, तरी तो [ राजाचा ] शत्रू समजावा. )**

राजा मेघवर्ण याप्रमाणे बोलताच त्याच्या उज्जीवी, संजीवी, अनुजीवी, प्रजीवी व चिरंजीवी या पाच मंत्र्यांपैकी उज्जीवी म्हणाला, 'महाराज, शत्रू बलवान असता, त्याला वेळप्रसंगी मित्रराजांची मदत मिळण्याची शक्यता असता, किंवा त्याच्याशी युद्ध करून आपल्याला विजय मिळेलच मिळेल अशी शाश्वती नसता, विनाकारण युद्धात पडून आत्मनाश करून घेऊ नये. अखेर युद्ध हे तरी कशाकरिता करायचे? भूमी, संपत्ती किंवा नवे उपयुक्त मित्र मिळविण्याची खात्री नाही, ते युद्ध करण्याऐवजी शत्रूशी तह करणेच योग्य नव्हे का? याचा अर्थ आपण शत्रूपुढे सपशेल शरणागती पत्करावी असा नव्हे, तर एक सोयीचा डाव म्हणून सध्या शत्रूशी तह करावा आणि आपले सामर्थ्य वाढवून संधी मिळताच त्याचा काटा काढावा. म्हणून तर प्रत्यक्ष बृहस्पतीसुद्धा म्हणतो -

***कौर्मं सङ्कोचमास्थाय प्रहारानपि मर्षयेत् ।***
***काले काले च मतिमान् उत्तिष्ठेत् कृष्णसर्पवत् ॥***

**(बुद्धिमान जे असतात त्यांनि -प्रतिकूल काळी - शत्रूचे प्रहारसुद्धा कासवाप्रमाणे अंग संकोचून सहन करावेत, पण योग्य वेळ येताच मात्र कृष्णसर्पाप्रमाणे शत्रूवर चालून जावे. )**

a

यावर संजीवी नावाचा मंत्री उभा राहून राजा मेघवर्णाला म्हणाला, 'महाराज, मंत्रीमहोदय उज्जीवी यांचे हे तह करण्याचे पडखाऊ विचार मला बिलकूल पटत नाहीत. आपला शत्रू अरिमर्दन हा धर्माची चाड न बाळगणारा व लोभी आहे. आज आपल्याशी तह करायला तो तयार झाला, तरी त्या तहानुसार तो वागेलच याची ग्वाही कुणी द्यावी? त्यातून त्याच्या सामर्थ्याचा बागुलबुवा उभा करण्यात तरी काय अर्थ आहे? तसा सामर्थ्याचा विचार करता, हत्ती हा सिंहापेक्षा कितीतरी वरचढ असतो ना? पण अंगच्या शौर्यामुळे व पराक्रमामुळे तो सिंह त्या हत्तीला भारी ठरतो. तरीही त्या शत्रूच्या सामर्थ्याचे भय वाटत असल्यास, त्याच्याशी समोरासमोर युद्ध न करता, त्याला कपटाने मारावे. स्त्रीरूप घेऊन भीमाने नाही का त्या दुष्ट कीचकाचा वध केला? तेव्हा शत्रूपुढे नमते घेण्याचा विचारही मनात आणु नये. त्यामुळे शत्रू मात्र आपल्याला गवताप्रमाणे तुच्छ मानू लागेल. महाराज, शत्रूपुढे पड खाण्यासाठी का आपल्याला आपल्या मातांनी जन्म दिला आहे? मुळीच नाही. शत्रूचा संहार हा करायलाच हवा. म्हणून तर युद्धाशास्त्रावरील एका ग्रंथाने राज्यकर्त्याला स्पष्ट भाषेत सवाल केला आहे-

*रिपुरक्तेन संसिक्ता वैरिस्त्रीनेत्रवारिणा ।*
*न भूमिर्यस्य भूपस्य का श्लाघा तस्य जीवने ॥*

a

**(शत्रूच्या रक्ताने व शत्रूस्त्रियांच्या डोळ्यातील आसवांनी ज्याची भूमी शिंपडली गेली नाही, अशा राजाच्या जीवनात प्रौढी मिरविण्यासारखी कोणती गोष्ट आहे?)**

त्यानंतर राजा मेघवर्णाने मंत्री अनुजीवी याच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले असता तो म्हणाला, 'महाराज, शत्रू बेभरंवशाचा व कपटी असल्यामुळे आणि त्याच्या सामर्थ्याचा आपल्याला अचूक अंदाज नसल्याने, त्याच्याशी तह किंवा युद्ध यांपैकी काहीही करण्यात अर्थ नाही. त्यातून त्याच्या राज्याच्या भौगोलिक परिस्थितीचे ज्ञानही आपल्याला नाही. तेव्हा सध्या आपण इथून पळ काढून एखाद्या सुरक्षित प्रदेशाच्या आश्रयाला जावे.

'महाराज, असा पळ काढण्यात किंवा माघार घेण्यात कुठल्याही प्रकारचा कमीपणा नाही. एडका धडका मारण्यापूर्वी जस थोडासा मागे सरकतो किंवा आपल्या लक्ष्यावर झेप घेण्यापूर्वी पशुराज सिंह हा जसा आपले अंग आखडून घेतो, तशा स्वरूपाची आपली ही माघार आहे. तेव्हा सध्या नव्या सुरक्षित ठिकाणाचा आश्रय घेऊन, आपण युद्धात जय मिळविण्याच्या दृष्टीने जोरात तयारीला लागू आणि शत्रूच्या सामर्थ्याची व त्याच्या राज्याच्या भौगोलिक रचनेची इत्थंभूत माहिती आपल्या हेरांमार्फत मिळवून, मग कार्तिकात वा चैत्रात त्याच्यावर घणाघाती हल्ला करू, म्हणजे आपल्या मोहिमेत पावसाचा अडथळा येणार नाही आणि शत्रूच्या

a

राज्यातील तयार पिके हाती लागल्याने, आपल्या सैन्याची उपासमारही होणार नाही.'

चौथा मंत्री प्रजीवी म्हणाला, 'महाराज, तह, युद्ध वा पलायन यांपैकी कुठलाच मार्ग हिताचा नाही. आपण आहो तिथेच राहून ऐक्याच्या बळावर शत्रूला भुईचित करू. एकमेकांजवळ उभे असणारे वृक्ष महाभयंकर वावटळीला सहज तोंड देऊ शकतात. पाण्यात असताना जी मगर एखाद्या हत्तीलासुद्धा खेचू शकते, तीच मगर पाण्याबाहेर पडली की, एखाद्या कुत्र्यापुढेसुद्धा हतबल ठरते. तेव्हा जे काय करायचे ते इथे राहूनच करू व शत्रूला पुरे पडू.'

पाचवा मंत्री चिरंजीवी याने राजाला वेगळाच सल्ला दिला. तो म्हणाला, 'महाराज, आपण आपले स्थान न सोडता, इथूनच आपल्या शत्रूचा पुरता बीमोड करू शकू. अर्थात त्याकरिता एखाद्या बलवान मित्राची मदत मात्र मिळायला हवी. म्हटलंच आहे -

*असहायः समर्थोऽमपि तेजस्वी किं करिष्यति ।*
*निर्वाते ज्वलितो वन्हिः स्वयमेव प्रशाम्यति ॥*

**(एखादा जरी समर्थ व तेजस्वी असला, तरी त्याला जर कुणाचे सहाय्य नसेल, तर तो एकटा काय करू शकणार? हवा नसलेल्या जागी जर अग्नी पेटविला, तर तो आपणहून विझून जातो.)**

चिरंजीवी पुढे म्हणाला, 'पण महाराज, आपल्याला मदत करणारा एखादा बलवान् मित्रच असावा असेही नाही. अनेक सामान्य पण निष्ठावंत मित्र जरी आपल्यामागे छातीठोकपणे उभे राहिले, तरी त्यांचाही आपल्याला तेवढाच उपयोग होऊ शकतो. म्हटल्च आहे ना?-

*संघातवान् यथा वेणुर्निबिडैर्वेणुभिर्वृतः ।*
*न हि शक्यः समुच्छेत्तुं दुर्बलोऽपि तथा नृपः ।*

**(एक वेळूही जर अनेक वेळूंनी वेढलेला असेल, तर ज्याप्रमाणे वावटळ त्याला पाडू शकत नाही, त्याचप्रमाणे दुर्बळ राजाची सहाय्यक मित्रांमुळे स्थिती होत असते. )**

चिरंजीवी शेवटी म्हणाला, 'महाराज, ज्यांची मदत घ्यायची ते खरोखरच चांगले असले तर आजचे चित्र पार बदलून जाईल, म्हटलंच आहे-

*महाजनस्य संपर्कः कस्य नोन्नतिकारकः ।*
*पद्मपत्रस्थितं तोयं धत्ते मुक्ताफलश्रियम् ॥*

**(थोराचा सहवास कुणाला उन्नतिकारक झालेला नाही? कमळाच्या पानावर पडलेल्या पाण्याला मोत्यांचे रूप प्राप्त होते. )**

अशा तऱ्हेने पाचही मंत्र्यांचा सल्ला ऐकून झाल्यावर आपल्या वडिलांपासून सचीवपदी असलेल्या व सर्व शास्त्रांत पारंगत असलेल्या स्थिरजीवीला राजा मेघवर्णाने विचारले, 'काका, या बाबतीत तुमचे म्हणणे काय आहे?'

a

स्थिरजीवी म्हणाला, 'महाराज, आतापर्यंत पाच मंत्र्यांनी आपल्याला जो सल्ला दिला, त्या प्रत्येकाच्या म्हणण्यात जरी काही ना काही तथ्य असले, तरी या बाबतीत माझे म्हणणे असे आहे की, सध्या आपण एकीकडे शत्रूशी मैत्री जोडू इच्छित असल्याचा बहाणा करावा व त्याच वेळी दुसरीकडून शत्रूला अडचणीत आणून त्याचा नायनाट करावा. ही नीती साधूसंतांच्या दृष्टीने कुटिल व म्हणून वाईट असली तरी, ज्याला राज्य चालवायचे व टिकवायचे आहे, अशा राजाचे अशा नीतीशिवाय चालायचे नाही. त्या दृष्टीने शत्रूच्या राहण्यावावरण्याच्या ठिकाणांची इत्थंभूत माहिती आपल्या हेरांच्या सहाय्याने मिळवावी. शत्रूकडील मंत्री, पुरोहित, सेनापती, युवराज, अंतःपुरावरील अधिकारी, त्या राजाची प्रेमपात्रे, परराष्ट्रमंत्री, दुर्गरक्षक, सीमारक्षक, शरीररक्षक, राजाला पाणी देणारे, त्याला विडा देणारे, यांच्यापैकी जे कुणी धन वा सत्ता यांसाठी हपापलेले असतील, त्यांना निरनिराळी आमिषे दाखवून फितवावे. त्याचबरोबर आपल्या राज्यातील अशा लोभी व्यक्ती शत्रूला फितूर होऊ नयेत म्हणून त्यांच्यावर सतत करडी नजर ठेवायला आपल्या हेरांना सांगावे. असे केल्याने शत्रूशी फारसे युद्ध करावे न लागता आपल्याला विजय प्राप्त करून घेता येईल आणि आम्हा कावळ्यांशी पूर्वापार वैर करीत आलेल्या घुबडांचा निःपात करता येईल.'

यावर 'पण कावळे व घुबडे यांच्यात वैर उद्भवण्याचे मूळ काय कारण?' असा प्रश्न राजा मेघवर्णाने विचारला असता सचीव स्थिरजीवी सांगू लागला-

a

# गोष्ट बत्तिसावी

## क्षुद्राचे शस्त्र जे न करी, ते थोराचे नुसते नाव करी.

एकदा हंस, पोपट, बगळे, कोकीळ, चातक आदि पक्षी मोठ्या चिंताग्रस्त मनःस्थितीत एकत्र जमले व एकमेकांना म्हणू लागले, 'गरुड, हा जरी आम्हा पक्ष्यांचा राजा असला, तरी तो सदान्‌कदा भगवान् विष्णूंच्या सेवेत गुंतून गेला असल्याने, त्याचे आम्हा प्रजाजनांकडे लक्ष नसते. अशा स्थितीत जर का आपल्यावर कधी एखाद्या पारध्याच्या जाळ्यात अडकण्याचा प्रसंग ओढवला, तर आपल्याला फुकट प्राणांना मुकावे नाही का लागणार? राजा हा कसा प्रजेचे रक्षण व तिचे नेतृत्व करणारा हवा. राजा असा नसेल, तर त्याच्या प्रजेची स्थिती कर्णधार - म्हणजे सुकाणूधारक - नसलेल्या व समुद्रावरील वादळात सापडलेल्या नौकेसारखी होते. योग्य तऱ्हेने शिकवू न शकणारा शिक्षक किंवा पतीशी प्रेमळपणे बोलू न शकणारी स्त्री ही जशी निरुपयोगी, त्याचप्रमाणे प्रजेचे रक्षण करू न शकणारा राजासुद्धा कुचकामी होय. तेव्हा अशा त्या गरुडाला राजपदी ठेवण्याऐवजी ज्याचे आपल्यावर सदैव लक्ष राहील, अशा दुसऱ्या एखाद्या पक्ष्याला आपण आपला राजा बनविणे योग्य नाही का?' त्या पक्ष्यांच्या विचारांनी असे वळण घेतले आणि नेमके त्याच वेळी त्यांचे लक्ष जवळच्याच एका

अंधाऱ्या कोपऱ्यात बसलेल्या 'भद्रकार' नावाच्या एका गुबगुबीत घुबडाकडे गेले. मग त्यांनी त्यालाच आपला राजा करण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे राज्याभिषेकाची तयारी सुरू झाली. सुतारपक्ष्याने एक लाकडी सिंहासन बनविले. पोपटाने त्यावर सप्तद्वीप, पृथ्वी व सागर यांची शुभचित्रे रेखाटली, मग कुणी त्या सिंहासनावर वाघाचे कातडे पसरले, तर कुणी त्या कातड्यावर निरनिराळ्या तीर्थांतील पवित्र पाण्याने भरलेला कलश ठेवला. भारद्वाज पक्ष्याने एकशेआठ वनस्पतींची फुले आणली, तर घुबडाला राजपदाचा अभिषेक करीत असतानाच त्याच्या घुबडिणीला पट्टराणीपदाचा अभिषेक करता यावा, यासाठी तिला सन्मानाने आणण्याकरिता कोकिळा, मैना आदि 'बाईमाणसे' रवाना करण्यात आली.

तेवढ्यात त्या ठिकाणी आलेल्या एका कावळ्याने त्या पक्ष्यांना 'हा कसला समारंभ चालला आहे?' अशी पृच्छा केली. तेव्हा ते पक्षी आपपासांत म्हणाले, 'कावळेकाका कसे अगदी वेळेवर आले. आपण घेतलेला निर्णय त्यांना कळवावा व मगच तो अंमलात आणावा. कारण विचार व चातुर्य ज्यांच्या ठिकाणी असते, अशांच्या सल्ल्याने हाती घेतलेल्या कार्यांत कधी अपयश येत नसते. आणि जगातल्या हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या धूर्त प्राण्यांत सुभाषितकारांनी कावळ्याचीही गणना केली आहे. ते म्हणतात -

*नराणां नापितो धूर्तः पक्षिणां चैव वायसः ।*
*दंष्ट्रिणाञ्च शृगालस्तु श्वेतभिक्षुस्तपस्विनाम् ॥*

**(माणसांत न्हावी, पक्ष्यांमधे कावळा, हिंस्त्र पशूंत कोल्हा आणि संशयात श्वेतांबरधारी भिक्षू हे धूर्त असतात.)**



यापमाणे बोलणे झाल्यावर त्या पक्ष्यांनी आपण घुबडाला आपला राजा का बनवीत आहोत याचे त्या कावळ्यापाशी स्पष्टीकरण केले व त्याचे त्या बाबतीतले मत विचारले. तेव्हा तो कावळा मिस्किलपणे हसून म्हणाला, 'काय म्हणावे या तुमच्या निर्णयाला? एक राजा जिवंत असताना कधी दुसऱ्याला राज्याभिषेक करता येतो का? त्यातून राज्याभिषेक कुणाला तर ज्याला सूर्य उगवताच चांगलेसे दिसेनासे होते व ज्याची चर्या राग

आलेला नसतानाही त्याच्या भेसूर गोलाकार डोळ्यांमुळे रागावल्यासारखी दिसते त्या घुबडाला? वास्तविक राजाचे दर्शन प्रजेला आनंददायी वाटायला हवे. त्या घुबडाच्या दर्शनाने कुणाला तरी आनंद होईल का? माझ्या पक्षीबांधवहो, तुम्ही म्हणाल की, राजा म्हणून गरुडाचा काहीएक उपयोग नाही. पण मी विचारतो जे घुबड सूर्यप्रकाशात चुकूनही कधी बाहेर पडत नाही, ते दिवसा आपल्यावर संकट ओढवले असता आपल्या मदतीला धावून येईल का? त्यापेक्षा तो शक्तिशाली गरुड कितीतरी बरा, कारण त्याचं जरी नुसत नाव घेतलं तरी शत्रू आपल्या वाटेला जायला घाबरेल आणि आपल्याला आपोआप सुरक्षितता लाभेल. म्हटलंच आहे -

*गुरुणां नाममात्रेऽपि गृहिते स्वामिसम्भवे ।*
*दुष्टानां पुरतः क्षेमं तत्क्षणादेव जायते ॥*

**(दुष्टांसमोर थोरामोठ्यांचे नुसते नाव घेतले किंवा ते आपले स्वामी असल्याचे जरी नुसते त्यांना कळले तरी त्याच क्षणी आपल्याला सुरक्षितता प्राप्त होते.)**

तो कावळा त्या पक्ष्यांना पुढे म्हणाला, 'प्रत्यक्ष चंद्र हा आपला राजा असल्याचे सशांनी सांगताच, त्यांचे त्या उन्मत्त हत्तींपासून संरक्षण झाले, ती गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे ना?'

'कावळेकाका, ती गोष्ट आम्हाला ठाऊक नाही.' असे त्या पक्ष्यांनी सांगताच तो कावळा म्हणाला, 'तर मग ऐका -

# गोष्ट तेहेतिसावी

## थोराशी जोडता नाते, येणारे संकट निघून जाते.

एकदा भयंकर दुष्काळ पडल्यामुळे, एका वनात असलेले एकमेव तळे पार आटून गेले व त्यामुळे त्या वनातील हत्ती आपला नेता 'चतुर्दन्त' याच्यासंगे पाच दिवस अहोरात्र प्रवास करून, अखेर दूरच्या वनातील पाण्याने तुडुंब भरलेल्या एका सरोवराकडे गेले.

पाण्याने काठोकाठ भरलेल्या तळ्यात मनमुराद विहार करायला मिळाल्यामुळे आनंदून गेलेले ते हत्ती, स्नानपान झाल्यानंतर, त्या तळ्याभोवतीच्या भुसभुशीत भूभागावर बराच वेळ नाचले व उंडारले, पण त्यामुळे त्या भूमीत बिळे करून राहणाऱ्या सशांवर त्या हत्तींचे पाय पडले आणि त्यांच्या पायांखाली काही सशांचे पाय चिरडले, कुणाचे पाठींचे कणे मोडले, तर काही साफ चिरडले जाऊन प्राणांना मुकले. असा बराच वेळ धुडगूस घालून झाल्यावर ते हत्ती गवतपाला खायला नजिकच्या वनात निघून गेले.

त्यांचा तो कळप तिथून निघून जाताच ते ससे बिळांबाहेर आले. मग एक ससा इतरांना म्हणाला, 'दुष्काळी प्रदेशातून आलेले हे हत्ती यापुढे दररोज या सरोवरात पाणी प्यायला आणि डुंबायला येणार आणि

आजच्यासारखाच धिंगाणा घालून, आपली वाताहत करणार. कारण म्हटलंच आहे ना?-

*स्पृशन्नपि गजो हन्ति जिघ्रन्नपि भुजङ्गमः ।*
*हसन्नपि नृपो हन्ति मान्यन्नपि दुर्जनः ।*

**(हत्ती हा नुसत्या स्पर्शाने - म्हणजे बारीकशा धक्क्यानेसुद्धा ठार करतो. सर्प हा केवळ [विषारी] उच्छ्वासानेसुद्धा जीव घेतो, राजा हा हसत हसतसुद्धा प्राण घेऊ शकतो आणि दुर्जन हा वरपांगी मान देत असतानाच आतून गळा कापतो.)**

याप्रमाणे बोलून त्या सशाने प्रश्न केला, 'तेव्हा आपल्या रक्षणाच्या दृष्टीनं आपण काय करावं, असं तुम्हाला वाटतं?'

यावर एका सशाने ते ठिकाण सोडून इतरत्र जाऊन राहण्याची सूचना केली, तर दुसऱ्याने तसे निघून जाण्यास हरकत घेतली. तो म्हणाला, 'पूर्वापार पिढयान्पिढ्या जिथे राहात आलो ते ठिकाण सोडून जाण्यात काय अर्थ? त्यापेक्षा ते हत्ती यापुढे या सरोवराकडे फिरकणार नाहीत, असा काहीतरी धाक त्यांना दाखवायला हवा, मग तो धाक खोटा का असेना? कुणीकडून आपला हेतु सफल झाल्याशी कारण. म्हटलंच आहे ना? -

a

*निर्विषेणापि सर्पेण कर्तव्या महती फटा ।*
*विषं भवतु मा वास्तु फटाटोपो भयंङ्करः ॥*

**(एखादा सर्प जरी विषारी नसला, तरी त्याने फणा उभारावी. त्याच्या ठिकाणी विष असो वा नसो, त्याने नुसती फणा उभारल्यानेच [दुसऱ्याच्या मनात] भय उत्पन्न होते.)**

त्या सशाच्या या म्हणण्याला दुजोरा देऊन एक वृद्ध ससा म्हणाला, 'हा म्हणतो तसेच करायला हवे. आपल्यापैकी एकाने त्या हत्तींचा प्रमुख जो 'चतुर्दन्त' त्याला भेटावे व त्याला दडपून सांगावे, 'माझे नाव विजयदत्त असून, मी पृथ्वीवर असलेल्या सर्व सशांचा राजा पृथ्वीला रात्री प्रकाश देणाऱ्या चंद्रमहाराजांचा दूत आहे. मी एरवी जरी चंद्रलोकी राहात असलो, तरी तुम्ही हत्तींनी या सरोवराकाठच्या माझ्या प्रजाजनांना त्रास द्यायला सुरुवात केली असल्याने, मी मुद्दाम तुम्हाला चंद्रमहाराजांचा निर्वाणीचा इशारा द्यायला पृथ्वीवर आलो आहे. यापुढे तुम्ही त्या सरोवराकडे चुकूनही जरी फिरकलात व त्या माझ्या प्रजाजन असलेल्या सशांना त्रास दिलात तर चंद्रमहाराज शाप देऊन तुम्हा हत्तींची राखरांगोळी करून टाकतील.'

त्या वृद्ध सशाने आणखीही मार्गदर्शन केल्यावर, 'चंद्रमहाराजांचा राजदूत म्हणून कुणाला त्या हत्तीप्रमुखाकडे पाठवावे, 'याबद्दल त्यांच्यात विचारमंथन सुरू झाले असता एक बहुश्रुत ससा म्हणाला, 'राजदूत कसा असावा याबद्दल राजनीतीवरील एका ग्रंथात असं सांगितलं आहे की -

a

*साकारो निःस्पृहो वाग्मी नानाशास्त्रविचक्षणाः ।*
*परचित्तावगन्ता च राज्ञो दूतः स इष्यते ॥*

**(जो देखणा, निर्लोभी, प्रभावी वक्तृत्वाचा, नाना शास्त्रे जाणणारा व दुसऱ्याच्या मनात काय आहे हे ओळखणारा असतो, असाच राजाचा दूत असावा.')**

त्या सशाने याप्रमाणे सांगताच, सर्व सशांनी लंबकर्ण नावाच्या एका देखण्या, बुद्धिमान्, हजरजबाबी व निःस्पृह अशा सशावर ते काम सोपविले. त्यानुसार तो लंबकर्ण ससा एका सोयीच्या अशा उंच टेकाडावर जाऊन बसला आणि हत्तीप्रमुख चतुर्दन्त हा त्या टेकाडाच्या पायथ्याजवळून जाऊ लागला असता, अगोदर ठरल्याप्रमाणे त्याला बोलला. त्याच्या या बोलण्याने मनी धसकून गेलेल्या चतुर्दन्ताने त्याला विचारले, 'काय रे विजयदत्ता, तू खरोखरच चंद्रमहाराजांचा राजदूत आहेस, याला पुरावा काय?'

लंबकर्ण म्हणाला, 'हे चतुर्दन्ता, तुला पुरावा हवा ना? मग आज रात्री तू एकटाच त्या सरोवराकडे अगदी सावकाश ये. ज्या माझ्या प्रजाजनांना तुम्ही हत्तींनी पायांखाली चिरडून मारलेत त्यांच्या नातेवाईकांचे सांत्वन करायला, ज्यांना तुम्ही जायबंदी केलेत त्यांना दिव्यौषधी देऊन बरे करायला, आणि जर तुम्ही इथून इतरत्र निघून जाणार नसाल, तर शाप देऊन

a

तुम्हाला भस्मसात् करायला आज चंद्रमहाराज त्याच सरोवरापाशी येणार आहेत. ते आल्याचे मी तुला प्रत्यक्षच दाखवीन.'

त्या दिवशी रात्र पडताच चतुर्दन्त हत्ती हळूहळू त्या सरोवराकडे गेला असता, त्याला सरोवरात पडलेले चंद्राचे प्रतिबिंब दाखवून लंबकर्ण म्हणाला, 'चतुर्दन्ता, चंद्रमहाराजांना पाहिलेस ना? ते समाधी लावून बसलेत. तेव्हा एकही शब्द न बोलता, केवळ त्यांना नमस्कार करून, तू तुझ्या अनुयायांसह या वनातून निघून जा. त्यांची समाधी उतरल्यावर जर का तुमच्यापैकी कुणी त्यांच्या दृष्टीस पडला, तर ते शापाने त्याची राख करून टाकतील.' लंबकर्णाने दिलेली ही पोकळ धमकी खरी वाटून, चतुर्दन्त आपल्या अनुयायांसह त्या वनातून कायमचा निघून गेला.'

ही गोष्ट सांगून तो कावळा इतर पक्ष्यांना म्हणाला, 'म्हणून मी म्हणतो की, आपला संबंध थोरामोठ्यांशी असल्याचे नुसते जरी कळले तरी आपले काम होऊन जाते. तेव्हा घुबडासारख्या क्षुद्र पक्ष्यावर राजेपणाची भलतीच जबाबदारी टाकण्यात काय अर्थ? पूर्वी ससा व चिमणी यांच्या भांडणात, न्यायदानाची जबाबदारी त्यांनी एका मांजरावर सोपविल्यामुळे, त्या दोघांनाही आपल्या प्राणांना कसे मुकावे लागले, ती गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे की नाही?'

त्या पक्ष्यांना 'नाही' असे म्हणताच तो कावळा म्हणाला, 'एकदा असे झाले -

# गोष्ट चौतिसावी

## भलत्यावर जो विश्वास ठेवी, तो आत्मघात करून घेई.

एका झाडाच्या ढोलीत राहणारा कपिंजल नावाचा चिमणा अन्नाच्या शोधार्थ एकदा आपल्या मित्रांसह दूरवर गेला असता, त्याला तयार होत आलेल्या भाताच्या लोंब्यांनी भरलेले एक शेत दिसले. मग त्या धान्यावर भरपूर ताव मारता यावा, म्हणून त्या चिमण्याने त्या शेताजवळच्या एका वृक्षावर मुक्काम ठोकला व दररोज त्या शेतात जाऊन व त्या धान्यावर ताव मारून तो धष्टपुष्ट बनू लागला. पण थोड्याच दिवसांत त्याला आपल्या मूळ घराची आठवण येऊ लागली. म्हटलंच आहे ना?-

*न तादृग् जायते सौख्यमपि स्वर्गे शरीरिणाम् ।*
*दारिद्र्येऽपि हि यादृक् स्यात् स्वदेशे स्वपुरे गृहे ॥*

**(दारिद्र्यात जरी राहावे लागले तरी प्राण्यांना स्वदेशात, स्वतःच्या गावात किंवा घरी राहण्यात जेवढे सुख वाटते, तेवढे ते प्रत्यक्ष स्वर्गातही वाटत नाही.)**

आणि म्हणून थोडे दिवस लोटताच तो चिमणा जेव्हा स्वतःच्या घराकडे गेला, तेव्हा त्याला आपण वर्षानुवर्षे ज्या झाडाच्या कोटरीत राहात

a

होतो त्या कोटरीत शीघ्रग नावाच्या एका सशाने बिऱ्हाड थाटले असल्याचे आढळून आले.

'वर्षानुवर्षे या जागेत मी राहात आलो असल्याने, ही जागा माझी आहे. तेव्हा तू इथून ताबडतोब निघून जा,' असे तो चिमणा त्या सशाला सांगू लागताच तो ससा त्याला म्हणाला, 'ही जागा तुझी कशी काय? याबाबत कायदा असा आहे -

*वापीकूपतडागानांन्देवालयकुनन्मनाम् ।*
*उत्सर्गात्परतः स्वाम्यमपि कर्तुं न शक्यते ॥*

**(विहिरी, तळी, देवळे आणि वृक्ष अशांसारख्या ठिकाणी राहिल्याने त्यांच्यावर कायमची मालकी प्रस्थापित होत नाही. जोवर एखादा अशा ठिकाणी राहात असतो, तोवरच त्याचा त्यावर हक्क असतो.)**

'तेव्हा आता या वृक्षाच्या ढोलीत मी राहात असल्याने ही ढोली माझी आहे.'

कपिंजल चिमणा म्हणाला, 'ससूमामा, कायदा ही अशी एक चमत्कारिक चीज आहे की तिचा आधार परस्परविरुद्ध अशा दोन्ही पक्षांना घेता येतो. तेव्हा एखाद्या कायदेपंडिताकडे जाण्याऐवजी आपण हा आपला तंटा एखाद्या निःपक्षपाती व ज्ञानी अशा व्यक्तीकडे नेऊ आणि ती जो निर्णय देईल, तो मान्य करू. आह कबूल?'

a

शीघ्रगाने ते मान्य करताच, ते दोघे अशा व्यक्तीच्या शोधार्थ इकडेतिकडे फिरू लागले. थोड्याच वेळात त्यांना नदीकाठी ध्यानस्थ बसलेला तीक्ष्णदंत नावाचा एक बोका दिसला. त्याला पाहून शीघ्रग ससा त्या चिमण्याला म्हणाला, 'चिमणराव, तो साधू बनलेला बोका पाहिलात? तो आपला तंटा अगदी निःपक्षपाती वृत्तीनं सोडवील.'


कपिंजल चिमणा म्हणाला, 'ससूमामा, साधूच्या वेषांत वावरणाऱ्यांपैकी बहुतेक सर्व आतून स्वार्थसाधूच असतात. त्यातून बोक्याचे व आपले जन्मजात वैर. अशा स्थितीत त्याच्यावर विश्वास कसा काय ठेवायचा?'

डोळे मिटून पण कान उघडे ठेवून बसलेल्या त्या ढोंगी ध्यानधारी बोक्याच्या कानी त्यांचा संवाद पडताच, डोळे उघडून तो त्यांना म्हणाला, 'बाबांनो, तुमच्या काय गप्पा चालल्यात त्याची मला कल्पना नाही. पण तुम्ही बहुधा निरर्थक गप्पा मारीत असणार. बाबांनो, या आयुष्याचा प्रत्येक क्षण अन् क्षण मोलाचा असताना, अशा निरर्थक गप्पा मारण्यात वेळ वाया घालविणे योग्य आहे का? या बाबतीत धर्मशास्त्र असं सांगतं -

*यस्य धर्मविहीनानि दिनान्यायान्ति यान्ति च ।*
*स लोहकारभस्त्रेव श्वसन्नपि न जीवति ॥*

**(ज्याचे दिवस धर्म न आचरता, नुसतेच उगवतात व मावळतात, तो लोहाराच्या भात्याप्रमाणे श्वासोच्छ्वास चालू असूनही [प्रत्यक्षात] जिवंत नसतो.)**

त्या बोकोबाच्या या विद्वत्तापूर्ण बोलण्याने प्रभावित झालेला तो ससा व चिमणा त्याला आपल्या तंट्याचे स्वरूप समजावून देऊ लागले असता, तो कपटी बोका त्यांना म्हणाला, 'बाबांनो, म्हातारपणामुळे मला नीटसे ऐकू येत नसल्याने, तुम्ही जे काय सांगायचे असेल ते माझ्याजवळ येऊन सांगा.'



त्याच्या या बोलण्यावर विश्वास ठेवून ते दोघे त्याच्याजवळ गेले असता, त्या बोक्याने क्षणार्धात त्या दोघांनाही मारून खाऊन टाकले.'

ही गोष्ट सांगून तो कावळा त्या घुबडाला राज्याभिषेक करू पाहणाऱ्या पक्ष्यांना म्हणाला, 'तेव्हा पक्षीबंधूंनो, स्वभावतःच क्रूर, घुम्या व उभा दिवस झोपेत घालविणाऱ्या त्या घुबडाला राजा बनवून, तुम्हाला त्या अविचारी ससा व चिमणासारखा स्वतःचा नाश करून घ्यायचा आहे का?' कावळ्याचे हे

a

म्हणणे पटल्यामुळे ते पक्षी आपला बेत रद्द करून तिथून चूपचाप निघून गेले.

बराच वेळ झाला तरी राज्याभिषेकाचे प्रत्यक्ष विधी सुरू होत नाहीसे पाहून त्या घुबडाने त्याला दिवसा इच्छित ठिकाणी सांभाळून नेणाऱ्या 'होला' नावाच्या पक्ष्याला विचारले, 'काय रे होल्या, मला राज्याभिषेक करायला निघालेले पक्षी आता चूपचाप का बसले आहेत?'

होला म्हणाला, 'घुबडराव, एका कावळ्याने तुमची निंदानालस्ती केल्यामुळे सर्व पक्षी तुम्हाला राज्याभिषेक करायचा बेत रद्द करून इथून चूपचाप निघून गेले आहेत. तो विघ्नसंतोषी कावळा तेवढा, पुढे काय होते ते पाहण्यासाठी जवळच्याच झाडाच्या फांदीवर बसून राहिला आहे.'

हे ऐकून रागाने काळेबुंद झालेले ते घुबड त्या कावळ्याला उद्देशून म्हणाले, 'अरे मूर्खा, माझ्या राज्याभिषेकात विघ्न आणून तू केवळ माझेच नव्हे, तर तुझे व तुझ्या कावळे जातीचेही कायमचे नुकसान करून घेतले आहेस. अरे, शस्त्रांनी केलेल्या जखमा जशा कालांतराने भरून निघत असल्या, तरी अपमानकारक शब्दांनी दुसऱ्यांच्या हृदयांना केलेल्या जखमा कधी भरून निघत नसतात. तू माझा अपमान केला असल्याने, यापुढे आम्हा घुबड जातीचे तुम्हा कावळेजातीशी कायमचे हाडवैर राहील.'

ते ऐकून कावळा स्वतःशीच म्हणाला, 'माझेच चुकले. म्हटलेच आहे ना?-

a

*बलोपपन्नोऽपि हि बुद्धिमान्नरः*
*परं नयेन्न स्वयमेव वैरिताम् ।*
*भिषङ्ममास्तीत विचिन्त्य भक्षयेत्*
*अकारणात् को हि विचक्षणो विषम् ॥*

**(कितीही सामर्थ्यसंपन्न जरी असला, तरी बुद्धिमंताने कारण नसता दुसऱ्याचे शत्रुत्व ओढवून घेऊ नये. आपल्याला बरे करायला जवळपास वैद्य आहे, असा विचार करून कुणा सूज्ञाने विषप्राशन करणे योग्य ठरेल का?)**

ही गोष्ट सांगून राजा मेघवर्णाचा वृद्ध सचीव स्थिरजीवी त्याला म्हणाला, 'महाराज, अशा तऱ्हेने कावळे व घुबड यांच्यात कायमचे वैर निर्माण झाले. ते असो. मुद्यावर येऊन बोलायचे तर घुबडांचा राजा अरिमर्दन याला आपण कसे तोंड द्यावे, त्याबाबत आपल्या इतर मंत्र्यानी आपल्याला वेगवेगळा सल्ला दिला असला, तरी माझ्या मते आपण शत्रूशी मैत्रीचे नाटक करून त्याला गाफील ठेवावे व एके दिवशी संधी साधून त्याला निपटून काढावे. शत्रू कितीही जरी बुद्धिमान् असला तरी तोही फसू शकतो. धूर्त अशा तीन लफंग्यांनी एका ब्राह्मणाला फसवून त्याचा बोकड कसा लांबविला ती गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे ना?'

'ती गोष्ट काय आहे?' असे राजा मेघवर्णाने विचारता स्थिरजीवी म्हणाला, 'तर मग ऐका महाराज-

a

# गोष्ट पस्तिसावी


## असत्य जेव्हा पुन:पुन्हा कानी पडते, तेव्हा ते सत्य भासू लागते.

एका गावात 'मित्रशर्मा' नावाचा एक अग्निहोत्री ब्राह्मण राहात होता. एकदा यज्ञात 'बळी' देण्यासाठी त्याने बाहेरगावच्या एका ओळखीच्या माणसाकडून एक गलेलठ्ठ बोकड तसाच मिळविला व त्याला खांद्यावर घेऊन तो आपल्या गावाच्या रस्त्याला लागला.

तो बोकड तीन भामट्यांच्या दृष्टीस पडला व त्यांनी त्या ब्राह्मणाला फसवून, त्या बोकडाला पळवून नेण्याचा आपपसांत बेत आखला. त्याप्रमाणे ते तिघे तो ब्राह्मण जाणार असलेल्या वाटेवर - त्याला दाद लागून न देता - थोडथोड्या अंतरावर उभे राहिले.

खांद्यावर बोकड घेतलेला ब्राह्मण जरा पुढे जाताच वाटेत भेटलेला पहिला भामटा त्याला म्हणाला, 'काय भटजीबुवा, कुत्रा खांद्यावर घेऊन कुठे चाललात? अहो, याला असेच घेऊन गेलात तर तुमचे गावकरी तुम्हाला वेड्यात काढतील.'

'हा कुत्रा नसून बोकड आहे,' असे उत्तर त्या ब्राह्मणाने देताच तो भामटा त्याला म्हणाला, 'भटजी, कुणाला चांगलं सांगण्याची सोय नाही हेच



खरं. तुम्हाला तो कुत्रा बोकड वाटतोय ना? मग वाटल्यास त्याला घरी नेऊन यज्ञात बळी द्या. मग तर झालं? माझं काय जातंय? तुमचं पाप तुम्हाला.'

त्या भामट्याच्या या बोलण्याचा विचार करीत तो ब्राह्मण जरा पुढे जातो न जातो तोच, वाटेत भेटलेला दुसरा भामटा म्हणाला, 'काय हो शास्त्रीबुवा, तुम्हाला वेडबीड तर नाही ना लागलं? गायीचं मेलेलं वासरू खांद्यावर घेऊन कुठे चाललात? टाकून द्या त्याला इथंच आणि घरी जाताच गोमूत्र मिसळलेल्या पाण्यानं स्नान करून शुद्ध व्हा.'

तो ब्राह्मण भांबावलेल्या मनःस्थितीत आणखी जरा पुढे जाताच तिसऱ्या भामट्याने विचारले, 'एका गाढवाच्या पोराला खांद्यावर घेऊन जाणे पंडितजी तुम्हाला शोभते का?'

हे शब्द ऐकून मात्र तो ब्राह्मण मनी चरकून स्वतःशीच म्हणाला, 'ज्या अर्थी वाटेत भेटलेल्या एकाला हा माझा बोकड कुत्रा दिसला, दुसऱ्याला गाईचे मेलेले वासरू दिसले तर तिसऱ्याला गाढवाचे पिलू भासले, त्या अर्थी हा बोकड म्हणजे क्षणोक्षणी रूपे बदलणारा मायावी राक्षस असावा. तेव्हा

याला घरी नेण्यात काय अर्थ? मनात असे म्हणून, त्याने त्या बोकडाला तिथेच सोडून दिले आणि तो आपल्या गावी परत गेला.

तो ब्राह्मण जरा दूर जाताच त्या तीन भामट्यांनी त्या बोकडाला पळवून नेले.'

ही गोष्ट सांगून सचीव स्थिरजीवी राजा मेघवर्णाला म्हणाला, 'महाराज, घुबडांचा राजा अरिमर्दन हा कितीही का हुशार असेना, त्यालाही फसवता येणे शक्य आहे. कारण-

*अभिनवसेवकविनयैः प्राघुणकोक्तैर्विलासिनीरुदितेः ।*
*धूर्तजनवचननिकरैरिह कश्चिदवंचितो नास्ति ॥*

**(नवीन नोकराचा नम्रपणा, पाहुण्याचे गोड बोलणे, विलासिनीचे लटके रडणे आणि धूर्तांचे अघळपघळ बोलणे, यांनी न फसणारा या जगात तरी कुणीच नाही.)**

सचीव स्थिरजीवी पुढे म्हणाला, 'महाराज, समजा शत्रू आपल्यापेक्षा बलवान् असला, तरी निर्धाराच्या व ऐक्याच्या बळावर आपण त्याला खलास करू. त्या क्षुद्र मुंग्यांनी निर्धार व ऐक्य करून एका नागराजाला ठार मारल्याची गोष्ट आपल्याला ठाऊक आहे का?'

मेघवर्णाने 'नाही' म्हणताच स्थिरजीवी त्याला ती गोष्ट सांगू लागला-

# गोष्ट छत्तिसावी

## ऐक्याची शक्ती न्यारी, मुंग्यांचा समूह सर्पास मारी!

'एका वारुळात 'अतिदर्प' नावाचा एक काळाकुट्ट महासर्प राहात होता. त्याला आपल्या सामर्थ्याचा अतिशय दर्प म्हणजे गर्व होता. एकदा वारुळाच्या नेहमीच्या रुंद बिळातून प्रवेश करण्याऐवजी त्याने अत्यंत अरुंद अशा बिळातून वारुळात शिरण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अंग खरचटून तो रक्तबंबाळ झाला. त्या रक्ताचा वास येताच हजारो मुंग्या एकत्रितपणे त्या सर्पावर तुटून पडल्या, आणि त्यांच्यापुढे काही एक न चालून, तो महासर्प अखेर त्यांच्या भक्ष्यस्थानी पडला' ही गोष्ट सांगून सचीव स्थिरजीवी राजा मेघवर्णाला म्हणाला, 'महाराज, शत्रूचा नि:पात करण्यासाठी आपल्या इतर मंत्र्यांनीच नव्हे, तर सुरुवातीला मीही जे उपाय सुचविले त्यापेक्षा एक वेगळाच उपाय आता माझ्या डोक्यात आला आहे.'

'तो कोणता?' अशी विचारणा राजा मेघवर्णाने केली असता स्थिरजीवी सांगू लागला, 'महाराज, "हा शत्रूला फितूर झाला आहे.' अशी खोटीच अफवा माझ्याबद्दल आपल्या राज्यात उठवा. त्यानंतर मी मरणार नाही अशा बेताने मला चोची मारून व भरीला बाहेरचे रक्त आणून ते माझ्या अंगाला फासून मला रक्तबंबाळ करा. एवढे झाल्यावर तुम्ही सर्व प्रजाजनांसह ऋष्यमूक पर्वतावर निघून जा. रात्री आपला शत्रू अरिमर्दन आला की, मी त्याच्यासमोर तुमची निंदा करीन, तुमच्याविरुद्ध मदत

करण्याचे त्याला आमिष दाखवीन आणि मला त्याच्यासंगे घेऊन जाण्याबद्दल मी त्याला विनंती करीन. माझी खात्री आहे की, तो मला मोठ्या आनंदाने त्याच्यासंगे घेऊन जाईल. त्याच्याकडे गेल्यावर, घुबडांना दिवसा दिसत नसल्यामुळे, संधी साधून त्या अरिमर्दनासह त्याच्याकडील महत्त्वाच्या व्यक्तींचे मी प्राण घेईन आणि चोरवाटेने इकडे पळून येईन. हे करीत असताना एखाद् वेळ मलाही प्राणांना मुकावे लागेल. पण या जगात मायभूमी हीच सर्वांत श्रेष्ठ आहे आणि तिच्या रक्षणासाठी - प्रसंग आल्यास - आत्मबलिदान करणे, हे तिच्या प्रत्येक सुजाण सुपुत्राचे पवित्र कर्तव्य आहे.'

स्थिरजीवीचे हे म्हणणे पटून, राजा मेघवर्णाने तो शत्रूला फितूर झाल्याची अफवा सर्वत्र पसरविली. सर्व कावळे त्याला 'फितूर' म्हणून शिव्या देऊ लागले. मग राजा मेघवर्णाने त्याला चोची मारून त्याच्या अंगातून रक्त काढले व काही रक्त चूपचाप बाहेरून आणून त्याच्या अंगाला फासले. मग त्याला त्याच वडाच्या झाडाखाली टाकून देऊन मेघवर्ण आणि त्याचे अनुयायी ऋष्यमूक पर्वताकडे निघून गेले.

'सचीव स्थिरजीवीवर शत्रूला फितूर झाल्याचा आरोप घेऊन राजा मेघवर्णाने त्याला रक्तबंबाळ केले आणि राजा व त्याचे अनुयायी कुठेतरी निघून गेले, 'ही बातमी अरिमर्दनाचा हेर म्हणून मेघवर्णाच्या राज्यात गुप्तपणे वावरणाऱ्या होला पक्ष्याने आपल्या धन्याला दिली. रात्री स्वतः अरिमर्दनाने त्या वटवृक्षाकडे येऊन त्याची ती दीन स्थिती पाहिली.

'अरिमर्दनाकडून आता आपली चौकशी होणार व मग आपल्याला आपले काम सहज तडीस नेता येणार, या विचाराने स्थिरजीवी स्वतःशीच म्हणाला -

*अनारम्भो हि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम् ।*
*प्रारभ्यस्त्यान्तगमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम् ॥*

**(एखाद्या कामाला ते आवाक्याबाहेरचे वाटल्यास प्रारंभ न करणे हे बुद्धीचे पहिले लक्षण आहे, पण एकदा का एखाद्या कामाला हात घातला, की ते तडीस नेणे हे बुद्धीचे दुसरे लक्षण आहे.)**

तो अशा तऱ्हेचा विचार करीत असतानाच अरिमर्दनाने त्याच्यापाशी जाऊन त्याला मुद्दामच त्याच्या त्या स्थितीचे कारण विचारता, स्थिरजीवी त्याला वंदन करून म्हणाला, 'महाराज, राजा मेघवर्णाने आपल्यासारख्या वीरश्रेष्ठाशी युद्ध करण्याचा विचार चालविला होता. पण मी त्याला म्हणालो, महाराज असा अविचार करू नका. अरिमर्दनमहाराजांशी लढणे, म्हणजे पतंगाने दिव्यावर झेप घेण्यासारखे आहे. तेव्हा त्यांच्याशी नमून वागा. मी त्याला असे त्याच्या हिताचे सांगितले, म्हणून त्याने मला फितूर ठरवून असे मारमार मारले आणि तो व त्याचे प्रजाजन कुठेतरी निघून गेले. महाराज, आपण मला आश्रय दिलात, तर मी त्या मूर्ख मेघवर्णाच्या नव्या मुक्कामाच्या ठिकाणाचा ठावठिकाणा मिळवीन आणि त्याचा निःपात करण्यात आपल्याला मदत करीन.'

'शत्रूचा एक जाणकार सचीव आपल्याला येऊन मिळत आहे,' हे पाहून मनी आनंदून गेलेल्या अरिमर्दनाने 'याला आश्रय द्यावा का?' असा प्रश्न रक्ताक्ष, क्रूराक्ष, दीप्ताक्ष, वक्रनास व प्राकारकर्ण या आपल्या पाच मंत्र्यांपैकी रक्ताक्षाला केला असता तो म्हणाला, 'महाराज, राजा मेघवर्णाच्या विश्वासातल्या या सचिवाची, तो नुसत्या संशयापोटी अशी दुर्दशा करील, हे मनाला पटत नाही. तेव्हा यात काही कपट असावे असे मानून आपण ताबडतोब याला जीवे मारावे. आपण म्हणाल की, याला आश्रय दिला तरी हा दुबळा म्हातारा आपले काय वाईट करू शकेल? पण एक शास्त्रवचन लक्षात घ्या. -

*हीनः शत्रुर्निहन्तव्यो यावन्न बलवान् भवेत् ।*
*प्राप्तस्वपौरुषबलः पश्चाद्भवति दुर्जयः ॥*

**(शत्रू मामुली जरी असला, तरी तो बलवान होण्यापूर्वीच त्याला ठार मारावे. नाहीतर - कुणाची मदत मिळाल्यास - तो पुढे जिंकण्यास कठीण होतो.)**

रक्ताक्ष पुढे म्हणाला, 'महाराज, या स्थिरजीवीला आश्रय देणे अविचाराचे ठरेल. अविचारामुळे त्या ब्राह्मणाच्या मुलाला प्राणांना कसे मुकावे लागेल, ती गोष्ट आपल्याला ठाऊक आहे ना?' अरिमर्दनाने ती गोष्ट मला माहीत नाही,' असे म्हणताच रक्ताक्ष म्हणाला, 'महाराज, ती गोष्ट काय आहे -

# गोष्ट सदोतिसावी

## अविचाराने केलेली कृती, प्रसंगी घेई प्राणांची आहुती!

हरिदत्त नावाचा एक गरीब ब्राह्मण एके दिवशी आपल्या शेताच्या बांधावरील वृक्षाच्या छायेत बसला असता, त्याला जवळच असलेल्या वारुळातून बाहेर डोकावणारा, एक भला मोठा नाग दिसला. त्याला पाहून, 'हा आपल्या शेताची राखण करणारा 'क्षेत्रपाल' असावा' असे वाटून त्याने त्याला नमस्कार केला, व कुठून तरी वाटीभर दूध आणून व ती वाटी त्या नागापुढे ठेवून तो त्याला म्हणाला, 'हे क्षेत्रपाला, तू इथे राहतोस हे ठाऊक नसल्यामुळे माझे आजवर तुझ्याकडे दुर्लक्ष झाले. त्याबद्दल मला क्षमा कर व मी आणलेल्या या दुधाचा स्वीकार करून, माझ्यावर कृपा कर.' याप्रमाणे बोलून तो ब्राह्मण आपल्या घरी निघून गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी हरिदत्त त्या वारुळापाशी पुन्हा वाटीभर दूध ठेवायला गेला, असता त्याला आदल्या दिवशी ठेवलेल्या वाटीतील दूध नागाने पिऊन, तिच्यात 'दिनार' नावाचे एक सुवर्णनाणे ठेवले असल्याचे आढळून आले. मग दररोज सकाळी त्याने वाटीभर दूध त्या वारुळाच्या तोंडाशी ठेवावे व दुसऱ्या दिवशी सोन्याच्या दिनारासहित असलेली आदल्या दिवशीची वाटी घेऊन चूपचाप घरी जावे, असा दिनक्रम सुरू झाला. थोड्याच दिवसांत त्या ब्राह्मणाची परिस्थिती सुधारली.

a

एके दिवशी हरिदत्ताने तीन-चार दिवसांकरिता बाहेरगावी जाताना, नागाला दुधाची वाटी नेऊन देण्याचे व त्याने दिलेले सुवर्णनाणे गुपचूप घरी घेऊन येण्याचे काम आपल्या मुलावर सोपविले.

पण शेतावर गेलेल्या त्या मुलाला, आदल्या दिवशीच्या वाटीत दिनार दिसताच तो मनात म्हणाला, 'हे वारूळ सोन्याच्या दिनारांनी वास्तविक खच्चून भरलेले असणार. असे असूनही हा कंजूष नागोबा वाटीभर दुधाच्या बदल्यात फक्त एकच दिनार देतो. पण आपण जर याला मारले व याचे वारुळ खोदले, तर आपल्याला एकदम हजारो दिनार मिळून, आपण एका दिवसात श्रीमंत होऊ.' मनात असा विचार येताच, त्या मुलाने तो नाग बाहेर येताच त्याच्या मस्तकावर हातातल्या काठीने जोरदार प्रहार केला. परंतु त्या नागाच्या आयुष्याची दोरी बळकट म्हणून, ती काठी त्याच्या फणेला चुटपुटती लागली व तो वाचला. मात्र लगेच त्या मुलाच्या अंगावर झेपावून त्या नागाने त्याला कडकडून दंश केला व त्यामुळे तो मुलगा तत्क्षणीच मरण पावला. मग त्या मुलाच्या नातेवाईकांनी त्याच्या प्रेताला अग्नी दिला.

दुसऱ्या दिवशी ब्राह्मण घरी परतताच, त्याला घडलेला प्रकार कळला व तो रडू लागला. त्याचे नातेवाईक त्याचे सांत्वन करू लागले, तेव्हा दुःखाचे दीर्घ उच्छ्वास सोडीत तो ब्राह्मण त्यांना म्हणाला, 'आपल्या हितचिंतकांशी जे क्रूरपणे वागतात, ते पद्मसरोवरातील सुवर्णहंसांना गमावून बसलेल्या राजा चित्ररथाप्रमाणे नंतर पश्चात्तापदग्ध होतात.'

a

'राजा चित्ररथाची ती गोष्ट काय आहे?' असा प्रश्न त्या नातेवाईकांनी केला असता हरिदत्त त्यांना ती गोष्ट सांगू लागला.





a

## गोष्ट अडतिसावी

# दिलेला शब्द जो मोडतो,
# तो पुढे स्वतःचे नुकसान करून घेतो.

राजा चित्ररथाने आपल्या राजवाड्यालगतच्या 'पद्मसर' नावाच्या सरोवरात जे सोनेरी हंस ठेवले होते, त्यांना कुणी मारू नये वा पळवू नये, म्हणून त्याने त्या सरोवराभोवती - राखणीसाठी - काही सैनिक ठेवले होते.

एकदा बाहेरून आलेला एक मोठा सोनेरी पक्षी त्या सरोवरात शिरू लागला असता, ते हंस त्याला म्हणाले, 'तू या सरोवरात येऊ नकोस. दर सहा महिन्यांनी चित्ररथमहाराजांना आमच्यापैकी प्रत्येक हंसाने एक सुवर्णपीस देण्याच्या करारावर आम्ही हे सरोवर घेतले असल्याने, तुला आम्ही या सरोवरात येऊ देणार नाही.'

त्या हंसाचे हे बोलणे ऐकून तो पक्षी राजा चित्ररथाकडे गेला व त्याला खोटेच सांगू लागला, 'महाराज, वास्तविक 'पद्मसर' हे सरोवर तुमच्या मालकीचे, पण त्यात तुमच्या कृपेने राहणारे उद्धट हंस मला म्हणाले, 'या सरोवरावर आमचा हक्क असल्याने प्रत्यक्ष राजे चित्ररथ यांनासुद्धा तुला यात राहायला सांगण्याचा अधिकार नाही.' हे ऐकताच मागचा पुढचा विचार

a

न करता राजा चित्ररथाने आपल्या सेवकांना त्या हंसांना ठार मारून आपल्याकडे घेऊन येण्याची आज्ञा फर्मावली.

राजाच्या आज्ञेनुसार ते सेवक हाती काठ्या घेऊन त्या सरोवराकडे धावू लागताच, आपल्यावर आलेल्या संकटाची कल्पना येऊन एक वृद्ध सुवर्णहंस आपल्या इतर सर्व ज्ञातिबांधवांना म्हणाला, 'राजा चित्ररथाने पाहुण्या पक्ष्याच्या नादी लागून आपले जीव घ्यायचे ठरविलेले दिसते. तेव्हा आपण इथून ताबडतोब निघून जाऊ या.' आपल्या म्होरक्याच्या सांगण्याप्रमाणे ते सर्व हंस लगोलग उडून गेले, पण त्यामुळे त्यांचे सुवर्णपंख मिळणे बंद होऊन, त्या राजाचेच मोठे नुकसान झाले. अविचार हा असा नुकसान करणारा दुर्गुण आहे.'

ही गोष्ट आपल्या नातेवाईकांना सांगून झाल्यावर व ते तिथून निघून गेल्यावर हरिदत्त नावाचा तो ब्राह्मण दुधाची वाटी घेऊन शेतावर गेला. त्याने ती दुधाची वाटी वारुळाच्या तोंडाशी ठेवताच तो नाग त्याला म्हणाला, 'हे लोभी माणसा, मी दंश करून तुझ्या मुलाचा प्राण घेतला असूनसुद्धा, तू जी दुधाची वाटी घेऊन मजकडे आला आहेस, तो माझ्यावरील प्रेमापोटी नसून, पदरात सुवर्णदिनार पाडून घेण्यासाठी आला आहेस. वास्तविक तुझ्या मनात माझ्याविषयी रागच आहे. आता तू माझ्याकडे आलाच आहेस, तर मी तुला एक मौल्यवान रत्न देतो, पण इतःपर मात्र तू माझ्याकडे येऊ नकोस. कारण जोवर तुझ्या मुलाने माझ्या फणेवर काठीचा प्रहार केल्याची आठवण

मला, आणि तुझ्या मुलाला दंश करून मारल्याची आठवण तुला राहणार आहे, तोवर तुझ्यामाझ्यात स्नेहसंबंध निर्माण होणे अशक्य आहे.'

ही गोष्ट राजा अरिमर्दनाला सांगून त्याचा मंत्री रक्ताक्ष हा त्याला पुढे म्हणाला, 'महाराज, स्वतःचे प्राण वाचविण्यासाठी स्थिरजीवी हा जरी आपल्याशी चांगला वागत असला तरी ते प्रेम काही खरे नाही. आपण आजवर मारलेल्या कावळ्यांमध्ये या स्थिरजीवीचेही आप्तसंबंधी असणारच असणार. तेव्हा ती कटु आठवण जोवर त्याला राहणार आहे, आणि त्याचा राजा मेघवर्ण हा आपल्या मनात राहणार आहे, तोवर आम्हा घुबडांत आणि त्या कावळ्यांपैकी कुणाताही मैत्रीसंबंध निर्माण होणे ही अशक्य गोष्ट आहे. अशा स्थितीत या स्थिरजीवीला आश्रय न देता, त्याला मारणे हेच श्रेयस्कर आहे.'

रक्ताक्षाचे म्हणणे ऐकून झाल्यावर राजा अरिमर्दनाने आपला दुसरा मंत्री क्रूराक्ष याच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले असता तो अरिमर्दनाला म्हणाला, 'महाराज, रक्ताक्षाचे म्हणणे साफ चूक आहे. धर्मशास्त्रसुद्धा 'शरणागताला मारू नये' असे सांगते. म्हणून तर एका कबुतराने त्याच्याकडे याचना करणाऱ्या एक पारध्याला संतुष्ट करण्यासाठी आपले स्वतःचे मांस दिले.'

'ते कसे?'

असे राजा अरिमर्दनाने विचारता क्रूराक्ष म्हणाला, 'ऐका महाराज-

# गोष्ट एकोणचाळीसावी

## अतिथीला जो संतुष्ट करी, तोच खरा धन्य या संसारी.

अन्नाच्या शोधार्थ घरट्यातुन बाहेर पडलेल्या एका कबुतरीला एका पारध्याने जाळ्यात पकडले व तिला आपल्या हाती असलेल्या पिंजऱ्यात अडकविले. आता आणखी असेच काही पक्षी पकडून घरी जाण्याच्या विचारात तो पारधी असता, एकाएकी जोराची वावटाळ सुरू झाली व दिशान्दिशा धुळीने भरून गेल्या. तेव्हा जाळे, पिंजरा व काठी यांच्यासह तो एका डेरेदार वृक्षाखाली जाऊन बसला.

त्याच वेळी त्या वृक्षावर घरट्यात राहणारे एक कबूतर मोठ्याने आकांत करीत म्हणू लागले, 'हाय रे हाय! माझी प्राणप्रिय पत्नी बाहेर गेली आणि नेमक्या ताच वेळी ही तुफानी वावटळ धिंगाणा घालू लागली! देवा, जिच्यामुळे माझे जीवन सुखी व म्हणून धन्य झाले, त्या माझ्या प्राणप्रियेचे तू रक्षण कर. म्हटलंच आहे –

*पतिव्रता पतिप्राणा पत्युः प्रियहिते रता ।*
*यस्य स्यादीदृशी भार्या धन्यः स पुरुषो भुवि ॥*

**(पतिव्रता ही जणू तिच्या पतीचा प्राण असून, ती पतीला प्रिय व हितकारक अशा गोष्टी करण्यातच दंग असते, अशी महती ज्याला लाभली, तो पुरुष या भूलोकी धन्य होय.)**

शिवाय -

*न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ।*
*गृहं हि गृहिणीहीनमरण्यसदृशं मतम् ॥*

**(नुसते घर हे 'घर' नसून, गृहिणी हेच खरे घर मानले जाते. गृहिणीशिवाय जे घर, ते अरण्यवत समजावे.)**

आपला पती आपल्या विरहाने व्याकूळ होऊन शोक करीत आहे व आपले गुणगान गात आहेसे ऐकून वास्तविक तशाही स्थितीत त्या कबुतरीला समाधान वाटले. पण त्याच वेळी ती मनात म्हणाली, 'तसं पाहता माझ्या पतीनं माझं एवढं गुणगान का बरं करावं? पतीच्या सुखदुःखाशी समरस होणं हे जे पतिव्रतेचं कर्तव्य, तेच मी करीत आले ना? कारण म्हटलंच आहे-

*न सा स्त्रीत्यभिमन्तव्या यस्यां भर्ता न तुष्यति ।*
*तुष्टे भर्तरि नारीणां तुष्टाः स्युः सर्वदेवताः ॥*

**(जिच्यावर तिचा पती संतुष्ट नसतो, तिला 'स्त्री' म्हणू नये. ज्या स्त्रियांवर त्यांचे पती संतुष्ट असतात, त्यांच्यावर सर्व देवता संतुष्ट होतात.)**

शिवाय -

*मितं ददाति हि पिता मितं भ्राता मितं सुतः ।*
*अमितस्य हि दातारं भर्तारं का न पूजयेत ॥*

**(पिता जे देतो त्याला मर्यादा असते, त्याचप्रमाणे भाऊ किंवा मुलगा हेही मर्यादेतच देतात. मग अमर्याद देणाऱ्या पतीला पूजनीय का मानू नये?)**

त्या कबुतरीच्या मनात अशा तऱ्हेचे विचार चालू असतानाच, थंड हेवेने गारठून गेलेला पण पोटात मात्र भुकेचा वणवा भडकलेला तो पारधी मोठ्याने म्हणाला, 'आता वावटळीचा जोर काहीसा ओसरला असला, तरी दशदिशा अंधारून गेल्या असल्याने, मला घराची वाट दिसेनाशी झाली आहे. अशा स्थितीत माझी थंडी व भूक कुणी नाहीशी करील का?'

पारध्याने केलेली ती याचना ऐकून, त्याच्याजवळ असलेल्या पिंजऱ्यातील कबुतरी झाडावरील आपल्या पतीला उद्देशून मोठ्याने म्हणाली, 'नाथ! जरी या पारध्याने मला जाळ्यात पकडून पिंजऱ्यात अडकवून ठेवले असले, तरी मला त्याचे दुःख होत नाही. कारण आपले माझ्यावरचे प्रेम पाहून मला माझे जीवन धन्य झाल्यासारखे वाटत आहे. आता एकच करा, हा पारधी जरी आपला शत्रू असला तरी, आता तो याचक

म्हणून आपल्या घरट्यापुढे आला आहे. तेव्हा त्याच्या इच्छेनुसार त्याची थंडी वा भूक नाहीशी करून, त्याला तृप्त करा. कारण म्हटलंच आहे-

*यः सायमतिथिं प्राप्तं यथाशक्ति न पूजयेत् ।*
*तस्यासौ दुष्कृत दत्त्वा सुकृतं चापकर्षति ॥*

**(अतिथी आला असता जो त्याचा यथाशक्ती सन्मान करीत नाही, त्याला तो अतिथी आपले पाप देऊन व त्याचे पुण्य घेऊन जात असतो.)**

आपल्या पत्नीला मारून खाण्यासाठी, तिला पिंजऱ्यात अडकवून ठेवणाऱ्या त्या पारध्याचा राग आला असूनही, त्या कबुतराने त्याला सुका पाचोळा गोळा करायला सांगितला आणि स्वतः कुठून तरी विस्तव आणून तो त्या पाचोळयाच्या राशीवर टाकला. मग त्या शेकोटीपाशी बसून पारधी शेक घेऊ लागताच ते कबूतर त्याला म्हणाले, 'हे पारध्या, मी तुझी एक इच्छा पूर्ण केली. मात्र तुझी भूक भागविण्यासाठी मजपाशी अन्न वा धान्य नसल्याने, मी स्वतःच या शेकोटीत उडी घेतो. मी पुरेसा भाजून निघालो की, तू मला बाहेर काढून खा.' असे म्हणून त्या कबुतराने त्या शेकोटीत उडी घेतली.

त्या कबुतराचा तो असीम त्याग पाहून, तो पारधी मनात म्हणाला, 'दुसऱ्याची भूक भागविण्यासाठी स्वतःचे प्राण देणारे हे कबुतर कुठे, आणि

स्वतःची भूक भागविण्यासाठी निरपराध प्राण्यांचे जीव घेणारा महानीच असा मी कुठे? त्याला आतापर्यंतच्या आपल्या जीवनाचा उबग आला. त्याने पश्चात्तापदग्ध मनाने त्या कबुतरीला ताबडतोब आपल्या पिंजऱ्यातून मुक्त केले. त्याबरोबर शेकोटीत होरपळत निघत असलेल्या पतीकडे बघत ती म्हणाली, 'नाथ, मजवर प्राणांपलीकडे प्रेम करणारे आपण निघून गेल्यावर, मी या जगात एकटी कशी काय जगू?' असे म्हणून तिनेही त्या धगधगत्या शेकोटीत उडी घेतली. या दोघांचा आपल्यामुळे अंत झाला, या कल्पनेने तो पारधी एवढा दुःखी झाला की, त्यानेही त्या अग्निकुंडात उडी घेऊन आपल्या जीवनाचा अंत करून घेतला.

ही गोष्ट सांगून मंत्री क्रूराक्ष राजा अरिमर्दनाला म्हणाला, 'महाराज, शरणागताला आश्रय देणे ही थोरांची परंपरा असल्याने, त्या स्थिरजीवीला मारण्याऐवजी आश्रय देणेच योग्य ठरेल.'

यानंतर अरिमर्दनाने तिसरा मंत्री दीप्ताक्ष याला तोच प्रश्न विचारला असता तो म्हणाला, 'महाराज, त्या वृद्ध वाण्याने चोराच्या बाबतीतसुद्धा औदार्य दाखविले, मग आपला होऊ इच्छिणाऱ्या या स्थिरजीवीला जीवदान देण्यात वावगे ते काय?' यावर 'ती वाण्याची गोष्ट काय आहे,' अशी पृच्छा राजा अरिमर्दनाने केली असता दीप्ताक्ष म्हणाला, 'ऐका महाराज-

a

# गोष्ट चाळीसावी

## चुकलेल्याला मार्गी लावावे व पदरी पुण्य पाडून घ्यावे.

एका गावी 'कामातुर' नावाचा एक वाणी राहात होता. म्हातारपणी त्याची बायको मरताच, त्याने दारिद्र्याने गांजलेल्या दुसऱ्या एका वाण्याला भरपूर पैसे देऊन, त्याच्या तरुण मुलीशी लग्न केले. पण ती त्या म्हाताऱ्या नवऱ्याला साधे जवळसुद्धा येऊ देईना.

एके दिवशी मध्यरात्री तो वाणी व त्याची तरुण बायको एकमेकांकडे पाठ करून पलंगावर झोपली असता, त्यांच्या घरात चोर शिरला. त्याच्या खुडबुडीने जाग आलेल्या त्या तरुणीच्या तो दृष्टीस पडताच, ती घाबरली व आपल्या म्हाताऱ्या नवऱ्याला बिलगली. त्या नवऱ्याला या गोष्टीचे आश्चर्य वाटले. पण डोळे उघडताच, जेव्हा त्याला कोपऱ्यात चूपचाप उभा असलेला चोर दिसला, तेव्हा आपली बायको आपल्याला का बिलगली याचा उलगडा होऊन तो त्या चोराला म्हणाला, 'तुला भ्यायल्यामुळे का होईना, माझी बायको मला बिलगली. नाहीतर आजवर ती मला कधी साधा स्पर्शही करीत नव्हती. देव तुझे भले करो. जा तू, तू चोर असलास तरी मी तुला क्षमा करतो.'

चोर म्हणाला, 'माझ्यावर उपासमारीचा प्रसंग आल्यामुळे मी चोर बनलो. त्यामुळे मी खरा गुन्हेगार नाही. तू मात्र - तुला नात शोभेल अशा - एका मुलीशी लग्न केल्यामुळे, खरा गुन्हेगार आहेस.'

a

चोराच्या बोलण्याने, पश्चात्ताप पावून, त्या वृद्ध पण धनिक वाण्याने त्याला आपले अर्धे धन दिले व म्हटले, 'यापुढे या पैशात उद्योगधंदा करून तू चांगले जीवन जग व आणखीही काही हवे असले तर माझ्याकडे येऊन माग.'

यावर तो चोर म्हणाला, 'हे वाण्या, तू मला तुझे काही धन दिलेस त्याबद्दल मी तुझा आभारी आहे. पण मला जसा तू सन्मार्गाने जायला सांगतोस, तसा तूही सन्मार्गाने जा. त्या तरुणीचे आयुष्य वाया न घालविता तिचा मोह सोड व तिचे माझ्याशी लग्न लावून दे. तू मला आणखी काही हवे असले तर ते मागायला सांगितलेस, म्हणून मी हे मागितले. तुझा तसा पक्का विचार झाला तर मला कळव म्हणजे मी तिला न्यायला येईन.'

ही गोष्ट मंत्री दीप्ताक्ष याने अरिमर्दनराजाला सांगितली व तो त्याला म्हणाला, 'महाराज, त्या वृद्ध वाण्याने त्याच्याकडे चोरी करायला आलेल्या एका चोराला आपले धन दिले, मग स्थिरजीवी हा तर शरणार्थी आहे. तेव्हा त्याला आश्रय का देऊ नये?'

मग राजा अरिमर्दनाने आपला चौथा मंत्री वक्रनास याला सल्ला विचारला असता, तो म्हणाला, 'स्थिरजीवी हा जरी शत्रू असला तरी, कावळ्यांची मर्मस्थाने समजून घेण्यासाठी त्याचा उपयोग करून घ्यावा. राक्षस व चोर याच्या भांडणात जसा त्या ब्राह्मणाचा फायदा झाला, तसा आपलाही फायदा होऊन जाईल.' राजा अरिमर्दनाने ती गोष्ट काय आहे?' असे विचारले असता वक्रनीस म्हणाला, 'ती गंमतीदार गोष्ट आहे -

# गोष्ट एकेचाळिसावी

## जेव्हा झगडा दोघांचा होई,
## तेव्हा लाभ तिसऱ्याच कुणाकडे जाई!

एका गावी 'द्रोण' नावाचा एक ब्राह्मण राहात होता. त्याला कुणीतरी गाईची दोन वासरे दान म्हणून दिली. ती गुटगुटीत वासरे एका चोराच्या मनात भरली. एके रात्री तो चोर त्या ब्राह्मणाच्या घराकडे ती वासरे चोरण्याच्या उद्देशाने चालला असता, त्याला एक महाभयंकर राक्षस भेटला. चोराने भीतभीत त्याची चौकशी केली असता तो म्हणाला, 'मी ब्रह्मराक्षस आहे. गेल्या तीन दिवसाच्या उपवासाचे पारणे फेडण्याकरिता मी द्रोण नावाच्या ब्राह्मणाला खायला जात आहे. तू कोण व कुठे चालला आहेस?' चोर म्हणाला, 'माझं नाव क्रूरकर्मा. चोरी करण्यात माझा हात धरणारा या पृथ्वीतलवर दुसरा कुणी नाही. मीही त्या द्रोणाकडेच त्याची वासरे चोरण्याकरिता चाललो असल्याने, आपण संगती सोबतीने जाऊ या.'

त्याप्रमाणे ते दोघे त्या ब्राह्मणाच्या घरी गेले. पण झोपलेल्या त्या ब्राह्मणाला खायला तो राक्षस जाऊ लागताच चोर त्याला म्हणाला, 'हे राक्षसा, अरे तू त्या ब्राह्मणाला खाताना जर का तो किंचाळला, तर शेजारीपाजारी जमा होऊ लागतील आणि वासरे न घेताच पळून जाण्याचा प्रसंग माझ्यावर येईल. तेव्हा अगोदर मी वासरे पळवतो, मग तू त्या ब्राह्मणाला खा.'

a

ब्रह्मराक्षस म्हणाला, 'छे छे! त्या दोन वासरांना तू पळवून नेत असताना, जर का ती हंबरली, तर त्या ब्राह्मणाला जाग येईल व माझ्याकडे नजर जाताच, मला असह्य होणाऱ्या एका देवाचे नाव घेऊन तो मला पळवून लावील. तेव्हा ब्राह्मणाला खाण्याचे काम मी अगोदर करतो, वासरे पळविण्याचे काम तू माझ्यानंतर कर.' अशा तऱ्हेने त्या दोघांत कुणी आपले काम अगोदर करायचे याबद्दल कडाक्याचे भांडण सुरू झाल्याने तो ब्राह्मण जागा झाला आणि त्याने कुलदेवतेच्या नावाचा गजर सुरू करताच, तो राक्षस पळून गेला. मागे राहिलेल्या चोराला त्या ब्राह्मणाने काठीने चोप पिटाळून लावले. ही गोष्ट सांगून मंत्री वक्रनास राजा अरिमर्दनास म्हणाला, 'महाराज, माझ्या दृष्टीनं मेघवर्न व स्थिरजीवी हे दोघेही जरी शत्रू असले, तरी त्या दोघांमध्ये आता वैर निर्माण झाले असल्याने, त्या दोघांना एकमेकांविरुद्ध लढवावे व त्यायोगे आपले हित आपण साधून घ्यावे.'

यानंतर आपला पाचवा मंत्री प्राकारकर्ण याला त्या बाबतीत अरिमर्दनाने विचारता, तो म्हणाला, 'महाराज, स्थिरजीवी हा जरी आपला एकेकाळचा शत्रू असला, तरी तो आता आपला होऊ पाहात आहे. अशा वेळी त्याला आपण सांभाळून न घेतल्यास, वारुळातला नाग व पोटातला नाग या दोघांचा जसा नाश झाला, तसाच नाश होण्याचा प्रसंग त्या कावळ्यांवर व आम्हा घुबडांवर येईल.'

'तो कसा काय?' असे अरिमर्दनाने विचारताच प्राकारकर्ण म्हणाला, 'ऐका-

## गोष्ट बेचाळिसावी

### नशीब व प्रयत्न एकत्र येती आणि प्राण्याचे भविष्य घडविती.

'देवशक्ती' नावाच्या एका राजाच्या मुलाच्या पोटात नाग वाढू लागल्याने, त्याची अन्नपाण्यावरील वासना उडाली आणि त्याची प्रकृतीही दिवसानुदिवस अधिकाधिक खंगत चालली. अखेर एके दिवशी तो राजकुमार कुणाला न सांगतासवरता दुसऱ्या राज्यातल्या एका गावी गेला व एका देवळात राहू लागला.

त्या राज्याच्या राजाला दोन राजकन्या होत्या. त्या राजाने एकदा त्या राजकन्यांना 'तुमचे सुख कुणाच्या हाती?' असा प्रश्न केला असता मोठी राजकन्या म्हणाली, 'बाबा, माझे सुख तुमच्या हाती.' तर धाकटी म्हणाली, 'माझे सुख, माझे नशीब व प्रयत्न यांच्या हाती.'

धाकटीच्या या उत्तराने रागावलेल्या राजाने तिचे लग्न मुद्दाम त्या देवळात राहणाऱ्या अस्थिपंजर राजकुमाराशी लावून देऊन तो तिला म्हणाला, 'तुझे सुख तुझ्या दैवाच्या व प्रयत्नाच्या हाती आहे ना? मग आता तू सुखी होऊन दाखव.'

'आपला पती आपल्याला साजेसा नसला तरी त्याचा यात काही अपराध नाही,' हे लक्षात घेऊन ती राजकन्या त्याची मनोभावे सेवा करी. थोड्याच दिवसांत ती त्याला घेऊन दूरच्या गावी गेली व एका तळयाच्या काठी त्याच्यासह उतरली. मग पतीला सामानाची राखण करायला सांगून ती स्वैपाकाचे काही जिन्नस आणायला गावात गेली. पण जिन्नस घेऊन ती परत येते तो, एक वेगळाच प्रकार तिच्या दृष्टीस पडला. तिचा पती गाढ झोपला होता. त्याच्या पोटातला नाग त्याच्या तोंडावाटे बाहेर येऊन, जवळच्या वारुळातून बाहेर आलेल्या दुसऱ्या नागाशी मनुष्यवाणीने काहीतरी बोलत होता. त्या राजकन्येने एका झाडाआड दडून, त्या दोन नागांचे बोलणे ऐकायला सुरुवात केली.

त्या राजपुत्राच्या तोंडातून बाहेर आलेल्या नागाला तो वारुळातला नाग म्हणाला, 'त्या निरपराध राजपुत्राच्या पोटात राहून तू त्याला विनाकारण का त्रास देतोस? एखाद्या नामवंत वैद्याच्या सल्ल्याप्रमाणे जर तो राजपुत्र मिऱ्यांचे पाणी प्यायला तर तू तडफडत बाहेर येशील व थोड्याच वेळात मरून जाशील.'

यावर राजपुत्राच्या पोटातून बाहेर पडलेला नाग त्या वारुळातील नागाला म्हणाला, 'तू तरी रत्नामोहरांनी भरलेले हंडे पुरलेल्या जागी मुद्दाम

वारूळ उभारून, ती अपार संपत्ती का वाया घालवतोस? त्या वारुळात अपार धन असल्याचे कुणाला कळले, आणि त्याने जर त्या वारुळात उकळते तेल वा पाणी ओतले, तर तुला तडफडून मरण येईल व त्या माणसाच्या हाती ते अपार धन जाईल.' त्यांचा तो संवाद झाडाआडून ऐकून राजकन्येने ते दोन्हीही उपाय प्रत्यक्ष आचरणात आणले आणि आपल्या पतीला त्या सापाच्या उपाधीतून मुक्त करून, त्या वारुळाखालचे अपार धनही मिळविले. मग ते दोघेही अत्यंत सुखी जीवन जगू लागले.'

ही गोष्ट सांगून मंत्री प्राकारकर्ण राजा अरिमर्दनाला म्हणाला, 'म्हणून मी म्हणतो की, आपला शत्रू मेघवर्ण याचा नायनाट करण्यासाठी आपण या स्थिरजीवीचा उपयोग करून घ्यावे व आपले काम झाल्यावर या स्थिरजीवीलाही त्या मेघवर्णाच्याच मार्गाने पाठवावा.'

मंत्री प्राकारकर्ण याचा सल्ला पटल्यामुळे राजा अरिमर्दन हा आपले मंत्री, अनुयायी व स्थिरजीवी यांच्यासह आपल्या किल्ल्याकडे जाऊ लागला असता त्याचा पहिला मंत्री रक्ताक्ष हा पुन्हा राजाला म्हणाल, 'महाराज, या स्थिरजीवीचा भरंवसा देता येत नसल्याने, याला ताबडतोब मारण्याचा माझा सल्ला आपण झुगारून देऊन, ज्यांचा सल्ला आपल्या हिताचा नाही, त्यांचे आपण ऐकता, याचे परिणाम वाईट झाल्याशिवाय राहणार नाहीत.

a

म्हटलंच आहे -

*अपूज्या यत्र पूज्यन्ते पूज्यानां तु*
*त्रीणि तत्र प्रवर्तन्ते दुर्भिक्षं मरणं भयम् ॥*

**(जिथे नादानांना मान दिला जातो आणि पूजनीय अपमानिले जातात तिथे दारिद्र्य, मृत्यु व भय या तीन गोष्टी वास करतात.)**

जिवाच्या तळमळीने मंत्री रक्ताक्ष पुढे म्हणाला, 'समजा, आज जरी तुमच्या म्हणण्याप्रमाणे हा स्थिरजीवी आपल्याला येऊन मिळाला असला, तरी अखेर तो जातीने कावळा असल्याने, त्याला त्याच्या जातभाईंबद्दलच आपुलकी वाटणार. म्हणून तर एका उंदरीने अन्य जातीची मातबर स्थळे नाकारून, शेवटी एका क्षुद्र उंदराशीच लग्न केले ना?'

'ती गोष्ट काय आहे?' असे काही घुबडांनी विचारता रक्ताक्ष सांगू लागला-



# गोष्ट त्रेचाळीसावी

## परजातीचा महानही लहान भासे,
## तर स्वजातीचा लहानही महान दिसे.

याज्ञवल्यमुनी नित्याप्रमाणे एकदा गंगेत स्नान करीत असता, त्यांना ससाण्याच्या तोंडातून गंगेच्या पात्रात एक उंदराचे पिल्लू पडलेले दिसले. या पिल्लाला एखादा मोठा मासा गिळंकृत करील, त्या भयाने त्यांनी त्याला दयेपोटी उचलून आपल्या आश्रमात नेले व मंत्रसामर्थ्याने त्याचे एका लहानग्या मुलीत रूपांतर करून, तिचे लालनपालन सुरू केले. ती मुलगी जेव्हा वयात आली, तेव्हा याज्ञवल्क्यांची पत्नी त्यांना म्हणाली, 'नाथ, आपली मुलगी विवाहयोग्य झाली असता, तिच्यासाठी योग्य स्थळं शोधून का काढत नाही?' यावर मुनिवर्य म्हणाले, 'अगं, तोच विचार मी करू लागलो आहे. पण मुलीसाठी स्थळ पाहताना अनेक गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. म्हटलंच आहे -

*कुलं च शीलं च सनाथता च विद्या च वित्तं च वपुर्वयश्च ।*
*एतान् गुणान् सप्त विचिन्त्य देया कन्या बुधैः शेषमचिन्तनीयम् ॥*

**(कुल, शील, वडीलधाऱ्यांचा आधार, विद्या, धन, निकोप शरीरयष्टी व वय, या सात गोष्टी विचारात घेऊन सूज्ञांनी मुलगी द्यावी, बाकी गोष्टी विचारात घेतल्या नाहीत तरी चालेल.)**

याप्रमाणे बोलणे झाल्यावर एके दिवशी सूर्याला देवरूपात आश्रमामधे आणून याज्ञवल्क्य मुनींनी त्या मुलीला विचारले, 'बेटी, हा तेजस्वी भगवान् आदित्य तुला नवरा म्हणून पसंत आहे का?' ती मुलगी नाक उडवीत म्हणाली, 'हा रागीट दिसतो. याच्यापेक्षा श्रेष्ठ नवरा मला हवा.'

मग मेघराजाला आश्रमात आणून मुनीवर्यांनी तिला विचारले, 'बेटी, त्या तेजस्वी आदित्याला झाकून टाकण्याचे सामर्थ्य असलेला हा मेघराज तरी तुला पसंत आहे का?' कपाळावर आठ्यांचे जाळे पसरून ती म्हणाली, 'छे! हा सावळा आहे.'

मग वायुदेवाला समोर उभे करून मुनिराज त्या मुलीला म्हणाले, 'बेटी, मागल्या वेळी जो तुला दाखविला, त्या मेघराजाला कुठल्याकुठे उडवून देण्याचे सामर्थ्य असलेला हा वायुदेव तरी तुझ्या मनात भरतो का?' तोंडाचा चंबू करीत ती मुलगी म्हणाली, 'छे छे! असला चंचल नोवरा सदान कदा फिरत राहणार, माझ्या नवऱ्यानं सदैव माझ्याजवळ राहून, माझ्या रूपागुणांचं कौतुक केलं पाहिजे. शिवाय तो या वायुदेवापेक्षाही सामर्थ्यवान् असावा.'

ते ऐकून वायुदेव मिष्किलपणे म्हणाला, 'मुनिराज, हिच्या दृष्टीने पर्वतराज हाच तिला योग्य वर ठरेल. एकतर त्याला एकाच जागी बसून राहाण्याची आवड आहे आणि दुसरे म्हणजे मलाही रोखून धरण्याचे सामर्थ्य त्याच्यात असल्याने, तो माझ्यापेक्षा सामर्थ्यवान आहे.'

पण पर्वताकडे तिला नेताच, 'हा तर नुसताच बसून राहणारा आहे. हा मला नको. माझा पती मला इकडेतिकडे फिरवणारा, पण या पर्वतापेक्षा

a

सामर्थ्यवान असा हवा आहे.' असे ती म्हणताच पर्वत आतून थट्टेने पण बाहेरून गंभीरपणे म्हणाला, 'मुनिराज, त्या दृष्टीने उंदीर हा हिला योग्य वर ठरेल. कारण तो मलाही पोखरू शकतो आणि सदैव इकडेतिकडे फिरत असतो.' त्या पर्वताची ती सूचना ऐकून व काही झाले तरी ही मुलगी मुळची उंदरीच आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन याज्ञवल्क्यमुनींनी एका गलेलठ्ठ उंदराला बोलावले व त्या मुलीकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. त्याबरोबर ती मुलगी लाजत मुरकत म्हणाली, 'पिताश्री, हेच मला पसंत आहेत.' मग तिला पूर्ववत् उंदीर करून याज्ञवल्क्यमुनींनी तिचे त्या उंदराशी लग्न लावून दिले.

ही गोष्ट सांगून मंत्री रक्ताक्ष म्हणाला, 'स्वजातीकडे प्राणी असा ओढला जात असल्याने, या स्थिरजीवीचा भरंवसा देता येत नाही. म्हणून याला जिवंत ठेवणे योग्य नाही.' पण रक्ताक्षाच्या या बोलण्याकडे राजा अरिमर्दन व त्याचे अनुयायी यांनी दुर्लक्ष केले व ते स्थिरजीवीला आपल्या किल्ल्याकडे घेऊन गेले.

त्या किल्ल्यात गेल्यावर स्थिरजीवी मनात म्हणाला, 'माझ्या मेघवर्णराजाने मला मारल्यामुळे अंगातून अतिशय रक्त वाहून गेले व माझ्या अंगात चालण्या-उडण्याचेही त्राण उरले नाही, असे जे सोंग मी वठवले, ते खरे वाटले व म्हणून अरिमर्दन राजाने मला उचलून या किल्ल्यात आणण्यास त्याच्या सेवकांना सांगितले. अशा स्थितीत जर माझ्याकडून संशयास्पद हालचाल झाली आणि ती या घुबडांच्या ध्यानात आली तर

माझ्या कार्याचा विचका उडेल. तेव्हा मी काहीतरी कारण सांगून या किल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशी राहणे हेच योग्य.

मनात असा विचार येताच तो अरिमर्दनाला म्हणाला, 'महाराज, आपले जरी माझ्यावर प्रेम असले, तरी आपल्या काही जातभाईंच्या डोळ्यात मी खुपत असल्याने, मला किल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशी राहण्याची परवानगी द्या. त्यायोगे मला किल्ल्याची राखण करणेही जमेल आणि आपण प्रवेशद्वारातून जाता येता मला आपले दर्शनही सहजगत्या घडेल.' स्थिरजीवीची ही विनंती राजा अरिमर्दनाने मान्य केली व किल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशी त्याची राहण्या-खाण्याची त्याने उत्तम व्यवस्था केली.

खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था झाल्याने स्थिरजीवी दिवसेंदिवस मोराप्रमाणे तुकतुकीत होऊ लागला. ते पाहून अस्वस्थ झालेला रक्ताक्ष मात्र राजा अरिमर्दनाला व इतर मंत्र्यांना म्हणाला, 'अहो, त्या संशयास्पद व परक्या स्थिरजीवीशी अशा भोंगळ औदार्याने वागू नका, असे मी परोपरीने सांगत असतानाही तुम्ही माझे ऐकत नाही, उलट तुम्ही दिवसानुदिवस त्याला अधिकाधिक बलवान बनवीत आहात! खरं बोलायचं तर शिटीतून सोने देणाऱ्या त्या पक्ष्याच्या गोष्टीतल्याप्रमाणे मला इथेही मूर्खांचा बाजार भरल्यासारखा दिसत आहे.' यावर त्या मंत्र्यांनी 'ती गोष्ट काय आहे?' असे विचारले असता रक्ताक्ष म्हणाला, 'ऐका -

## गोष्ट चव्वेचाळिसावी

## जिथे राज्य मूर्खांचे, तिथे राहणे धोक्याचे.

एका पर्वतावरील वृक्षावर 'सिंधुक' नावाचा एक पक्षी राहात होता. त्याच्या विष्ठेतून सोन्याचा रवा पडे. एकदा त्या वृक्षाजवळून एक पारधी चालला असता, तो सिंधुक त्याच्या समक्ष शिटला. त्याच्या विष्ठेत चमकत असलेले सोने पाहून त्या पारध्याने त्याला जाळ्यात पकडले.

मग त्याला घेऊन घरी जाताना तो पारधी मनात म्हणाला, विष्ठेतून सोने देणारा पक्षी मजपाशी आहे हे वृत्त जर राजाला कळले, तर तो या पक्ष्याला तर घेऊन जाईलच, पण त्याशिवाय तो मलाही शिक्षा ठोठवील. त्यापेक्षा हा पक्षी राजाला नेऊन दिलेला बरा. मनात असे ठरवून त्याने त्या पक्ष्याचे वैशिष्ट्य राजाला सांगून, त्याला त्याच्या हवाली केले आणि राजाने त्या सिंधुकाला एक सेवेकाकरवी पिंजऱ्यात अडकविले.

तेवढ्यात त्या राजाचा प्रधान तिथे येताच, जेव्हा राजाने त्याला त्या पक्ष्याचे वैशिष्ट्य सांगितले, तेव्हा तो म्हणाला, 'महाराज, पक्ष्याच्या विष्ठेतून सोने निघणे शक्य नाही. तेव्हा तुम्ही त्या पक्ष्याला पिंजऱ्यातून मुक्त करा.' राजाने त्याप्रमाणे करताच तो पक्षी एका उंच जागी जाऊन शिटला. त्या

a

विष्ठेतून चमचमणारे सुवर्णकण पाहून राजा म्हणाला, 'अरेरे! विष्ठेतून सोने देणाऱ्या या पक्ष्याला सोडून देणारा मी मूर्ख आहे!'

यावर सिंधुक पक्षी म्हणाला, 'हे राजा, या जगात तू एकटाच काही मूर्ख नाहीस. पारध्याच्या समोर सुवर्णभरित विष्ठा शिटलो तर तो आपल्याला पकडील ही गोष्ट कळत असूनही, मी त्याच्या समक्ष शिटलो व स्वतःहून त्याच्या जाळ्यात सापडलो. तेव्हा तुझ्याप्रमाणे मीही एक मूर्खच आहे. आणि तो पारधी? विष्ठेतून सुवर्ण देणाऱ्या मला पाळून स्वतः श्रीमंत होण्याऐवजी त्याने मला तुझ्या स्वाधीन केले! तेव्हा तुझ्या-माझ्याप्रमाणे तो पारधीही मूर्खच! थोडक्यात सांगायचे तर या जगात शहाणे थोडे. सगळीकडे मूर्खांचाच बाजार!' एवढे बोलला आणि तो पक्षी उडून गेला.

ही गोष्ट आपल्या आप्त संबंधितांना सांगून रक्ताक्ष म्हणाला, 'जो हा आपला किल्ला आजवर आपले रक्षण करू शकत होता, त्याच किल्ल्यात आता आपल्या राजाने व त्याच्या तोंडपुंज्या मंत्र्यांनी स्थिरजीवीसारख्या शत्रूला आणून ठेवल्याने, यापुढे इथे राहाणाऱ्यांवर केव्हा प्राणसंकट येईल याचा भरंवसा देता येत नाही. म्हणून मी व तुम्ही इथून दूरच्या एखाद्या सुरक्षित स्थळी राहायला जाऊ या. 'गुहा कधी बोलत नाही' हे त्या चतुर कोल्ह्याने हेरले म्हणूनच त्याचे प्राण वाचले ना?'

रक्ताक्षाने याप्रमाणे विचारताच, 'ती गोष्ट काय आहे?' असा प्रश्न त्याच्या नातेवाईकांनी केला. तेव्हा तो म्हणाला, 'एकदा असं झालं-

# गोष्ट पंचेचाळिसावी

## स्वविचाराने वागे तो शिखर चढे,
## परविचाराने वागे तो खड्ड्यात पडे!

भक्ष्याच्या शोधार्थ सकाळपासून वनात फिरणाऱ्या 'खरनरवर' नावाच्या सिंहाला दिवसभरात शिकार न मिळाल्याने, तो एका पर्वतातल्या गुहेपाशी जाऊन स्वतःशीच म्हणाला, 'आता संध्याकाळ दाटू लागल्याने, या गुहेत नेहमी राहणारा प्राणी लवकरच रात्रीच्या निवाऱ्यासाठी इथे येईल व त्याला मारून आपल्याला आपली भूक भागवता येईल.' मनात असे म्हणून तो सिंह त्या गुहेत दडून बसला.

थोड्याच वेळात, त्या गुहेत राहणारा दधिपुच्छ नावाचा एक कोल्हा त्या गुहेच्या तोडापाशी आला. आत प्रवेश करण्यापूर्वी तो इकडेतिकडे बघतो, तर त्याला केवळ गुहेच्याच दिशेने धुळीत उमटलेली सिंहाची पावले दिसली. आत सिंह आहे की काय, या गोष्टीची खात्री करून घेण्यासाठी, तो मुद्दामच त्या गुहेला उद्देशून म्हणाला, 'बये गुहे, आज रात्री मी तुझ्या पोटात आसरा घेऊ का? अगं, दररोज संध्याकाळी जेव्हा मी तुला हा प्रश्न विचारतो तेव्हा तू मोठ्या आपुलकीने 'ये, बाबा ये' असे म्हणतेस. मग आजच तू अशी

a

गप्प का? तू जर नेहमीप्रमाणे मला 'ये, बाबा ये,' असे म्हणाली नाहीस तर, मी इथून निघून जाईन.'

गुहेबाहेरच्या कोल्ह्याचे ते शब्द ऐकून सिंहाला वाटले, 'कोल्ह्याच्या त्या प्रश्नाला ही गुहा 'ये, बाबा ये,' असे उत्तर देत असणार, पण आज माझे भय वाटत असल्याने ही चुपचाप असावी. मग आता त्याला नेहमीचे उत्तर नाही मिळाले तर तो निघून जाईल व मजवर भुके राहण्याची पाळी येईल. तेव्हा या गुहेऐवजी मीच त्याला उत्तर देतो.' त्या सिंहाच्या मनात याप्रमाणे विचार चालला असता, त्या कोल्ह्याने पुन्हा विचारले, 'काय गं गुहे, आज रात्री मी तुझ्या पोटात आसरा घेऊ का?' त्याबरोबर सिंहाने उत्तर दिले, 'ये बाबा ये.'

गुहेतून हे शब्द बाहेर पडताच त्या सिंहाला ऐकू जाईल एवढ्या मोठ्या आवाजात, तो कोल्हा म्हणाला, 'अरेच्चा! या गुहेत राहता राहता माझ्या काळ्यांचे पांढरे झाले, पण ही गुहा काही कधी बोलली नाही. पण ज्या अर्थी आज तिला वाचा फुटली आहे, त्या अर्थी तिच्यात जाणे धोक्याचे आहे.' एवढे बोलून तो कोल्हा तिथून निघून गेला आणि तो सिंह स्वतःच्या मूर्खपणाबद्दल स्वतःलाच शिव्या देऊ लागला.

a

ही गोष्ट सांगून व या किल्ल्यात इतःपर राहणे कसे धोक्याचे आहे, हे आपल्या आप्तमित्रांना स्पष्ट करून रक्ताक्ष हा त्यांच्यासह तो किल्ला सोडून अन्यत्र कुठेतरी निघून गेला.

राजा अरिमर्दनाचा मंत्री रक्ताक्ष, त्याच्या बंधुबांधवांसह निघून गेल्याचे पाहून, स्थिरजीवी स्वतःशी म्हणाला, 'या घुबडाच्या राज्यात एकटा रक्ताक्ष हाच काय तो खरा दूरदर्शी व राज्याचा हितचिंतक होता. पण त्याच्यावर स्वभूमी सोडून जाण्याचा प्रसंग आला. मात्र त्यामुळे या घुबडांचा निःपात करण्यात मला वाटणारा अडथळा दूर झाला. म्हटलंच आहे ना?-

*न दीर्घदर्शिनो यस्य मंत्रिणः स्युर्महीपतेः ।*
*क्रमायता ध्रुवं तस्य न चिरात् स्यात् परिक्षयः ॥*

**(त्या राजाचे मंत्री दूरदर्शी नसतात, त्याचा नाश क्रमाक्रमाने पण लवकरच होतो, हे ठरलेले असते. )**

त्यानंतर दररोज सूर्योदय झाला व किल्ल्यातल्या घुबडांच्या डोळयांसमोर अंधार दाटला की, स्थिरजीवी हा त्या किल्ल्यातून बाहेर पडून सुक्या काटक्या शोधून आणी व किल्ल्याच्या प्रवेशदरवाजाजवळच, पण आडोशाला त्यांचा साठा करी. थोड्याच दिवसांत काटक्यांचा पुरेसा साठा

a

होताच, तो एका भर दुपारी राजा मेघवर्णाकडे गेला व त्याच्या कानात काहीतरी सांगून परतीच्या प्रवासाला निघाला.

लगेच राजा मेघवर्ण व त्याचे अनुयायी पेटते पलिते घेऊन स्थिरजीवीमागोमाग, भर उन्हातून, पण जराही गाजावाजा न करता त्या घुबडांच्या गडाकडे आले. तिथे येताच स्थिरजीवीने अगोदरच साठवून ठेवलेल्या सुक्या काटक्या, त्या कावळ्यांनी त्या गडाच्या प्रवेशद्वारात खच्चून भरल्या व त्यांच्यात ते पेटते पलिते घुसविले. त्याबरोबर आगडोंब उसळून त्या बंदिस्त भुयारवजा गडात धूरच धूर झाला आणि त्यात त्यांचा शत्रू अरिमर्दन व त्याचे मंत्री व प्रजाजन यांचा अंत झाला.

मग परत आपल्या मूळ वटवृक्षाकडे गेल्यावर स्थिरजीवीचा गौरव करून राजा मेघवर्णाने त्याला विचारले, 'काका, हा विजय तुम्ही कसा मिळविला?' यावर स्थिरजीवीने आपल्या कारस्थानाचा सविस्तर तपशील सांगून शेवटी तो म्हणाला, 'महाराज, या विजयात मी वठविलेल्या फितुरीच्य व लाचारीच्या सोंगाचा हात असला, तरी या विजयाला प्रामुख्याने त्या घुबडांच्या मूर्खपणानेच जास्त हातभार लावला. त्या कृष्णसर्पाने स्वतः कमीपणा पत्करून त्या बेडकांना जे पाठीवर फिरवले ते काय उगा फिरवले?'

'ती गोष्ट काय आहे?' असा प्रश्न मेघवर्णाने केला असता, स्थिरजीवी म्हणाला, 'ऐका महाराज-

a

# गोष्ट सेहेचाळिसावी

## मूर्ख फसती, आणि त्यांच्या जिवावर धूर्त मजा मारती.

वरुण पर्वतालगतच्या प्रदेशात राहणारा मंदवीष नावाचा साप, जवळच्याच एका सरोवरातले बेडूक मारून, त्यावर आपला चरितार्थ चालवीत होता. पण वाढत्या वयाबरोबर त्याच्य अंगची चपळता कमी झाली आणि त्याला बेडूक पकडता येईनासे झाल्याने, त्याची उपासमार होऊ लागली. म्हणून त्याने बेडूक आयते मिळविण्याची एक युक्ती शोधून काढली.

एकदा तो त्या सरोवराच्या काठी दुःखी चेहेऱ्याने बसला. त्याबरोबर एका बेडर बेडकाने त्याला त्याच्या दुःखाचे कारण विचारले. तेव्हा मंदवीष सर्प दुःखाचा सुस्कारा सोडून म्हणाला, 'बाबा रे. काल नदीवर स्नानाला गेलेल्या एका ब्राह्मणकुमाराला दंश करून मी त्याचा प्राण घेतला, म्हणून त्या मुलाच्या पित्याने 'तू यापुढे बेडकांचे वाहन होशील व त्यांना पाठीवर घेऊन पाण्यात फिरत राहशील.' असा मला शाप दिला. म्हणून तुम्हाला पाठीवर घेऊन या सरोवरात संचार करण्याकरिता मी इकडे आलो आहे.'

त्या बेडकाने ही गोष्ट त्याच तळ्यात राहणाऱ्या आपल्या राजाच्या कानी घालताच तो राजा आपल्या मंत्र्यांसह त्या सर्पाच्या पाठीवर बसला आणि तो सर्प त्यांना त्या तळ्यात फिरवू लागला. दोन दिवस याप्रमाणे

फिरवून झाल्यावर, तिसऱ्या दिवशी तो सर्प त्या बेडकांना पाठीवर घेऊन त्या सरोवरात अत्यंत मंदगतीने संचार करू लागला. बेडकांच्या राजाने त्या सर्पाला त्याची गती मंदावण्याचे कारण विचारता, तो त्या बेडकांच्या राजाला म्हणाला, 'महाराज, गेल्या दोन दिवसात पोटात अन्नाचा कण गेला नसल्याने, आपल्याला पाठीवर घेऊन पाण्यात घिरट्या घालण्याची माझ्यात ताकदच उरली नाही.' हे त्याचे उत्तर ऐकून त्याच्या पाठीवर बसून पाण्यात विहार करण्याची चटक लागलेला तो बेडूकराजा त्या सर्पाला दररोज तीन चार बारीक बेडूक खाण्यासाठी देऊ लागला. त्यामुळे त्या सर्पाची प्रकृती सुधारू लागली.

एके दिवश त्या बेडूकराजाला व त्याच्या मंत्र्यांना काही वेळ पाठीवरून त्या तळयात फिरवून व त्याने दिलेले तीन-चार बेडूक स्वाहा करून, तो मंदवीष सर्प आपल्या वारुळाकडे चालला असता, तो प्रकार पाहिलेल्या एका ओळखीतल्या सर्पाने त्याला विचारले, 'मंदवीषमामा, तुमच्यासारख्या प्रतिष्ठित सर्पाने त्या क्षुद्र बेडकांना पाठीवर घेऊन त्या सरोवरात फिरत राहणे योग्य आहे का?'

यावर तो मंदवीष सर्प म्हणाला, 'बाबा रे, आपली कामे साधण्यासाठी वाट्टेल ती सोंग आणून मूर्खांना फसवावे लागते. म्हणून तर त्या यज्ञदत्त ब्राह्मणाने तूप खाऊन आंधळे झाल्याचे सोंग आणले ना?'

तेव्हा, 'ती गोष्ट काय आहे?' अशी त्या दुसऱ्या सर्पाने पृच्छा केली असता, मंदवीष त्याला ती गोष्ट सांगू लागली-

# गोष्ट सत्तेचाळिसावी

## वाट्टेल ते सोंग घ्यावे, पण दुष्टांना निपटून काढावे.

एका गावी राहणाऱ्या 'यज्ञदत्त' नावाच्या ब्राह्मणाची बायको दुराचारी होती. ती स्वतःच्या नवऱ्याला अगदी साधे अन्न खायला घाली आणि उत्तमोत्तम पक्वान्ने करून, स्वतः मात्र, गावाबाहेरच्या देवीच्या देवळात नेऊन तिथे भेटणाऱ्या आपल्या प्रियकराला खाऊ घाली. त्यामुळे यज्ञदत्ताची प्रकृती खालावू लागली. परंतु एके दिवशी त्याला बायकोच्या चालचलणूकीची माहिती मिळाली.

मग दुसऱ्याच दिवशी, बायकोच्या नकळत तो त्या देवळात गेला व देवीच्या मूर्तीआड दडून बसला. थोड्याच वेळात पक्वान्नाने भरलेल्या ताटासह, त्याची बायको त्या देवळात आली व त्याचा नैवेद्य दाखवून म्हणाली, 'देवी, माझ्या प्रियकराला माझ्या घरी राजरोस येता यावे, म्हणून माझ्या नवऱ्याला आंधळा कर.'

देवीच्या मूर्तीआड दडलेला यज्ञदत्त बायकी आवाजात म्हणाला, 'हे माझ्या भक्तिणी, तू तुझ्या नवऱ्याला दररोज भरपूर तूप व तुपातले पदार्थ खायला घाल म्हणजे थोड्याच दिवसांत तो आंधळा होईल.' देवीचीच ही

वाणी आहेसे वाटून त्या कुलटेला अतिशय आनंद झाला. त्या आनंदात ती प्रियकराची वाट पाहू लागली असता, यज्ञदत्त लपत छपत परस्पर मागल्या बाजूने निघून गेला व दुरून त्या देवळाकडे बघू लागला. थोड्याच वेळात त्या बाईचा प्रियकर आला आणि तिने दिलेले पक्वान्न खाऊन व तिच्याशी गुजगोष्टी करून निघून गेला.

नवरा लवकरात लवकर आंधळा व्हावा, म्हणून ती बाई, त्याला भरपूर तूप व तुपातले पदार्थ खायला घालू लागली. त्यामुळे त्याची प्रकृती सुधारू लागली. पण त्याचबरोबर त्याने 'आपल्याला कमी दिसू लागले आहे,' अशी खोटीच कुरबूर सुरू केली. त्यामुळे 'देव'च्या सांगण्यावार तिची श्रद्धा जडली. असा एक महिना निघून गेला आणि एके दिवशी सकाळी अंथरुणातून उठता उठताच यज्ञदत्त खोटेच ओरडला, 'अगं, मला बिलकूल दिसत नाही!'

आता आपला नवरा पूर्ण आंधळा झाला, असे वाटून त्या निर्लज्ज बाईने आपल्या प्रियकराला घरी बोलावले व त्याच्याशी प्रेमाचे चाळे सुरू केले. ती दोघे त्यात रमली असता, आता केवळ डोळसच नव्हे, तर दणकट झालेल्या यज्ञदत्ताने, हाती काठी घेऊन त्या बायकोच्या प्रियकराला मरेमरेस्तो मारले आणि बायकोचे नाक कापून तिला घरातून हाकलून दिले.

ही गोष्ट आपल्या मित्राला सांगून मंदवीष सर्प पुढे म्हणाला, 'बाबा रे, ब्राह्मणाच्या मुलाला चावल्यामुळे त्याच्या बापाने मला शाप दिला, वगैरेसारखी थाप मारून, मी जो बेडकांच्या राजाला व त्याच्या मंत्र्यांना

पाठीवरून फिरवतो आहे, ते मला दररोज पोटीपोटभर बेडुक खायला मिळावे म्हणून. अद्यापपर्यंत लहान बेडूक तर मी खाऊन संपविले. आता मोठ्यांना खात आहे. माझी तब्येत आणखी सुधारली की, मी त्या राजालाही त्याच्या मंत्र्यांसकट खाऊन टाकीन.' आणि मंदवीष जसे म्हणाला, तसेच त्याने पुढे केले.

या गोष्टी राजा मेघवर्णाला सांगून स्थिरजीवी त्याला म्हणाला, 'महाराज, काम साधण्यासाठी शत्रूला डोक्यावर घ्यावे, पण काम साधले जाताच त्याला नाहीसे करावे. युद्धे जिंकण्यासाठी शस्त्रांपेक्षाही बऱ्याच वेळा युक्ती व बुद्धी उपयोगी पडतात.'

स्थिरजीवीचे हे विचार ऐकून राजा मेघवर्ण म्हणाला, 'काका, तुमचे किती गुणगान गाऊ? बाकी तुम्ही हाती घेतलेलं काम तडीस नेणार याबद्दल मलाही खात्री होती. कारण म्हटलंच आहे,

*प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः*
*प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः ।*
*विघ्नैः सहस्त्रगुणितैरपि हन्यमानाः*
*प्रारब्धमुत्तमगुणा न परित्यजन्ति ॥*

**(जे क्षुद्र असतात, ते विघ्ने आडवी येतील या भयाने कामालाच सुरुवात करीत नाहीत. मध्यम दर्जाचे लोक, विघ्ने आल्यावर हतबल होऊन, घेतलेले काम अर्धवट सोडून देतात. तर जे उत्तम दर्जाचे**

**असतात, त्यांना जरी हजारो संकटांनी बेजार केले, तरी ते हाती घेतलेले काम मधेच सोडून देत नाहीत.)**

राजा मेघवर्ण शेवटी म्हणाला, 'काका, ऋण, अग्नी, शत्रू व रोग यांना अगदी मुळापासून निपटून काढावे, अशी जी उक्ती आहे, ती कृतीत आणून तुम्ही मला व प्रजाजनांना भयमुक्त केले आहे.'

यावर स्थिरजीवी म्हणाल, 'महाराज, राज्य हे पूर्णपणे भयमुक्त कधीच नसते. त्यामुळे तुम्ही गाफील राहू नका. स्वतःच्या हितापेक्षा प्रजेचे हित सदैव डोळ्यांपुढे ठेवा. या राज्याचा आपण व आपल्या पुत्रपौत्रांनी अनंत काळपर्यंत उपभोग घ्यावा अशीच आम्हा सर्वांची मनोमन इच्छा आहे.'

# तंत्र चौथे

# लब्धप्रणाश

# तंत्र चौथे - लब्धप्रणाश

त्या तीन राजकुमारांचे अभिवादन स्वीकारून विष्णुशर्मा आपल्या नित्याच्या आसनावर बसला व त्यांना म्हणाला, 'आजपासून आपण पंचतंत्राच्या चौथ्या तंत्राला सुरुवार करीत आहेत. या तंत्राचे नाव 'लब्धप्रणाश' म्हणजे 'जे मिळवले ते घालवले' असा आहे. संकटकाळी प्रत्येकाने आपली बुद्धी स्थिर ठेवली पाहिजे, हे या तंत्रातून आपल्याला शिकायचे आहे. तशी बुद्धी स्थिर ठेवली, म्हणूनच ते वानर स्वतःचे प्राण वाचवू शकले ना?'

यावर 'ती गोष्ट काय आहे?' असे त्या राजकुमारांनी विचारले असता विष्णुशर्मा म्हणाला, 'लक्ष देऊन ऐका-

a

# गोष्ट अठ्ठेचाळिसावी

## संकटात जो बुद्धी स्थिर ठेवतो, तोच त्यावर मात करतो.

समुद्रकिनाऱ्याच्या वाळवंटात, पिकलेल्या निळसर टपोऱ्या जांभळांनी भरलेला एक वृक्ष होता. त्या जांभुळवृक्षावर ताम्रमुख नावाचा वानर ती जांभळे भक्षण करून राही.

एकदा दुपारच्या जेवणासाठी तो वानर ती जांभळे खायला सुरुवात करणार, तोच एक मगर त्या समुद्रातून बाहेर आला व त्या जांभूळवृक्षाखाली जाऊन बसला. त्याला पाहून तो वानर म्हणाला, 'या मगरराव, नेमके जेवणाच्या वेळी आलात. तेव्हा अशा अतिथीचं कूळ, गोत्र, योग्यता वा आर्थिक परिस्थिती यापैकी कुठल्याही गोष्टीचा विचार न करता त्याला तृप्त करणं हे गृहस्थाश्रमी व्यक्तीचं कर्तव्य असल्याने मी तुम्हाला पोटभर जांभळे खायला देतो. कारण म्हटलंच आहे-

*अपूजितोऽतिथिर्यस्य गृहाद्याति विनिःश्वसन् ।*
*गच्छन्ति विमुखास्तस्य पितृभिःसह देवताः ॥*

**(ज्याच्याकडे आलेला अतिथी स्वागत न झाल्याने, दुःखाचे निःश्वास सोडत निघून जातो, तेव्हा त्याच्याबरोबर त्या यजमान गृहस्थाचे पितर व देवही खिन्न होऊन निघून जातात. )**

a

- असे बोलून त्या वानराने त्या मगराला बरीच जांभळे दिली व ती त्या मगराने मोठ्या आवडीने खाल्ली. मग त्या जांभळांची गोडी लागल्याने तो मगर दररोज त्या ताम्रमुखाकडे येऊ लागला आणि त्याने दिलेल्या जांभळांतली काही जांभळे स्वतः खाऊन, बाकीची जांभळे तो आपल्या बायकोसाठी घेऊन जाऊ लागला. हळूहळू तो वानर व मगर यांच्यात दृढ स्नेह निर्माण झाला.

एके दिवशी मगराची बायको त्याला म्हणाली, 'अहो, तुमचा तो वानरमित्र गेली अनेक वर्षे, ती गोडगोड जांभळे खात असल्याने, त्याचे काळीज किती गोड झाले असेल? तेव्हा त्या तुमच्या मित्राला मारून तुम्ही मला त्याचे काळीज आणून द्याल का?'

यावर तो मगर तिला म्हणाला, 'प्रिये, काय भलतेच बोलतेस तू हे? जो आता मला माझ्या भावापेक्षाही अधिक प्रिय वाटू लागला आहे, त्या माझ्या मित्राचा मी प्राण घेऊ? मित्राविषयी असं म्हणतात -

*एकं प्रसूयते माता द्वितीयं वाक् प्रसूयते ।*
*वाग्जातमधिकं प्रोचुः सोदर्यादपि बान्धवात् ॥*

**(एक भाऊ हा एकाच मातेच्या उदरी जन्म घेतल्याने निर्माण होतो, तर दुसरा भाऊ हा गोड संभाषणातून उत्पन्न होतो. पण एका आईच्या पोटी जन्म घेतल्यामुळे निर्माण झालेल्या भावापेक्षा मधुर संभाषणातून उत्पन्न होणारा भाऊ हा अधिक श्रेष्ठ असल्याचे सूज्ञ मानतात.)**



मगराच्या या बोलण्याने त्याची बायको भडकली व त्याला अद्वातद्वा बोलू लागली. तेव्हा त्याने तिचे म्हणणे मान्य केले व त्या ताम्रमुख वानराला आपल्या घरी जेवायला येण्याचे निमंत्रण दिले. त्यानुसार त्या मगराच्या पाठीवर बसून तो वानर समुद्रातून जाऊ लागला. किनारा बराच दूर जाताच, 'आता याला खरे सांगितले तरी हा काही कुठे पळून जाऊ शकणार नाही,' असा विचार करून मगराने त्याला आपल्या हेतूची कल्पना दिली. तरीही गांगरून न जाता तो वानर त्याला म्हणाला, 'मगरराव, तुम्ही अगदीच वेडे कसे हो? मला झाडाझाडांवरून उड्या माराव्या लागत असल्याने, एखाद् वेळ अंदाज चुकून खाली पडल्यास काळीज फुटेल व दुखावेल, म्हणून मला कुठेही बाहेर जाताना माझे काळीज, त्या जांभूळवृक्षाच्या खोडातील ढोलीत ठेवून द्यावे लागते. प्रत्येक वानर असेच करतो, ही गोष्ट तुला ठाऊक नाही का? चल, परत मला माझ्या झाडाकडे पोहोचते कर. वहिनीसाठी मी माझे

काळीजच काय, पण वेळ आल्यास माझे प्राण देईन.' त्या वानराचे हे बोलणे खरे वाटून, त्या मगराने त्याला त्याच्या झाडाकडे पोहोचवले.

मग झाडावर चढून तो वानर त्या मगराला म्हणाला, 'अरे मूर्खा, काळीज कधी शरीराबाहेर काढून ठेवता येते का? तू मला कपटाने मारू पाहात होतास, म्हणून मी ती तुला थाप मारली आणि तुला ती खरी वाटली! यापुढे तू चुकूनही माझ्याकडे येऊ नकोस.' मग पुन्हा त्याला फसविण्यासाठी तो मगर म्हणाला, 'हे मित्रा, ताम्रमुखा, अरे मी तुला मारीन कसा? तुला केवळ भिवविण्यासाठी मी तसे बोललो होतो. तेव्हा तू माझ्या घरी चल. माझ्या सुगरण बायकोने तुझ्यासाठी फार चांगले पदार्थ केले आहेत.'

यावर ताम्रमुख म्हणाला, 'अरे दगलबाजा, एकदा ज्याचा वाईट अनुभव आला, त्याच्या बोलण्यावर सूज्ञ कधी विश्वास ठेवतात का? म्हणून तर गंगदत्त नावाच्या त्या बेडूकराजाने 'आता त्या विहिरीत मी चुकूनही येणार नाही,' असा निरोप त्या कपटी प्रियदर्शन नावाच्या सर्पाला पाठविला ना? -

'ती गोष्ट काय आहे?' असे त्या मगराने विचारले असता, झाडाच्या फांदीवर बसल्याबसल्या ताम्रमुख म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट एकोणपन्नासावी

## ज्याचा एकदा वाईट अनुभव येई, त्यावर पुन्हा विश्वास ठेवू नाही.

एका विहिरीतील बेडकांचा राजा 'गंगदत्त' हा तिथल्या भांडखोर बेडकांनी दिलेल्या त्रासाला कंटाळला आणि विहिरीबाहेर पडला. मग तो स्वतःशीच म्हणाला, 'ज्यांनी आपल्याला अतिशय त्रास दिला, त्यांचा निःपात करण्यासाठी वेळप्रसंगी एखाद्या बलवान् शत्रूची तात्पुरती मदत घेण्यात काय वावगे आहे? म्हटलंच आहे-

*शत्रुमुन्मूलयेत्प्राज्ञस्तीक्ष्णं तीक्ष्णेन शत्रुणा ।*
*व्यथाकरं सुखार्थाय कण्टकेनैव कण्टकम् ॥*

(**ज्याप्रमाणे खुपत राहणारा एक काटा आपण दुसऱ्या काट्याने काढतो, त्याचप्रमाणे सुखाच्या प्राप्तीसाठी, एका प्रबळ शत्रूचा निःपात, दुसऱ्या प्रबळ शत्रूच्या सहाय्याने करावा**.)

मनात असे ठरवून गंगदत्त हा माहितीतल्या प्रियदर्शन नावाच्या एका बलवान काळ्या सर्पाच्या बिळाच्या तोंडाशी जाऊन त्याला म्हणाला, 'हे प्रियदर्शना, मी बेडकांचा राजा गंगदत्त असून, तुझ्या मदतीने माझ्या प्रजेतील त्रासदायक बेडकांचा नाश करायचा आहे. त्यायोगे माझे शत्रूही नाश पावतील व तुलाही ते खायला मिळतील.'

प्रियदर्शनाने बिळातल्या बिळात राहूनच विचारले, 'हे गंगदत्ता, मी तुम्हा बेडकांचा जन्मजात वैरी असताना तू माझी मदत मागायला कसा काय आलास?'

गंगदत्त बेडूक म्हणाला, 'अडलेल्या माझ्यासारख्याला असे करण्यावाचून दुसरा मार्गच कुठे आहे? म्हटलेच आहे ना?-

*सर्वनाशे च संजाते प्राणानामपि संशये ।*
*अपि शत्रुं प्रणम्यापि रक्षेत् प्राणान्धनानि च ॥*



**(सर्वनाश होण्याचा प्रसंग आला असता, तसेच प्राणांवर बेतले असता, शत्रूलासुद्धा नमस्कार करून, प्राण व धन यांचे रक्षण करावे.)**

गंगदत्ताने आपण दाखवू त्याच बेडकांचा तू फडशा पाड, असे त्या सर्पाला सांगितले व ते त्याने मान्य केले. पण प्रत्यक्षात त्या विहिरीत जाताच तो आडदांड सर्प सरसकट बेडकांना गिळंकृत करू लागला. मग त्या गंगदत्ताला आपण केलेल्या चुकीचा पश्चाताप होऊन तो स्वतःशी म्हणाला

*योऽ मित्रं कुरुते मित्रं वीर्याभ्याधिकमात्मनः ।*

*स करोति न सन्देहः स्वयं हि विषभक्षणम् ।*

**(जो आपल्यापेक्षा अधिक सामर्थ्यसंपन्न अशा शत्रूशी मैत्री करतो, तो जणू स्वतःच वीषभक्षण करीत असतो, यात संशय नाही.)**

त्या सर्पाने गंगदत्ताच्या शत्रूंप्रमाणेच त्याचे नातेवाईकही आणि शेवटी तर त्याचा मुलगा यमुनादत्त यालाही गिळंकृत केले. बाकी त्यात नवल ते काय? कारण म्हटलंच आहे!-

*यथा हि मलिनैर्वस्त्रैर्यत्रतत्रोपविश्यते ।*
*एवं चलितवृत्तस्तु वृत्तिशेषं न रक्षति ॥*

**(एखाद्याची वस्त्रे मलीन झाली की, ज्याप्रमाणे तो वाटेल तिथे बसतो, त्याचप्रमाणे एकदा का एखादी व्यक्ती सदाचाराच्या मार्गापासून ढळली की, ती उरलीसुरली नीतीही सांभाळीनाशी होते.)**

याप्रमाणे गंगदत्ताखेरीज जेव्हा बाकीचे सर्व बेडूक खाऊन खलास केले गेले, तेव्हा त्या सर्पाने त्याला विचारले, 'बोल गंगदत्ता, आता मी माझी भूक कुणाला खाऊन भागवू?' यावर स्वतःचे रक्षण करण्याच्या हेतूने गंगदत्त त्याला खोटेच म्हणाला, 'मित्रा, मी या विहिरीबाहेर जातो आणि दुसऱ्या एका विहिरीत मोठ्या प्रमाणात असलेल्या बेडकांना फसवून या विहिरीत आणतो. म्हणजे तुझ्या पोटाची काळजी दूर होईल.' असे म्हणून तो जो त्या विहिरीबाहेर पडला, तो पुन्हा तिकडे गेलाच नाही.

मग त्या महासर्पाने ता विहिरीतील एका घळीत राहणाऱ्या एका घोरपडीला त्या गंगदत्ताला शोधून त्याला 'तुझ्या विरहाने मी व्याकूळ झालो

असून, तू लवकरात लवकर इकडे ये,' असा निरोप कळवायला सांगितले. घोरपडीने गंगदत्ताला तो निरोप सांगताच, त्याने तिच्याचबरोबर त्या सर्पाला निरोप पाठविला, 'हे प्रियदर्शना, तू माझ्या विरहाने व्याकूळ झालेला नाहीस, तर भुकेने व्याकूळ झालेला आहेस आणि जो भुकेला आहे, तो आपली भूक शमविण्यासाठी कोणते पाप करायला तयार होत नाही? म्हटलेच आहे ना? -

*बुभुक्षितः किं न करोति पापम् ।*
*क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति ॥*

**(भुकेले लोक कोणते पाप करायचे बाकी ठेवतात? भुकेने क्षीण झालेले लोक निर्दय बनतात.)**

असे म्हणून 'आता त्या विहिरीत मी चुकूनही येणार नाही, ' हा निरोप त्या सर्पाला कळविण्यास गंगदत्ताने त्या घोरपडीस सांगितले.'

ही गोष्ट त्या मगराला सांगून तो ताम्रमुख वानर त्याला पुढे म्हणाला, 'अरे दगलबाजा, तुझ्यासंगे तुझ्या घरी येणे म्हणजे आपणहून मृत्यूच्या कराल जबड्यात प्रवेश करणे हे स्पष्ट दिसत असतानही तो धोका पत्करायला मी काय थोडाच तो लंबकर्ण गाढव आहे?'

यावर 'ती लंबकर्णाची गोष्ट काय आहे?' अशी विचारणा त्या मगराने केली असता तो ताम्रमुख वानर म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट पन्नासावी

## जो संकटापासून धडा घेत नाही, तो आयुष्यात मारच मार खाई.

वनातील एका गुहेत राहणारा 'करालकेसर' नावाचा सिंह एकदा एका मदोन्मत्त हत्तीशी झालेल्या झटापटीत बराच जायबंदी झाला. त्याच्या अंगी शिकार करण्यासाठी आवश्यक असलेली चपळता न राहिल्याने, त्याची व त्याचा खाजगी कारभारी असलेल्या 'धूसरक' नावाच्या कोल्ह्याची उपासमार होऊ लागली. तेव्हा तो धूसरकाला म्हणाला, 'तू जर एखाद्या श्वापदाला फसवून या गुहेत आणलेस, तर इथल्या इथे अशाही स्थितीत मी त्याची शिकार करू शकेन.'

मग धूसरक कोल्हा, ते वन व नजिकचे गाव यांच्या सीमारेषेवरील सरोवराकाठी दुर्वा खात असलेल्या 'लंबकर्ण' नावाच्या गाढवापाशी जाऊन त्याला म्हणाला, 'मामा, बऱ्याच दिवसांनी दर्शन झाले की हो तुमचे? आणि एवढे वाळलात कसे काय?'

लंबकर्ण म्हणाला, 'काय सांगू धूसरका तुला? ज्या धोब्याकडे मी आहे, तो फक्त माझ्याकडून मरेमरेतोवर काम करून घेतो आणि मग मला

a

जराही गवत-पाणी न देता, असे वाऱ्यावर सोडून देतो. तेव्हा माझी अशी दशा व्हावी यात नवल ते काय?'

कोल्हा म्हणाला, 'मामा, तुम्ही मजबरोबर चला. आजपासून तुमच्या आयुष्यात 'आनंदपर्व' सुरू होईल, वनातून वाहणाऱ्या नदीकाठचे पाचूसारखे हिरवेगार गवत पोटीपोटभर खाऊन, थोड्याच दिवसांत तुम्ही चांगले तगडे व्हाल. शिवाय तुमच्याप्रमाणेच दुसऱ्या एका धोब्याच्या जाचाला कंटाळून, तुमच्या जातीतल्या तीन तरुण सुंदरी माझ्या आश्रयाला येऊन राहिल्या आहेत. त्यांचं ते झगमगतं सौंदर्य पाहून, मामा तुम्ही खरोखरच देहभान हरपून बसाल. त्यांनीही आम्हाला 'एखादा खानदानी व देखणा पती मिळवून द्या,' अशी माझ्यामागे भुणभुण लावली आहे. तुम्ही मजबरोबर आलात, तर मी त्यांच्याशी तुमचे लग्न लावून देईन. मग येणार का मजसंगे?' त्या कल्पनेतल्या गर्दभसुंदरीचे नुसते नाव काढताच तो लंबकर्ण त्या कोल्ह्यामागोमाग चालू लागला. म्हटलंच आहे ना? -

*यासां नाम्नापि कामः स्यात्सङ्गमं दर्शनं विना ।*
*तासां दृक्सङ्गमं प्राप्य यन्न द्रवति कौतुकम् ॥*

**(ज्यांच्याशी मीलन, किंवा ज्यांचे दर्शन नव्हेच तर ज्यांचे नुसते नाव घेतल्यानेही काम जागृत होतो, त्यांच्याशी दृष्टभेट झाली असतानाही जो हेलावून जात नाही, त्याचे कौतुक करावे तितके थोडेच आहे.** )

a

अशा तऱ्हेने त्या कोल्ह्याने बोलत बोलत त्या लंबकर्णाला धन्याच्या गुहेत नेले. अवयवांची इच्छेनुसार हालचाल करता येत नसल्याने त्या सिंहाने लंबकर्णाला पंजा मारला, पण तो चुटपुटता लागून लंबकर्ण पळून पुन्हा त्या सरोवराकाठी गेला.



हातची शिकार घालविल्याबद्दल त्या सिंहाला दोष देऊन आणि यापुढे अशी चूक होऊ देणार नाही, असे त्याच्याकडून आश्वासन घेऊन, तो कोल्हा पुन्हा त्या सरोवराकाठी गेला व लंबकर्णाला म्हणाला, 'मामा, तुम्हाला पाहताच, त्या तीन सुंदरीपैकी सर्वात सुंदर असलेल्या गर्दभसुंदरीने तुमचा हात धरण्याचा प्रयत्न केला, तर तुम्ही पळून का बरं आलात? तुम्हाला काय वाटलं - त्या गुहेतल्या अंधारात एखादा सिंह लपून बसला आहे? छे छे! ती तुमच्या जातीतली सुंदरी होती. तिला तुम्ही एवढे आवडलात की तुम्ही परत तिच्याकडे न आल्यास तिने आमरण उपोषण करण्याचा किंवा त्या नदीत वा अग्निकुंडात उडी घेऊन देहान्त करण्याचा निश्चय केला आहे.' त्या

a

कोल्ह्याच्या या बोलण्यावर विश्वास ठेवून लंबकर्ण त्याच्या पाठोपाठ पुन्हा त्या गुहेत गेला आणि त्या सिंहाची शिकार बनला!

लंबकर्णाला मारल्यावर तो सिंह म्हणाला, 'धूसरका, मी आस्ते आस्ते नदीवर जाऊन आंघोळ करून येतो. तोवर तू शिकारीची राखण कर.' असे म्हणून सिंह तिथून जातो, तोच धूसरकाने लंबकर्णाचे संपूर्ण मस्तक खाऊन टाकले. सिंहाने परत आल्यावर रागाने त्याला त्याबद्दल विचारताच तो म्हणाला, 'महाराज, या गाढवाला डोके नव्हते, म्हणून तर एकदा तुमच्या पंजाचा तडाखा बसल्यावरही, पुन्हा हा लगेच या ठिकाणी आला.' सिंहाला धूसरकाचे म्हणणे पटले आणि मग त्या दोघांनी त्या गाढवावर चांगले हात मारले...'

ही गोष्ट सांगून तो ताम्रमुख वानर त्या मगराला म्हणाला, 'मी बुद्धिमान आहे म्हणून तुझ्या कपटकारस्थानातून वाचलो, तू मात्र त्या लंबकर्णाप्रमाणे मूर्ख आहेस. म्हणून तर मध्येच खरे बोलून, तू स्वतःचे त्या युधिष्ठिर कुंभाराप्रमाणे नुकसान करून घेतलेस.' यावर 'ते कसे?' असे त्या मगराने विचारता, वानर म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट एक्कावन्नावी

## नको तिथे बोलणे, म्हणजे आपलीच 'शोभा' करून घेणे.

युधिष्ठिर नावाचा एक कुंभार दारूच्या नशेत असताना अंगणात पडला. त्याच्या कपाळाला फुटलेल्या मडक्याची एक अणकुचीदार खापरी लागून मोठी जखम झाली. काही दिवसांनी ती जखम बरी झाली, तरी तिची मोठी खूण कपाळावर कायमची राहिली.



पुढे तो राहात होता त्या राज्यात भयंकर दुष्काळ पडल्याने, तो इतर काहीजणांसंगे दुसऱ्या राज्यात गेला व नोकरीसाठी त्या राजाला भेटला. त्याचे ते गोरगोमटे रूप व कपाळावरची जखमेची खूण पाहून 'हा एखादा राजघराण्यातला असून, याच्या कपाळावरची खूण ही याने कुठल्यातरी युद्धात भाग घेतला असता, शत्रूच्या तरवारीच्या वारामुळे

a

झालेल्या जखमेची आहे,' असा राजाचा समज झाला. त्याने त्याला आपल्या राजवाड्यात मोठ्या सन्मानाने ठेवून घेतले.

पण थोड्याच दिवसांत राजावर युद्धावर जाण्याचा प्रसंग आला. आता या युधिष्ठिराला सैन्यातले एखादे मोठे पद द्यावे, म्हणजे तो शत्रूचा धुव्वा उडविण्यात मोलाची कामगिरी बजावील, असा विचार मनात येऊन त्या राजाने विचारले, 'युधिष्ठिरजी, कुणाबरोबर लढताना तुम्हाला ही जखम झाली हो?' तो कुंभार म्हणाला, 'मी एकदा दारू पिऊन बेभान स्थितीत चालत असताना पडलो आणि मीच बनविलेल्या व नंतर फुटलेल्या मडक्याची टोकदार खापर कपाळात घुसून जखमी झालो. त्या जखमेची ही खूण आहे. पण लढाईचा मला अनुभव नसला, तरी मी शत्रूला भारी होईन हे निश्चितच.'

यावर त्याला राजवाड्यातून घालवून देत राजा म्हणाला, 'बाबारे, रणांगणात लढणं हे घरी बसल्या बसल्या मडकी घडविण्याएवढं सोपं का आहे? 'बाळा, ज्या कुळात तुझा जन्म झाला, त्या कुळात कुणीही कधी हत्तीला मारलेलं नाही,' असं ती सिंहीण उगाच का त्या कोल्ह्याच्या मुलाला म्हणाली?'

'ती गोष्ट काय आहे?' असे त्या कुंभाराने विचारताच, राजाने त्याला ती गोष्ट सांगायला सुरुवात केली -

a

# गोष्ट बावन्नावी

## सिंहासाठी हत्तीची शिकार,
## कोल्ह्याने करावा केवळ कोंबडीचाच विचार.

एका वनात सिंहसिंहिणीचे एक जोडपे राहात होते. सिंहिणीने नुकताच दोन छाव्यांना जन्म दिला असल्याने, सिंहच शिकारीला जाई आणि केलेल्या शिकारीतला अर्धा भाग स्वतः खाऊन, उरलेला अर्धा भाग आपल्या घरधनिणीला आणून देई. एकदा तो शिकारीसाठी गेला असता, त्याला एका कोल्ह्याच्या पिलाखेरीज दुसरे काहीच मिळाले नाही. मग त्या पिल्लालाच आपल्या जबड्यात धरून त्याने आपल्या गुहेत आणले व आपल्या पत्नीसमोर ठेवले.

'आज तुम्ही माझ्यासाठी काहीच आणले नाही?' अशी विचारणा त्या सिंहिणीने केली असता तो सिंह म्हणाला, 'प्रिये, आज मला या पिलाखेरीज दुसरे काहीच मिळाले नाही. वाटल्यास तू याला खा, पण मी मात्र खाणार नाही. कारण धर्मशास्त्र स्पष्टपणे सांगते-

*स्त्रीविप्रलिङ्‌गिबालेषु प्रहर्तव्यं न कर्हिचित् ।*
*प्राणत्यागेऽपि संजाते विश्वस्तेषु विशेषतः ॥*

**(आपल्यावर प्राण गमाविण्याचा जरी प्रसंग आला तरी स्त्री, ब्राह्मण, संन्यासी, बालक व विशेषेकरून ज्यांनी आपल्यावर विश्वास टाकला आहे, अशांना कधी मारू नये.)**

सिंहीण म्हणाली, 'धर्मानं जी गोष्ट निषिद्ध म्हणून सांगितली, ती मी तरी कशी करीन? मी या पिल्लाची माझा तिसरा मुलगा म्हणून सांभाळ करीन.' याप्रमाणे बोलून ती सिंहीण आपल्या छाव्यांप्रमाणेच त्या पिलालाही अंगावरचे दूध पाजू लागली. असे होता होता, त्या दोन छाव्यांबरोबरच ते कोल्ह्याचे पोरही थोडेसे मोठे झाले.

एकदा ते पिल्लू, त्या दोन छाव्यांसह वनात एकत्रपणे हिंडत असता, त्यांना एक रानहत्ती दिसला. ते दोन छावे त्या हत्तीवर झडप घेण्याच्या पवित्र्यात उभे राहू लागले असता, ते कोल्ह्याचे पोर त्यांना दटावून म्हणाले, 'अरे, काय हा अविचार करता? तो एक बलाढ्य हत्ती आहे. त्याच्या वाटेस गेल्यास, तो तुम्हाला मारून नाही का टाकणार?' एवढे बोलून ते कोल्ह्याचे पोर धपापत्या छातीने तिथून पळून घरी गेले. ते पोर असे बोलल्यामुळे ते दोन छावे मात्र नाउमेद झाले. म्हटलंच आहे ना?-

*एकेनापि सुधीरेण सोत्साहेन रणं प्रति ।*
*सोत्साहं जायते सैन्यं भग्ने भङ्गमवाप्नुयात् ॥*

**(रणभूमीवर एखादा धैर्यशाली वीर जरी उत्साहाने लढायला उभा राहिला, तरी सर्व सैन्यात स्फुरण उत्पन्न होते. पण त्याऐवजी एखादा जरी पळ काढू लागला, तरी सर्वांचीच पळापळ सुरू होते.)**

त्यानुसार ते कोल्ह्याचे पोर पळून जाताच ते दोन छावेही गुहेकडे गेले व वनराज सिंहाला सांगू लागले, 'बाबा, आमचा दादा अगदीच भित्रा कसा हो? एका रानहत्तीवर आम्ही दोघे झेप घेऊ पाहात असता, याने आम्हाला निरुत्साही केले व घरी पलायन केले.'

त्या छाव्यांनी आपली कुचेष्टा केल्याचे पाहून ते कोल्ह्याचे पोर, त्यांच्यावर भडकून त्यांना नको नको ते बोलू लागले असता, त्याला एका बाजूला घेऊन सिंहीण म्हणाली, 'बाळा, बोलून चालून तू एका कोल्ह्याचा मुलगा आहेस, तर ते दोघे सिंहाचे छावे आहेत. त्यांच्या कुवतीची कल्पना तुला कशी काय यावी?'



कोल्ह्याच्या पिल्लाने विचारले, 'आई! पण शौर्य, शिक्षण, रूप या दृष्टींनी माझ्यात काही कमतरता आहे का?' यावर ती सिंहीण म्हणाली -

*शूरोऽसि कृतविद्योऽसि दर्शनीयोऽसि पुत्रक ।*
*यस्मिन्कुले त्वमुत्पन्नो गजस्तत्र न हन्यते ॥*

**(बाळा, तू शूर आहेस, विद्याभ्यास पूर्ण केलेला आहेस आणि दिसायलाही चांगला आहेस, पण ज्या कुळात तू जन्मलास त्या कुळात कुणाकडूनही हत्तीचा वध केला जात नाही.)**

'तेव्हा बाळा, तू एक यःकश्चित् कोल्हा आहेस, हे माझ्या मुलांना कळण्यापूर्वीच तू इथून निघून या वनातील तुझ्या जातभाईंकडे जा.' ही गोष्ट त्या राजाने कुंभाराला सांगताच तो कुंभार तिथून चूपचाप निघून गेला.'

अशा या गोष्टी त्या मगराला सांगून तो ताम्रमुख वानर त्याला पुढे म्हणाला, 'क्षुद्रांचे क्षुद्रपण केव्हातरी उघड्यावर येतेच येते. कुंभाराचा अडाणीपणा किंवा त्या कोल्ह्याचा क्षुद्रपणा जसा उघड्यावर आला, तसाच तूही तुझ्या बायकोच्या नादी लागून स्वतःचा मूर्खपणा उघड केलास. अरे, आपली बायको झाली, म्हणून तिने सांगितलेली प्रत्येक गोष्ट शिरसावंद्य मानणे योग्य आहे का? मग देवाने आपल्याला जे स्वतंत्र डोके दिले आहे, त्याचा काय उपयोग? असाच सारासार विचार सोडून बायकांच्या आज्ञांचे बंदे गुलाम झाल्यामुळे, त्या प्रधानावर स्वतःच्या डोक्याचे मंडन करून घेण्याचा व राजावर आपल्या राणीचा घोडा होण्याचा लज्जास्पद प्रसंग आला ना?' यावर 'ती गोष्ट काय आहे?' असे त्या मगराने विचारल्यामुळे वानर म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट त्रेपन्नावी

## ज्याची बुद्धि दुसऱ्याकडे गहाण,
## त्याचे सर्वत्र नुकसानच नुकसान.

एका राज्याचा राजा नंद व त्याचा प्रधान वररुची हे जसे बुद्धिमान व प्रजाहितदक्ष होते, तसेच महापराक्रमीही होते. त्यामुळे त्यांचे प्रजाजन सुखी व निश्चिंत होते, तर त्यांचे शत्रु कष्टी व चिंताग्रस्त होते. दुःखाची गोष्ट एकच की, राजा व प्रधान या दोघांच्याही वाट्याला जहांबाज व मूर्ख बायका आल्या होत्या आणि शत्रूंना चळाचळा कापायला लावणाऱ्या त्या दोघांपैकी कुणाचीही बायकोच्या मनाविरुद्ध जायची ताकद नव्हती.

एकदा प्रधानाची बायको रुसून बसली व त्याला म्हणाली, 'आताशा तुमचे माझ्यावर प्रेमच उरले नाही. तुम्ही जर तुमच्या मस्तकाचे सफाईदार मुंडण करून घेतलेत, तरच तुमचे माझ्यावर पूर्ववत् प्रेम आहे असे मी मानीन.' प्रधानाने त्याप्रमाणे न्हाव्याकडून स्वतःचे अगदी सफाचट मुंडण करून घेतले. प्रधानिणीच्या दासीला मुंडणाचे कारण कळताच तिने ते लगेच राजाकडे पोहोचते केले.

तिकडे राणीही आपल्या क्रोधागारात फुरंगुटून बसली होती. राजाने तिला तिच्या रागाचे कारण विचारता तीही म्हणाली, 'आताशा महाराजांचे

माझ्यावर प्रेमच उरले नाही. महाराजांनी जर तोंडात लगाम पकडून, ओणवे होऊन मला पाठीवर घेऊन या महालात घोड्याप्रमाणे फिरविले, तरच मला आपल्या प्रेमाची खात्री पटेल.' तिच्या इच्छेनुसार राजानेही 'घोडा' होऊन तिला पाठीवरून फिरविण्याचा गाढवपणा केला. दुर्दैवाने त्या महालाच्या दरवाजाच्या फटीतून डोकावून तो प्रकार राणीच्या दासीने पाहिला व प्रधानाच्या कानी घातला.

दुसऱ्या दिवशी प्रधान राजसभेत गेला असता नंद राजाने त्याला खंवचटपणे विचारले, 'काय प्रधानजी, कोणत्या पर्वणीनिमित्त तुम्ही स्वतःचे मुंडण करून घेतलेत?' यावर प्रधानाने उत्तर दिले, 'महाराज, ज्या पर्वणीच्या निमित्ताने एखादा थोर पतीही घोड्याप्रमाणे तोंडात लगाम घेऊन, खिंकाळून आपल्या पत्नीला पाठीवर घेऊन तिला बंदिस्त महालात फिरवितो, त्याच पर्वणीनिमित्त मी हे मुंडण केले आहे.' हे तडाखेबंद उत्तर ऐकून राजाही मनोमन शरमला.'

ही गोष्ट सांगून ताम्रमुख वानर त्या मगराला म्हणाला, 'राजा नंद व प्रधान वररुची यांच्याप्रमाणे तू आपली बुद्धी बायकोकडे गहाण तर टाकली आहेसच, पण त्याशिवाय तू सैल जिभेचा आहेस, म्हणून तर आपल्या मूर्ख बायकोच्या हट्टाखातर तू मला मारण्याचा कट रचलास, पण नको तेव्हा तोंड उघडून, तू स्वतःच्या कटाचा फज्जा उडवून दिलास. म्हटलंच आहे ना?-

*आत्मनो मुखदोषेण बध्यन्ते शुकसारिकाः ।*
*बकास्तत्र न बध्यन्ते मौनं सर्वार्थसाधनम् ॥*

a

**([सर्वांसमक्ष मधुर बोलण्याच्या] आपल्या मुखदोषामुळे पोपट व मैना बंधनात [पिंजऱ्यात] पडतात, पण तेच बगळे मात्र [तसे न केल्यामुळे] पकडले जात नाहीत. म्हणून न बोलणे हेच कुठलेही काम साधण्याचे मुख्य साधन आहे**.)

ताम्रमुख वानर पुढे म्हणाला, 'हे मूर्ख मगरा, वाघाचे कातडे मोठ्या कौशल्याने अंगावर चढविल्याने ज्या गाढवाचा चांगला जम बसला होता, त्याने नको तेव्हा आवाज काढल्यामुळेच त्याचा नाश झाला ना?' यावर ती काय गोष्ट आहे?' असे त्या मगराने विचारले आणि त्या वानराने त्याला ती गोष्ट सांगणे सुरू केले-



# गोष्ट चोपन्नावी

## मोठेपणाचे सोंग घातक ठरते,
## जरा पाऊल घसरल्यास मरण ओढवते.

एका गावी 'शुद्धपट' नावाचा एक कंजूष व लुच्चा परीट राहात होता. तो दिवसा आपल्या गाढवाकडून भरपूर काम करून घेई, पण त्याला चारापाणी घालताना मात्र हात आखडता घेई. अखेर त्याने एका वाघाचे कातडे मिळविले. ते कातडे तो त्या गाढवाच्या अंगावर चपखलपणे बसवी आणि रात्रीच्या वेळी त्याला दुसऱ्याच्या शेतात सोडून देई. त्यामुळे त्या नकली वाघाला खरे समजून शेतातील झोपड्यांमध्ये राहणारे, पिकांचे पहारेकरी घाबरून आपापल्या झोपड्यांची दारे बंद करून घेऊन आत बसत. असे होऊ लागल्याने त्या गाढवाला रात्रभर शेतातले धान्याचे रोप भरपूर खायला मिळे. पहाट होताच तो परीट त्याला घरी घेऊन जाई व त्याच्या अंगावरचे कातडे काढून ठेवी.

त्या नकली वाघाची अशा तऱ्हेने बरेच दिवस चंगळ झाली आणि त्याची प्रकृतीही सुधारू लागली. पण एके रात्री तो नित्याप्रमाणे शेतात चरत असता, त्याला कुठूनतरी गाढविणीचे ओरडणे ऐकू आले. त्याबरोबर तिच्या सादेला प्रतिसाद देण्यासाठी, वाघाच्या कातड्यातले ते गाढवही आपल्या

भसाड्या आवाजात 'आँऽ आँऽ आँऽ' असे ओरडू लागले. त्यामुळे त्याचे खरे रूप उघडे झाले आणि शेताच्या रखवालदारांनी काठ्यांचा बेदम मार देऊन त्याला ठार केले.'



ही गोष्ट सांगून तो ताम्रमुख वानर त्या मगराला म्हणाला, 'घेतलेले सोंग केव्हातरी उघडकीस येतेच येते. माझा एक परममित्र म्हणून तू घेतलेले सोंगही आता असेच उघडे पडले असल्याने यापुढे तू माझ्याकडे चुकूनही येऊ नकोस. एवढे सांगूनही जर तू आलास, तर त्या शामलक नावाच्या कोडग्या जावयाला जसे त्याच्या सासऱ्याने हाकलून दिले, तसेच मलाही तुझ्या बाबतीत करावे लागेल.' यावर 'ते कसे?' अशी पृच्छा त्या मगराने केली असता ताम्रमुख म्हणाला, 'ऐक-

## गोष्ट पंचावन्नावी

## ज्याला स्वाभिमान नसे, त्याच्या कमरेत लाथ बसे.

विकण्टक नावाच्या नगरीत 'ईश्वर' नावाचा एक मध्यम परिस्थितीतील गृहस्थ राहात होता. एकदा त्याचे चारही जावई त्याच्याकडे पाहुणे म्हणून आले. ईश्वर व त्याची पत्नी यांनी त्यांचे चांगले आगतस्वागत केले व त्यांना जेवूखाऊ घातले. पण पुरते सहा महिने होऊन गेले तरी ते जाण्याचे नाव काढीनात. तेव्हा ईश्वर आपल्या बायकोला म्हणाला, 'आपले जावई भलतेच चिवट आहेत. त्यांचा अपमान केल्याशिवाय ते निघून जाणार नाहीत. म्हणून आज जेवणाच्या वेळी तू त्यांना पाय धुवायला पाणी देऊ नकोस.' बायकोने ही सूचना अंमलात आणताच फक्त मोठा जावई तेवढा रागाने निघून गेला.

दुसऱ्या दिवशी त्या गृहस्थाच्या सूचनेवरून त्याच्या बायकोने उरलेल्या तिघा जावयांना बसायला अगदी लहान पाट दिले. तेव्हा क्रमांक दोनचा जावई डोक्यात राख घालून घरी निघून गेला.

तिसऱ्या दिवशी सासूने पतीच्या सूचनेनुसार त्या उरलेल्या दोन जावयांना ताटांत आदल्या दिवशीचे उरलेले शिळे अन्न वाढले. त्यामुळे

तिसऱ्या क्रमांकाच्या जावयाच्या रोमारोमात अंगार फुलला आणि पाय आदळीत आपटीत तोही निघून गेला. उरलेला चौथा जावई मात्र कुठलाच अपमान मनाला लावून घेत नसल्याचे पाहून, सासऱ्याने त्याला गचांडी देऊन घालवून लावला.

ताम्रमुख ही गोष्ट पूर्ण करतो न करतो तोच समुद्रातला एक प्राणी नजिकच्या किनारी आला आणि त्या मगराला उद्देशून म्हणाला, 'मगरमामा, त्या जांभूळखाऊ वानराचे गोड काळीज आणून देण्याचे वचन देऊन तुम्ही घरातून बाहेर पडल्याला बराच वेळ झाला तरी परत आला नाहीत, तेव्हा तुमचे आता बायकोवर प्रेम उरले नाही, असा समज करून घेऊन मगरमामींनी देहान्त करून घेतला.'

हे वृत्त ऐकून तो मगर मोठ्याने रडत रडत म्हणाला, 'अरेरे! किती दुर्दैवी मी! म्हटलंच आहे ना?-

*माता यस्य गृहे नास्ति भार्या च प्रियवादिनी ।*
*अरण्यं तेन गन्तव्यं यथारण्यं तथा गृहम् ।*

**(ज्याच्या घरात आई व गोड बोलणारी पत्नी नसते, त्याने बेशक अरण्यात जावे, कारण त्याच्या दृष्टीने अरण्य व घर ही सारखीच असतात.)**

a

याप्रमाणे रडता रडता मधेच 'आता मी काय करू?' असा प्रश्न त्याने ताम्रमुखाला विचारला असता तो म्हणाला, 'अरे मूर्खा, जिने तुला तुझ्या मित्राला कपटाने मारण्याचा सल्ला दिला व तुला घरी परतायला जर उशीर होताच संशयाने ग्रासून जिने देहान्त करून घेतला अशा स्त्रीला काय बायको म्हणायचं? म्हटलंच आहे ना?

*या भार्या दुष्टचरिता सततं कलहप्रिया ।*
*भार्यारूपेण सा ज्ञेया विदग्धैर्दारुणा जरा ॥*

**(जी बायको वाईट वागणुकीची असून नेहमी भांडण करण्यात गोडी मानणारी असते, ती बायको नसून बायकोच्या रूपाने अवतरलेली पण वृद्धपण आणणारी एक ब्यादच असते**.)

मगर म्हणाला, 'तू म्हणतोस तो मुद्दा जरा बाजूला ठेवू. पण बायकोपरी बायको गेली आणि तुझ्यासारख्याशी असलेली मैत्रीही संपुष्टात आली. तेव्हा आता मी काय करू? कारण माझी गत त्या गोष्टीतल्या शेतकऱ्याच्या बायकोसारखी झाली आहे.'

यावर म्हणजे कशी?' अशी पृच्छा त्या वानराने केली असता तो मगर सांगू लागला-

# गोष्ट छप्पन्नावी

## घातक्याचे शस्त्र दुधारी,
## ते दुसऱ्याबरोबर धन्याचाही घात करी.

एक सुखवस्तू पण अशक्त व गरीब स्वभावाचा शेतकरी होता. त्याची बायको एका पिळदार शरीराच्या व देखण्या भामट्यावर भाळली आणि त्याने तिला लग्नाचे वचन दिल्याने, एका पहाटे दागदागिने, पैसे व कपडेलत्ते यांसह त्याच्यासंगे पळून जाऊ लागली.

रस्ता चालता चालता सकाळ झाली आणि त्यांना वाटेत एक नदी लागली. तेव्हा तो भामटा तिला म्हणाला, 'लाडके, तू बरोबर आणलेल्या बोचक्यातले मौल्यवान कपडे व दागदागिने भिजून खराब होऊ नयेत म्हणून, ते बोचके मी अगोदर नदीच्या पैलतीरावर नेऊन ठेवतो आणि मग तुला उचलून नेण्याकरिता परत इकडे येतो.' त्याप्रमाणे दागदागिने, पैसे व मौल्यवान कपडे असलेले आपल्याजवळचे बोचके तिने त्याच्या हवाली केले. ते हाती येताच तो नदी पार करून पलीकडे गेला व मोठ्याने ओरडून तिला म्हणाला, 'या उतारवयातही लग्नाच्या नवऱ्याला सोडून माझ्यासारख्या अनोळखी माणसाशी लग्न करायला तयार झालेली तू, उद्या माझ्याहीपेक्षा तरुण व देखणा माणूस आढळल्यास त्याच्याबरोबर पळून

कशावरून जाणार नाहीस? तेव्हा तुझ्याशी लग्न करायला मी काय मूर्ख आहे?' एवढेच तो भामटा म्हणाला आणि त्या बोचक्यासह निघून गेला.

या प्रकाराने डोके सुन्न झाल्यामुळे नदीकाठच्या वाळवंटात बसून 'आता पुढे काय करायचे?' या गोष्टीचा ती विचार करू लागली. इतक्यात तोंडात मांसखंड धरलेली एक कोल्ही तिथे आली. नदीकाठच्या उथळ पाण्यात एक मोठा मासा आल्याचे पाहून, त्याला पकडण्यासाठी तिने तोंडातला मांसखंड वाळवंटात ठेवून त्याच्याकडे धाव घेतली. पण त्यामुळे तो मासा घाबरून खोल पाण्यात निघून गेला आणि इकडे तो वाळवंटात ठेवलेला मांसाचा तुकडा एक गिधाडाने लांबवला.

यामुळे क्रुद्ध झालेली ती कोल्ही त्या मांसखंडासह उडत चाललेल्या गिधाडाकडे रागाने बघत राहिली असता, ती बाई तिला म्हणाली, 'हे कोल्हे, तोंडातला हक्काचा मांसखंड इथे टाकून त्या बेभरंवशाच्या माशामागे धावणारी आणि अखेर त्या दोघांनाही गमावून बसणारी तू किती मूर्ख आहेस?' यावर त्या फटकळ कोल्हीने त्या बाईला प्रश्न केला, 'काय ग, लग्नाच्या हक्काच्या नवऱ्याला सोडून, त्या अनोळखी माणसाच्या नादी लागलेली आणि अखेर नवरा व तो प्रियकर यांच्याबरोबरच पैसा, दागदागिने, कपडेलत्ते आणि अब्रू यांना गमावून बसलेली तू शहाणी का?' तो मगर ही गोष्ट पूर्ण करतो न करतो, तोच समुद्रातून दुसरा एक प्राणी त्या किनाऱ्यापाशी आला व त्या मगराला म्हणाला, 'मगरमामा, एका आडदांड मगराने तुमचे घर बळकावले आहे.'

a

ही दुसरी वाईट बातमी कानी पडताच, तो मगर एकदम हताश होऊन त्या वानराला म्हणाला, 'ताम्रमुखा, मी आयुष्यातून पुरता उठलो! संकट हे कधी एकटेदुकटे येत नाही, हेच खरे. आता या परिस्थितीतून मला तुझ्यासारख्या सज्जनाचा उपदेशच तारू शकेल.'

ताम्रमुख म्हणाला, 'हे मूर्ख मगरा, सज्जनांचा उपदेश हा फक्त त्या उपदेशाप्रमणे वागणाऱ्यांनाच तारक ठरतो. तुझ्यासारख्या चंचलांना नव्हे. तुझ्यासारखे चंचल व मूर्ख लोक गळयात घंटा बांधलेल्या त्या मूर्ख उंटाप्रमाणे स्वतःच स्वतःचा नाश करून घेतात.' यावर 'तो कसा?' असा प्रश्न त्या मगराने केला असता ताम्रमुख वानर त्याला म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट सत्तावन्नावी

## जो सज्जनांचा उपदेश अव्हेरी, तो स्वतःचेच नुकसान करी.

उज्ज्वलक नावाचा एक सुतार बाहेरगावी चालला असता, त्याला वाटेत लागलेल्या झाडीत एक उंटीण व्यायलेली आढळली. तिला व तिच्या पिल्लाला घेऊन तो घरी गेला व त्याने त्यांचा चांगला सांभाळ केला. पिल्लाच्या गळयात त्याने एक घंटा बांधली.

त्या उंटिणीच्या दुधावर त्याला पैसा मिळू लागताच, त्याने तात्पुरते कर्ज काढून आणखी काही उंट-उंटिणी खरेदी केल्या. उंटिणीचे दूध व त्यांना होणारी पिल्ले तो विकी व पैसे मिळवी. एरव्ही त्याचे उंट व उंटिणी चरण्यासाठी वनात नेऊन सोडी. तिथे ते एकत्रपणे चरत. गळयात घंटा बांधलेले पिल्लू तेवढे आपण इतरांपेक्षा कुणी विशेष आहोत, अशा ताठ्याने इतरांपासून दुर राहून चरे.

'तू असा एकटा चरत राहू नकोस,' असा उपदेश त्याला काही सूज्ञ व सज्जन उंटउंटिणींनी अनेक वेळा केला. पण त्यांच्याकडे त्याने दुर्लक्ष केले. अखेर एके दिवशी संध्याकाळी ते सर्व उंट-उंटिणी वनातून घराकडे चालले असता, मुद्दाम मागे राहिलेल्या त्या घंटाधारी गर्विष्ठ पिल्लाला एका सिंहाने फाडून खाल्ले.' ही गोष्ट सांगून ताम्रमुख वानर म्हणाला, 'हे मगरा, त्या उंटाच्या पिल्लाप्रमाणेच तूही मूर्ख आहेस. म्हणुन मी तुला उपदेश करणार नाही.'

a

तो मगर म्हणाला, 'ताम्रमुखा, मी मूर्ख आहे, वाईट आहे, हे तर खरेच! पण चांगल्याशी कुणीही चांगले वागतो. वाईटाशीही जो चांगला वागतो, त्यालाच सज्जन म्हटले जाते ना? मग तू एक सज्जन असल्यामुळे मी माझे घर परत कसे मिळवू या बाबतीत मला मार्गदर्शन कर.'

यावर ताम्रमुख म्हणाला, 'आता तू माझा पिच्छाच पुरविला आहेस तर सांगतो. प्राप्त परिस्थितीत तू तुझे घर बळकावून बसलेल्या त्या दांडगट मगराशी द्वंद्वयुद्ध करून व त्याचा पराभव करून त्याला हाकलून दे. कारण म्हटलंच आहे -

*उत्तमं प्रणिपातेन शूरं भेदेन योजयेत् ।*
*नीचमल्पप्रदादेन समशक्तिं पराक्रमैः ॥*

**(जो श्रेष्ठ असेल त्याच्यापुढे हात जोडून, जो पराक्रमी असेल त्याच्या बाबतीत भेदनीतीचा अवलंब करून, नीच असेल त्याला थोडीफार लाच देऊन, तर तोडीस तोड असलेल्यांना पराक्रम दाखवून आपले काम साधावे**.)

याप्रमाणे सांगून शेवटी तो वानर म्हणाला, 'हे मगरा, महाचतुरक नावाच्या एका कोल्ह्याने याच तंत्राचा वापर करून, एक मेलेला हत्ती आपल्या एकट्याच्या पदरात पाडून घेतला.'

'तो कसा काय?' असे त्या मगराने विचारले असता ताम्रमुख म्हणाला, 'त्याचं असं झालं-

# गोष्ट अठ्ठावन्नावी

## काळ पाहून उपाय योजावे
## आणि आपले घोडे विजयाकडे दौडवावे.

महाचतुरक नावाच्या एका कोल्ह्याला वनात हिंडत असता, एक मेलेला हत्ती आढळला. 'हा हत्ती आपल्याला एकट्यालाच खायला मिळावा,' यासाठीच्या उपायाचा तो विचार करीत असतानाच त्या ठिकाणी एक सिंह आला. त्याला पाहून तो मोठ्या नम्रतेनं म्हणाला, 'दुसऱ्याने मारलेले वा स्वतःहून मेलेले श्वापद महाराज कधी खात नाहीत. तरीही जर त्यांना फारच भूक लागलेली असली, तर त्यांना यथेच्छ हात मारता यावा, यासाठी मी या मृत हत्तीची राखण करीत बसलो होतो.' त्याचे हे बोलणे ऐकून तो सिंह म्हणाला, 'चतुरका, तुझं म्हणणं खरं आहे. शास्त्रच मुळी सांगतं-

*वनेऽपि सिंहा मृगमांसभक्षा बुभुक्षिता नैव तृणं चरन्ति ।*
*एवं कुलीना व्यसनाभिभूता न नीतिमार्गं परिलङ्घयन्ति ।*

a

**(पशूंचे मांस भक्षण करून त्यावर जगणारे वनातले सिंह हे जरी भुकेने व्याकूळ झाले, तरी ते गवत खात नाहीत. तसेच जे कुलवंत असतात, ते जरी संकटात सापडले, तरी नीतीचा मार्ग सोडून वागत नाहीत.)**



याप्रमाणे बोलून व 'तो हत्ती मी तुलाच इनाम देत आहे,' असे म्हणून सिंह तिथून निघून जातो न जातो तोच, एक वाघ तिथे टपकला. 'हा वाघ या हत्तीला खाईल व त्याची हाडे तेवढी मागे ठेवील, असा विचार मनात येऊन तो महाचतुरक त्याला म्हणाला, 'वाघोबा, केवळ तुमच्याबद्दल वाटणाऱ्या आपुलकीपोटी, मी तुम्हाला एक गुपित सांगतो. सिंहमहाराज या हत्तीची शिकार करून नदीवर स्नानाला जाताना मला म्हणाले, 'इथे जर कुणी वाघ आला तर त्याच्याशी गप्पा मारीत त्याला थांबवून ठेव. गेल्या महिन्यात मी एक शिकार करून नदीवर स्नानाला गेलो असता एका वाघाने ती शिकार

उष्टावली. तेव्हापासून या वनात एकही वाघ जिवंत न ठेवण्याची प्रतिज्ञा मी केली आहे.' चतुरकाचे हे बोलणे ऐकून त्या वाघाने तिथून पळ काढला.

नंतर आलेल्या चित्त्याच्या दाढा मजबूत व धारदार असल्याने, महाचतुरकाने त्याला तो हत्ती खाण्याचा आग्रह केला. पण वरचे राठ व चिवट कातडे त्या चित्त्याने फाडताच महाचतुरक त्याला खोटेच म्हणाला, 'चित्तूकाका, सिंह आला. पळा, पळा, पळा.' चित्त्याला ते खरे वाटून त्याने पळ काढला. त्याच्यानंतर आलेला कोल्हा तुल्यबळ असल्याने त्याच्याशी दोन हात करून महाचतुरकाने त्याला पळवून लावला व सवडीनुसार पण एकट्याने त्या हत्तीला खाऊन खलास केला.'

ही गोष्ट त्या मगराला सांगून ताम्रमुख वानर त्याला म्हणाला, 'हे मगरा, तुझ्या घरात शिरलेल्या तुझ्या जातवाल्याशी तू शर्थीने लढून त्याला पळवून लाव. मग तुला कुणीही त्रास देणार नाही. कारण प्रत्येकाचे खरे पण छुपे शत्रू त्याच्या जातीतच असतात. म्हणून तर परदेशात जाऊन आलेल्या चित्रांग नावाच्या कुत्र्याने तिकडे त्याला तसाच आलेला अनुभव आपल्या गावकरी कुत्र्यांना सांगितला ना?"

'तो कसा? असा प्रश्न मगराने केला असता ताम्रमुख म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट एकोणसाठावी

## आपल्याला वाटे 'हा आपला असे'
## पण तोच पाठीत सुरा खुपसे.

दुष्काळामुळे अन्नपाणी मिळेनासे झाल्याने 'चित्रांग' या नावाचा एक धाडसी कुत्रा, दुष्काळ वगैरे नसलेल्या दूरच्या देशातील एका गावी गेला. तिथे गेल्यावर कुणा ना कुणाच्या घरात शिरून, तो नाना तऱ्हेचे रुचकर पदार्थ खायला मिळवत असे, पण त्या घराबाहेर पडताच त्याच्याभोवती कुत्रे जमत व त्याच्यावर भुंकून, वा त्याला चोप देऊन हैराण करीत. अखेर आपला देशच बरा होता. तिथे अन्नाच्या टंचाईमुळे आपल्या जातभाईंमध्ये भुंकण्याचावण्याचे त्राण उरले नसल्याने आपल्याला कुणाचा तसा त्रास नव्हता, असा विचार करून तो कुत्रा स्वदेशी परतला.

पददेशाहुन परतल्यावर गावातल्या कुत्र्यांनी 'चित्रांगा, परदेश कसा काय होता?' असा प्रश्न त्याला केला असता त्याने उत्तर दिले, 'तिकडे अन्नपाणी भरपूर आणि ईश्वरकृपेने बायकाही मंद गतीच्या व गाफील असल्याने, कुणाच्याही घरात शिरून मला नानातऱ्हेच्या पदार्थांवर ताव मारता येई. गोष्ट वाईट ती हिच की, आपले तिथले जातभाई एकमेकांना पाण्यात पाहणारे, व परस्परांबद्दल शत्रूत्वभावना ठेवणारे आहेत.'

a

ही गोष्ट सांगून ताम्रमुख वानर त्या मगराला म्हणाला, 'तेव्हा तुझ्या घरात घुसलेल्या त्या हडेलहप्पी मगराचा तू नाश कर, म्हणजे त्यात तुला सुखाने राहता येईल.' त्या मगराने तसे केले, आपले घर परत मिळविले व पुढले आयुष्य सुखात व शांततेत घालविले.

या गोष्टी त्या तीन राजकुमारांना सांगून चौथ्या तंत्राचा समारोप करीत असता विष्णुशर्मा म्हणाला, 'पराक्रम व धाडस हे गुण अंगी असल्याशिवाय कुणाला वैभव प्राप्त होत नाही, आणि समजा, योगायोगाने ते प्राप्त झाले तरी, त्याला त्या कष्टप्राप्त वैभवाची रुची येत नाही. म्हटलंच आहे-

*अकृत्य पौरुषं या श्रीः किं तयापि सुभोग्यया ।*
*जरद्गवोऽपि समश्नाति दैवादुपगतं तृणम् ॥*

**(पराक्रम न करता जे वैभव प्राप्त होते, त्याचा उपभोग घेण्यात कसली गोडी आली आहे? तसा म्हातारा बैलसुद्धा नशिबाने पुढ्यात येणारे गवत खाऊन दिवस ढकलतोच**.)

a

# तंत्र पाचवे

# अपरीक्षितकारक

# अपरीक्षितकारक

आपल्या आश्रमातील त्या डेरेदार वृक्षाच्या तळी अंथरण्यात आलेल्या आसनावर बसण्याकरिता विष्णुशर्मा येताच, त्या तीन राजकुमारांनी मोठ्या नम्रपणे नमस्कार करून विचारले, 'गुरुदेव, आज आपण पाचव्या व शेवटच्या तंत्राला सुरुवात करणार आहात ना?' विष्णुशर्मा म्हणाला, 'होय. या तंत्राचे नाव 'अपरीक्षित-कारक' म्हणजे 'न जाणता करण्यात येणाऱ्या गोष्टींसंबंधीचे प्रकरण' असा आहे. जे आपण प्रत्यक्ष पाहिले नाही, ऐकले नाही, आपल्याला समजले नाही, किंवा मुळाशी जाऊन ज्याची स्वतः परीक्षा केली नाही, असे आपण कधीही करू नये. तसे केल्यास जैन यतींच्या डोक्यात काठीचे प्रहार करून त्यांचे प्राण घेणाऱ्या एक अविचारी न्हाव्यावर जसा सुळी जाण्याचा प्रसंग ओढवला, तसा प्रसंग ओढवतो.' यावर त्या राजकुमारांनी 'तो कसा काय?' अशी पृच्छा केली असता, विष्णुशर्मा म्हणाला, 'ऐका अणि त्यापासून योग्य तो बोध घ्या-

# गोष्ट साठावी

## कुठल्याही गोष्टीच्या मुळाशी जावे,
## आणि मगच योग्य ते करावे.

दक्षिणेकडील 'पाटलीपुत्र' नगरात 'मणिभद्र' नावाचा एक व्यापारी राहात होता. धंद्यात कमालीची खोट खावी लागल्याने, दोन वेळच्या अन्नालाही महाग होण्याची वेळ त्याच्यावर आली आणि भोवतालच्या जगात त्याची किंमत एकदम कमी झाली. तो स्वतःशीच म्हणाला, 'अरेरे! दारिद्र्य किती वाईट! ते सर्व गुणांना मातीमोल करून टाकते! म्हटलंच आहे ना?-

*शीलं शौचं क्षान्तिर्दाक्षिण्यं मधुरता कुले जन्म ।*
*न विराजन्ति हि सर्वे वित्तविहीनस्य पुरुषस्य ॥*

**(शील, शुद्धता, क्षमा, नम्रता, स्वभावातील गोडवा, कुलीनता या सर्व गोष्टी धन नसलेल्या पुरुषापाशी असल्या, तरी त्या कुणाच्या डोळ्यांत भरत नाहीत.)**

'असले अपमानकारक जिणे जगण्यापेक्षा आयुष्याचा शेवट करून घेतलेला काय वाईट?' अशा तऱ्हेचा विचार मणिभद्र एका रात्री अंथरुणात पडल्या पडल्या करीत असता तो झोपी गेला आणि त्याच्या स्वप्नात एक

जैन यती येऊन त्याला म्हणाला, 'हे मणिभद्रा! तू आपल्या मनात असे आत्महत्येचे विचार आणू नकोस. तुझ्या वाडवडिलांनी धर्मासाठी जे विपुल धन खर्च केले, तेच धन माझ्या रूपाने आता तुला दर्शन देत आहे. उद्या सकाळी याच रूपात मी तुझ्याकडे ' पद्मनिधी' हे नाव धारण करून येईन. तेव्हा तू माझ्या मस्तकावर काठीने एक जोरदार प्रहार कर, म्हणजे माझे रूपांतर एका सुवर्णपुतळ्यात होईल. त्या पुतळ्यातील आवश्यक तेवढे सोने गरजेनुसार खर्च करुन, तू पुन्हा व्यापारात जम बसव.' एवढे बोलून तो जैन यती अंतर्धान पावला.

दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान वगैरे उरकून व हाती काठी घेऊन मणिभद्र त्या यतीची वाट पाहात घराच्या पुढल्या ओसरीवर बसला. नेमका त्याच वेळी दुसऱ्या काही कामानिमित्त एक न्हावी त्याच्याकडे आला. तेवढ्यात पहाटे स्वप्नात आलेला तो जैन यतीच पुढल्या अंगणात येऊन थडकला. मणिभद्राने त्याला नाव विचारताच त्याने आपले नाव 'पद्मनिधी' आहे, असे सांगताच, मणिभद्रने आपल्या हातातल्या काठीचा प्रहार त्याच्या मस्तकावर केला. त्याच क्षणी तो यती सोन्याचा पुतळा होऊन जमिनीवर कोसळला मणिभद्राने त्या पुतळ्याला उचलून घरात नेले व न्हाव्याने हा प्रकार इतर कुणाला सांगू नये म्हणून त्याला मौल्यवान कापड व धन दिले.

'याच रीतीने आपण मणिभद्रापेक्षाही श्रीमंत होऊ या,' असा विचार मनात आणून व जैन यतींना वस्त्रे दान करण्याचे आमिष दाकवून, त्याने

त्यांना आपल्या घरी येण्याचे आमंत्रण दिले. त्याप्रमाणे गावातल्या मठातून पाचपंचवीस जैन यती घरी येताच, त्या मूर्ख व अविचारी न्हाव्याने खैराच्या सोट्याने त्यांची टाळकी फोडायला सुरूवात केली. त्या अनपेक्षित हल्ल्यात सापडलेले काही यती तिथल्या तिथे मेले, तर काही पळून गेले.

पुढे जेव्हा न्यायाधीशासमोर खटला सुरू झाला आणि त्या न्हाव्याने 'आपण श्रीमंत होण्यासाठी मणिभद्राचा मार्ग अवलंबिला,' असे सांगितले, तेव्हा मणिभद्राला बोलावून न्यायमूर्तींनी त्याच्याकडे घडलेल्या प्रकाराचा खुलासा करून घेतला. तो ऐकून न्यायमूर्ती म्हणाले, 'कुठल्याही गोष्टीच्या मुळाशी न जाता जो अविचाराने कृती करतो त्याच्यावर त्या निरपराध मुंगसाला जिवे मारणाऱ्या अविचारी बाईवर जसा पश्चात्ताप करण्याचा प्रसंग आला तसा येतो. या अविचारी न्हाव्याला मी अपराधाबद्दल सुळावर चढविण्याची शिक्षा फर्मावितो.'

'पण महाराज, त्या अविचारी बाईची व मुंगसाची गोष्ट काय आहे?' असे मणिभद्राने विचारले असता न्यायमूर्ती म्हणाले, 'ऐका-



# गोष्ट एकसष्ठावी

## अविचारासारखा शत्रु विरळा,
## ज्याने त्याला थारा दिला, तो बरबाद झाला.

एका गावी देवशर्मा नावाचा एक ब्राह्मण, आपली पत्नी व एक लहान मूल यांच्यासह गरिबीत दिवस ढकलीत होता. त्याने एक मुंगूसही पाळला होता. त्या उभयता पतिपत्नींचा जर त्या मुंगुसावरही जीव होता, तर त्यांना आपला गोजिरवाणा मुलगा किती प्रिय असेल? बाकी स्वतःचा मुलगा कसाही जरी असला तरी तो 'आपला' म्हणून आईबापांना प्रिय असतोच. म्हटलंच आहे-

*कुपुत्रोऽपि भवेत् पुंसां हृदयानन्दकारकः ।*
*दुर्विनीतः कुरूपोऽपि मूर्खोऽपि व्यसनी खलः ॥*

**(आपला मुलगा वाईट असो, कुरूप असो, मूर्ख असो वा व्यसनी किंवा दुष्ट असो, लोकांना तो आनंददायीच वाटतो.)**

एकदा आपले मूल निजले असता ती ब्राह्मणी, आपल्या पतीला त्याच्यावर लक्ष ठेवायला सांगून पाणी भरण्यासाठी नदीवर गेली. ती जाताच, आपल्या मुलाला कोण काय करणार आहे, पण भिक्षा मागण्यासाठी आपण उशीरा बाहेर पडल्यास मात्र इतर भिक्षुक अगोदर

a

भिक्षा मागून गेल्याने, आपल्या आजच्या भिक्षेवर परिणाम होणार आहे, असा विचार करून तोही घराबाहेर पडला. त्यानंतर लगेच एक सर्प त्या घरात शिरला व त्या निजलेल्या मुलाच्या दिशेने जाऊ लागला. त्या इमानी मुंगुसाच्या लक्षात तो धोका येताच, त्याने वाटेतच त्याच्याशी झुंज घेतली व त्याला चावचावून त्याची खांडोळी करून टाकली. मग थकलेला तो मुंगूस पुढल्या उंबरठ्यात बसून, आपल्या मालक-मालकिणीची वाट पाहू लागला.

पाणवठ्यावरून घरी येताच, जेव्हा त्या ब्राह्मणीने त्या मुंगुसाचे रक्ताने माखलेले तोंड पाहिले तेव्हा या दुष्टाने आपल्या बाळालाच खाल्ले, असा समज झाल्याने तिचे माथे भडकले व कमरेवरची पाण्याने भरलेली घागर त्याच्या मस्तकावर आदळून, तिने त्याला ठार केले. मग घरात जाताच जेव्हा तिला खरा प्रकार दिसला, तेव्हा तिला पश्चात्ताप झाला.

थोड्या वेळाने भिक्षेसह घरी आलेल्या पतीला घडलेला प्रकार सांगून, ती रडत रडत म्हणाली, 'मी सांगूनही, तुम्ही अधिक भिक्षा मिळविण्याच्या लोभाने घराबाहेर गेलात, म्हणूनच हा सारा प्रकार घडला. लोभ वाईट. या अतिलोभामुळेच ना, त्या ब्राह्मणाच्या मस्तकाभोवती चक्र फिरत राहिले?' यावर त्या ब्राह्मणाने 'ते कसे?' असे विचारले असता त्याची बायको म्हणाली, 'प्रकार असा झाला -

# गोष्ट बासष्ठावी

## लोभ धरी अती, त्याच्या तोंडात पडे माती

एका गावात दारिद्र्याने पिडलेले चार ब्राह्मण तरुण एकमेकांचे मित्र होते. एकदा ते एकत्र आले असता, त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, 'आपण दरिद्री असल्यामुळे आपले नातेवाईकसुद्धा आपल्याला काडीची किंमत देत नाहीत. मग इथे राहण्यात काय अर्थ? म्हटलंच आहे ना? -

*वरं वनं व्याघ्रगजादिसेवितं जलेन हीनं बहुकण्टकावृतम् ।*
*तृणानि शय्या परिधानवल्कलं न बन्धुमध्ये धनहीनजीवितम् ॥*

**(वाघ व हत्ती यांचा बुजबुजाट असलेले, जलहीन व काट्याकुट्यांनी भरलेले असे अरण्य पत्करले व तिथे वल्कले नेसून गवताच्या बिछान्यावर पहुडलेले परवडले, पण दरिद्री अवस्थेत नातेवाईकांमध्ये राहणे नको.)**

हे त्याचे म्हणणे पटल्यामुळे नशीब काढण्यासाठी त्यांनी आपला गाव सोडला व उज्जयिनीचा रस्ता धरला.

तिथे गेल्यावर क्षिप्रा नदीत स्नान करून व महांकालेश्वराचे दर्शन घेऊन ते भैरवानंद नावाच्या एका सिद्ध पुरुषाला भेटले व म्हणाले, 'महाराज, आम्हाला धनप्राप्तीचा मार्ग दाखवा.' ते ऐकून त्या चौघांपैकी प्रत्येकाला एकेक सिद्धीची दिव्य वात देऊन भैरवानंद म्हणाला, 'या वाती घेऊन तुम्ही हिमालयात जा व चालत राहा. पहिली वात जिथे पडेल तिथेच तुम्हाला पोटाचे साधन मिळेल. पण तेवढ्याने तुमचे समाधान नाहीच झाले, तर आणखी पुढे जा, व दुसरी वात पडेल तिथे तुम्हाल जे मिळेल ते घ्या.'

मग त्या दिव्य वाती घेऊन ते चौघे हिमालयातून जाऊ लागले असता, एकाच्या हातातली वात खाली पडली. त्याने तिथे जमीन खणून पाहिली असता, त्याला तिथे तांब्याची खाण आढळून आली. तो म्हणाला, 'हे तांबे विकून मी आयुष्यभर सुखात जगेन. आपण सर्वचजण इथे थांबून या खाणीतल्या तांब्यावर पोट भरू या.' बाकीचे तिघे नाक मुरडून म्हणाले, 'छे! तांबे विकून काही आपण वैभवात राहू शकणार नाही. आम्ही पुढे जातो.'

याप्रमाणे बोलून उरलेले तिघे पुढे चालू लागले असता, दुसऱ्या तरुणाच्या हातातली वात खाली पडली. त्याला तिथे चांदीची खाण सापडली. तो तिथे थांबला. पण उरलेले दोघे म्हणाले, 'चांदी विकून विकून कितीसे पैसे मिळणार? आम्ही पुढे जातो.' याप्रमाणे बोलून उरलेले दोघे थोडे पुढे जात असता तिसऱ्याच्या हातातली वात पडली. त्याला तिथे सोन्याची

खाण सापडली. तो चौथ्या साथीदाराला म्हणाला, 'ही खाण आपल्याला दोघांनाही वैभवात ठेवील. मी तर इथेच थांबतो. पण तूही इथेच थांबलेले बरे.' पण चौथा लोभी तरुण म्हणाला, 'मी आणखी पुढे जातो. मला रत्नांची खाण मिळेल.'

यापमाणे बोलून चौथा तरुण पुढे चालत असता त्याच्याही हातातली वात खाली पडली. पण मोठ्या आनंदाने तो तिथली जमीन खोदणार, तोच एक चक्र घोंगावत आले व त्याच्या मस्तकाभोवती फिरू लागले. त्यामुळे नुसते बसून राहण्याखेरीज त्याला काहीच करता येईना. तेवढ्यात त्याचे लक्ष एका हाडकुळया माणसाकडे गेले. त्या दोघांची दृष्टादृष्ट होताच तो हाडकुळा माणूस म्हणाला, 'तू रत्नांच्या लोभाने इकडे आलास हे बरे झाले. कारण त्यामुळे गेली एक हजार वर्षे माझ्या मस्तकाभोवती फिरत असलेले चक्र मला सोडून आता तुझ्या पाठीशी लागले.'

'पण असे होण्याचे कारण काय?' असे त्या चौथ्या ब्राह्मण तरुणाने विचारले असता तो हडकुळा मनुष्य म्हणाला, 'मी पण उज्जयिनीच्या एका सिद्ध पुरुषाने दिलेली वात हाती घेऊन धनाच्या शोधार्थ हिमालयात आलो होतो. पण तांबे, रूपे व सोने यांच्या खाणींवर समाधान न मानता रत्नांच्या शोधार्थ इकडे आलो आणि हा मुलूख कुबेराचा असल्याने त्याने फेकलेल्या चक्रामुळे एका जागी जखडून पडलो. यापुढे जेव्हा तुझ्यामाझ्यासारखा

a

लोभी मनुष्य रत्नांच्या शोधार्थ इकडे येईल, तेव्हा हे चक्र तुला सोडून त्याच्या मस्तकाभोवती फिरत राहील. तोपर्यंत माझ्याप्रमाणेच तुलाही तहानभुकेने व्याकूळ अशा स्थितीत जीतेजागते जीवन जगावे लागेल.' तो हाडकुळा मनुष्य असे बोलला आणि निघून गेला.

ज्याला सोन्याची खाणी सापडली होती, त्या 'सुवर्णसिद्धी' ने पुरेसे सोने घेऊन, रत्नांच्या शोधार्थ गेलेल्या व 'चक्रधर' बनलेल्या आपल्या मित्राच्या येण्याची बराच वेळ वाट पाहिली. अखेर तो त्याच्या शोधार्थ निघाला. जेव्हा मस्तकाभोवती चक्र फिरत असलेला 'चक्रधर' त्याला आढळला व त्याच्याकडून त्याला सर्व प्रकार कळला, तेव्हा तो त्याला म्हणाला, 'मित्रा, मी तुला सोन्याच्या खाणीतच समाधान मानायला सांगत असता, तू सारासार विचार न करता पुढे आलास, आणि मृत सिंहाला जिवंत करून स्वतःचा प्राणांत करून घेणाऱ्या त्या चार अविचारी ब्राह्मणकुमारांप्रमाणे स्वतःचा घात करून घेतलास.' यावर 'तो कसा?' असा प्रश्न चक्रधराने केला असता सुवर्णसिद्धी त्याला म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट त्रेसष्ठावी

## सारासार विचाराने अडाणीही तरे,
## तर त्याच्याभोवती ज्ञानीही मरे.

एका गावात चार ब्राह्मण मित्र होते. त्यांच्यापैकी तिघे हे वेगवेगळ्या विद्यांत पारंगत होते. चौथा मात्र घरच्या कठीण परिस्थितीमुळे अल्पशिक्षित राहिला होता. पण असे असले तरी सारासार विचारबुद्धी मात्र त्यालाच त्या चौघांत जास्त होती.

एकदा ते तिघे ज्ञानी मित्र आपल्या विद्येचे चीज परराज्यात गेल्यानेच होईल असा विचार करून प्रवासाला निघाले असता, त्यांचा तो चौथा मित्रही त्यांच्यासंगे जायला निघाला. तेव्हा त्या तिघा विद्वान् मित्रांपैकी दोघे त्याची निर्भत्सना करून त्याला म्हणाले, 'अरे, तू अडाणी. परदेशात तू काय उजेड पाडणार? उलट तू आमच्यासंगे आल्याने, आम्हाला मात्र आमच्या प्राप्तीतला काही भाग तुला कारण नसता द्यावा लागेल.' यावर त्या तिघांमधला उरलेला तिसरा त्या दोघांना म्हणाला, 'अहो, एकतर हा आपला मित्र आहे. त्यातून खरं तर तो जरी आपला मित्र नसता, तरी अशी संकुचित वृत्ती बाळगणं अयोग्य आहे. कारण-

***अयं निजः परो वेतो गणना लघुचेतसाम् ।***
***उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्॥***

a

**(हा माझा, तो परका, अशी वृत्ती संकुचित मनाच्या माणसांची असते. परंतु थोर मनोवृत्तीची माणसे हे जगच आपले कुटुंब असल्याचे मानतात**.)

तिसऱ्याने असा शास्त्राधार दिल्यावर ते चौघेही एकत्रपणे पुढल्या मार्गाला लागले. चालता चालता ते एका रानवाटेने जाऊ लागले असता, त्यांना एके ठिकाणी सिंहाची हाडे पडलेली दिसली. ती पाहून ते पुस्तकी पंडित आपापसांत म्हणाले, 'वाः! आपल्या विद्येचे सामर्थ्य सिद्ध करून दाखविण्याची संधी कशी अगदी चालून आली आहे.'

एवढे बोलून एकाने आपल्या विद्येच्या सहाय्याने ती सुटी हाडे सांधून, त्यांचा अखंड व पूर्ण असा सांगाडा बनविला. दुसऱ्याने त्या सांगाड्यात मांस व रक्त घातले व त्याला प्राणहीन सिंह बनविले. आता तिसरा आपल्या मंत्रविद्येने त्याच्यात प्राण ओतणार, तोच काहीसा अडाणी पण सारासार विचार असलेला चौथा त्याला म्हणाला, 'बाबा रे, असा अविचार करू नकोस. तो सिंह जिवंत झाला तर आपणा चौघांनाही फाडून खाणार नाही का?' पण मी माझी मंत्रविद्या वाया घालविणार नाही,' असे ठासून सांगून तो तिसरा तरूणमंत्र पुटपुटू लागला असता, तो चौथा तरुण एका झाडाच्या शेंड्यावर जाऊन बसला व काय होते ते पाहू लागला. पण त्याच्या बोलण्याप्रमाणेच झाले. त्या सिंहात प्राण संचारताच तो उठला आणि त्याने त्या तिघाही तरुणांचा फडशा उडविला. मग तृप्त झालेला तो सिंह निघून गेल्यावर, तो चौथा तरुण खाली उतरला व घरी निघून गेला.

a

ही गोष्ट सांगून सुवर्णसिद्धी म्हणाला, 'मित्रा चक्रधरा, तसं पाहता तू चांगला कुलवान व ज्ञानी आहेस, पण सारासार विचाराला सोडचिठ्ठी दिलीस म्हणून तू असा आत्मघात करून घेतलास. नुसते पुस्तकी ज्ञान कामी येत नाही. त्याला सारासार विचाराची जोड हवी. ती नव्हती, म्हणूनच एका गावच्या चार पुस्तकी पंडितांनी स्वतःची फजिती करून घेतली ना?' यावर 'ती कशी?' अशी पृच्छा चक्रधराने केली असता, सुवर्णसिद्धी त्याला ती गोष्ट सांगू लागला.

# गोष्ट चौसष्ठावी

## ज्यांचे ज्ञान नुसतेच पुस्तकी, त्यांचे हसे होई या लोकी.

एका गावातले चार ब्राह्मण तरुण विद्यावंत होण्यासाठी कनोज शहरी गेले. तिथे गुरूकडे असलेले सर्व ग्रंथ त्यांनी - खोलात न जाता - मुखोद्गत केले आणि मग गुरूची परवानगी घेऊन, ते आपल्या गावाकडे जायला निघाले.

चालता चालता रस्त्याला आणखी एक फाटा फुटलेला त्यांना दिसला. 'आता डाव्या रस्त्याने जायचे की उजव्या? ' असा प्रश्न त्यांच्यापुढे पडला. योगायोगाने त्याच वेळी डाव्या फाट्याने बरीच माणसे एका वाण्याच्या मुलाचे प्रेत नेताना त्यांच्या दृष्टीस पडली. त्यांना पाहुन त्या चौघांपैकी एक पढतमुर्ख टाळी वाजवून म्हणाला, 'महाजनो येन गतः स पन्थः । म्हणजे **बरेच लोक ज्यावरून जात असतात तोच (योग्य) मार्ग समजावा** असं शास्त्र सांगतं. मग ते लोक चालले आहेत, त्यांच्या पाठीमागेच जाऊ या की!' त्याचे हे म्हणणे बाकीच्या तिघांनाही पटले व चौघेही त्या लोकांमागोमाग स्मशानात पोहोचले.

तिथे एक गाढव उभे होते. त्याला पाहून दुसरा पढतमूर्ख आपल्या मित्रांना म्हणाला, 'ज्या अर्थी प्रत्यक्ष स्मशानातसुद्धा हा आपल्यासंगे उभा

आहे त्या अर्थी हाच आपला हितचिंतक व नातेवाईक आहे. कारण माझ्याजवळच्या ग्रंथात स्पष्टपणे सांगितलं आहे-

*उत्सवे व्यसने चैव दुर्भिक्षे शत्रुसंकटे ।*
*राजद्वारे श्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः ॥*

**(उत्सवप्रसंगी, संकटात, दुष्काळात, शत्रूपासून धोका उत्पन्न झाला असता, राजाच्या दरबारात; एवढेच नव्हे, तर स्मशानातसुद्धा जो आपल्यामागे उभा राहतो तोच खरा आप्त**.)

आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्याने ग्रंथ उघडून ते वचन दाखविताच बाकीच्या तिघांनाही त्याचे म्हणणे पटले व ते त्या गाढवापाशी जाऊन त्याचे मोठ्या प्रेमाने लाड करू लागले.

तेवढ्यात तिथून जलदगतीने चाललेल्या उंटाला पाहून व हा प्राणी कोण आहे? - हे जाणून घेण्यासाठी आपल्याजवळचा ग्रंथ उघडून तिसरा शहाणा म्हणाला, 'अहो! धर्मस्य त्वरिता गतिः । म्हणजे **धर्म हा कुणासाठी थांबत नाही**, असं ज्या अर्थी शास्त्रवचन आहे व ते ज्या अर्थी या प्राण्याला लागू पडत आहे, त्या अर्थी हा वेगाने चाललेला प्राणी धर्मच असला पाहिजे.'

यावर चौथा शहाणा म्हणाला, 'तुझं म्हणणं बरोबर आहे. पण ज्या अर्थी माझ्याजवळच्या ग्रंथात 'इष्टं धर्मेण योजयेत् । म्हणजे **'आपल्याला योग्य वा प्रिय असलेल्या गोष्टींची धर्माशी सांगड घालावी**,' असे सांगितले आहे, त्या अर्थी आपण आपल्याला अत्यंत प्रिय असलेल्या

a

गाढवरूपी नातेवाईकाची सांगड करून ती या 'धर्मा' च्या गळयात बांधू या.' त्या शहाण्याचे हे म्हणणे बाकीच्या तिघांनाही पटल्याने, त्यांनी त्या गाढवाला ओढत त्या उंटाकडे नेले व त्याला त्या उंटाच्या गळयात बांधू लागले. तेवढ्यात गाढवाचा मालक तिथे आला आणि त्याने त्या चौघांनाही काठीने चोप दिल्यामुळे त्यांनी तिथून पोबारा केला.

पुढे वाटेत एक नदी लागली. तिला पाणी बरेच असल्याने पैलथडी कसे जायचे - असा त्यांना प्रश्न पडला. पण त्यांच्यापैकी एका शहाण्याच्या एका ग्रंथात 'आगमिष्यति यत्पत्रं तदस्मांस्तारयिष्यति । (**प्रसंगी जरी एका पानाचा आधार मिळाला, तरी ते आपल्याला तारू शकते**.) हे वचन आढळले. त्याने तो शास्त्राधार आपल्या सहकाऱ्यांना म्हणून दाखवून तो त्या नदीतल्या पाण्यातून वाहात चाललेल्या पळसाच्या पानावर बसू लागला. पण त्या खटपटीत तो बुडू लागला. तेव्हा दुसरा शहाणा म्हणाला,

*सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः ।*
*अर्धेन कुरुते कार्यं सर्वनाशो हि दुःसहः ॥*

(**सर्वनाश होण्याचा प्रसंग आला असता, सूज्ञ अर्ध्यावर पाणी सोडतो. कारण उरलेल्या अर्ध्याने काहीतरी कार्यभाग साधता येतो. पण सर्वस्वाचा नाश असह्य होतो**.)

याप्रमाणे बोलून व आपल्या बुडणाऱ्या सहकाऱ्याची शेंडी पकडून, त्याने त्याचे मुंडके कापून घेतले आणि 'चला, पूर्ण मित्रालाच काही मुकावे

लागले नाही,' असे म्हणून तो व त्याचे दोन सहकारी कसेतरी पुढे प्रवास करू लागले.

मग ते मुंडके विधीपूर्वक जाळून ते तिघे वाटेला लागलेल्या एका गावात शिरले. त्या गावात त्यांना तीन गावकरी भेटले. त्यांच्यापैकी प्रत्येकाने एकेकाला आपापल्या घरी जेवायला बोलावले. त्यांच्यापैकी एकासाठी यजमानाने बायकोला शेवया करायला सांगितल्या. पानात शेवयांचे लांब लांब धागे पाहताच त्या पाहुण्या पंडिताला '***दीर्घसूत्री विनश्यति*** ।' हे शास्त्रवचन आठवले. वास्तविक त्या शास्त्रवचनाचा अर्थ **'कुठल्याही कामात दिरंगाई करणारा नाश पावतो'** असा होता. पण त्या शहाण्याने या वचनाचा अर्थ 'लांब धागे ज्याच्याकडे असतात तो नाश पावतो.' असा घेतला व तो पानावरून पळून गेला.

दुसरा 'शहाणा' ज्याच्या घरी गेला होता त्याची बायको मांडे करीत होती. विस्तवात पटकन् फुगून मोठे होणारे मांडे पाहून त्या शहाण्याला एक शास्त्रवचन आठवलं -

*अति विस्तारविस्तीर्णं न तद्भवेत् चिरायुषम् ।*

(**ज्याचा वेगाने विस्तार होतो ते लवकर नाश पावते**.)

'मग हे असले अन्न खाण्यात काय अर्थ?' - असे म्हणून तोही रात्रीच्या अंधारातून पळून गेला.

तिसरा पुस्तकी पंडित ज्या घरी गेला, त्याच्या पानात यजमानिणीने आंबोळी वाढली होती. तिला पडलेली छिद्रे पाहून तो यजमानाला

a

म्हणाला, 'अहो महाराज, शास्त्रात स्पष्टपणे सांगितलं आहे की, 'छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति ।' म्हणजे **एखाद्या गोष्टीला एकदा छिद्रे पडली की त्या छिद्रांमधून संकटपरंपरा सुरू होते.** सदऱ्याला एक भोक पडले की, तो फाटू लागतो. नौकेच्या तळाशी एक छिद्र पडले तरी, ती बुडू लागते. पण या आंबोळीला तर शेकडो छिद्रे आहेत. तेव्हा अनेक संकटांना कारणीभूत होणारी ही आंबोळी मी कशी खाऊ?' असे म्हणून तोही पुस्तकी पंडित उपाशी पोटी निघून गेला.'

ही गोष्ट सांगून सुवर्णसिद्धी चक्रधराला म्हणाला, 'म्हणून मी म्हणालो, **नुसती विद्वत्ता उपयोगाची नाही. व्यवहारबुद्धीही हवी**.'

यावर चक्रधर बोलू लागला, 'या सगळ्या दैवाच्या गोष्टी आहेत. म्हणून तर शतबुद्धी व सहस्त्रबुद्धी हे मासे त्या कोळयाच्या हाती लागले आणि ते बेडूक जोडपे मात्र सामान्यबुद्धीचे असूनही सुखात राहिले.' हे ऐकून सुवर्णसिद्धाने 'ते कसे?' असे विचारले असता चक्रधर म्हणाला, 'नीट ऐक-

## गोष्ट पासष्ठावी

## वाचावीर केवळ बेत करती, पण कृतीवीर ते तडीस नेती.

एका तळयात राहणारा 'एकबुद्धी' नावाचा विचारी बेडूक आणि 'शतबुद्धी' व 'सहस्त्रबुद्धी' हे दोन विद्वान मासे, एके दिवशी काठावरच्या उथळ पाण्यात शिळोप्याच्या गप्पा मारीत असता, जवळच्याच रस्त्याने जाणाऱ्या दोन कोळयांनी त्यांना पाहिले. 'हे मासे आपण उद्या पकडून नेऊ,' असे बोलून ते कोळी निघून गेले. पण घाबरलेल्या एकबुद्धी बेडकाने त्या माशांना विचारले, 'ऐकलेत ना, ते काय बोलले ते? आता ते जरी तुम्हा माशांना पकडायला नेणार असले, तरी तुम्हीही माझे मित्रच ना? शिवाय मासे पकडताना त्यांना तळे तुडवावे लागणार असल्याने त्यांच्या पायाखाली सापडून मी वा माझी पत्नी चिरडलो गेलो तर? तेव्हा आताच आपल्याला एखादा मार्ग शोधून काढला पाहिजे.' यावर सहस्त्रबुद्धी म्हणाला, 'हे पहा, एकबुद्धी, दुष्टांचे सगळेच बेत काही तडीस जात नाहीत. त्यातून समजा ते खरोखरच आले, तरी माझ्यासारखा बुद्धिवंत त्या संकटातून सहीसलामत सुटण्याचा मार्ग शोधून काढील आणि स्वतःप्रमाणेच इतरांनाही वाचवील.'

त्याचे हे बोलणे ऐकून शतबुद्धी त्या बेडकाला म्हणाला, 'मित्रा, अरे सहस्त्रबुद्धी जे बोलतोय ते खरे आहे. त्याच्या-माझ्यासारख्या बुद्धिवंतांना या जगात अशक्य ते काय आहे?बुद्धीच्या सामर्थ्यावरच त्या चाणक्याने शस्त्रास्त्रांनी सुसज्ज अशा नंदाचा नाश केला ना? बुद्धीचा प्रभाव असा आहे की-

*न यत्रास्ति गतिर्वायो रश्मीनां च विवस्वतः ।*
*तत्रापि प्रविशत्याशु बुद्धिर्बुद्धिमतां सदा ॥*

**(जिथे वायु, सूर्य किंवा सूर्यकिरणे यांचाही प्रवेश होऊ शकत नाही, अशा ठिकाणी बुद्धिमंतांची बुद्धी केव्हाही झटकन प्रवेश करू शकते**.)

यावर एकबुद्धी बेडूक त्या दोघांना म्हणाला, 'देवाने मला जरी तुमच्याएवढी बुद्धी दिली नसली, तरी थोडीफार व्यवहारबुद्धी मात्र दिली आहे. त्यामुळे मी आत्ताच माझ्या सौभाग्यवतीसह दुसऱ्या एखाद्या सुरक्षित जलाशयात जातो.' एकबुद्धी असे बोलला आणि शतबुद्धी व सहस्त्रबुद्धी आपल्या भित्रेपणाला हसत आहेत, या गोष्टीकडे दुर्लक्ष करून, दुसऱ्या एका विहिरीच्या आश्रयाला गेला.

a

दुसऱ्या दिवशी दोघेही कोळी आले आणि शतबुद्धी व सहस्त्रबुद्धी यांच्यासह त्या तळ्यातल्या सर्व माशांना पकडून ते घरी जाऊ लागले.

अशा तऱ्हेनं ते कोळी त्या विहिरीजवळून चालले असता, विहिरीच्या काठावर आरामात बसलेला एकबुद्धी बेडूक आपल्या बायकोचे तिकडे लक्ष वेधून तिला म्हणाला, 'बघितलेस ना? बुद्धिवान शतबुद्धीला एक कोळी डोक्यावरून नेत आहे, महाबुद्धिवान सहस्त्रबुद्धीला दुसरा कोळी हातात उलटा लोंबकळत नेत आहे, आणि हा एकबुद्धी मात्र बायकोसंगे या विहिरीत सुखात गप्पा मारीत आहे.' ही गोष्ट सांगून चक्रधर म्हणाला, 'मित्रा सुवर्णसिद्धी, तेव्हा या सर्व दैवाधीन गोष्टी आहेत.'

यावर सुवर्णसिद्धाने उत्तर दिले, 'दैव कसले कपाळाचे! हा त्या माशांचा अतिशहाणपणा त्यांना नडला. 'मामा, त्या पहारेकऱ्याने हा तुमचा सन्मान तुमच्या गोड गाण्याबद्दल केला ना?' असे जे त्या कोल्ह्याने त्या गाढवाला उपरोधाने विचारले, ते त्या गाढवाने अतिशहाणपणाने स्वतःवर संकट ओढवून घेतले म्हणूनच ना?' हे ऐकून 'ती गोष्ट काय आहे?' अशी विचारणा चक्रधराने करताच सुवर्णसिद्धी त्याला ती गोष्ट सांगू लागला-

# गोष्ट सहासष्ठावी

## जो मोठेपणाच्या भ्रमात राही,
## त्याच्यावर रडण्याची पाळी येई.

एक धोबी आपल्या 'उद्धत' नावाच्या गाढवाकडून दिवसभर ओझी वाहण्याचे काम करून घेई आणि रात्री तो त्याला गावाबाहेर चरायला सोडून देई. रात्रभर गवत, नाहीतर कुणा ना कुणाच्या शेतातली धान्याची रोपे पोटभर खाऊन झाल्यावर, पहाटे पहाटे ते गाढव आपल्या घरी जाई. या रात्रीच्या भ्रमंतीत त्याची एका कोल्ह्याशी ओळख झाली.

एके रात्री पुनवेचे पिठूर चांदणे पडले असताना ते गाढव म्हणाले, 'कोल्होबा, या चांदण्यामुळे मन कसे प्रफुल्लीत झाले आहे. मी थोडा वेळ गाऊ का?' कोल्हा म्हणाला, 'मामा, तुम्ही आणि गाणार? म्हणजे प्रलयच थडकला म्हणायचा!'

'का रे! मला गाण्याची माहिती नाही, असे का तुला वाटते?' असा प्रश्न विचारून ते गाढव स्वर किती, सप्तके किती व राग किती वगैरे महिती देऊन, त्या कोल्ह्याला म्हणाले, 'आता तरी माझ्या रागदारीच्या ज्ञानाबद्दल तुझ्या मनात संशय उरला नाही ना?'

कोल्हा म्हणाला, 'नुसते ज्ञान असणे वेगळे आणि गाण्याचा आवाज वेगळा. त्यातून कुणी, कुठे व कसे वागायचे याबद्दल मार्गदर्शक असे काही नियम आहेत. उदाहरणच द्यायचं झालं तर -

*कासयुक्तस्त्यजेत् चौर्यं निद्रालुश्चैव चौरिकाम् ।*
*जिव्हालौल्यं रुजाक्रान्तो जीवितं योऽत्र वाञ्छति ॥*

**(या जगात सुरळीतपणे जगण्याची इच्छा असेल तर, खोकला झालेल्याने व जो झोपाळू आहे त्याने चोरी करण्याच्या फंदात पडू नये व रोगग्रस्ताने जिभेचे चोचले पुरवू नयेत.)'**

तो कोल्हा पुढे म्हणाला, 'खोकला झालेला जर कोणी चोरी करायला गेला आणि चोरी करता करता, जर का त्याला खोकला आला, तर ज्याप्रमाणे घरमालकाकडून मार खाण्याचा प्रसंग येईल, त्याचप्रमाणे तुम्ही जर या रात्रीच्या वेळी गाऊ लागलात, तर ज्याच्या शेतातली कोवळी कणसे आपण चोरून खात आहोत, तो शेतकरी जागा होईल, आणि आपणा दोघांनाही चोप देईल.'

गाढव म्हणाले, 'कोल्होबा, तू अगदीच अरसिक कसा रे? तो स्मशानात राहणारा रुक्ष मनोवृत्तीचा शंकर, जर त्या रावणाने सुकवलेल्या स्नायूंपासून तयार केलेल्या तंतुवाद्यातून रागदारीचे मधुर स्वर काढताच त्याच्यावर प्रसन्न झाला, तर माझे गोड गाणे ऐकून, त्या शेताची रखवाली करणारा माणूस मला मारणे शक्य आहे का? उलट तो माझा सन्मानच करील.'

हा आपले ऐकण्याचे लक्षण दिसत नाहीसे पाहुन तो कोल्होबा त्या शेताच्या कुंपणाबाहेर पडून दूर उभा राहिला आणि त्या गाढवाने टिपेत गायला प्रारंभ केला. त्याबरोबर त्या शेताच्या जाग्या झालेल्या राखणदाराने

a

त्याला बेदम मार दिला. त्या माराने ते गाढव मूर्च्छा येऊन जमिनीवर कोसळताच, त्या राखणदाराने त्याच्या गळ्यात दोरखंडाने एक उखळ बांधले.

एवढे करून तो पहारेकरी आपल्या झोपडीत जाताच, शुद्धीवर आलेले ते गाढव, व गळयात बांधण्यात आलेल्या उखळासह कसेबसे घराकडे जाऊ लागले. तेव्हा दूर उभा राहिलेला कोल्हा त्याला म्हणाला, 'गाढवमामा, तुमच्या दिव्य गायनावर बेहद्द खूष होऊन त्या पहारेकऱ्याने तुमच्या सन्मानार्थ हा 'भव्य मणी' तुमच्या गळ्यात बांधला का?' पण लाजेने चूर झालेले ते गाढव एकही शब्द न बोलता निघून गेले.

ही गोष्ट सांगून सुवर्णसिद्धी म्हणाला, 'चक्रधरा, तो कोल्हा हिताचे सांगत असतानाही ते न ऐकल्यामुळे जसे त्या गाढवाच्या गळयात उखळाचे लोढणे पडले, तसेच तूही माझे न ऐकल्यामुळेच हे चक्र तुझ्या पाठीशी कायमचे लागले.'

चक्रधर म्हणाला, 'मित्रा, तुझे म्हणणे मला आता पटले. ज्याला सारासार विचार नसतो, तो त्या मंथरक कोष्ट्यासारखा स्वतःच स्वतःच्या नाशाला कारणीभूत ठरतो.'

'तो कसा काय?' असा प्रश्न सुवर्णसिद्धीने केला असता चक्रधर म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट सदुसष्ठावी

## स्वतःचे ज्याला 'डोके' नाही,
## तो मृत नसला तरी जिवंतही नाही.

एका गावात मंथरक नावाचा कोष्टी राहात होता. ज्या हातमागावर साड्यालुगडी बनवून त्या बाजारात विकून तो आपला व आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवी, तो मागच एकदा मोडल्याने, नवा माग बनविण्यासाठी लागणाऱ्या लाकडाकरिता त्याने समुद्रकाठचा एक शिसवी वृक्ष तोडण्याचे ठरविले. त्याप्रमाणे कुऱ्हाड घेऊन त्या वृक्षाकडे तो गेला असता, त्या वृक्षावर राहणारी एक अप्सरा त्याला म्हणाली, 'हे मानवा, तू जे मागशील ते मी तुला देईन, पण हा वृक्ष तू तोडू नकोस.' यावर तो तिला म्हणाला, 'हे अप्सरे, मी माझ्या बायकोच्या सांगण्यानुसारच वागत असल्याने, तुझ्याकडे काय मागायचे, ते मी तिला विचारतो व ते तुझ्याकडे येऊन मागतो.'

याप्रमाणे बोलून तो कोष्टी घराकडे जाऊ लागला. वाटेत त्याला त्याचा एक न्हावी मित्र भेटला व त्याने नुकताच घडलेला प्रकार त्याच्या कानी घातला. तेव्हा तो म्हणाला, 'अरे, त्या अप्सरेकडे तू राज्य माग. म्हणजे तू राजा व मी तुझा प्रधान. आपण दोघेही प्रजेचे जास्तीतजास्त कल्याण करू

व कीर्ती मिळवू. त्या अप्सरेकडे मागायची गोष्ट एवढी सोपी असताना, तू या बाबतीत तुझ्या मूर्ख बायकोचा कशाला सल्ला घेतोस? तुला स्वतःच वाटोळं करून घ्यायचं आहे काय? कारण म्हटलंच आहे-

*यत्र स्त्री यत्रं कितवो बालो यत्र प्रशासकः ।*
*तद् गृहं क्षयमायाति भार्गवो इदमब्रवीत् ॥*

**(जिथे स्त्री, जुगारी वा बालक यांच्या मतानुसार कारभार चालतो, ते घर नाश पावते, असे भार्गवमुनी सांगून गेले.)**

'ते काहीही जरी असले, तरी माझ्या घरात बायकोचा शब्दच शेवटचा.' असे उत्तर त्या न्हाव्याला देऊन तो कोष्टी घरी गेला आणि त्याने अप्सरेने देऊ केलेला वर व त्या बाबतीत न्हाव्याने दिलेला सल्ला तिच्या कानी घातला. यावर ती भडकून म्हणाली, 'त्या न्हाव्याला काय कळतंय? म्हटलंच आहे ना, 'न्हावी, तोंडपुजे आणि भिक्षुक यांचे म्हणणे ज्याने मनावर घेतले, त्याचे वाटोळे झाले.'

म्हणून त्या अप्सरेकडे तुम्ही राज्य मागू नका. एका राज्याचे राजे झालात की नुसते बाहेरचे नव्हे तर जवळच्या नातेवाईकांमधेही तुम्हाला शत्रू निर्माण होतील आणि राज्यलोभाने ते तुमचा घात करतील. राज्यलोभामुळेच कौरवांनी त्या सज्जन पांडवांना वनात पाठविले ना? तेव्हा राज्य वगैरे काही मागू नका. तुम्हाला एकच वेळी दोन हातमाग चालवता यावे, म्हणून तुम्ही त्या अप्सरेकडे तुमच्या पाठीच्या बाजूला आणखी एक मस्तक व आणखी दोन हात मागून घ्या, म्हणजे मागे पुढे असे दोन माग

तुम्हाला एकाच वेळी चालवता येतील आणि त्यामुळे आपले उत्पन्न दुप्पट होऊन आपल्याला मजेत दिवस घालवता येतील.' त्या कोष्ट्याने तिच्या म्हणण्याप्रमाणे त्या अप्सरेकडे ते मागणे मागितले आणि तिने 'तथाऽस्तु ' म्हटले! पण त्या वरामुळे आणखी एक पाठमोरे मस्तक व दोन हात फुटताच, तो कोष्टी घरी जाऊ लागला असता गावकऱ्यांना 'हा कुणीतरी राक्षस आहे' असे वाटले आणि काठ्यांच्या प्रहारांनी त्यांनी त्याला ठार केले.'

ही गोष्ट सांगून चक्रधर सुवर्णसिद्धीला म्हणाला, 'मित्रा, हितचिंतकाचे न ऐकल्यामुळेच त्या कोष्ट्याने स्वतःचा नाश करून घेतला. जो मनुष्य लोभाच्या आधीन होऊन नको त्याचे ऐकतो किंवा अशक्य गोष्टींच्या स्वप्नात रंगून जातो तो त्या सोमशर्माच्या पित्याप्रमाणे थट्टेचा विषय बनतो.' यावर 'तो कसा काय?' असा प्रश्न सुवर्णसिद्धीने विचारला असता चक्रधर म्हणाला, 'एकदा असं झालं-



a

# गोष्ट अड्सष्ठावी

## सोनेरी स्वप्नांचे साम्राज्य खोटे,
## वेळ येताच भ्रमाचा भोपळा फुटे.

एका शहरात 'स्वभावकृपण' नावाचा एक कंजूष ब्राह्मण होता. दररोज मिळणाऱ्या भिक्षेचे धान्य तो दळून त्याचे पीठ करी आणि स्वतः मुद्दाम कमी भाकऱ्या खाऊन, वाचविलेले पीठ तो एका मडक्यात साठवी. त्याने ते मडके भिंतीतल्या खुंटीला एका दोरखंडाने टांगून ठेवले होते. त्याच्याखाली ठेवलेल्या बाजेवर तो रात्री उताणा झोपे आणि झोप येईपर्यंत त्या मडक्याकडे एकटक नजरेने बघत असे.

एके रात्री नित्याच्या सवयीनुसार त्या मडक्याकडे बघत राहिला असता, मनात म्हणाला, 'हे मडके आता पिठाने भरत आले आहे. ईश्वरकृपेने जर आता दुष्काळ पडला, तर धान्याचे भाव कडाडतील आणि या घडाभर पिठाचे मला शंभर रुपये सहज मिळतील. मग त्या शंभर रुपयांच्या मी शेळ्या खरेदी करीन. त्या दर सहा महिन्यांनी व्यायला लागल्या, की माझ्याकडे शेळ्याच शेळ्या होतील. मग त्या शेळ्यांचे दूध व काही शेळ्या विकून जमलेल्या पैशात मी गाई-म्हशी व नंतर घोडे देईन. आणि शेळ्या, गाईम्हशी व नंतर घोडे यांच्या विक्रीवर धनवंत होऊन, चौसोपी वाडा बांधीन.

a

'त्यानंतर थोरामोठ्यांच्या मला सांगून येणाऱ्या मुलींतून एक सुंदर व गुणी मुलगी निवडून तिच्याशी मी लग्न करीन आणि पहिला मुलगा झाला की, त्याचे नाव मी 'सोमशर्मा' असे ठेवीन.

'पुढे तो मुलगा रांगू लागला की, घोड्याच्या पागेच्या बाजूला असलेल्या एकांतात मी ग्रंथ वाचत असता, मला त्रास द्यायला येईल. मग मी बायकोला आज्ञा फर्मावीन, 'अगं तू तुझ्या मुलाला घेऊन जा.' यावर ती मला म्हणेल, 'मुलगा काही माझा एकटीचा नाही. तो तुमचाही आहे.' तिचे ते उलटे उत्तर ऐकून मी तिच्यावर वचक बसविण्यासाठी तिला अशी जोरदार लाथ मारीन...' विचारांच्या तंद्रीत त्या ब्राह्मणाने त्या पिठाने भरलेल्या घड्यालाच बायको समजून अशी जोराने लाथ मारली की, तो घडा फुटून त्यातले पीठ त्याच्या अंगावर पडले आणि त्याचे सर्व अंग गोरेभुरे झाले.'

ही गोष्ट सांगून चक्रधर म्हणाला, 'मित्रा सुवर्णसिद्धी, म्हणून मीही अशा निष्कर्षाला आलो आहे की, माणसाने स्वतःच्या भविष्याबद्दलची भलतीच स्वप्ने रंगवीत बसू नयेत.' त्याचे हे विधान ऐकून सुवर्णसिद्धी म्हणाला, 'या सर्वांच्या मुळाशी अती लोभी वृत्तीच असते. काही प्रमाणात असलेला लोभ वाईट नसतो, पण एकदा का माणूस त्या लोभाच्या आहारी गेला की, तो त्या चंद्रराजाप्रमाणे स्वतःचा नाश करून घेतो.' यावर 'तो कसा काय?' असा प्रश्न चक्रधराने केला असता सुवर्णसिद्धी म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट एकोणसत्तरावी

## जो लोभाच्या आहारी जाई,
## त्याच्या जीवनातले सुख नाहीसे होई.

चंद्र नावाच्या राजाने आपल्या लहान मुलांच्या मनोरंजनासाठी बरीच वानरे पाळली होती व सेवकांच्या सहाय्याने त्यांची चांगली बडदास्त ठेवली होती. त्या वानरांचा जो म्होरक्या होता, तो अतिशय बुद्धिमान् व बहुश्रुत होता.

त्या राजाने आपल्या मुलांच्या खेळातल्या गाड्यांना जुंपण्यासाठी काही मेंढेही पाळले होते. त्यांतलाच एक खादाड मेंढा वेळीअवेळी मुदपाकखान्यात शिरून तिथल्या पदार्थांवर तुटुन पडे. मग त्याला हाकलून देण्यासाठी तिथले आचारी हाती लागेल ती गोष्ट, त्याच्यावर भिरकावून त्याला घालवून देत. ते आचारी व तो मेंढा यांचा असा झगडा जवळजवळ दररोज चाले.

तो प्रकार पाहुन एकदा तो वानरप्रमुख आपल्या जातभाईंना जवळ बोलावून त्यांना म्हणाला, 'इथे आता तंटेझगडे ही नित्याची बाब होऊन बसली असल्याने, या ठिकाणी राहाणे धोक्याचे आहे. तेव्हा आपण इथुन कुठेतरी निघून जाऊ या. कारण म्हटलंच आहे -

a

*कलहान्तानि हर्म्याणि कुवाक्यान्तं च सौहृदम् ।*
*कुराजान्तानि राष्ट्राणि कुकर्मान्तं यशो नृणाम् ॥*

**(मोठमोठ्या घरांचा नाश भांडणांनी होतो. मैत्रीचा शेवट कटु शब्दांनी होतो, राष्ट्रांचा नाश वाईट राजांमुळे होतो आणि वाईट कृत्यांमुळे माणसांच्या यशाचा शेवट होतो.)**

'पण त्या दांडगट मेंढ्याच्या व आचाऱ्यांच्या भांडणाची झळ आपल्याला कशी काय पोहोचू शकते?' मधेच एका तरुण वानराने प्रश्न केला. यावर तो वानरप्रमुख म्हणाला, 'असं समजा, एखाद्या दिवशी, तो मेंढा मुदपाकखान्यात शिरला असता कुणा आचाऱ्याने त्याच्या अंगावर पेटते कोलीत फेकले, तर त्या मेंढ्याच्या अंगावरची लोकर पेट घेईल. मग तो भयभीत झालेला मेंढा इकडे तिकडे धावत, मुदपाकखान्याजवळ असलेल्या गवताच्या गंजीकडे गेला, की ती गंजीच नव्हे, तर तिला लागून असलेली घोड्यांची पागाही पेट घेईल आणि तीत असलेले घोडे भाजून मरतील किंवा होरपळून निघतील. तसे झाले तर शालिहोत्र याच्या जनावरांच्या रोगावरील उपचारग्रंथात सांगितल्याप्रमाणे आगीमुळे घोड्यांना होणाऱ्या जखमांवर वानरांची चरबी हा रामबाण उपाय असल्याने, चंद्रराजा त्या चरबीसाठी आपणा सर्वांना ठार मारील.' पण वानरप्रमुखाचं हे म्हणणं राजवाड्यात मिळणाऱ्या उत्तमोत्तम पदार्थांची चटक लागलेल्या त्या वानरांना पटले नाही. तेव्हा तो त्यांना म्हणाला, 'तुम्हाला नसले यायचे, तर येऊ नका. पण मी मात्र जाणार. कारण म्हटलंच आहे-

*मित्रं व्यसनसम्प्राप्तं स्वस्थानं परपीडितम् ।*
*धन्यास्ते ये न पश्यन्ति देशभङ्गं कुलक्षयम् ॥*

**(संकटात सापडलेला मित्र, दुसऱ्याकडून त्रास होणारे आपले घर, देशाची फाळणी, किंवा कुलक्षय झालेला पाहाण्याचा ज्यांच्यावर प्रसंग येत नाही, ते खरोखरच धन्य होत.)**

याप्रमाणे बोलून तो वानरप्रमूख तिथून वनात निघून गेला.

परंतु थोड्याच दिवसांत त्या वानरप्रमुखाच्या कानी आपण केलेले भाकित खरे ठरल्याचे आले. आपल्या सर्व आप्तमित्रांना राजाने चरबी मिळविण्यासाठी मारल्याचे ऐकून तो अतिशय अस्वस्थ झाला व मनात म्हणाला, 'माझे न ऐकता ते माझे आप्तमित्र तिथे राहिले हे खरे. पण कसेही झाले तरी ते माझेच ना? मग माझ्या आप्तमित्रांना ज्याने जिवे मारले, त्या राजावर सूड उगवायला नको का? कारण म्हटलंच आहे -

*मर्षयेद्धर्षणां योऽत्र वंशजां परनिर्मिताम् ।*
*भयात् वा यदि वा कामत् स ज्ञेयः पुरुषाधमः ॥*

**(परक्यांकडून आपल्या कुटुंबियांवर हल्ला केला गेला असता, भीती वा स्वार्थ यांमुळे जो तो सहन करतो असा पुरुष नीचात नीच समजावा.)**

अशा तऱ्हेनं आपल्या गणगोताचा संहार केल्याबद्दल राजावर सूड उगविण्याचा विचार करीत तो वानरप्रमुख एका सरोवरापाशी गेला. त्या सरोवरात विपुल रत्ने होती. सरोवराच्या पाण्यावर सूर्यप्रकाश पडला की ती

रत्ने चमकू लागत व ती मिळविण्यासाठी त्या सरोवरात शिरणारी माणसे, त्यात राहणाऱ्या एका राक्षसाच्या भक्ष्यस्थानी पडत. त्या राक्षसाची भेट घेऊन त्या वानरप्रमुखाने आपल्या बंधुबांधवांच्या संहाराची सर्व हकीकत त्याला सांगितली व राजाला त्याच्या परिवारासह त्या सरोवराकडे आणण्याकरिता त्याच्याकडे एक दिव्य रत्नमाला मागितली. ती मिळताच तो त्या राजाच्या वाड्यासमोरच्या एका झाडाच्या फांदीवर जाऊन बसला.

सूर्यकिरणे पडताच झगमगणारी ती रत्नमाला पाहून राजा तिच्याकडे लोभी नजरेनं टकमक बघू लागला. त्याने त्या वानराला विचारले, 'काय रे ही दिव्य रत्नमाला तुला कुठे मिळाली? तू ती मला देतोस का?'

राजाचा हा प्रश्न ऐकून तो वानरप्रमुख मनात म्हणाला, 'स्वतःपाशी गडगंज संपत्ती असलेला हा राजा! पण माझ्या अपेक्षेप्रमाणे याचाही जीव माझ्यापाशी असलेल्या माळेत गुंतलाच! बाकी त्यात नवल ते काय? लोभ किंवा हाव ही चीजच मोठी अजब आहे. म्हटलंच आहे ना?-

***इच्छति शती सहस्त्रं सहस्त्री लक्ष्मीहते ।***
***लक्षाधिपस्तस्था राज्यं राज्यस्थः स्वर्गमीहते ॥***

**(शंभराचा स्वामी असलेला हजारांची इच्छा धरतो. हजार असलेला लाखांची अभिलाषा बाळगतो. लक्षाधीशाला राज्य हवेसे वाटते आणी राजपदी असलेला मरणोत्तर स्वर्गाची इच्छा धरतो.)**

'मनुष्य कितीही वृद्ध होवो, त्याचा लोभ किंवा तृष्णा क्षीण न होता, दिवसानुदिवस अधिकाधिक तरुणच होत जाते. म्हटलंच आहे -

a

***जीर्यन्ते जीर्यतः केशा दन्ता जीर्यान्ति जीर्यतः ।***
***जीर्यतश्चक्षुषी श्रोत्रे तृष्णैका तरुणायते ॥***

वृद्धत्वाने केस जीर्ण होतात, वृद्धत्वाने दातही कमकुवत होतात आणि डोळे व कानही क्षीण होतात. पण तृष्णा मात्र तरुण होत राहते.)

अशा तऱ्हेच्या विचारात मग्न झालेल्या त्या वानराला राजाने पुन्हा तोच प्रश्न विचारता तो म्हणाला, 'महाराज, या राजधानीबाहेरच्या वनात कुबेराने निर्माण केलेले एक सरोवर आहे. रविवारी सकाळी सूर्योदय होता होता, जो जो त्या सरोवरात बुडी घेतो, तो तो गळ्यात असली एक रत्नमाला घेऊनच बाहेर पडतो. तुम्ही उद्याच्या रविवारी माझ्या मागोमाग आलात, तर मी तुम्हाला ते सरोवर दाखवीन.'

दुसऱ्या दिवशी सकाळी राजा आपल्या सर्व परिवारासह त्या वानरामागोमाग त्या सरोवराकडे गेला. मग सूर्य उगवू लागल्याचे पाहून त्या वानराने राजाला वगळून इतर सर्वांना त्या सरोवरात उड्या घ्यायला सांगितले. त्याप्रमाणे राजाच्या राण्या, राजकुमार, आप्तेष्ट यांनी उड्या मारल्या. पण बराच वेळ झाला, तरी कुणीच बाहेर येत नाहीसे पाहून, राजाने त्या वानराला विचारले, 'काय रे, कुठे गेली ही मंडळी?' वानर म्हणाला, 'तुम्ही माझ्या नातेवाईकांना चरबीसाठी मारून जिकडे पाठवून दिले, तिकडे गेली. त्या सर्वांना या सरोवरात राहणाऱ्या एका राक्षसाने गिळंकृत केले आहे.'

दुःखाने व्याकूळ व संतप्त झालेल्या राजाने त्या वानराला विचारले, 'तुझे हे वागणे धर्माला सोडून नाही का?' यावर वानराने उत्तर दिले, 'नाही. कारण -

*कृते प्रतिकृतिं कुर्यात् हिंसिते प्रतिहिंसितम् ।*
*न तत्र दोषं पश्यामि दुष्टे दुष्टं समाचरेत् ॥*

**(एखाद्या कृतीला तशाच प्रतिकृतीने, हिंसेला प्रतिहिंसेने आणि दुष्टपणाला उत्तर द्यावे, यात मला काहीच वावगे दिसत नाही. दुष्टांशी दुष्टपणानेच वागावे.**

याप्रमाणे बोलून झाल्यावर ते वानर त्याच्या वाटेने, तर तो राजा त्याच्या मार्गाने निघून गेला.

ही गोष्ट सांगून सुवर्णसिद्धी म्हणाला, 'चक्रधरा, ज्या लोभाने त्या चंद्रराजाचे अपार नुकसान केले, त्या लोभानेच तू तुझ्या पाठीशी ही चक्राची उपाधी लावून घेतलीस. ठीक आहे. मी आता तुझा निरोप घेऊ का? कारण एकतर मित्र या नात्याने मी तुला मदत करण्याचे कितीही जरी ठरविले, तरी मी तुला संकटमुक्त करू शकत नाही आणि दुसरे म्हणजे तुझा चेहेरा त्या अकाली राक्षसाला भ्यायलेल्या वानराप्रमाणे दिसत असल्याने, मला तो बघवतही नाही.' यावर हा 'अकाली राक्षस कोण?' असा प्रश्न चक्रधराने केला असता सुवर्णसिद्धी म्हणाला, 'ऐक-

# गोष्ट सत्तरावी

## कधी कधी अपूर्व योग जुळून येती
## अशक्य गोष्टी प्रत्यक्षात उतरती!

'भद्रसेन' नावाच्या एका राजाची मुलगी 'रत्नवती' हिच्या प्राप्तीसाठी एक राक्षस धडपड करू लागला. तिच्या लक्षात ही गोष्ट आली व एके रात्री, तिच्या महालात आलेल्या तिच्या मैत्रिणीला ती म्हणाली, 'सखे, एक राक्षस अकाली माझ्याकडे येण्याचा प्रयत्न करीत असतो. कोणत्या उपायाने मी त्याचा प्राण घेऊ?'

वास्तविक राजकन्येने एक राक्षस अकाली येतो असे म्हटले होते त्याचा अर्थ 'नको तेव्हा' असा होता, पण त्याच महालाबाहेरील अंधाराच्या आडोशाला उभ्या असलेल्या त्या राक्षसाचा गैरसमज झाला. त्याला वाटले, आपल्याप्रमाणे 'अकाली' नावाचा दुसराही एक राक्षस हिच्या प्राप्तीसाठी धडपडत आहे. तेव्हा त्या राक्षसाने मायेच्या सहाय्याने एका उमद्या घोड्याचे रूप घेतले व दुसरा राक्षस पहायला मिळावा म्हणून तो राजकन्येच्या महालापासून थोड्या अंतरावर उभा राहिला.

तेवढ्यात तिथे एक चोर आला आणि 'हा घोडा छान आहे,' असे स्वतःशी म्हणून त्याच्यावर स्वार झाला व त्याला दौडवू लागला. त्या

प्रकाराने घोड्याच्या रूपात असलेला राक्षस घाबरला. 'याने आपल्याला ओळखले असावे, हा आता आपल्याला दूर नेणार व आपला जीव घेणार,' असा समज होऊन तो वेगाने पळू लागला. गंमत अशी की 'हा अनावर घोडा आपल्याला पाडून टाकील.' अशा भयाने, तो चोर वाटेत लोंबत असलेल्या एका वडाच्या पारंबीला पकडून लोंबकळत राहिला.

'चला, आपण त्या अकाली राक्षसाच्या कटकटीतून सुटलो,' असे मनात म्हणून तो राक्षस मूळ स्वरूप धारण करून पळून जाऊ लागला असता, त्या वटवृक्षावरचा एक विघ्नसंतोषी वानर त्या राक्षसाला म्हणाला, 'अरे राक्षसदादा, ज्याला तू घाबरत आहेस, तो कुणी महाराक्षस नसून, एक सामान्य माणूस आहे. त्याला खाऊन टाक.'

तेवढ्यात त्या चोराने, फांदीखाली लोंबत असलेल्या त्या कळलाव्या वानराच्या शेपटीला कडकडून चावा घेतला. त्यामुळे तो वानर मोठ्याने चीत्कारला. त्या वानराचा तो भयंकर आवाज ऐकून, त्याच्याकडे पाहून तो राक्षस म्हणाला, 'अरे मर्कटा, त्या अकाली राक्षसाने तुला खायला सुरुवात केली असल्याने तुझा चेहेरा अगोदरच भयग्रस्त झाला आहे. तशाही स्थितीत त्या राक्षसाने मलाही खावे म्हणून तुझा प्रयत्न चालला आहे. पण मी असा फसणार नाही.' असे म्हणून तो राक्षस पळून गेला.

ही गोष्ट सांगून सुवर्णसिद्धी म्हणाला, 'चक्रधरा, तुझा चेहेराही आता त्या 'अकाली' राक्षसाच्या तावडीत सापडलेल्या वानराच्या चेहेऱ्याप्रमाणे

भयग्रस्त झाला आहे. तो मला बघवत नसल्याने मी तुझा निरोप घेतो. तुझ्या कर्माची फळे तू भोग.'

चक्रधर त्राग्याने म्हणाला, 'मित्रा, चांगली कर्मे केली की चांगली फळे मिळतात. आणि वाईट कर्मे केली की, वाईट फळे पदरात पडतात, हे बोलणे खोटे आहे. रावणाने एवढ्या बंदोबस्तात बांधलेल्या लंकानगरीचीसुद्धा, त्या मारुतीने राखरांगोळी केली, आणि वाईट कर्मे करूनसुद्धा आंधळा, कुबडा व ती तीन स्तनांची राजकन्या सुखी झाली.'

यावर हे तीन स्तनांच्या राजकन्येचे प्रकरण काय आहे?' असे सुवर्णसिद्धाने विचारले असता चक्रधर म्हणाला, 'ऐक-



# गोष्ट एकाहत्तरावी

## नशीब असे जोराचे, तेव्हा अमृत बने विषाचे.

उत्तरेकडील मधुपूर राज्याचा राजा 'मधुसेन' याला एक अत्यंत देखणी, परंतु तीन स्तने असलेली मुलगी झाली. 'ही अशुभलक्षणी मुलगी आपल्या राज्याचा व घराण्याचा सत्यानाश करील. तेव्हा आताच सेवकांकरवी हिला वनातील वन्य श्वापदांच्या स्वाधीन करावे,' असा विचार राजाच्या मनात



येऊ लागला असता, काही विशालहृदयी धर्मपंडित त्याला म्हणाले, 'महाराज, काही झाले तरी ही आपली मुलगी आहे. तेव्हा हिला वनात सोडून न देता, हिचे आपल्याला चुकूनही दर्शन होणार नाही, एवढ्या दूरच्या स्थळी हिला दासदासींबरोबर पाठवावे व त्यांनाच तिचे लालनपालन करायला सांगावे.' राजाने त्याप्रमाणे केले.

a

अशी काही वर्षे निघून जाताच, ती मुलगी वयात आली, तेव्हा राजाने सेवकांकरवी राज्यात दवंडी पिटविली, 'जो कुणी तीनस्तनी राजकन्येशी लग्न करील, त्याला एक लाख सुवर्णमोहोरा हुंडा म्हणून देण्यात येईल. मात्र लग्न होताच त्याला व तिला दूरवर पाठविण्यात येईल.' एका गरीब आंधळ्याने ते मान्य केले व त्याचे तिच्याशी लग्न झाले.

लग्न झाल्यावर आपल्या तीनस्तनी बायकोसह दूरदेशी जाताना त्या आंधळ्याने, त्याला कुठेही जायचे असले तर, त्याचा हात आपल्या हाती घेऊन पोहोचविणाऱ्या आपल्या एका कुबड्या मित्रालाही बरोबर घेतले. पण दूरदेशी जाऊन बिऱ्हाड थाटल्यावर थोड्याच दिवसांत त्या राजकन्येच्या मनात विचार येऊ लागला, 'आपण एवढ्या सुंदर असूनही आपल्या नवऱ्याला दिसत नसल्याने तो आपल्या रूपाचे कौतुक करीत नाही. तेव्हा याच्यापेक्षा त्या डोळस कुबड्याशी जर आपले लग्न झाले असते, तर बरे झाले असते.'

मनात हा विचार येऊ लागताच, एकदा ती त्या कुबड्याला म्हणाली, 'तुम्ही जर वीष आणून दिलेत, तर मी ते जेवणातून माझ्या आंधळ्या नवऱ्याला घालीन आणि तो मेला की तुमच्याशी लग्न करीन.'

तिच्या या कल्पनेवर कुबडा एकदम खुश झाला व थोड्याच वेळात एक मेलेला विषारी सर्प घेऊन घरी आला. मग तो तिला म्हणाला, 'मी या सर्पाचे लहान लहान तुकडे करतो. तू त्याचे सांबार कर व जेवताना नवऱ्याला खायला घाल, म्हणजे तुझीमाझी इच्छा फलद्रूप होईल.' याप्रमाणे

a

बोलून त्या कुबड्याने त्या सर्पाचे तुकडे करून तिच्या स्वाधीन केले व तो घराबाहेर पडला.

इकडे त्या राजकन्येने त्या तुकड्यांमधे मालमसाला घालून, त्याचे सांबार करण्यासाठी ते एका वेगळ्या चुलीवर रांधले व आपल्या आंधळ्या पतीच्या हाती एक पळी देऊन 'ते माशांचे कालवण या पळीने अधुनमधून ढवळत राहा,' असे सांगितले आणि त्याचा हात धरून त्याला त्या चुलीपाशी नेऊन बसविले. मग ती आपल्या नेहमीच्या चुलीवर स्वैपाक करायला गेली.

तो आंधळा त्या चुलखंडापाशी सांबार पळीने ढवळत असता, त्यातून निघणाऱ्या वाफा त्याच्या डोळ्यांना लागून त्याला चांगली दृष्टी आली आणि सांबारात रटरटत असलेले ते सापाचे तुकडे पाहून आपणाविरुद्धच्या कारस्थानाची त्याला कल्पना आली. तरीही तो आंधळेपणाचे सोंग पांघरून वावरू लागला. तेवढ्यात बाहेर गेलेला कुबडा आत आला आणि 'सापाचे सांबार तयार होत आले का?' असे त्या राजकन्येला खुणांनी विचारू लागला. त्याबरोबर ती राजकन्या त्याला हळूच सांगण्यासाठी त्या चुलीजवळून उठली आणि त्याच वेळी त्या डोळस आंधळ्याने त्या कुबड्याकडे धाव घेतली. मग त्याचे दोन पाय पकडून व त्याला गरगर फिरवून त्याने त्याला आपल्या बायकोच्या अंगावर भिरकावले. त्यामुळे त्याचे मस्तक थाडकन् तिच्या तिसऱ्या स्तनावर आदळून तो स्तन नाहीसा

झाला व तो कुबडा नंतर जोराने जमिनीवर पाठमोरा आदळल्याने त्याच्या पाठीतले कुबड नाहीसे झाले!

मग लज्जित झालेला तो 'कुबडा' तिथून कायमचा निघून गेला आणि पश्चात्तापाने पावन झालेल्या त्या राजकन्येचा व तिच्या त्या डोळस नवऱ्याचा संसार सुखाने सुरू झाला.'

ही गोष्ट सांगून चक्रधर म्हणाला, 'मित्रा, 'कर्म तसे फळ' हे तुझे म्हणणे खरे असते, तर त्या राजकन्येचे व कुबड्याचे कर्म वाईट असता, त्यातून त्यांना चांगले फळ मिळाले असते का?'

सुवर्णसिद्धी म्हणाला, **'कुठेतरी कधीतरी घडून येणाऱ्या घटनेचा दाखला पुढे करून सिद्धांत सिद्ध होत नाही. अविचाराने प्रत्येक बाबतीत वाद घालत राहिल्याने, पदरात केवळ हानीच पडते. म्हणून हेकटपणाने वागणे सोडून द्यावे.** एक पोट पण तोंडे मात्र दोन असलेल्या त्या भारुंड पक्ष्यांच्या दोन्ही तोंडांचे एकमेकांशी न पटल्यामुळेच त्या पक्ष्याचा नाश झाला ना?' यावर तो कसा?' असा प्रश्न चक्रधराने असता सुवर्णसिद्धी म्हणाला, 'ऐक-



# गोष्ट बहात्तरावी

## हेकटपणाचे वागणे म्हणजे स्वनाशाला आमंत्रण देणे.

एका सरोवरात एकच पोट पण दोन तोंडे असलेला 'भारुंड' नावाचा पक्षी राहात होता. एकदा समुद्रकिनारी तो हवेतून संचारत असता, त्याला पाण्यावर तरंगत असलेले एक सुंदर फळ दिसले. आपल्या एका तोंडाने ते फळ अर्धवट खाऊन झाल्यावर, तो पक्षी त्याच तोंडाने म्हणाला, 'वाः! आजवर अनेक फळे खाल्ली पण असे अमृतमधुर फळ कधी माझ्या खाण्यात आले नव्हते.'

त्याचे ते बोलणे ऐकून त्याचे दुसरे तोंड त्याला म्हणाले, 'धनी, त्या अमृतमधुर फळाचा आस्वाद घेण्याची संधी तुम्ही फक्त त्याच तोंडाला दिलीत. ते फळ जर इतके गोड आहे, तर त्याचा उरलेला अर्धा भाग तुम्ही मला द्या ना?'

यावर तो पक्षी म्हणाला, 'अरे, कुठलीही वस्तू या तोंडाने खाल्ली काय, किंवा तू खाल्लीस काय, शेवटी ती वस्तू एकाच पोटात जाऊन शरीराच्या सर्व अवयवांना उपयोगी पडते ना? त्यातूनही हे फळ मी तुला दिले असते. पण मला ते माझ्या लाडक्या भारुंडीसाठी घरी न्यायचे आहे.' त्या भारुंड पक्ष्याच्या बोलण्याने ते दुसरे तोंड रागावले.

a

काही दिवसांनी तो पक्षी असाच घिरट्या घालत असता त्याला एक फळ दिसले. त्याच्याजवळ जाताच त्या दुसऱ्या तोंडाने ते पटकन् उचलले, पण ते विषारी असल्याचे त्याला आढळून आले. तेव्हा ते तोंड निराशेने म्हणाले, 'अरेरे! माझे नशीबच वाईट! त्या दिवशी त्या तोंडाला अमृततुल्य फळ मिळावे, आणि आज माझ्या वाट्याला मात्र हे फळ यावे? मग असले दुर्दैवी जीवन जगण्यापेक्षा हे विषारी फळ खाऊन मेलेलेच काय वाईट?'

यावर भारुंड त्या तोंडाला म्हणाला, 'अरे, असं करू नकोस. ते फळ जरी तू खाल्लेस, तरी तुझ्याबरोबर सर्व अवयवांना व शेवटी मलाही मरावे लागेल.' पण हे ऐकूनही ते तोंड आपला हेकटपणा सोडीना. त्याने ते फळ खाल्ले व त्यामुळे त्या भारुंड पक्ष्याला मरण आले.' ही गोष्ट सांगून सुवर्णसिद्धी तिथून काढता पाय घेऊ लागला असता, चक्रधर त्याला म्हणाला, 'मी माझ्या हेकटपणाने हे संकट पाचारलं असलं तरी तू मला सोडून जाऊ नकोस.'

'माझी जर तुला मदत होण्यासारखी नाही, तर मग इथे उगाच कशाला राहू?'

'असं तू म्हणू नकोस. जगात कुणाची, कुणाला व कुठे मदत होईल ते सांगता येत नाही. म्हणून तर एक क्षुल्लक खेकडा एका ब्राह्मण तरुणाचे प्राणांतिक संकटातून रक्षण करू शकला ना?' यावर 'ते कसे?' असा प्रश्न सुवर्णसिद्धीने केला असता, चक्रधर त्याला ती गोष्ट सांगू लागला-

# गोष्ट त्र्याहत्तरावी

## क्षुल्लक मानू नये कुणाला, प्रसंगी महत्त्व प्रत्येकाला.

एका गावात 'ब्रह्मदत्त' नावाचा एक ब्राह्मण तरुण राहात होता. एकदा तो बाहेरगावी जायला निघाला असता, त्याची आई त्याला म्हणाली, 'बाळा, तू असा एकटा प्रवास करू नकोस. प्रवासात नेहमी कुणालातरी सोबतीला घ्यावे.'

'पण आई, मी जाणार असलेल्या मार्गावर कुणाचेच भय नसल्याने, मला कुणाच्याही सोबतीची गरज नाही.' असे ब्रह्मदत्त म्हणाला असतानाही, त्याच्या आईने परसदारी असलेल्या विहिरीतून एक खेकडा आणला आणि एका कापडाच्या तुकड्यात कापरांच्या वड्यांसह तो घालून व कापडाची पुरचुंडी करून, तिने तो खेकडा सोबतीसाठी त्याच्या स्वाधीन केला.

बाहेरगावची वाट चालता चालता उन्हे उभी राहिल्याने तो तरुण वाटेत लागलेल्या एका छायाळ वृक्षाखाली विश्रांतीसाठी म्हणून आडवा झाला आणि पडल्या पडल्या त्याचा डोळा लागला. तेवढ्यात एका वृक्षाच्या ढोलीतून एक जहरी नाग बाहेर पडला व त्या तरुणापाशी गेला. पण त्याच्याजवळच असलेल्या त्या पुरचुंडीतून कापराचा वास बाहेर पडू

लागल्याने व सापाला कापूर प्रिय असल्याने, तो आपल्या अणकुचीदार दातांनी ती पुरचुंडी उलगडू लागला. ती तशी उलगडली जाताच, तिच्यातून बाहेर पडलेल्या खेकड्याने आपल्या नांग्यांच्या कैचीत त्या नागाचे मानगूट आवळून त्याला ठार केले. जाग आल्यावर जेव्हा त्या तरुणाच्या दृष्टीस - आपण झोपेत असताना घडलेला प्रकार कळला, तेव्हा तो स्वतःशीच म्हणाला, 'आई म्हणाली तेच खरे. या जगात कुठलीच गोष्ट क्षुल्लक नसते. प्रसंग येताच तिचे महत्त्व पटते. मग आपल्या आईच्या धोरणी वृत्तीचे मनात कौतुक करीत तो तरुण पुढल्या वाटेला लागला.'

चक्रधराने ही गोष्ट सांगताच सुवर्णसिद्धी त्याला म्हणाला, 'मित्रा, खेकडा हा कितीही जरी क्षुद्र असला, तरी सर्पाची मानगूट पकडून त्याला मारण्याचे सामर्थ्य त्याच्यात होते. इथे तसे नाही. कुबेराच्या सेवकांनी दिलेल्या शिक्षेतून तुझी सोडवणूक करायला गेलो, तर माझ्याही पाठीशी अशीच एखादी भयंकर उपाधी लागण्याची शक्यता आहे. तेव्हा तांब्याच्या खाणीवर व रुप्याच्या खाणीवर संतुष्ट असलेले आपले ते दोन मित्र वाट पहात राहिले असल्याने, त्यांच्या संगतीसोबतीने गावी जाणे मी पसंत करतो.' असे म्हणून सुवर्णसिद्धी निघून गेला.

# समाप्ती

अशा या मनोरंजक पण बोधप्रद गोष्टी त्या तीन राजकुमारांना सांगून 'पंचतंत्राच्या' पाचव्या तंत्राची समाप्ती करताना विष्णुशर्माने त्यांना मुद्दामच विचारले, 'बाळांनो, या गोष्टी ऐकण्यात तुमचा वेळ चांगला गेला ना?' यावर ते राजकुमार नम्रपणे अभिवादन करून म्हणाले, 'गुरुदेव, आयुष्याचा मौल्यवान वेळ नुसत्याच मनोरंजनात घालविणे, हे निष्क्रियतेचे व सामान्य बुद्धी असल्याचे लक्षण आहे. आयुष्याचा क्षण अन् क्षण सत्कारणी लावला पाहिजे. या मनोरंजक पण बोधप्रद गोष्टींतून आपण आम्हाला या जगाकडे पाहण्याची व या जगात वागण्याची एक नवी दृष्टी दिलीत. आपण दिलेली ही 'शिदोरी' घेऊन, आम्ही आयुष्याची पुढली वाटचाल यशस्वीपणे करू. फक्त आपले आशीर्वाद आम्हाला द्या.'

विष्णुशर्मा हात उंचावून म्हणाला, 'तथास्तु!'

॥ पाचवे तंत्र समाप्त ॥

# अदृश्य खजिन्याचा रस्ता

अशा तऱ्हेने तीन राजपुत्रांना जन्मभर पुरेल असा खजिना त्या रानातल्या कुटीत मिळाला.

आपल्या आजूबाजूला, आपल्या आत एक अदृश्य खजिना असतो. तो म्हणजे शहाणपण. असंख्य स्वानुभवांनी, उपदेशांनी आणि इतरांच्या अनुभवाने आलेलं शहाणपण. आपल्या आत ते मुरलेलं असतं. त्याला योग्यवेळी जो वापरतो तो मुकद्दर का सिकंदर बनतो. जिंकतो. पुढे जातो.

आपला देश, आपला समाज, आपली भाषा आणि आपले लोक यांना पुढे न्यायचं असेल तर आपलं हे शहाणपण जागं केलं पाहिजे. पाश्चिमात्यांनी हेच केलं. भारत, चीन अरबस्तान आदी जुन्या जगातलं सगळं शहाणपण जमा करून त्याचा वापर करून त्यांनी जगावर राज्य केलं. आणि आपल्याकडून शिकलेलं ज्ञान अधिक पॉलिश करून आणि त्याला काळाप्रमाणे रूप देऊन ते आज आपल्याला शिकवतात. आपण ते शिकतो, त्यांना पैसे देऊन. का? कारण आपल्याला आपल्या शहाणपणाबद्दल आदर नाही, विश्वास नाही, अभिमान तर काडीचाही नाही. कायम एक न्यूनगंड घेऊन वावरतो. कोणी इंग्लीशमधून फ़ाडफ़ाड बोलायला लागला की घाबरतो, त्याच्याकडे आदराने बघतो. आपल्याला आपल्या भाषेतली पुस्तकं वाचायची लाज वाटते. वाचतो म्हणून सांगायची लाज वाटते.

इंग्रजीला जेव्हा लिपी नव्हती तेव्हा मराठीत गाथासप्तशती नांवाची सातशे पुस्तकं होती. इंग्रजीतल्या पहिल्या पुस्तकाच्या हजार वर्षं आधी आपल्या भाषेत ज्ञानाची भांडारं होती. आज त्या पोथ्या, कुठल्या उंदरांच्या पोटात असतील काय माहित!

निदान आता तरी जागे होऊ या. आपल्याकडील ज्ञानाची भांडारं जमतील तसतशी इंटरनेटवर ठेऊया. जगाच्या कोपऱ्याकोपऱ्यात पसरलेल्या मराठी बांधवांपैकी कोणी ना कोणी ते उघडेल या आशेने.

ई साहित्य प्रतिष्ठान हे काम हाती घेत आहे. जितके जमेल तितके. आपली मदत पाहिजेच. कारण हे दोनचार डोक्यांचे काम नाही. याला लाखो लोकांच्या मदतीची गरज आहे.

आम्ही पैसे मागत नाही. जाहिराती नकोत.

तुमच्या माहितीत जिथे कुठे असे ज्ञान असेल ते आम्हाला उपलब्ध करून द्या. आम्ही आपले ऋणी राहू.

तुमच्या ओळखीच्या आठ लोकांचे ई मेल द्या. म्हणजे या माहितीचा प्रसार होत राहील. वाचकांना जोडूया. ज्ञानाची भांडारे उपलब्ध करून देऊ या.

आपल्या भाषेसाठी. आपल्या भविष्यासाठी. आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी.

आमच्याशी संपर्क साधा

a


esahity@gmail.com

आमच्या संपर्कात रहा

www.esahity.com

**9987737237** या क्रमांकावर WhatsApp करून आपले नाव व गाव कळवा व अशीच पुस्तके नियमितपणे मिळवा.